S P E A K | R E A D | W R I T E



# माय मराठी ५
# My Marathi 5

अभ्यासपुस्तक | WORKBOOK FOR COMMUNICATIVE MARATHI




MADHURI PURANDARE JYOTSNA BHIDE
SONALEE GUJAR ZAMEER KAMBLE

UNIVERSITY OF MUMBAI

RAJYA MARATHI VIKAS SANSTHA

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

माधुरी पुरंदरे / MADHURI PURANDARE
ज्योत्स्ना भिडे / JYOTSNA BHIDE
सोनाली गुजर / SONALEE GUJAR
जमीर कांबळे / ZAMEER KAMBLE

# माय मराठी ५
# My Marathi 5

अभ्यासपुस्तक / Workbook for Communicative Marathi

**संपादक / EDITORS**
विभा सुराणा / VIBHA SURANA
संजय कृष्णाजी पाटील / SANJAY KRUSHNAJI PATIL
सोनाली गुजर / SONALEE GUJAR

**संकल्पना आणि निर्मिती / CONCEPT & PRODUCTION**
जर्मन विभाग, मुंबई विद्यापीठ
Department of German, University of Mumbai

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई
**RAJYA MARATHI VIKAS SANSTHA, MUMBAI**

मुंबई विद्यापीठ
**UNIVERSITY OF MUMBAI**

**ISBN No.: 978-93-5407-591-9**

**FIRST EDITION**
**पहिली आवृत्ती**

**क्रिएटिव्ह कॉमन्स ॲट्रिब्यूशन – शेअरअलाईक लायसन्स (CC BY-SA 4.0) ह्याअन्वये उपलब्ध**
**Published under Creative Commons Attribution – ShareAlike License (CC BY-SA 4.0)**

- **प्रकल्प समन्वयक / PROJECT CO-ORDINATOR**
  विभा सुराणा / VIBHA SURANA

- **लेखक / AUTHORS**
  माधुरी पुरंदरे / MADHURI PURANDARE
  ज्योत्स्ना भिडे / JYOTSNA BHIDE
  सोनाली गुजर / SONALEE GUJAR
  जमीर कांबळे / ZAMEER KAMBLE

- **सहलेखक / CO-AUTHOR**
  कृत्तिका भोसले / KRUTTIKA BHOSALE

- **संपादक / EDITORS**
  विभा सुराणा / VIBHA SURANA
  संजय कृष्णाजी पाटील / SANJAY KRUSHNAJI PATIL
  सोनाली गुजर / SONALEE GUJAR

- **संपादकीय मंडळ / EDITORIAL TEAM**
  सुहास लिमये / SUHAS LIMAYE
  मेहेर भूत / MEHER BHOOT
  प्र. ना. परांजपे / P.N. PARANJAPE

- **मराठीसाठी तांत्रिक साहाय्य / TECHNICAL SUPPORT FOR MARATHI**
  वूडस्टॉक स्टुडिओ / WOODSTOCK STUDIO, कन्फ्युशिअस इन्स्टिट्यूट, मुंबई विद्यापीठ / CONFUCIUS INSTITUTE, UNIVERSITY OF MUMBAI
  गुरुनाथ कलमकर (मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ) / GURUNATH KALAMKAR (DEPARTMENT OF MARATHI, UNIVERSITY OF MUMBAI)

- **कला, मांडणी, चित्रे / छायाचित्रे / अक्षर जुळणी**
  **LAYOUT DESIGN / PHOTOS / TYPESETTING**
  नागेश सिरसाल / NAGESH SIRSAL
  प्राची जाधव / PRACHI JADHAV
  शिखा पांडे / SHIKHA PANDEY
  सुभाष गोपाळे / SUBHASH GOPALE

- **प्रकाशन / PUBLICATION**
  मुंबई विद्यापीठ / UNIVERSITY OF MUMBAI
  राज्य मराठी विकास संस्था, मुंबई / RAJYA MARATHI VIKAS SANSTHA, MUMBAI

- **ई-पत्ता / E-MAIL**
  rmvs_mumbai@yahoo.com
  deptofgerman@mu.ac.in

- **संकेतस्थळ / WEBSITE ADDRESS**
  https://www.learn-marathi.com, www.mu.ac.in
  www.rmvs.marathi.gov.in

Online access link: https://mu.ac.in/mymarathi5

**TEXTBOOK, WORKBOOK AND AND AUDIOVISUALS ₹ 1250 | $ 25 | € 20**

# प्रस्तावना

भारतीय अन्यभाषक, त्याचप्रमाणे परदेशी तरुण आणि प्रौढ व्यक्तींना मराठी भाषा शिकण्यासाठी 'माय मराठी' हे पाचव्या पातळीचे पुस्तक आहे. सर्वसमावेशक सामग्रीतून संवादात्मक, कृतिशील आणि निर्मितिक्षम अशा पायाभूत आधारावर ह्या अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे. मराठी भाषेचे काटेकोर पण परिणामकारक अध्ययन करण्याकरता हा एक अद्ययावत पद्धतीने भाषा शिकवण्याचा प्रयत्न आहे. विद्यार्थ्यांना आकलन, संवाद, वाचन तसेच लिखाण यांद्वारे मराठी भाषेचा योग्य रीतीने आणि परिणामकारक वापर कसा करावा याचे शिक्षण दिले जाते.

ह्या अभ्यासक्रमाच्या अध्यापन सामग्रीत प्रामुख्याने दोन पुस्तके आहेत, १) पाठ्यपुस्तक : पाठ, ध्वनिमुद्रित उताऱ्यांचे लिखित मजकूर, मराठी - इंग्रजी आणि हिंदी, असा शब्दसंग्रह आणि विनामूल्य दृक्श्राव्य सामग्री यांसहित आणि २) अभ्यासपुस्तक : सराव, चाचणी, आणि उत्तरसंच यांसहित.

'माय मराठी, पातळी ५'च्या ह्या खास पाठ्यपुस्तकात विषयानुरूप छायाचित्रे, रेखाचित्रे, मजकूर, कविता आणि गाणी, म्हणी आणि वाक्प्रचार, व्याकरण, 'करा आणि शिका' स्वाध्याय आहेत. तसेच खेळाद्वारे शिकवणी, समर्पक अर्कचित्रे, शब्दसंपदेवरील दृष्टिक्षेप, पाठ्यपुस्तक आणि अभ्यासपुस्तक यांच्याबरोबर सराव करण्यास उपयुक्त अशा ध्वनिफिती आणि चित्रफिती, ध्वनिफितींचे अनुलिखित उतारे व शब्दसंग्रह आहेत. दुव्यावर उपलब्ध आहेत. ग्लॉसरी किंवा शब्दसंग्रहात कठीण शब्दांची लिंगानुसार, वचनांनुसार आणि सामान्यरूपांनुसार विस्तृत माहिती समाविष्ट केलेली आहे. तसेच सर्वच धड्यांची रचना विद्यार्थ्यांना समजेल अशी आहे.

'माय मराठी पातळी ५'च्या अभ्यासपुस्तकात १) पाठ्यपुस्तकातील प्रत्येक पाठावरील स्वाध्याय आहेत. त्यासोबतच २) मागील भागात या पाठावरील चाचणी, ३) प्रत्येक दोन पाठांसाठी चाचणी प्रश्नावली, शेवटी ४) संपूर्ण पातळी ५च्या अभ्यासक्रमाची एकत्रित चाचणी आणि ५) उत्तरे यांचा समावेश आहे.

संवादात्मक मराठीच्या पातळी ५चा संपूर्ण अभ्यासक्रम म्हणजे साधारणपणे १६० तासांची शिकवणी आहे. तथापि, ह्याचे अध्यापन करताना शिक्षकाला ह्यातील प्रत्येक पाठासाठी साधारणपणे १६ तासांचा अवधी लागेल. ह्या सामग्रीत सराव आणि चाचणीसाठी पुरेशी सामग्री समाविष्ट केलेली असली, तरी प्रत्यक्ष शिकवताना संबंधित शिक्षकाला अभ्यासक्रमाव्यतिरिक्त अवांतर माहितीही द्यावी लागणार आहे. विद्यार्थ्यांसाठीही एक सूचना आहे की, योग्य तऱ्हेने मराठी बोलण्यासाठी त्यांनी एकवचन, अनेकवचन, सामान्यरूप तसेच लिंगानुसार नामांचा अभ्यास करण्याचा सराव करावा. सदर पुस्तके ही वर्गात शिक्षकांकडून समजून घेऊन शिकण्याच्या स्वरूपाची असली, तरी स्वयं-अध्ययन करणाऱ्यांना दिलेल्या सामग्रीतील विस्तृत शब्दसंग्रहाच्या आधारे ती समजून घेऊन शिकता येईल.

ह्या अध्यापन सामग्रीसोबत दृक्‌श्राव्य सामग्रीचा दुवा विनामूल्य देण्यात येत आहे, कारण हा प्रकल्प पूर्णपणे शैक्षणिक तत्त्वावर राबवला जात आहे. भाषा परिपूर्णपणे शिकण्यास मदत व्हावी ह्या हेतूने श्राव्य ध्वनिफिती तसेच निरनिराळ्या माध्यमांतून निवडलेल्या वैविध्यपूर्ण दृक्‌श्राव्य चित्रफिती समाविष्ट केल्या आहेत. शिक्षकांनी सुचवलेल्या उत्तरांसहची लेखी प्रश्नावली घेताना, तसेच इतर प्रश्नोत्तरांच्या वेळी ह्या दृक्‌श्राव्य सामग्रीची मदत घेणे अपेक्षित आहे. दृक्‌श्राव्य सामग्री आणि पूर्ण पाठ्यपुस्तक व अभ्यासपुस्तक या दुव्यावर उपलब्ध आहे.

हा अभ्यासक्रम शिकवणाऱ्या शिक्षकांसाठी असा सल्ला आहे की, त्यांनी शिक्षकांसाठी असणाऱ्या संवादात्मक भाषा-अध्यापनाच्या प्रशिक्षण वर्गांना उपस्थित राहावे; तसेच, ह्या संदर्भात त्यांनी संपादकांशी वा राज्य मराठी विकास संस्थेशी संपर्क साधावा.

प्रकल्पातील इथवरची ही अध्यापनसामग्री तयार करण्यासाठी कष्ट घेऊन हे सारे पूर्णत्वास नेण्यास साहाय्य करणाऱ्या सर्वांचे आभार.

इंग्लिश आणि जर्मनप्रमाणे मराठीदेखील संपन्न आणि पूर्वपरंपरा असणारी इंडो-युरोपियन भाषा आहे. ह्या भाषेचे अध्ययन करून त्यात सर्वसामान्य निजभाषकाइतके प्रभुत्व येण्याकरता किमान ६ पातळ्यांची, म्हणजेच अंदाजे ८०० तासांची, आवश्यकता आहे.

या कामात बहुमोल साहाय्य करणाऱ्या राज्य मराठी विकास संस्थेचे अधिकारी आणि कर्मचारी यांचे आम्ही आभारी आहोत.

कुलगुरू सुहास पेडणेकर आणि प्र-कुलगुरू रवींद्र कुलकर्णी यांच्या नेतृत्वासह कार्यशील अशा मुंबई विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांचे, तसेच हा प्रकल्प सुरळीत चालण्यासाठी साहाय्य करणाऱ्या सर्वांचे आम्ही अत्यंत आभारी आहोत.

विभा सुराणा, संजय कृष्णाजी पाटील आणि सोनाली गुजर
संपादक

# Preface

My Marathi Level 5 is a Marathi course book particularly meant for non-native teens and adults, for both Indian and foreign Marathi language learners. It is prepared using an integrated communicative, task and production-based approach. It is a modest attempt to apply latest language teaching tools to facilitate the learning of the Marathi language systematically and effectively. It teaches the learners to communicate correctly and effectively in Marathi by imparting understanding, speaking, reading as well as writing skills.

This course material consists of two books, namely 1) a textbook along with audio transcripts, a glossary and free audiovisual material and 2) a workbook with exercises, tests, and answer keys. This entire material is available on the following link - https://mu.ac.in/mymarathi5

This particular textbook of 'My Marathi Level 5' consists of units such as thematic images and illustrations, texts, poems and songs, idioms and proverbs, grammar, 'do and learn' exercises, learning games, cartoons, audio-visual and audios components with exercises and transcripts, vocabulary overview (drishtikshep) per chapter, as well as learner self-evaluation in all chapters. The glossary or shabdasangraha gives a detailed list of new words with their gender in singular and plural forms as well as their oblique forms. English and Hindi word meanings are given.

The workbook of 'My Marathi Level 5' consists of 1) exercises for each chapter as well as the following tests 2) a comprehensive test for level 4 after mageel bhagat, 3) a test after every two chapters 4) a comprehensive test for level 5 and 5) answerkeys.

The entire Communicative Marathi Level 5 course is designed for approximately 160 teaching hours. Thus, the teacher may take about 16 hours for each of the 10 chapters. Though enough exercises and tests have been given, the teacher is expected to give more exercises as and when required. The learners are advised to learn the nouns along with their gender with singular and plural forms as well as the oblique forms in order to learn to speak correct Marathi. Though the book is meant for classroom teaching, self-learners too can make use of it with the help of the glossary.

The audio-visual content available on the link comes free with the book and is meant purely for educational purpose. It consists of the audio section and a wide spectrum of audiovisual clips from the media which have been collated in accordance with the language proficiency level of the learners. The teachers are expected to use audio-visual material along with specific MCQs and other questions (written & oral).

The teachers using this book are advised to undergo rigorous teachers' training for the integrated communicative approach and may contact the editors or Rajya Marathi Vikas Sanstha for the same. We are extremely thankful to the entire team for making this level happen.

Like English and German, Marathi too is a rich Indo-European language with a long tradition and similarly requires at least 6 levels of language learning, i.e. approximately 800 hours for near native language proficiency.

We are extremely thankful to the employees of Rajya Marathi Vikas Sanstha for their valuable cooperation.

We thank the authorities of the University of Mumbai led by the Vice Chancellor Dr. Suhas Pednekar and Pro-Vice Chancellor Dr. Ravindra Kulkarni to facilitate the smooth running of this project.

Vibha Surana, Sanjay Krushnaji Patil and Sonalee Gujar
Editors

## आभार | Acknowledgement

Abhijeet Ranadive

Amit Varandekar

Ashish Sawant

Ashwini Mane

Bharati Nirgudkar

Disha Gudulkar

Gauri Brahme

Geeta Bhagwat

Gurudutt Kamath

Kamala Ganesh

Kavya Chintala

Manasi Sawant

Neha Thombare

Nishka Pradhan

Pradnya Dalvi

Priyanka Katkar

Ravindra Kulkarni

Sadhana Gore

Shrikant Pathak

Shweta Redekar

Sonal Atre

Suhas Pednekar

Sunanda Mahajan

Suparna Kulkarni

### Permission for copyrights

Amruta Subhash
(with Rajahans Prakashan, Pune)

Arun Khopkar

Chandrashekhar Kulkarni
(for V. M. Kulkarni)

Continental Prakashan
(for Kusumagraj)

D. B. Dhamnaskar

Dr. Ajit Padgaonkar
(for Mangesh Padgaonkar)

Gauri Brahme

Girish Kuber (Loksatta) /
Rajiv Khandekar

Girish Kulkarni

Hemant Jogalekar

Maharashtra Rajya Sahitya Ani
Sanskruti Mandal
(for Namadev Dhasal)

Majestic Publishing House

Manoj Rege (for P. S. Rege)

Maxin Bernsten

Meena Chandavarkar
(for Bhaskar Chandavarkar)

Mehta Publishing House
(for Tara Bhawalkar, Geeta Sapre)

Mirasdar Pratishthan
(for D. M. Mirasdar)

Mouj Prakashan

Nandatai Paithankar
(for G. A. Kulkarni)

Nivrutti Khanolkar
(for Aarati Prabhu /
C. T. Khanolkar)

Parchure Prakashan

Popular Prakashan

Pras Prakashan
(for Arun Kolatkar)

Prashant Kulkarni

Rahul Gadpale
(from Sakal newspaper for
Rajeshri Kshirsagar)

Rajendra Pai
(for Aacharya P. K. Atre)

Rajiv Naik

Ramesh Panase

S. D. Phadnis

Sandeep Khare

Shriniwas V. Kulkarni

Sumitra Madgulkar
(for G. D. Madgulkar)

Vasant Aabaji Dahake

Vasant Patankar

Vijay Prakashan


Yashawant Manohar

(Disclaimer : Apart from the above names, heirs of Sadanand Rege, Shanta J. Shelke, Sopandev Chaudhari, V. D. Ghate & R. K. Joshi could not be reached in spite of many attempts. Similarly, Ashwini Gawade & N. D. Mahanor could not be contacted in spite of our best efforts. University of Mumbai, Rajya Marathi Vikas Sanstha and editors of this book have no intention of evading their copyright in any way. If and when contact with them is possible, we / editors will seek their permission.)

# अनुक्रमणिका


| पाठ | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | मागील भागात | १० |
| | चाचणी | २९ |
| १ | खेळ आणि आरोग्य | ३५ |
| २ | पेहराव / सौंदर्य / फॅशन | ५१ |
| | चाचणी – पाठ १ - २ | ६६ |
| ३ | हास्यतरंग | ७१ |
| ४ | हे विश्वचि माझे घर! | ८७ |
| | चाचणी – पाठ ३ - ४ | १०२ |
| ५ | मराठी भाषा - विविध पैलू | १०६ |
| ६ | समारंभ (हर्षोल्हास) | १२३ |
| | चाचणी – पाठ ५ - ६ | १४२ |
| ७ | मन मनास उमगत नाही... | १४६ |
| ८ | कवितेच्या प्रांतात | १६० |
| | चाचणी – पाठ ७ - ८ | १७९ |
| ९ | जडणघडण | १८२ |
| १० | पाणी | २०२ |
| | चाचणी – पाठ ९ - १० | २१९ |
| | अंतिम परीक्षा | २२३ |
| | उत्तरसंच | २४० |

# मागील भागात



## उजळणी करू या...

- भाषा, शिक्षणाचे माध्यम, भाषेचे संवर्धन
- समरूप शब्द
- काळ, धातू + आयला / ऊ / त
- प्रयोजक व शक्य क्रियापदे
- कर्तरी व कर्मणी प्रयोग
- जो/जे, तो/ते, तर/तरी
- तुलनादर्शक शब्द
- क्रमसूचक शब्द
- वाक्यरचना
- क्रियापद-नाम

## १ काळ – वेळ

**आज २ जानेवारी, बुधवार असेल तर?**

(परवा, तेरवा, काल, ~~आज~~)

| | | |
|---|---|---|
| १. जानेवारी<br>-------------------<br>मंगळवार होता. | २. जानेवारी<br>आज बुधवार आहे. | ३. जानेवारी<br>-------------------<br>गुरुवार आहे. |
| ३१. डिसेंबर<br>-------------------<br>सोमवार होता. | १. जानेवारी<br>आज मंगळवार आहे. | ४. जानेवारी<br>-------------------<br>शुक्रवार आहे. |
| ३०. डिसेंबर<br>-------------------<br>रविवार होता. | ३१. डिसेंबर<br>आज सोमवार आहे. | ५. जानेवारी<br>-------------------<br>शनिवार आहे. |

**क. कधी? / केव्हा?**

उदा॰ सोमवार – सोमवारी

(अ) मंगळवार – -------------------- (आ) बुधवार – -------------------- (इ) गुरुवार – --------------------

(ई) शुक्रवार – -------------------- (उ) शनिवार – -------------------- (ऊ) रविवार – --------------------

**ख. कंसातील शब्दांचा योग्य वापर करून रिकाम्या जागा भरा.**

(सोमवार – मंगळवार – बुधवार)

**अस्मिता** : तुमच्या शहरात सगळीकडे रोज शेतकरी बाजार भरतो का?

**अमन** : नाही. आमच्याकडे दर सोमवार / सोमवारी असतो, शेजारच्या गंज पेठेत दर मंगळवार / (अ) --------------------, आणि पुढे लोहियानगरमध्ये दर (आ) -------------------- / बुधवारी.

**अस्मिता** : अच्छा, म्हणजे सोमवारी / सोमवारचा तुमच्याकडे, मंगळवारी / (इ) -------------------- गंज पेठेत आणि (ई) -------------------- / बुधवारचा लोहियानगरमध्ये.



**ग. कंसातील शब्दांचा योग्य वापर करून रिकाम्या जागा भरा.**

(सोमवार – मंगळवार – बुधवार)

**अमन** : तुमच्या शहरात सगळीकडे कचरा उचलणारी गाडी दररोज येते का?

**अस्मिता** : नाही. आमच्याकडे दर (अ) ------------ / ------------ येते, शेजारच्या गंज पेठेत दर (आ) ------------ / ------------, आणि पुढे लोहियानगरमध्ये दर (इ) ------------ / ------------.

**अमन** : अच्छा, म्हणजे सोमवारी / सोमवारची तुमच्याकडे, (ई) ------------ / ------------ गंज पेठेत आणि (उ) ------------ / ------------ लोहियानगरमध्ये.

तो बाजार : दर सोमवार / दर सोमवारी / सोमवारी = सोमवारचा
ती गाडी : दर सोमवार / दर सोमवारी / सोमवारी = सोमवारची

**घ. कंसातील शब्दाचा योग्य वापर करून रिकाम्या जागा भरा.**

(रविवार)

**आई** : अमन, आज चक्क रविवारी / (अ) ------------ सुट्टीच्या दिवशी अभ्यासाला बसलायस?

**अमन** : हो. तूच म्हणत होतीस ना, मी रविवारी / (आ) ------------ कधीच अभ्यास करत नाही म्हणून? आता मी दर (इ) ------------ अभ्यासाला बसायचं, असं ठरवलंय.




**च. कंसातील शब्दांचा योग्य वापर करून रिकाम्या जागा भरा.**

(रविवार)

**आई** : अस्मिता, आज चक्क रविवारी / (अ) ------------ सुट्टीच्या दिवशी अभ्यासाला बसलीयस?

**अस्मिता** : हो. तूच म्हणत होतीस ना, मी रविवारी / (आ) ------------ कधीच अभ्यास करत नाही म्हणून? आता मी दर (इ) ------------ अभ्यासाला बसायचं, असं ठरवलंय.



**छ. सोमवार – सोमवारी – सोमवारचा**

| सोमवार | दर सोमवारी | सोमवारचा |
|---|---|---|
| सकाळ | रोज सकाळी | ए॰व॰ : सकाळचा / सकाळची / सकाळचे<br>अ॰व॰ : सकाळचे / सकाळच्या / सकाळची |
| पहाट | रोज पहाटे | ए॰व॰ : पहाटेचा / पहाटेची / पहाटेचे<br>अ॰व॰ : (अ) ---------- |
| दिवस | रोज (आ) ---------- | ए॰व॰ : (इ) ----------<br>अ॰व॰ : (ई) ---------- |
| रात्र | रोज (उ) ---------- | ए॰व॰ : (ऊ) ----------<br>अ॰व॰ : (ए) ---------- |

**ज. कंसातील शब्दाचा योग्य वापर करून रिकाम्या जागा भरा.**



**बाबा** : काय रे, (अ) (रात्र) ---------- तू पाहत होतास तो सिनेमा कोणता? चांगला होता ना?

**मुलगा** : अहो, कमाल कथा होती. तुम्ही नक्की पाहा. काल पूर्ण (आ) (रात्र) ---------- विचार करत होतो त्या कथेबद्दल.

**बाबा** : आता कधी पाहायला मिळणार?

**मुलगा** : आज (इ) (दुपार) ----------! (ई) (रात्री) ---------- सिनेमा हल्ली पुन्हा (उ) (दुपार) ---------- दाखवतात.

## २ परिणामवाचक : म्हणून = त्यामुळे = सबब = यास्तव = जेव्हा-तेव्हा

**क. पुढील वाक्यांतील चूक अधोरेखित करून वाक्ये दुरुस्त करा.**

उदा॰ माणिकने पुन्हा अंघोळ केली म्हणून तो चिखलात घसरला.
माणिकने पुन्हा अंघोळ केली म्हणून तो चिखलात घसरला.
माणिक चिखलात घसरला म्हणून त्याने पुन्हा अंघोळ केली.

अ. सॉरी सर, मला उशीर झाला, सबब आज बस पंक्चर झाली होती.

----------------------------------------

आ. आमची आजी फेसबुकवर कायम पडीक असते, याकरिता आपला वेळ चांगला जावा.

----------------------------------------

इ. उर्दू भाषेचे संवर्धन व्हावे यास्तव अनेक कॉलेजांनी एकत्र येऊन मुशायऱ्याचे आयोजन केले.

ई. तुमची सर्व खाजगी माहिती हॅक होते, जेव्हा फसव्या ई-मेलला तुम्ही उत्तर देता.

उ. राजीवने घरच्या सगळ्यांवर आपल्याला उठवण्याचं काम सोपवलं आहे. त्यामुळे गजर वाजतो तरी त्याला सकाळी जाग येत नाही.

ऊ. यास्तव कोणास संशय येऊ नये, राजाने फकिराचा वेष करून स्वतः राज्यात जाऊन प्रजेची विचारपूस केली.

ए. मी संवादांना चाल लावतो म्हणून मला संवाद पाठ होत नाहीत.

ऐ. शेतकरी हवालदिल झाले आहेत, त्यामुळे सरकारने कर्जमाफीची अंमलबजावणी केली नाही.

म्हणून, त्यामुळे, यास्तव, सबब ह्या सर्व शब्दांचा अर्थ एकच असला तरी 'यास्तव' आणि 'सबब' ह्या शब्दांचा वापर कमी केला जातो.

## ३ कर्ता आणि कर्म

**क. पुढील वाक्ये भूतकाळात लिहा आणि क्रियापद कर्त्याप्रमाणे बदलले आहे की कर्माप्रमाणे, ते रकान्यात ✓ खूण करून दाखवा.**

| | | कर्त्याप्रमाणे | कर्माप्रमाणे |
|---|---|---|---|
| अ. थांब जरा, ही माझी पर्स आहे! | अ. | | |
| आ. मला आज बरं वाटत नाहीये. | आ. | | |
| इ. चहा मस्त झालाय. | इ. | | |
| ई. आलोक बाटलीत पाणी भरतो. | ई. | | |
| उ. बाबांचे गुडघे खूप दुखताहेत. | उ. | | |
| ऊ. चंदा अगदी तिच्या बहिणीसारखी दिसते. | ऊ. | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ए. कलाबाई रांगोळीत रंग भरतात. | ए. | | |
| ऐ. हा ड्रेस तुला चांगला दिसत नाही. | ऐ. | | |
| ओ. सूर्य पहाटे साडेपाच वाजताच उगवतो. | ओ. | | |
| औ. हे लोणचे उन्हात ठेवल्यामुळे चांगले मुरते. | औ. | | |
| अं. सिगरेट का ओढतोस रे? | अं. | | |

**ख. पुढील वाक्यांमध्ये कर्माचे दोन पर्याय ठळक केले आहेत. त्यातील योग्य तो पर्याय वापरून वाक्य पुन्हा लिहा.**

अ. आजी रोज पहाटे **सगळे लवकर उठवते** / **सगळ्यांना लवकर उठवते** आणि स्वतः सगळ्यांसाठी **चहाला करते** / **चहा करते.**

आ. मनजीतने **बायकोला बोलावले** / **बायको बोलावली. तिला म्हणाला** / **ती म्हणाला,** “बाहेर जायचंय, लवकर आटप.”

इ. आरती घरात आली, तिने **तोंड धुतले** / **तोंडाला धुतले, केस पुसले** / **केसांना पुसले** आणि **कपड्यांना बदलले** / **कपडे बदलले.**

ई. आज आधी सर्व **ईमेल्सची उत्तरं पाठवते** / **ईमेल्सच्या उत्तरांना पाठवते** आणि मगच अभ्यास बसते / अभ्यासाला बसते.

उ. माझे मित्र दर वर्षी न चुकता माझ्या वाढदिवशी **फोन करतात** / **फोनला करतात** आणि मला **शुभेच्छा देतात** / **शुभेच्छांना देतात.**

ऊ. मांजर **शिडी चढते** / **शिडीला चढते,** कुंडीतल्या रोपट्यांची **पाने खाते** / **पानांना खाते, तिला रागावले** / **ती रागावली** की पळून जाते.

ए. आज पंतप्रधान येणार म्हणून सरकारी कर्मचाऱ्यांनी **रस्ते झाडले** / **रस्त्यांना झाडले,** काहींनी **रांगोळ्यांना काढले** / **रांगोळ्या काढल्या, तर काहींनी निदर्शने केली** / **निदर्शनांना केले.**

## ४ जिगीषा आणि मनीषा

**क. खालील उताऱ्यातील रिकाम्या जागा भरा.**

(इतका, तिच्याइतकीच, जास्त, इतक्या, तशाच, त्याप्रमाणे, इतकं, त्याहून जरा जास्तच, इतकी, तितक्याच, जशा, असा, जितक्या, ज्याप्रमाणे)



जिगीषा आणि मनीषा सख्ख्या बहिणी. अगदी पाठीला पाठ लावून आलेल्या, आवळ्या-जावळ्या. दिसायलाही इतक्या सारख्या, की जुळ्याच वाटाव्यात. दोघी (अ) ------------ रूपवान होत्या (आ) ------------ गुणवानही होत्या. शाळेत असल्यापासूनच त्यांच्यातील चमक दिसून येत होती. कोणत्याही गोष्टीचा त्या दोघीही (इ) ------------ ध्यास घेत, की (ई) ------------ लहान वयात इतर कोणीही घेतला नसेल. बरं, प्रत्येक गोष्ट त्या अगदी जोडीनं करत आणि न ठरवताच त्या गोष्टी एकमेकींना अगदी पूरक ठरत असत. म्हणजे (उ) ------------ सहजतेने जिगीषा चित्रं काढत असे, (ऊ) ------------ सफाईनं मनीषा त्यात रंग भरत असे. दोघींनीही शाळेतच क्रिकेट खेळायला सुरुवात केली. जिगीषानं फलंदाज व्हायचं ठरवलं आणि त्यासाठी खूप मेहनत केली. (ए) ------------, किंबहुना (ऐ) ------------ मेहनत मनीषानं गोलंदाज व्हायला केली. शाळेच्या क्रिकेट टीमचं नाव त्यांनी मोठं केलं.

मोठेपणी दोघींनीही वेगवेगळ्या क्षेत्रांत नाव कमावलं. जिगीषानं (ओ) ------------ शास्त्रोक्त संगीतात नाव कमावलं, (औ) ------------ पार्श्वगायन क्षेत्रात एक उत्कृष्ट पार्श्वगायिका म्हणून ती प्रसिद्धीस आली. मनीषाला (अं) ------------ चांगला गळा नव्हता, तर तिनं तबलावादक म्हणून मोठं नाव मिळवलं.

असं म्हटलं जातं, की सख्ख्या भावंडांतच (अः) ------------ चुरस असते, हेवा-दावा असतो. पण ह्या दोघींनीही एकमेकींवर आयुष्यभर (अ) ------------ प्रेम केलं आणि एकमेकीला (आ) ------------ साथ दिली, की त्यांच्या कुटुंबात आणि परिवारात अजूनही आदर्श बहिणी म्हणून त्यांचा दाखला दिला जातो.

**ख. कंसात दिलेल्या पर्यायांचा योग्य वापर करून वाक्ये पूर्ण करा. प्रत्येक पर्याय एकदाच वापरावा.**

(~~इतके~~, तशीच, तसेच, जणू, तितक्या, तसा, तेवढीच, त्या प्रकारे, त्याप्रमाणे)

उदा. माझी बहीण गणितात फार हुशार आहे. आमच्या घरात तिच्याइतकं गणितात कोणीच हुशार नाहीये.

अ. माझ्या प्रश्नाचे उत्तर सरांनी ज्या प्रकारे दिले, ------------------------------------------------

------------------------------------------------

आ. हे पुस्तक जसे उत्तम आहाराबद्दल माहिती देते, ------------------------------------------------

------------------------------------------------

इ. हे बघ, मी लिहून दिलेली पाककृती नीट वाच आणि ------------------------------------------------

------------------------------------------------

ई. ज्याप्रमाणे तुझ्या वडिलांनी राजकारणात नाव कमावले, ------------------------------------------------

------------------------------------------------

उ. तू माझ्याकडे असं बघतेयस, ------------------------------------------------

------------------------------------------------

ऊ. माझी आई जेवढी शिस्तप्रिय आहे, ------------------------------------------------

------------------------------------------------

ए. ह्या मॉलमध्ये जितक्या सोयी उपलब्ध आहेत, ------------------------------------------------

------------------------------------------------

ऐ. एखाद्या पटाईत चोराने चोरी करावी, ------------------------------------------------

------------------------------------------------

## ५ उद्देशार्थक काळ

**क. उदाहरणाप्रमाणे उद्देशार्थक काळ वापरून संवाद लिहा.**

उदा॰ (राधिका – मुंबईला जाणे)

# : राधिका कुठे आहे?
@ : अरे, ती आज पहाटेच मुंबईला गेली.
# : पण ती तर काल जाणार होती ना?
@ : हो, परवा ती मलाही म्हणाली होती, ‘आई, मी कदाचित उद्या मुंबईला जाणार आहे.’ पण काल दुसरं काहीतरी काम आलं, म्हणून तिला जाता आलं नाही.

अ. बॉस – काल संध्याकाळी / कामानिमित्त बाहेरगावी जाणे
आ. बाबा – आज पहाटे / मित्राला भेटायला नाशिकला जाणे

**ख. उदाहरणाप्रमाणे उद्देशार्थक काळ वापरून संवाद लिहा.**

उदा॰ (तयार होणे)

# : हे काय? तू अजून तयार झाली नाहीस?
@ : अरे, मी तयार होणारच होते, पण तेवढ्यात आईचा फोन आला. आई म्हणाली, मी आता घरी येणार आहे. तिच्यासाठी स्वयंपाक करत बसले, त्यामुळे मी कशी तयार होणार होते?



अ. अभ्यास करणे आ. फोन करणे इ. जेवून येणे
ई. पुस्तक वाचणे उ. बाबांना सांगणे ऊ. सिगरेट सोडणे

**ग. उदाहरणाप्रमाणे उद्देशार्थक काळ वापरून संवाद लिहा.**

उदा॰ (संजय – प्रबंध सबमिट करणे)

# : मला वाटलं, संजयनं त्याचा प्रबंध आज सबमिट केला असेल.

@ : खरं तर तो कालच करणार होता, मला म्हणालाही होता, की आज मी माझा प्रबंध सबमिट करणार आहे. पण प्रबंध प्रिंट करत असताना त्याच्या लक्षात आलं, की काही पानं गायब आहेत. ती पानं पुन्हा शोधून, प्रिंट करून शेवटी आज त्यानं सबमिट केला.

अ. (ती – माझ्याशी बोलणे) आ. (आई – मला पैसे देणे)

इ. (रवी – माझी मदत घेणे) ई. (तो – मलाही सोबत नेणे)

**घ. उदाहरणाप्रमाणे उद्देशार्थक काळ वापरून संवाद लिहा.**

उदा॰ (समीर – भेटणे – विसरणे)

# : काल समीर मला भेटणार होता, त्याचं काय झालं? दरवेळेला टांग मारतो हा मुलगा.

@ : तू चुकतोयस. तो आज भेटणार आहे तुला.

ती – सिनेमाचं तिकिट काढणे

तो – खरेदी करायला जाणे

आपण – पार्टी करणे

ते (अ॰व॰) – अमेरिकेला जायला निघणे

तू – स्वयंपाक करणे

तू – गाणं शिकवणे

तुम्ही – अर्ज देणे

तुम्ही – ईमेल करणे



## ६ एकच क्रियापद – अनेक रूपे

**क. कंसातील क्रियापदांचे योग्य रूप वापरून रिकाम्या जागा भरा.**

**अ. (करायला, करण्यापूर्वी, केल्याने, करताना, करावा)**

नियमित व्यायाम करण्याचा सल्ला सगळेच जण अमलात आणतात असं नाही. एरोबिक व्यायाम (१) ---------------- सुद्धा तो योग्य प्रमाणात व योग्य तितका वेळच (२) ---------------- हवा. हृदयरोग्यांनीच नव्हे, तर सर्वांनीच एरोबिक व्यायाम (३) ---------------- काही गोष्टी लक्षात ठेवाव्यात. व्यायाम किती वेळ, किती जोमाने आणि कसा (४) ---------------- या सर्व गोष्टी ठरवताना व्यायामामुळे होणारे फायदे आणि अतिरेक (५) ---------------- हृदयावर, स्नायूंवर होणारे विपरीत परिणाम, यात समन्वय साधणे अत्यावश्यक असते.

**आ. (द्यायचा, देणारा, दिल्यानंतर, देत, देते)**

मी व्यवसायाने वकील आहे, तेव्हा ऑफिसला येणाऱ्या प्रत्येक अशिलास भाडेकरूविषयी मी नेहमी सल्ला (१) ---------------- असते; परंतु त्यांच्याकडून नेहमीची उत्तरे मिळतात : भाडेकरू आमच्या ओळखीचा आहे, भाडेकरू आमचा नातलग आहे, वगैरे वगैरे. लिव्ह ॲन्ड लायसेन्सचा करारनामा करून (२) ---------------- मी त्यांच्या सोयीसाठी भाडेकरूची माहिती (३) ---------------- अर्जदेखील सोबत (४) ---------------- आणि तो अर्ज कसा भरून कोठे (५) ---------------- हे सांगूनदेखील घरमालकांत नेहमीच उदासीनता दिसून येते.

**इ. (सांगणे, सांगायला, सांगण्यासाठी, सांगताना, सांगितलेल्या, सांगत)**

आमच्या चाळीत एक गोष्टीवेल्हाळ आजी गोष्टी (१) ---------------------- प्रसिद्ध होती. ती कधीही गोष्ट (२) ---------------------- लागली, की आजूबाजूच्या बाया, पोरंटोरं ओसरीवर येऊन बसत. तिनं (३) ---------------------- गोष्टींमुळे मनोरंजन तर होत असेच; पण शहाणपणही येत असे, कारण कुठलीही गोष्ट (४) ---------------------- आजी मध्येच थांबून लोकांनाच गोष्टीचा पुढचा प्रवास ठरवायला (५) ---------------------- असे. त्यामुळे आम्ही सगळे तिच्या गोष्टी ऐकताना विचारही करत असू.



आता आजीची जागा संगणकाने घेतली आहे. पालकांनी, आजोबा-आजींनी मुलांना गोष्ट (६) ---------------------- हे राहिलंच नाही. पालकांनाच गोष्टी सांगता येत नाहीत. लहानपणी ऐकलेल्या आठवत नाहीत. मुलांना टीव्हीवर कार्टून लावून दिलं म्हणजे प्रश्न मिटतो.

## ७ नाम + क्रियापद जोडी

**क. खालील वाक्ये कंसातील नाम वापरून पुन्हा लिहा. कंसातील नामाला योग्य क्रियापद लावा.**

उदा॰ तो रोज घरी साधारण २० विद्यार्थ्यांना **शिकवतो. (शिकवणी)**
तो रोज घरी साधारण २० विद्यार्थ्यांची शिकवणी घेतो.

अ. राज्याचे मुख्यमंत्री आज येथील आश्रमातल्या अनाथ मुलांना **भेटणार** आहेत. **(भेट)**

----------------------------------------------------------------------

आ. न्यायाधीशांनी विचारलेल्या प्रश्नांवर तो काहीच **उत्तरला** नाही. **(उत्तर)**

----------------------------------------------------------------------

इ. पुढच्या मीटिंगसाठी मी काही **सुचवू** इच्छिते. **(सूचना)**

----------------------------------------------------------------------

ई. तुम्हाला नोकरी द्यायची की नाही, ते **ठरवण्यामध्ये** तुमची अर्हता महत्त्वाची ठरेल. **(निर्णय)**

----------------------------------------------------------------------

उ. या बाबतीत आपल्याला लवकर काहीतरी **ठरवावं लागेल. (निर्णय)**

----------------------------------------------------------------------

ऊ. मंत्रिमहोदय आज वाढत्या महागाईवर **भाष्य करणार आहेत. (भाषण)**

----------------------------------------------------------------------

## ८ प्रयोजक क्रियापद

**क. उदाहरणाप्रमाणे बदल करून वाक्ये पुन्हा लिहा.**

उदा॰ कृषिमंत्र्यांनी दिलेल्या सवलतीमुळे शेतकऱ्यांचा प्रश्न **सुटला.**
कृषिमंत्र्यांनी सवलत देऊन शेतकऱ्यांचा प्रश्न सोडवला.

अ. कोणीतरी ढकलले म्हणून मी खड्ड्यात **पडलो.**



आ. पण शेवटी माझे ओरडणे ऐकून तू लगेच आलास म्हणून मी **वाचलो.**

इ. तुला वाढदिवसाला बोलवायला विसरलो म्हणून मला आईचं किती **ऐकावं लागलं!**

ई. भांडी घासताना आमच्या कामवाल्या बाईंच्या हातून सारखी काचेची भांडी **फुटतात.**

उ. भूसंपादनाचे कित्येक प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांमुळे अजूनही महापालिकेत **लटकले** आहेत.

ऊ. सध्याच्या व्यावसायिक युगातील स्पर्धांमुळे माणसाचा मेंदू **बिघडतो,** असे संशोधन सांगते.

**ख. खालील क्रियापदांचे प्रयोजक रूप लिहा.**

| | | | |
|---|---|---|---|
| पडणे | उदा॰ पाडणे | रंगणे | |
| वाचणे | | फुटणे | |
| संपणे | | बसणे | |
| ऐकणे | | लागणे | |
| लटकणे | | घडणे | |
| बिघडणे | | उडणे | |
| उडणे | | रडणे | |
| हसणे | | पसरणे | |
| झोपणे | | तुटणे | |
| पिणे | | फिटणे | |
| तरणे | | निघणे | |

## ९ प्रश्नशब्द

**क. खालील वाक्यांमध्ये योग्य शब्द वापरून रिकाम्या जागा भरा.**

काय (५), कोणी (२), का (३), किंवा, ना (३), कशी, कोणापाशी, कसले, कधी, कुठे, कशामुळे, केव्हा, कितवं, केवढी, कोण, कितव्यांदा, की, कोणत्या, कशाला, किती

उदा॰ अरे, ही माझी वही हरवली होती! कुठे सापडली तुला?

अ. -------------------- रे, तुला -------------------- सारखी झोप येते अशी? डायबेटीस वगैरे तर झाला नाही -------------------- तुला?

आ. अगं, तू -------------------- आलीस? मी पाहिलंच नाही तुला येताना. आणि -------------------- गं, पुन्हा एकटीच आलीस --------------------? तुझा नवरा -------------------- येणार आहे मला म्हातारीला भेटायला?

इ. अय्या, हे --------------------? आईबाबांच्या लग्नाचे फोटो! बाबा -------------------- तरुण दिसताहेत! आणि आई -------------------- सुंदर!

ई. आज आमचा वर्ग घ्यायला -------------------- तरी नवीन शिक्षिका येणारेय म्हणे. देव जाणे --------------------असेल, -------------------- असेल?

उ. मी तुला -------------------- तीच गोष्ट सांगते आहे? मी म्हटलं ना, मला तुझं हे वागणं मुळीच आवडत नाही.

ऊ. पुढच्या आठवड्यात तुझा वाढदिवस आहे --------------------? तुझ्यासाठी -------------------- आणू? पुस्तक -------------------- एखादी गाण्याची सीडी? -------------------- तुला बाहेर नेऊ जेवायला?

ए. दादा, तुम्ही सांगितलेला पत्ता पुन्हा समजावून सांगता --------------------? बँक नेमकी -------------------- दिशेला आहे?

ऐ. # अरे, तुला -------------------- सांगितलं ताटं उचलून ठेवायला?
* सांगायला -------------------- लागतंय? मी -------------------- पाहुणा आहे -------------------- या घरात?

ओ. अगं, -------------------- सांगू! घरात मी एकटीच असते मुलाला सांभाळायला. शेजाऱ्यापाजाऱ्यांशी साधी ओळखसुद्धा नाही, मग -------------------- ठेवायचं मुलाला? त्यापेक्षा तूच -------------------- येत नाहीस माझ्या घरी?

औ. हे -------------------- चॉकलेट आहे तुझं? बस झालं हं आता!

**ख. खाली काही विधाने आहेत. त्यांना अनुसरून जास्तीत जास्त प्रश्न विचारा आणि प्रतिसाद द्या.**



उदा॰ माझ्या मित्राला गंभीर दुखापत झालीय.
काय? कशी झाली दुखापत? काय झालं नेमकं? आता तो कुठंय? तू बरायस ना? तुला काही झालं नाही ना? त्याच्या घरच्यांना कळवलं का?

अ. माझे आजोबा खूप आजारी आहेत.

आ. आमचं लग्न आता होणार नाहीये.

इ. तिच्याकडे एक पैसा शिल्लक राहिलेला नाही.

ई. तो शाळेला न जाता सिनेमाला जातो.

उ. मला रक्षकांनी मॉलमध्ये शिरूच दिलं नाही.

ऊ. आमच्या मुलांना खेळायला आवडतच नाही.

ए. गावामध्ये वीज नाहीये.

ऐ. चाळीत पाणी येत नाहीये.

ओ. गाडी चालवता चालवता त्याचा डोळाच लागला.

औ. हल्ली ती फक्त दोनदाच जेवते.

**ग. तुम्हाला खालीलपैकी एक शिबिर घ्यायचे आहे. इच्छुक उमेदवारांसाठी एकूण १० प्रश्नांची एक प्रश्नावली तयार करा.**

अ. अभिनय

आ. आयुर्वेद

इ. डायबेटीस आणि आहार

ई. चित्रकला

उ. नृत्य




उदा॰ तुमचे संपूर्ण नाव? तुमचा पत्ता? तुम्हाला ह्या शिबिराविषयीची माहिती कुठून मिळाली?

## १० उभयान्वयी अव्यये

**क. खालील उतारे नीट वाचा आणि कंसातील योग्य उभयान्वयी अव्यय वापरून रिकाम्या जागा भरा.**

अ. (तर, पण, किंवा, अन्, तरी, तेव्हा, की, म्हणून, आणि)



अचानक मध्यरात्री मधमाशीला जाग आली (१) ---------- पाहते (२) ---------- काय! तिचं एका माणसात रूपांतर झालं होतं. (३) ---------- ती फार दचकली (४) ---------- ताटकन उठून बसली. तिला खात्री होती, (५) ---------- आपल्याला भास झाला असेल (६) ---------- हे स्वप्न असेल, (७) ---------- तिने आपले डोळे चोळले. (८) ---------- स्वतःला आरशात पुन्हा पाहिले (९) ---------- तेच! बिचारीचा खरंच माणूस झाला होता!

आ. (पण, परंतु, कारण, तरी, आणि, पण, का, वा, तर, कारण, तरी, पण, तेव्हा, जरी)



आज कमालच झाली. सकाळी उठल्यावर लक्षात नाही आलं, (१) ---------- कामाला जाताना रस्त्यावरून चालत जात होतो, (२) ---------- अचानक जाणवलं : माझी सावली मला सोडून गेली होती. मी स्वतःला स्पर्श करून पाहिलं. मी (३) ----------होतो, (४) ---------- माझी सावली गायब होती. मी इकडेतिकडे पाहिलं, जागीच बसलो, पुन्हा उठलो (५) ---------- वेड्यासारखा स्वतःभोवती गरगर फिरलो, (६) ---------- माझी सावली काही मला सापडली नाही. आज सकाळीच काही तरी चमत्कारिक घडलं असणार, (७) ---------- काल तर माझी सावली होती. होती म्हणजे असणार, नक्कीच असणार. रोज उठून मी कशाला माझीच सावली बघतोय? (८) ---------- मी (९) ---------- माझी सावली पाहत नसलो (१०) ---------- ती काल नक्की होती, हे मी खात्रीने सांगतो. (११) ---------- ती कशाला मला अशी सोडून जाईल, नाही (१२) ---------- जाऊ दे, कोणाचा कट असो (१३) ---------- भुताटकी असो, मला माझी सावली नसली (१४) ---------- काही फरक पडत नाही.

**ख. वरीलप्रमाणे तुम्हीही उभयान्वयी अव्यये वापरून एक उतारा लिहा.**

----------

----------

----------

----------

----------

----------

## ११ स्वयंपाक

क. खाली स्वयंपाकातील काही कृती दिल्या आहेत. त्या कृतींपुढे योग्य नामांची यादी लिहा.

| | |
|---|---|
| भाजणे | उदा॰ पापड, शेंगदाणे ... |
| उकळणे | |
| चाळणे | |
| फेटणे | |
| कापणे | |
| वाफवणे | |
| मळणे | |
| परतणे | |
| किसणे | |
| आटवणे | |
| कालवणे | |
| मिसळणे | |
| सोलणे | |
| मुरवणे | |
| खवणे | |
| कुटणे | |
| भिजवणे | |
| शिजवणे | |
| चिरणे | |
| तळणे | |
| पाखडणे | |
| लाटणे | |
| उकडणे | |
| ढवळणे | |

| | |
|---|---|
| कुस्करणे | |
| घोटणे | |
| वाटणे | |
| उलथणे | |
| धुणे | |
| घुसळणे | |
| तापवणे | |
| दळणे | |
| कढवणे | |
| आंबवणे | |
| भुरभुरणे | |
| उपसणे | |
| गाळणे | |
| निथळणे | |
| थापणे | |
| ठेचणे | |

## १२ विशेषण

**क. खालील विशेषणांचे / ची जोडविशेषण / जोडविशेषणे लिहा.**

| | | |
|---|---|---|
| निळा – उदा. निळाशार, निळाजर्द | लाल – | काळा – |
| पिवळा – | पांढरा – | हिरवा – |

**ख. खालील वाक्यांमध्ये कंसातील जोडविशेषणाचे योग्य रूप लिहा.**



अ. बरं वाटत नाहीये ना? मग एवढं जड पुस्तक का वाचतोयस? एखादं (हलकाफुलका) ------------------------ पुस्तक वाचावं.

आ. कसल्या (कोराकरकरीत) ------------------------ नोटा आहेत! आत्ताच एटीएममधून आलास वाटतं?

इ. किती बोलशील! अजून काही असेल (उरलासुरला) ------------------------ तर बोलून टाक.

ई. का गं फसवलंस त्या (भोळाभाबडा) ------------------------ पोरीला? फक्त पत्ताच तर विचारत होती ना ती?

उ. ह्या (निळाशार) ------------------------ पाण्यात मनसोक्त डुंबावंसं वाटतंय!

ऊ. तुमची हळद एवढी (पिवळाधमक) ------------------------ कशी?



## १३ वाक्प्रचार आणि म्हणी

**क. खालील वाक्प्रचारांचा वा म्हणींचा वाक्यात उपयोग करा.**

अ. पाणी नाकातोंडात जाईल इतके बुडणे

------------------------------------------------

------------------------------------------------

आ. डोळे भरून येणे

------------------------------------------------

------------------------------------------------

इ. दिवस चढणे

------------------------------------------------

------------------------------------------------

ई. दिवसाची रात्र आणि रात्रीचा दिवस करणे

------------------------------------------------

------------------------------------------------

उ. धरले तर चावते आणि सोडले तर पळते

------------------------------------------------

------------------------------------------------

ऊ. वचावचा बोलणे

---

ए. 'आ' वासून पाहणे

---

ऐ. दिवस फिरणे

---

ओ. दिवसाढवळ्या स्वप्न पाहणे

---

अं. त्रिवेणी संगम

---

अः. डोळे मोठे करणे

---



# तोंडी परीक्षा

## एकूण २० गुण


**१. चित्रवर्णन** **(एकूण १५ गुण)**

**क. कोणतेही एक चित्र निवडा व त्याचे सविस्तर वर्णन करा.** **(५)**









**ख. तुमच्या एखाद्या आवडत्या चित्रपटाबद्दल / पुस्तकाबद्दल / विरंगुळ्याबद्दल सविस्तर सांगा.** **(५)**

**ग. पुढीलपैकी कोणताही एक विषय आपल्या सहाध्यायाशी बोलून निवडा आणि त्याच्या / तिच्याबरोबर वादविवाद करा.** **(१०)**

१. इंटरनेटमुळे चित्रपटगृहे, नाट्यगृहे बंद पडतील.

२. विदेशी खाद्यपदार्थांमुळे भारतीय खाद्यपदार्थ मागे पडतायेत.

३. इंटरनेटमुळे महाविद्यालये आणि विद्यापीठे निरुपयोगी ठरतील.

# लेखी परीक्षा

## एकूण ३० गुण

### १. वाचन आणि आकलन (एकूण १० गुण)

**चित्रपट कसा पाहावा?**

सिनेमा आज आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनून राहिला आहे. पूर्वी बहुधा दर रविवारी टीव्हीवर सिनेमा पाहिला जायचा. तीन-चार महिन्यांनी कधी तरी चित्रपटगृहाची वारी व्हायची. आज मात्र सिनेमा सर्वत्र असतो. सदा सर्वकाळ चालू असलेल्या केबल चॅनल्सवर, मल्टिप्लेक्समध्ये, रस्त्यावरच्या डीव्हीडी विक्रेत्यांकडे, आंतरजालावर, आयपॅड किंवा मोबाईलच्या छोट्या स्क्रीन्समधून आणि अजून तग धरून असलेल्या फिल्म सोसायट्यांच्या छोट्या-मोठ्या दालनांत. सगळीकडे, सर्वत्र असतोच हा. त्याची दखल घ्यावीच लागते, त्याच्याविषयी मत बनवावे आणि मांडावे लागतेच.

आज माझी मुलं आणि नातवंडंही नवीन आलेल्या सिनेमावर तावातावानं बोलत असतात. माझ्या 'हं, चांगला होता!', किंवा 'वाईट होता बरं का सिनेमा!' इतक्या मर्यादित अभिप्रायांकडे कोणाचं लक्षही नसतं. त्यांना खूप काही महत्त्वाची चर्चा करायची असते. 'ही बापडी अजूनही दुरूनच सिनेमाकडे पाहते' – माझ्याबद्दल हे त्यांचं मत, बरं का!

आमची पिढी सिनेमा मनोरंजनासाठी बघायची, विरंगुळा म्हणून बघायची. सिनेमा आजच्या इतका दैनंदिन जीवनाचा भाग बनला नव्हता तेव्हा. तेव्हाचे सिनेमे काही सांगायचे-शिकवायचे नाहीत असं नाही; पण ही शिकवण जरा बाळबोधच असे. एकंदरीत जगच तेव्हा लहान होतं. त्या छोट्या जगाचे, समाजाचे प्रश्नही मर्यादित होते. त्यामुळे चित्रपटनिर्मितीचं मुख्य प्रयोजन करमणूक हेच होतं. आजही बरेच सिनेमे केवळ मनोरंजनासाठीच बनवले जातात आणि त्यात गैर काहीच नाही. व्यावसायिक यशाकडे नजर ठेवून बनवलेले चित्रपट असेच असणार.

समाजाचं प्रबोधन करणं, समाजाला जगाची ओळख करून देणं, सध्याच्या धगधगत्या वास्तवाची जाणीव करून देणं, ज्वलंत प्रश्नांना तोंड फोडणं, वगैरे वगैरे उद्देश सिनेमा बनवण्यामागं आले, ते आमची पिढी बरंच अंतर काटून आल्यावर. त्याखेरीज चित्रपटनिर्मितीच्या विविध अंगांची ओळख आणि त्यांचे महत्त्व ह्या पिढीलाच जाणवले. चित्रपट पाहताना आणि समजून घेताना चित्रपटकलेच्या ह्याच सर्व अंगांचा विचार करणं किती जरुरीचं आहे, हे त्यांनी जाणलं.

आंतरजालानं जगाला जवळ आणलं. तुझे प्रश्न 'तुझे' न राहता 'आपले' झाले. डिजिटल क्रांतीची साक्षीदार असलेली, ह्या क्रांतीबरोबरच जन्माला आलेली आणि वाढणारी ही नवी पिढी लहानपणापासून चित्रपटांबरोबरच वाढली. चित्रपट हे त्यांच्या जीवनाचा एक भागच बनलं. केवळ आपल्या भाषेतले, देशातले चित्रपटच नाही, तर जागतिक चित्रपटसृष्टीशी इंटरनेटवरून त्यांचं नातं जुळलं. जगभर पसरलेल्या, आपल्याला भेटलेल्या, न भेटलेल्या मित्रमंडळींबरोबर त्यांचा संवाद सुरू झाला. आम्ही मागे पडलो. चित्रपटाच्या सर्वांगाचं आकलन व्हावं, चित्रपट केवळ वरवर, करमणूक किंवा विरंगुळा म्हणून न पाहता त्या पाहण्यात एक सजगता असावी, चित्रपट जाणीवपूर्वक पाहिला जावा, असं ह्या पिढीला वाटतं. त्यामुळे 'चित्रपट कसा पाहावा' हे

कळावं म्हणून ही पिढी चर्चासत्रांचं आयोजन करते, कार्यशाळा भरवते. चित्रपटअभ्यासक आणि समीक्षक ह्यांचं मार्गदर्शन घेते. ह्या सर्वातूनच एक जाणकार, अभ्यासू आणि समजदार प्रेक्षक तयार होईल हे नक्की.

आज दोन्ही प्रकारचे चित्रपट आपल्याकडे आहेत. केवळ करमणुकीसाठी, विरंगुळ्यासाठी, वरवर पाहिले जाणारे गल्लाभरू चित्रपट सर्वसामान्य जनतेचं मनोरंजन करतायत, त्याचवेळी अनेक कलात्मक, अर्थपूर्ण, समाजाचा आणि समाजात होणाऱ्या बदलांचा मागोवा घेणारे चित्रपटही तयार होत आहेत. ह्या दोन्ही प्रकारच्या चित्रपटांना समजून घेणारा सुजाण प्रेक्षक तयार करण्याचे काम ह्या नव्या पिढीकडेच आहे.

**क. वरील लेखात आलेल्या ह्या शब्दांची त्यांच्या योग्य अर्थांशी जोडी लावा. (२.५)**

| | |
|---|---|
| १) अविभाज्य | क) ज्वलंत, जळता |
| २) तावातावानं | ख) भाबडे, भोळे, साधे |
| ३) बाळबोध | ग) वेगळा न करता येण्यासारखा |
| ४) धगधगत्या | घ) दक्षता, जागरूकता |
| ५) सतर्कता | च) उत्साहाने |

**ख. खालील शब्दांचे मूळ शब्द कोणते? त्यांचे लिंग व वचन लिहा. (कोणतेही ५) (२.५)**

| | |
|---|---|
| १) मर्यादित | |
| २) व्यावसायिक | |
| ३) समीक्षक | |
| ४) अभ्यासू | |
| ५) समजदार | |
| ६) जागतिक | |
| ७) अभिप्रायांकडे | |
| ८) सुजाण | |

**ग. वरील लेखात पूर्वी चित्रपट कसा पाहिला जायचा याबद्दल सांगितलेले तीन मुद्दे लिहा. प्रत्येकी एक वाक्य लिहा. (३)**

---

---

---

**घ. खालील मुद्द्याशी तुम्ही सहमत आहात का? तुमचे मत सविस्तर लिहा. (२)**

"तेव्हाचे सिनेमे काही सांगायचे किंवा शिकवायचे नाहीत असं नाही; पण ही शिकवण जरा बाळबोधच असे. एकंदरीत जगच तेव्हा लहान होतं. त्या छोट्या जगाचे, समाजाचे प्रश्नही मर्यादित होते."

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

## व्याकरण (एकूण १५ गुण)

**क. खाली दिलेले शब्द वापरून रिकाम्या जागा भरा. (कोणतेही १०) (२.५)**

(जितकं, पेक्षा, जास्त, पेक्षा, हून, तितकं, पेक्षा, जणू काही, त्याहून, पेक्षा, हून, जास्त)

प्राण्यांच्या आणि पक्ष्यांच्या अंगात (१)------------ कलाकौशल्य असतं ना, (२)------------



स्वतःला खूप हुशार आणि शहाणा समजणाऱ्या माणसात नसतं, असं मला नेहमीच वाटतं. जी गोष्ट करायला अनेक माणसांना अनेक दिवस लागतात, तीच गोष्ट एखादा मुका प्राणी किंवा पक्षी एकटाच करून दाखवतो, आणि माणसा (३)------------ अधिक चांगल्या प्रकारे करतो. म्हणजे बघा ना, एक घर बांधायला किती माणसांना किती दिवस राबावं लागतं. सुगरण पक्षी एकटाच एक अप्रतिम घरटं बांधून मोकळा होतो. माणसानं अनेक हातांची मदत घेऊन बांधलेल्या घरा (४)------------ ते किती सुंदर आणि सुबक असतं ना? झाडाच्या काटक्या जमवून चिमण्या, कावळे असे पक्षीही स्वतःच्या जरुरीपुरतं घरटं बांधतात. प्रत्येकाचं घरटं दुसऱ्याच्या घरट्या (५)------------ वेगळं.

कोकिळानं सकाळी सकाळी मारलेली तान, पेटी-तंबोऱ्याच्या साथीनं पट्टीच्या गवयानं गायलेल्या सकाळच्या रागा (६)------------ मला अधिक सुरेल वाटते. एका कोकिळानं इकडून आवाज दिला, की कुठून तरी (७)------------ उंच आवाजातील तान ऐकू येते. (८)------------ जुगलबंदीच चाललीय दोघांची. एखादा सुतारपक्षी त्याच वेळी झाडाच्या खोडावर आघात करायला लागतो, आणि एक सुंदर ताल निर्माण होतो. ह्या निसर्गनिर्मित संगीताची गोडी (९)------------ अवीट, का मानवनिर्मित वाद्यांची? हा प्रश्न मला नेहमीच पडतो. कवायत करणाऱ्या सैनिकांच्या ओळी (१०)------------ एकीमागे एक तुरुतुरु चाललेल्या मुंग्या मला (११)------------ शिस्तशीर वाटतात. पावसाच्या सरींच्या तालावर थुईथुई नाचणाऱ्या मोराचा पदन्यास आणि डौल मला एखाद्या कुशल नृत्यांगनेच्या नृत्या (१२)------------ नयनरम्य वाटतो. तुम्हालाही असंच काही नक्की वाटत असेल!

**ख. खालील अव्यये वापरून वाक्ये परत लिहा. काही अव्यये एकापेक्षा जास्त वेळा वापरता येतील. अनेक उत्तरे शक्य आहेत. (२.५)**

(जर-तर, जरी-तरी, म्हणून, यासाठी, याकरिता, यास्तव, पण, किंवा)

अ. मुलींनीही उच्च शिक्षण घेतले पाहिजे. सरकार मुलींना अनेक शिष्यवृत्त्या देत आहे.

आ. ती गेले चार महिने औषधं घेत आहे. तिच्या प्रकृतीत काही सुधारणा नाही.

इ. मोहिनी दिवसातून आठ तास रियाज करते. तिची तयारी इतकी चांगली आहे.

ई. गेली अनेक वर्षे शुभांगी ह्या महाविद्यालयात अध्यापिका म्हणून कार्यरत आहे. त्याआधी तिने एका बहुराष्ट्रीय कंपनीत मोठ्या पदावर काम केलं आहे.

उ. मानसी अखेर ती प्रवेशपरीक्षा पास झाली. गेली दोन वर्षं ती तयारी करत होती.

ऊ. तू दिवसातून दहा वेळा खायची सवय सोडून दे. तुझं वजन नक्की कमी होईल.

ए. आपल्या मुलांना चांगलं राहणीमान मिळावं असं सर्वच आई-वडिलांना वाटतं. सगळेच आई-वडील खूप कष्ट घेतात.

ऐ. तुला तुझ्या अंगातली ताकद वाढवायची आहे ना? रोज व्यायाम करायला सुरुवात कर.

ओ. मंदार आणि केदार घरात कुत्र्या-मांजरासारखे भांडतात. बाहेर कुणाशी भांडण झालं तर एकमेकांची साथ सोडत नाहीत.

औ. तुम्ही दिल्लीला पावसाळ्यात जा. हिवाळ्यात जा. उन्हाळ्यात नको.

**ग. कंसात दिलेल्या क्रियापदापासून शक्य क्रियापदाचे रूप बनवून वाक्य पूर्ण करा. (३)**

बऱ्याच दिवसापासून बिंगो आजारी आहे. चांगला चौदा वर्षांचा आहे तो. खूप म्हातारा झालाय. त्याला आता मोठ्याने (भुंकणे) (१)................ पण नाही. बिचारा जास्त करून झोपूनच असतो. मनोज त्याला खायला घालतो. त्याला कठीण गोष्टी (चावणे) (२)................ नाहीत, पण चावतो कसा तरी. त्याला जास्त (चालणे) (३)................ नाही, पण (उठणे) (४)................ नसलं तरी उठतो कसा तरी, आणि खुरडत खुरडत घरात इकडे तिकडे हिंडतो. त्याचं हे दुःख माझ्याच्याने (बघणे) (५)................ नाही. पण काय करणार?

मी ऑफिसमधून घरी आल्यावर चहा घ्यायला बसते तेव्हा बिंगो (चढणे) (६)................ नसलं तरी कसाबसा माझ्या शेजारच्या, त्याच्या आवडीच्या खुर्चीत चढतो आणि माझ्या हातून त्याचं आवडतं बिस्कीट खातो. दिवसभरातील ती दहा-पंधरा मिनिटं आम्हा दोघांचीच हक्काची आणि आनंदाची असतात.

**घ. कंसात दिलेल्या क्रियापदापासून प्रयोजक क्रियापदाचे रूप बनवा आणि वाक्य पूर्ण करा. (२)**

बिंगोला रोज थोडा तरी व्यायाम व्हावा, म्हणून लता त्याला रोज थोडं तरी (चालणे) (१)................. त्याला धरून (उठणे) (२)................ आणि बागेत (फिरणे) (३)................. नंतर त्याला झाडाखाली (बसणे) (४)................ आणि त्याच्या पायांना मालीश करते. खूप आवडीनं तो हे लाड करवून घेतो.

**च. खालील शब्दयोगी पदे वापरून वाक्ये बनवा.** **(२)**

(आधी, पूर्वी, भर)

अ. महेश, रात्र, अभ्यास, करणे, दिवस, झोपा, काढणे

आ. इतरांवर, टीका, करणे, स्वतःचे, वर्तन, तपासणे

इ. परदेशप्रवास, करणे, सर्व, कागदपत्रे, नीट, तपासणे

ई. आठवडा, पाऊस, पडणे, नदी, पूर, येणे

**छ. योग्य ते साहाय्यक क्रियापद वापरून वाक्ये पूर्ण करा. (कोणतीही ६)** **(३)**

अ. जर तुला गिर्यारोहणाला जायचं असेल तर आधी तुला स्वावलंबी व्हावं (१)------------------.

आ. मी उसने पैसे दिले नाहीत म्हणून वैदेही रागावून निघून (२)------------------.

इ. श्रेयांश सात महिन्यांचा असतानाच चालायला (३)------------------.

ई. महेश, शिरा गरम आहे तोवरच खाऊन (४)------------------.

उ. रुहीला सगळं घरकाम एकटीलाच करावं (५)------------------.

ऊ. त्यात काय! हा डोंगर मी एका दमात चढू (६)------------------.

ए. मुलगी असून मला खूप मोठ्याने शिट्टी वाजवता (७)------------------, ह्याचे बऱ्याच जणांना आश्चर्य वाटते.

ऐ. माझे वडील खूप संतापी आहेत. त्यांच्या विरोधात कोणीही बोलू (८)------------------ नाही.

## शब्दसंपदा **(एकूण ५ गुण)**

**क. अधोरेखित केलेल्या शब्दांच्या विरुद्ध अर्थाचे शब्द वापरून वाक्य परत लिहा. जरूर तेथे योग्य ते बदल करा.** **(कोणतेही ५)**

अ. रेवती स्वभावाने अतिशय <u>उधळी</u> आहे, त्यामुळे पैसे खर्च करताना ती मागचापुढचा विचार करत नाही.

--------------------------------------------------------------------

आ. डोंगराचा हा <u>उतार</u> संपला, की एक चहाची टपरी येईल. तिथे थांबू आपण.

--------------------------------------------------------------------

इ. मला वाटतं सोहानं शलाकाची खोडी <u>मुद्दामच</u> काढली आहे.

--------------------------------------------------------------------

इ. ह्या रस्त्यावर इतकी रहदारी <u>क्वचितच</u> असते.

--------------------------------------------------------------------

ई. इतकी <u>रंजक</u> कादंबरी मी प्रथमच वाचली.

--------------------------------------------------------------------

उ. माझी सगळी मुलं नेहमी माझ्या <u>विरोधातच</u> का बोलतात, हे मला कळत नाही.

--------------------------------------------------------------------

# खेळ आणि आरोग्य

# १









## चला, शिकू या ...

- खेळाशी संबंधित शब्द जाणून घेणे
- व्याकरण : धातुसाधित क्रियाविशेषणे समजून घेणे - उदा॰ उठल्याबसल्या, पडल्या पडल्या
- प्रयोग - उजळणी करणे
- महाराष्ट्रातील विविध खेळांविषयी माहिती घेणे
- खेळ, व्यायाम आणि योगासने ह्यांचे वाढते महत्त्व जाणून घेणे
- केले पाहिजे, करायला पाहिजे, करायला हवे ह्यातील फरक समजून घेणे
- खेळ आणि दुखापतींबद्दल बोलणे
- संधी ओळखणे आणि करणे
- प्रसिद्ध खेळाडूंची माहिती घेणे

## १ खेळाचे शब्द - शब्दांचे खेळ

**क. खालील शब्द वापरून प्रथम उतारा पूर्ण करा.**

(खेळ, खेळणे, खेळकरी, खेळगडी, खेळिया, खेळकर, खेळवणे, खेळी, खेळकरपणा, खेळाडू, खेळणे, खेळपट्टी)

**ख. नंतर उताऱ्यातील कंसात दिलेल्या आकड्यांचा विचार करून त्याखालील शब्दकोडे पूर्ण करा.**

(आकडे १ ते ५ = आडवे शब्द) (अक्षरे अ ते ए = उभे शब्द)

(इ. उभे) खेळ म्हटले की लहान-थोर सर्वांनाच आनंद होतो. लहान मुलांच्या हाती (ऊ. उभे) ------------ देताच तीही आनंदतात. खेळात प्रत्येक जण आळीपाळीने आपली (अ. उभे) ------------ करतो. खेळ करणारा प्रत्येक जण असतो एक (१. आडवे) ------------ आणि एकमेकांबरोबर खेळणारे सगळे असतात (२. आडवे) ------------. स्वतः (४ आडवे) ------------ आणि जगाला (उ. उभे) ------------ देवालाही आवडते. खेळांची रचना करून खेळायला लावणारा आणि स्वतःही खेळणारा तो (आ. उभे) ------------ आहे. 'जीवन' नावाच्या खेळात भाग घेणारा प्रत्येक जण एक (३. आडवे) ------------ आहे. हे जग म्हणजे खेळण्यासाठी तयार केलेली एक (ए. उभे) ------------ आहे. हा आयुष्याचा खेळ आनंदाने खेळायला हवा. पण सर्वच माणसे (५. आडवे) ------------ नसतात आणि (ई. उभे) ------------ नसेल तर आयुष्यच दुःखी होते.

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १/अ | | | | | | | | | |
| | | | | इ. खे | | | | | |
| | | | २/आ | ळ | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | ३/ई | | | |
| ४/उ | | | | | | | | | ऊ. |
| | | | | ५/ए | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

## २ जिंकणं आणि हरणं

कॉलनीच्या चौकात क्रिकेट चालू होतं. आरडाओरडा, टाळ्या, शिट्या ... नुसता दंगा चालू होता.



आमची सोसायटी विरुद्ध बाजूच्या दोन लहान सोसायट्या असा सामना होता. हे मला अर्थातच नातवांकडून कळलं होतं. मला खेळातलं काही कळत नाही; त्यात मी रमत नाही. पण उत्साहानं आणि जल्लोशानं भारलेल्या वातावरणाचा संसर्ग मलाही टाळता येत नाही. त्यामुळे अधूनमधून बाल्कनीत माझ्या चकरा चालू होत्या. खेळापेक्षा तो पाहणाऱ्यांचे फुललेले चेहरे पाहण्यातच मला गंमत वाटत होती. नुकतंच चौथं संपून पाचवं वर्ष लागलेल्या धाकट्या नातवाला त्या गर्दीत शोधण्याचा मी थोडा प्रयत्न केला, पण मग नाद सोडून दिला.

घराचा दरवाजा मी नुसताच लोटून घेतला होता. खेळात जराशी मोकळी फट सापडली, की घरचं किंवा शेजारचं एखादं पोर पाणी पिण्यासाठी, किंवा शू लागली म्हणून, किंवा काही तरी तोंडात टाकायला घेऊन जाण्यासाठी म्हणून धावत येऊन लगेच परत जात होतं. इकडेतिकडे बघायला त्यांना फुरसत नव्हती. अगदी भान विसरून त्यांचं सगळं चाललं होतं. मैदानावरचा एक क्षणही कुणाला चुकवायचा नव्हता.

"अनीशकडे लक्ष आहे ना रे तुमचं?" मी एकाला विचारण्याचा प्रयत्न केला.
शेंगदाण्यांचा तोबरा भरलेल्या तोंडानं 'हुंऽऽ!' म्हणत त्यानं अंगठा उंचावून दाखवला आणि तो भुर्रकन पळालादेखील. "अरे, त्याच्यासाठी दोन बिस्किटं घेऊन जाऽ ...!" पण माझं बोलणं त्याच्या कानात शिरलंच नाही. 'आहेत त्याचे आईबाप; बघतील', मी मनाशी म्हटलं आणि स्वयंपाकाच्या तयारीला लागले.

चौकातला वाढता गोंगाट ऐकत एकीकडे माझं भाज्या चिरणं, डाळ-तांदूळ धुणं चालू होतं. मी कुकर शेगडीवर ठेवला आणि त्याच वेळी एकदम ओरडा टिपेला पोचला. 'संपला वाटतं खेळ' असं पुटपुटत मी भाजीही फोडणीला टाकली. खालून कुणी तरी जोरात ओरडलं : "पूर्वाकाकूऽ, आपण जिंकलोऽऽ!!" नकळत मला बरं वाटलं.

दरवाजा उघडल्याचा आवाज आला. काही क्षण गेले, पण कुणाचीच चाहूल लागली नाही. "कोण आहे रे?" असं म्हणत मी बाहेरच्या खोलीत आले. छोटा अनीश सोफ्यावरच्या उशीत तोंड खुपसून पालथा पडला होता.

"काय, जिंकलो ना आपण? मजा आली की नाही?" मी जवळ जात म्हटलं. अनीशनं पडल्या पडल्याच पाय झाडले. तो रडत होता. हुंदक्यांनी त्याची पाठ थरथरत होती.

"अगं बाई! काय रे, काय झालं रडायला? इतका छान खेळ झाला, जिंकलो आपण! तुला आवडलं नाही का बघायला?" मी त्याच्याजवळ बसत म्हणाले. अनीशनं उशीतच मान हलवली. "का? काय झालंय तरी काय एवढं?"

अनीश सावकाश उठून बसला. त्याचे गाल ओले झाले होते. माझ्याकडे न बघता ओठ काढून तो म्हणाला, "त्यांना कशाला हरवलं पण? किती वाईट वाटलं त्यांना, माहितेय?"

"त्यांना कशाला ...? अरे, असंच असतं खेळात, बाळा. एक जिंकतो म्हणून दुसरा हरतो. पुढच्या वेळी ते जास्त चांगलं खेळतील, जिंकतील आणि आपण हरू!"

"आंऽऽऽ!" पुन्हा जोरजोराने मान हलवत अनीशनं गळाच काढला.

"मग काय करायचं?"

"कुणीच हरायचं नाहीऽऽऽ!" अनीश ओरडून म्हणाला.

काय बोलावं ते न सुचून मी त्याच्याकडे काही क्षण बघत राहिले. तो अगदी हमसून हमसून रडत होता. मला एकदम गलबलून आलं. मी पदरानं त्याचे ओले ओले गाल पुसले. वाटलं, सांगावं त्याला, की कधी कधी जे जिंकतात तेच खरं म्हणजे हरलेले असतात आणि जे हरतात तेच जिंकलेले असतात. कितीदा तरी दोघेही हरलेले असतात. तू मोठा होशील तसतसं तुझं तुलाच हे उमगत जाईल.



पण मी नुसताच आवंढा गिळला. त्याला जवळ घेतलं आणि त्याच्या पाठीवरून हळूहळू हात फिरवत राहिले.

**क. वरील उताऱ्यातील पहिला परिच्छेद निवेदक तृतीय पुरुषी करून लिहा.**

उदा॰ त्यांची सोसायटी विरुद्ध बाजूच्या दोन लहान सोसायट्या असा सामना होता.

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

**ख. खालील छोटी वाक्ये जोडून एकच मोठे वाक्य बनवा.**

मला खेळातलं काही कळत नाही; त्यात मी रमत नाही. पण उत्साहानं आणि जल्लोशानं भारलेल्या वातावरणाचा संसर्ग मलाही टाळता येत नाही.

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

**ग. खाली दिलेली मोठी वाक्ये सुटी करून लहान वाक्ये बनवा.**

**अ.** नुकतंच चौथं संपून पाचवं वर्ष लागलेल्या धाकट्या नातवाला त्या गर्दीत शोधण्याचा मी थोडा प्रयत्न केला, पण मग नाद सोडून दिला.

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

आ. त्यावर भाजलेल्या शेंगदाण्यांचा तोबरा भरलेल्या तोंडानं 'हुंऽऽ!' म्हणत त्यानं अंगठा उंचावून दाखवला आणि तो भुर्रकन पळालादेखील.

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

**घ. खालील पर्यायांमधून योग्य तो क्रियावाचक शब्दसमूह वापरून वाक्य पूर्ण करा.**

| |
|---|
| नाद सोडून देणे, लोटून घेणे, तोंडात टाकणे, तोबरा भरणे, अंगठा उंचावून दाखवणे, टिपेला पोचणे, फोडणीला टाकणे, चाहूल लागणे, ओठ काढणे, गळा काढणे, हमसून हमसून रडणे, गलबलून येणे, उमगत जाणे, आवंढा गिळणे |

अ. करीना वर्षभर चित्रकलेच्या वर्गाला गेली, पण तरीही चांगलं चित्र काढणं तिला जमेना. शेवटी कंटाळून तिनं चित्रकलेचा ------------ ------------ ------------.

आ. भूक असो वा नसो, येताजाता काही तरी ------------ ------------ सवयच आहे सुजाताला.

इ. तुला काही चोरांची भीती नाही का वाटत? तुझ्या घराचा दरवाजा कायम नुसता ------------ ------------ असतो.

ई. हा विषय काही सोपा नाही कळायला. हेच पुस्तक दहा वेळा वाच; दरवेळी काही नवीन गोष्टी तुला ------------ ------------.

उ. संजू किती रडकी आहे! नुसते ------------ ------------, मोठ्यानं ------------ ------------ किंवा ------------ ------------ ------------ हे प्रकार ती आलटूनपालटून करत असते.

ऊ. ती दु:खद बातमी ऐकून राकेशला अगदी ------------ ------------ होतं. त्याच्या तोंडातून शब्द फुटेना. त्याने नुसताच ------------ ------------.



ए. सोहम, अरे सगळा लाडू तुझाच आहे. हळूहळू खा. असा ------------ ------------ नकोस.

ॲ. जयेशनं पोहे ------------ ------------ आणि गॅस गेला. कच्चे पोहेच खाल्ले त्यानं मग.

ऐ. बाबांच्या येण्याची ------------ ------------, आणि मी ठरल्याप्रमाणे खिडकीतून ------------ ------------ ------------ भाऊला सूचना दिली.

ओ. कीर्तन संपता संपता टाळ-मृदुंगांचा आवाज अगदी ------------ ------------ होता.

## ३ उदाहरणाप्रमाणे वाक्ये पूर्ण करा.

(येणे, पडणे, पडणे, शिजणे, म्हणणे, घेणे, बसणे, मिळणे, मागणे)

उदा. आल्या आल्या चहा काय मागतोस! जरा दम तर घेशील!

क. प्रत्येक गोष्ट ------------ ------------ झालीच पाहिजे असा त्याचा आग्रह असतो.

ख. भाजी ------------ ------------ मी ताट वाढते तुझं, तोवर जरा थांब.



ग. विजेत्याच्या गळ्यात स्वर्णपदक ------------ ------------ कॅमेऱ्यांच्या दिव्यांचा लखलखाट झाला.

घ. बक्षीस हातात ------------ ------------ मी एक सेल्फी घेतली आणि आईला पाठवली.

च. माझी सेल्फी ------------ ------------ आईचा अभिनंदनपर संदेश आला.

छ. कोणतीही गोष्ट ------------ ------------ हातात देण्याची वाईट सवय मुलांना लावू नका.

ज. ------------ ------------ वाचू नये.

झ. ------------ ------------ हे काम तेवढं करून टाक.

## ४ उदाहरणाप्रमाणे धातुसाधिताचे बरोबर रूप वापरून वाक्ये पूर्ण करा.

(धुणे-पुसणे, देणे-घेणे, घडणे-बिघडणे, थकणे-भागणे, अडणे-पडणे, पडणे-झडणे)



उदा. जानकी दिवसरात्र घराची साफसफाई करत असते, पण तिने धुतल्यापुसलेल्या वस्तू थोड्याच वेळात परत मळतात.

क. कोणाच्याही ------------------------------ला बिपीन नेहमीच धावून जातो.

ख. झिनिया आणि मनवा खूप चांगल्या मैत्रिणी आहेत. ------------------------------चा हिशोब त्या कधीच ठेवत नाहीत.

ग. खूप सराव केल्याखेरीज कोणतीच गोष्ट निर्दोष होत नाही. प्रत्येक गोष्ट दोन-चार वेळा ------------------------------शिवाय चांगली घडणारच नाही.

घ. खेळायला गेलेला अनय ------------------------------शिवाय घरी येतच नाही.

च. ------------------------------ माणसाला अंथरुणावर पाठ टेकताच झोप लागणारच.

## ५ खालील वाक्यांत क्रियापद कशाप्रमाणे चालले आहे? कर्त्याप्रमाणे (१) कर्माप्रमाणे, (२) की दोन्हीप्रमाणे नाही, (३) ते त्यापुढील कंसात योग्य तो आकडा लिहून दाखवा.

**मग हेच वाक्य भूतकाळात लिहा आणि क्रियापद कशाप्रमाणे बदलले ते त्यापुढील कंसात योग्य तो आकडा लिहून दाखवा.**

उदा. खेळताना अजयला ठेच लागते (२) आणि तो पडतो (१). मुलं त्याला उठवतात (१) आणि हाताला धरून घरी नेतात (१).

खेळताना अजयला ठेच लागली (२) आणि तो पडला (१). मुलांनी त्याला उठवलं (३) आणि हाताला धरून घरी नेलं (३).

क. बॅडमिंटन खेळताना वर्षाचं मनगट दुखावतं. (  ) आई तिला आठ दिवस भरवते. (  )



ख. छोटा जयेश अंधाराला घाबरतो (  ) आणि रडतो (  ). मग आई त्याला जवळ घेते (  ).

ग. विशालला क्रिकेटचा बॉल लागतो (  ) आणि त्याला चक्कर येते (  ). मुलं त्याला धरतात (  ) आणि घरात आणतात (  ).



घ. विजय सामना जिंकतो (  ). पदक घेण्यासाठी मित्र त्याला व्यासपीठावर चढवतात (  ).

## ६ झुंबा नाचू या, मित्रांनो, झुंबा नाचू या!



एरोबिक्स, बॉलीवूड डान्स आणि झुंबा... , सध्या हे व्यायामप्रकार प्रचंड लोकप्रिय आहेत. सत्तरच्या दशकात पश्चिमेकडील देशांत एरोबिक्स लोकप्रिय होऊ लागले. आपल्याकडील तरुणाई व्यायामासाठी लोकप्रिय हिंदी गाण्यांच्या तालावर 'बॉलीवूड डान्स' करू लागली आणि हा व्यायामप्रकारही त्यांना आवडू लागला. एका एरोबिक्स प्रशिक्षकाने लॅटिन प्रकारच्या डान्स सीडीवरून व्यायामप्रकार घेतले आणि त्यातून झुंबा आला असं म्हणतात. पण झुंबा असो की बॉलीवूड डान्स, सगळ्यांचा पाया एरोबिक्स हाच!

झुंबा या प्रकारात एकामागोमाग एक गाणी लावून त्यावर ठरावीक पद्धतीनं बसवलेला नृत्यासारखा पदन्यास केला जातो. यातलं संगीत आणि गाणी ठरलेली असतात. संगीत हेच झुंबाच्या आकर्षणाचं केंद्र आहे. संगीताच्या तालावर पाय आपसूक थिरकायला लागतात आणि नाचायला हुरूप येतो. ७-८ वर्षांपूर्वी झुंबा आपल्याकडे आला आणि हळूहळू लोकप्रियही होऊ लागला.

गटाने करायच्या ह्या व्यायामात अनेकांना नवे मित्र भेटतात. हा व्यायामप्रकार लोकप्रिय होण्यामागचं हेदेखील एक कारण असू शकेल. संगीताच्या तालावर नाचण्याचा कंटाळा येत नाही, शिवाय, गटातले सगळेच बरोबर नाचत असतात, त्यामुळं नव्यानं आलेल्या व्यक्तीचा उत्साह टिकतो.

नाचात पायांच्या आणि हातांच्या हालचाली खूप असतात. पुन:पुन्हा झालेल्या एकाच प्रकारच्या हालचालीमुळे स्नायूंना उत्तम व्यायाम होतो आणि स्नायू पीळदार आणि बळकट होतात. स्नायूंचं परस्परसहकार्य वाढतं. स्नायूंसोबत हृदयाचं आरोग्य सुधारतं. रक्तदाब कमी व्हायला मदत होते. रक्तामधील कोलेस्ट्रॉल कमी होतं. नियमित व्यायाम सुरू राहिला तर शरीरातील धमन्यांचा व्यास वाढतो. त्यामुळे रक्तप्रवाह खंडित होण्याची शक्यता कमी होते. शारीरिक कष्ट व ताण सहन करण्याची त्या व्यक्तीची क्षमता वाढते.

नाचताना घाम खूप येतो आणि शरीरातील नको असलेली द्रव्यं बाहेर टाकण्यास मदत होते; तसंच चयापचय क्रिया सुधारते, चांगली भूक लागू लागते. व्यायाम करून शरीर घाटदार होतं. व्यायाम करणाऱ्या व्यक्तीला आपण निरोगी आहोत, ही आंतरिक भावना समाधान देत असते. या समाधानातूनच सुरक्षिततेची भावना दृढ होऊन सकारात्मक मानसिक आरोग्य घडायला मदत होते. व्यायामाचा स्नायूंवर, हृदयावर, रक्तवाहिन्यांवर, मनावर प्रत्यक्ष परिणाम होत असतोच, पण अप्रत्यक्षरीत्याही अनेक फायदे होतात. नाचाच्या व्यायामात सांध्यांनाही चांगला व्यायाम होतो. भविष्यात संधिवात, हाडं ठिसूळ होणं या गोष्टी टाळण्यासाठी त्याचा उपयोग होतो.

चला तर मग, जाऊ या झुंबा नाचायला.

**क. कंसात दिलेले शब्द वापरून खालील संवाद पूर्ण करा.**

(पदन्यास, आपसूक, हुरूप, स्नायू, पीळदार, बळकट, लयबद्ध, चयापचय, घाटदार, सांधे, ठिसूळ)

**डॉक्टर :** या या, रोहिणीताई, आज बरेच दिवसांनी येताय!

**रोहिणी :** हो ना हो, डॉक्टर! आता पायाचं प्लास्टर काढून दोन महिने झाले, पण अजून पूर्वीसारखी ताकद येत नाहीये पायात. तुम्हाला माहितेय, मी नाचाचे वर्ग घेते. वर्ग सुरू केलाय आता, पण अजून वर्गात जायचा (अ) ------------------- वाटत नाही.



**डॉक्टर :** हे बघा रोहिणीताई, तुमचं पायाचं हाड आता सांधलं गेलंय, पण इतके दिवस पायाची हालचाल नसल्यानं मुख्यतः मांडीचे आणि इतरही (आ) -------------- कमकुवत झालेत. ते परत (इ) -------------- व्हायला हवेत.

**रोहिणी :** पण त्यासाठी मला काय करायला हवं? त्यांच्यात (ई) -------------- ताकद येईल का?

**डॉक्टर :** तुमचा पाय दोन-अडीच महिने प्लास्टरमध्ये होता. शारीरिक हालचालींवर निर्बंध आल्यानं तुमचा (उ) --------------ही नीट होत नसणार. पचन नीट झालं नाही की सर्व शरीरातच अशक्तपणा जाणवतो. कॅल्शियम कमी झालं की हाडं (ऊ) -------------- होतात. तुम्ही नर्तकी आहात. (ए) --------------, (ॲ) -------------- शरीर आणि मजबूत (ऐ) -------------- ही तुमच्या व्यवसायासाठी अत्यावश्यक पुंजी आहे. नृत्यात होणाऱ्या (ओ) -------------- हालचाली आणि (ऑ) -------------- तुम्हाला तुमची गेलेली उर्जा लवकरच परत मिळवून देईल. तोवर मी लिहून देतोय ती पूरक जीवनसत्त्वं घ्यायला लागा. चौरस आहार घ्या. मुख्य म्हणजे सांगितलेले व्यायाम नियमितपणे करा. आणि हो, हळूहळू पण नियमित नृत्याचा सराव करत रहा. बोलवा आम्हाला लवकरच तुमचा नृत्याचा कार्यक्रम पाहायला!

**रोहिणी :** धन्यवाद डॉक्टर, मी घेईन सगळी काळजी आणि कळवीनच तुम्हाला, माझी कशी प्रगती होतेय ते!

**ख. विरुद्ध अर्थाचे शब्द लिहा**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ. | सकारात्मक | | आ. | बळकट | |
| इ. | खंडित | | ई. | नियमित | |
| उ. | घाटदार | | ऊ. | निरोगी | |
| ए. | यशस्वी | | | | |

**ग. व्यायामामुळे शरीर आणि मन ह्यांना कसा फायदा होतो? थोडक्यात लिहा.**

उदा॰ स्नायू - पीळदार आणि बळकट होतात.

अ. हृदय – --------------------------------

आ. पचन – --------------------------------

इ. सांधे – --------------------------------

ई. शरीर – --------------------------------

उ. रक्त – --------------------------------

ऊ. मानसिक आरोग्य – --------------------------------

## ७ चित्रफिती पाहा.

**तीन किंवा चार विद्यार्थ्यांचे गट करा. प्रत्येक गटाने एक चित्रफीत पाहून त्यातील खेळाचे वर्णन वर्गात सादर करायचे आहे. पुढील प्रश्न तुम्हाला सादरीकरण तयार करताना मदत करतील.**

क. हे खेळ कोणत्या शाळांत वापरले जातात? (शहरी / ग्रामीण)

ख. एका वेळी किती विद्यार्थ्यांचा सहभाग असेल?

ग. खेळाला लागणारे साहित्य आणि त्याची उपलब्धता.

घ. ह्या खेळाचे वैशिष्ट्य आणि त्याचा विद्यार्थ्यांना होणारा सर्वांगीण फायदा.

च. हे खेळ तुम्हाला का आवडले / आवडले नाहीत?


## ८ चित्रवाचन

**पुढील संपूर्ण चित्राचे आणि त्यात दाखवलेल्या खेळांपैकी कमीतकमी चार खेळांचे सविस्तर लेखी वर्णन करा.**



## ९ शब्दखेळ

**पुढे एक छोटे वाक्य आहे. ते प्रत्येक वेळी एकेक शब्द घालून वाढवत नेले आहे.**



अ. मी निघालो.
आ. मी घरातून निघालो
इ. मी एकटाच घरातून निघालो.
ई. मी दुपारी एकटाच घरातून निघालो.
उ. मी दुपारी बाराला एकटाच घरातून निघालो.
ऊ. मी काल दुपारी बाराला एकटाच घरातून निघालो.
ए. मी काल दुपारी बाराला एकटाच घरातून निघालो होतो.
ॲ. मी काल दुपारी बाराला एकटाच घरातून मित्राकडे निघालो होतो.
ऐ. मी काल दुपारी बाराला एकटाच घरातून मित्राकडे जायला निघालो होतो.
ओ. मी काल दुपारी बाराला उन्हाचा एकटाच घरातून मित्राकडे जायला निघालो होतो.
ऑ. मी काल दुपारी बाराला उन्हाचा चालत एकटाच घरातून मित्राकडे जायला निघालो होतो.
औ. मी काल रागारागाने दुपारी बाराला उन्हाचा चालत एकटाच घरातून मित्राकडे जायला निघालो होतो.

**हा खेळ एकट्याने किंवा दोघांनी किंवा दोन गटांनी खेळता येतो.**
**अट :** स्वल्पविराम, अर्धविराम, 'आणि, व, किंवा' अशी अव्यये वापरून वाक्य वाढवता येणार नाही. शिवाय, एकदा वापरलेला शब्द तसाच किंवा प्रत्यय जोडून पुन्हा वापरता येणार नाही.

**क. पुढे काही पहिली वाक्ये दिली आहेत. हवी तर तुम्ही वेगळी वाक्ये घेऊ शकता.**

अ. आई उठली. आ. मी चिडते. इ. अंधारून आले.

## १० काय करायला हवं?, काय केलं पाहिजे? सल्ला द्या.

उदा॰ मुलांचं वजन वाढतंय – त्यांना योग्य आहार द्यायला हवा.

क. सतर्क दिवसभर एका जागी बसून काम करतो. त्याचे सांधे दुखत आहेत.



--------------------

ख. मृगाली संगणकप्रशिक्षक आहे. तिच्या डोळ्यांवर ताण येतो आहे.

--------------------

ग. मेगन रोज दुपारी बर्गर खाते. तिचं पोट सुटायला लागलं आहे.

--------------------

घ. अजयला सारखी सर्दी होते.

--------------------

च. मनवीन शिक्षिका आहे. तिला दिवसभर उभं राहावं लागतं. तिचे पाय दुखतात.

--------------------

## ११ खालील चौकटीत बघून प्रत्येक खेळात होत असलेल्या चार क्रिया लिहा.

उदा॰ क्रिकेट – गोलंदाजी करणे, फलंदाजी करणे, चेंडू झेलणे, चेंडू अडवणे

क. लंगडी – ----------------------------

ख. हॉकी – ----------------------------

ग. टेनिस – ----------------------------

घ. विटी-दांडू – ----------------------------



पाठलाग करणे, सर्विस (आरंभखेळी) करणे, टोला लगावणे, चेंडू परतवणे, हुलकावणी देणे, लंगडी घालणे, गोल करणे, गल खणणे, विटी उडवणे, विटी झेलणे, ओलीसुकी करणे, चेंडू फटकारणे, गोल वाचवणे, चेंडू पास करणे, दुसरा पाय न टेकवणे, फटका मारणे

## १२ गटात बसत नसलेल्या खेळावर 'चूक'ची खूण करा आणि कारण लिहा.

| | | | |
|---|---|---|---|
| उदा॰ गाण्याच्या भेंड्या | संगीत खुर्ची | बुद्धिबळ ✗ | पहिल्या दोन्ही खेळांत संगीत लागते. बुद्धिबळात नाही. |
| क. टेनिस | बॅडमिंटन | खोखो | |
| ख. पत्ते | बुद्धिबळ | हॉकी | |
| ग. लंगडी | मुष्टियुद्ध | कबड्डी | |
| घ. झिम्मा | लपंडाव | फुगडी | |
| च. पोहणे | क्रिकेट | फुटबॉल | |









## १३ शब्दसंपदा

क. खालील तक्त्यात तीन खेळांची नावे आणि त्या खेळांसंबंधित काही शब्द आहेत, ते शोधून काढा.

ख. त्यापुढील तक्त्यात वर खेळांची नावे आणि त्याखाली त्या खेळाशी संबंधित शब्द लिहा. काही शब्द एकापेक्षा जास्त खेळांशी संबंधित असतील.

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ष | ट | का | र | य | म | स | भ | क्रि | के | ट | के |
| ला | प | रा | व | ती | श | ग | नी | ला | श्वा | झ | दि |
| श | म | क | ची | छ | रो | खो | टी | ज | स | य | त |
| मा | जी | क्ष | ने | ला | स्प | या | प | मी | सा | म | ना |
| ने | म | बा | ज | बा | र्श | म | ळ | न | लि | नी | लो |
| मै | दा | न | पा | द | ना | ल | ती | श | प्र | ळी | ण |
| त्रि | द | ल | ठ | ग | री | ब | ना | त | ता | ली | म |
| खा | ण | खुं | ला | ज | बॅ | ट | ही | क | प | वा | स |
| घ | य | ट | ग | ग | र | ती | बा | ई | क | ज्या | ल |
| र | म | ला | त | च | ढा | ई | क्ष | मा | ब | मि | त |
| खो | दा | ई | सं | बा | र | झे | ल | न | ड्डी | बॉ | ल |
| खो | ला | त | घ | र | घा | र | भ | री | व | ज | न |

| खेळ १ | खेळ २ | खेळ ३ |
|---|---|---|
| क्रिकेट | | |
| षटकार | | |

## १४ 'गैर' हा उपसर्ग लावून शब्द तयार करा आणि त्यांचा वाक्यात उपयोग करा.

उदा. हजर = गैरहजर, निमिष अलीकडे बऱ्याचदा शाळेत गैरहजर असतो.

क. फायदा = ------------------------, ------------------------------------------------------------------

ख. वापर = ------------------------, ------------------------------------------------------------------

ग. समज = ------------------------, ------------------------------------------------------------------

घ. सोय = ------------------------, ------------------------------------------------------------------

## १५ आनंदयात्री

**क. खालील मुलाखतीत उत्तरं आहेत, मात्र मुलाखतकाराचे प्रश्न नाहीत. उत्तरं वाचून उदाहरणाप्रमाणे प्रश्न तयार करा आणि मोकळ्या जागेत लिहा.**

@ : सर्वप्रथम क्रीडाप्रशिक्षक म्हणून तुम्हाला राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल तुमचं अभिनंदन.

# : धन्यवाद!

@ : खेळांशी तुमचं इतकं अतूट आणि उत्कट नातं आहे; त्याची मुळं तुमच्या बालपणात आहेत, असं पूर्वी तुम्ही म्हणाला होतात. कसं होतं तुमचं बालपण?

# : फारसं रम्य नव्हतं. आईवडिलांचा मी एकुलता एक मुलगा. वडिलांची बदलीची नोकरी होती आणि कामासाठी ते सतत फिरतीवर असत. आई स्वभावानं संशयी होती. त्यामुळे मी शाळेत जायला लागल्यानंतर वडील बदलीच्या गावी एकटेच जात आणि घरी – म्हणजे औरंगाबादला – येण्याचं शक्य तेवढं टाळत. शेजारपाजारचे लोकही आईपासून दूरच राहत. ती हळूहळू स्वतःमध्ये बुडत गेली. माझ्यासाठी कुणालाच वेळ नव्हता. मी एकटाच उरलो.

@ : (अ) ------------------------------------------------------------?

# : शाळेत जाईपर्यंत नव्हते. घरात मोजकीच खेळणी होती, त्यांच्याशीच खेळायचं किंवा आपणच वेगवेगळे खेळ शोधायचे, असं माझं चाललं होतं.

@ : अच्छा? (आ) ------------------------------------------------? (इ) ------------------------------------------------?

# : खास असं काही नाही. सगळ्यात जुनी आठवण म्हणजे, मी तेव्हा अडीच-तीन वर्षांचा असेन; बदली झालेल्या एका गावात आमचं घर गावापासून थोडं दूर होतं. अंगणातून समोरच्या ठेंगण्या, लहानमोठ्या झाडांनी वेढलेल्या हिरव्यागार टेकड्या दिसायच्या. एकदा मी अंगणात उगीचच उठबस उठबस करत होतो आणि त्या टेकड्याही माझ्याबरोबर वरखाली होतायत असा मला भास होत होता. मला फार गंमत वाटली आणि मग तो माझा खेळच झाला. एकदा त्या टेकड्यांकडे पाठ करून आणि उलटी कमान टाकून मी जमिनीवर हात टेकले. डोके उलटे झाल्यामुळे टेकड्याही उलट्या दिसायला लागल्या. मी हरखून गेलो. मग मला छंदच लागला : कमान टाकायची आणि तसंच चार पायांवर चालल्यासारखं चालायचं, पळायचं, सगळं जग उलटीकडून पाहायचं. टेकड्या, झाडं,

माणसं, जनावरं, सगळे छताला पाय लावून उलटे लोंबत असल्यासारखे दिसायचे. खाली अथांग आकाश असायचं. नंतर मी पायही वर उचलून हातांवर चालायला शिकलो.

@ : (उ) ------------------------------------------------------------?

त्या वयात काही अवघड नसतं. शरीर वळवावं तसं वळतं न् वाकवावं तसं वाकतं. मनसुद्धा तसंच लवचीक असतं.

# : (ऊ) ------------------------------------------------------------?

म्हणजे ... कसं सांगू तुम्हाला ... खेळ फक्त शरीरानंच खेळायचे नसतात. त्यात बुद्धी, कल्पकता, समज असं सगळंच असावं लागतं. मी तेव्हा मनानंही खेळत असे. माझे काही काल्पनिक मित्र होते. कल्पनेतलेच चार भाऊ आणि तीन बहिणीही होत्या. मी त्यांच्याशीच खेळत असे, गप्पा मारत असे, मारामारीही करत असे. त्यांची मी नावं ठेवली होती : काही एकाक्षरी, काही दोनाक्षरी.

@ : (ए) ------------------------------------------------------------?

# : आठवतात ना! टू, की, पा, फे अशी एकाक्षरी होती. लूलू, मेमे, तातू, विवि अशी दोनाक्षरी होती. आम्ही सगळे दिवसभर एकत्र खेळायचो, एकत्र जेवायचो, टेकडीवर सहलीला जायचो. वेड्यासारखं वागणाऱ्याला शिक्षा म्हणून घरी ठेवायचो आणि सर्वांत धाकट्याला माझ्या खांद्यावर बसवून न्यायचो. अंधार पडला, की कल्पनेतले मित्र आपापल्या घरी जायचे. मग कल्पनेतल्या भावंडांना गोष्टी सांगत झोपवायचं. ह्या खेळांनी माझं रम्य नसलेलं, हरवत चाललेलं बालपण वाचवलं. खेळातून जगण्यातला आनंद शोधण्याची वाट दाखवली. आजही मी त्याच वाटेवर चालतो आहे.



**ख. वरील मुलाखत वाचून खालील उतारा पूर्ण करा.**

ह्या क्रीडाप्रशिक्षकाचे खेळाशी ------------ ------------ आहे. घरात इतर कोणाचीच साथसंगत नसल्याने, असलेल्या ------------ खेळण्यांशी खेळायचं किंवा स्वतःच ------------ खेळ शोधायचे आणि एकटंच खेळायचं, असं त्यांचं बालपण गेलं. 'खेळ फक्त ------------ खेळायचे नसतात, तर त्यात ------------, ------------, ------------ असं सर्वच असावं लागतं', असं त्यांचं म्हणणं आहे. काही खेळ तर ते ------------ खेळत असत. त्यात त्यांचे ------------ मित्र आणि ------------ भाऊ आणि बहिणीही सामील असत. ह्या खेळांनीच त्यांचं ------------ आणि ------------ ------------ बालपण वाचवलं, आणि खेळातून ------------ ------------ ------------ ------------ दाखवली, असं त्यांना वाटतं.


## १६ संधी

**क. पुढील संधी सोडवा.**

अ. समांतर = ---------- + ----------
आ. सारासार = ---------- + ----------
इ. शुभाशीर्वाद = ---------- + ----------

**ख. पुढील शब्दांचे संधी करा.**

अ. विद्या + आलय = ----------
आ. कार्य + आरंभ = ----------
इ. महत्त्व + आकांक्षा = ----------



## १७ चला, वाचू या.

**खेळ काचाकवड्यांचा**

एक छंद बाळवयातला
जिवाभावाने होता जपला ...
बांगड्यांच्या रंगीबेरंगी काचा, झुळझुळते रेशीमतुकडे,

जमवलेले हव्यासाने स्वैर हिंडून इकडेतिकडे,
काचा हातांत खुळखुळवून टाकायच्या जमिनीवर
मध्ये सलग ढीग, भोवती विखुरलेल्या काचा सर्वभर,
मग डोळे आकुंचित करून
कपाळाला आठी घालून
अत्यंत एकाग्र होऊन
खेळायचा काचाकवड्यांचा खेळ सोबतिणीसंगत
त्या निरागस खेळाला यायची कितीतरी रंगत ...



ओठांचे गोल वर्तुळ करीत
जपून जपून फुंकर मारीत
ढीग न दुखवता एक एक काचतुकडा वेगळा काढायचा
– ती जिंकायची, जिच्याजवळ जमतील जास्तीत जास्त काचा.

आजही खेळ संपलेला नाही
पण आता खेळणारी मी एकटीच.
एक अस्ताव्यस्त ढिगारा समोर
काचा मीच, वेचणारीही मीच.
आता आपलेच तुकडे आपणच वेचायचे
तुकड्यांच्या अनाकलनीय लिपीतून
आपले संदिग्ध भविष्य आपणच वाचायचे ...

- शांता ज. शेळके

**क. वरील कवितेतील अधोरेखित शब्दांच्या जागी पुढे दिलेला कोणता शब्द वापरता येईल?**

(विविधरंगी, हळुवार, साठतील, न समजणाऱ्या, उचलणारी, मैत्रिणीबरोबर, नाद, पसरलेल्या, मोकाट, बारीक)

अ. छंद = ------------------------------------

आ. रंगीबेरंगी = ------------------------------------

इ. स्वैर = ------------------------------------

ई. विखुरलेल्या = ------------------------------------

उ. आकुंचित = ------------------------------------


ऊ. सोबतिणीसंगत = ------------------------------------

ए. जपून जपून = ------------------------------------

ॲ. जमतील = ------------------------------------

ऐ. वेचणारीही = ------------------------------------

ओ. अनाकलनीय = ------------------------------------



# पेहेराव आणि फॅशन २






## चला, शिकू या ...

- महाराष्ट्रातील पेहेराव ओळखणे
- काळानुरूप झालेले पेहेरावातील बदल समजून घेणे
- व्याकरण : अधिविशेषण (पूर्वविशेषण) / विधिविशेषण (उत्तरविशेषण)
- 'चांगला प्रकार - चांगल्या प्रकारे' अशा शब्दसमूहांचा योग्य वापर करणे
- महाराष्ट्रीय दागिने ओळखणे आणि सांगणे
- विशेषणांचा नामासारखा वापर करणे
- बदलते ट्रेंड्स जाणणे
- संधी ओळखणे आणि करणे


## १ पुरुषांच्या वेषभूषेविषयी थोडे जुने-नवे



पुरुषांच्या वेषभूषेत मिश्या आणि शिरोभूषण – म्हणजे मस्तक झाकण्यासाठी उपयोगात आणली जाणारी वस्तू – ह्या दोन गोष्टींचे फार महत्त्व आहे, कारण त्यांचा संबंध केवळ देहाच्या सजावटीसाठी नसतो.

मिश्या आणि पुरुषाची 'पुरुषपणाची' भावना ह्यांचे घट्ट नाते असते. आजही तो मिशीला पीळ देऊन आपला रुबाब आणि आपले सामर्थ्य दाखवत असतो. साध्या पैजेतही 'हरलो तर मिशी उतरवून ठेवीन!' असे आव्हान देतो. एखाद्याचा सर्वोच्च अपमान करायचा असेल, तर त्याची मिशी भादरली जाते. अशा ह्या मिशीचे लाड पुरुष नाना तऱ्हांनी करत असतात. आपले व्यक्तिमत्त्व खुलेल असा आकार तिला देतात. आकडेबाज, छपरी, लिंबू-पिळी, तलवार कट, हिटलर कट अशी अनेक मनोरंजक नावे त्या आकारांना दिलेली आहेत.

शिरोभूषणाचे महत्त्व पूर्वी फार होते. त्याचे पहिले काम म्हणाल तर ते म्हणजे उन्हापासून मस्तकाचे रक्षण करणे. त्या अर्थाने ती एक गरजेची, रोजच वापरण्याची वस्तू. पण तिचाही संबंध पुरुषाच्या सामाजिक, आर्थिक आणि भारतीय संदर्भात जातीय ओळखीशी जोडलेला असे. तेव्हा ही ओळखही मिशीइतकी जपणे आणि थोडीफार सजवणे आलेच. मिशीप्रमाणेच शिरोभूषणाच्याही नाना तऱ्हा होत्या.



लांबच लांब कापडी पट्टी वापरून शिवलेल्या शिरोभूषणाला महाराष्ट्रात पागोटे किंवा पगडी म्हणत. लांब म्हणजे किती, तर कोशात म्हटले आहे – सुमारे हातभर रुंद व पन्नासपासून सव्वाशे हात लांब असे वस्त्र (६० ते ७० फूट लांब). कापड सुती किंवा रेशमी आणि रंगीत असे. प्रतिष्ठित लोकांच्या, धनिकांच्या पगड्यांना जरीचा काठ आणि सोनेरी झिरमिळ्या असत, तर सत्तेच्या सर्वोच्च स्थानावर असणाऱ्यांच्या शिरोभूषणाला झोकदार पिसांची आणि हिऱ्यामोत्यांच्या अलंकारांची सजावट केलेली असे. व्यक्तीचे समाजातील स्थान जेवढे वरचे आणि वजनदार, तेवढा मस्तकावरच्या ऐवजाचा आकार आणि भार वजनदार असला पाहिजे, असेही एक गणित होते.

उन्हातान्हात राबणाऱ्या श्रमिकाला हे आकार-भाराचे गणित परवडणारे नव्हते, सोयीचे नव्हते, बहुधा ते समाजमान्यही नव्हते. उन्हापासून रक्षण हा मूळ हेतू साधणे एवढेच त्याच्यासाठी महत्त्वाचे होते. कष्ट करताना येणारा घाम ही समस्याही होती. त्यामुळे धुता येईल असे कापड डोक्याभोवती घट्ट गुंडाळले की त्याचे भागत असे.



हे झाले एकोणिसाव्या शतकातले पगडीपुराण. विसावे शतक उगवले. महाविद्यालयांमध्ये इंग्रजी शिक्षण घेणाऱ्या शहरी सुशिक्षितांनी आपली मस्तके नाना प्रकारच्या सुटसुटीत

टोप्यांखाली झाकली. गंधर्व टोपी, सावरकरी टोपी, गडकरी टोपी अशी नामवंतांची नावे त्यांना दिली गेली. लवकरच देशाच्या राजकीय क्षितिजावर मोहनदास करमचंद गांधी नावाच्या फाटक्या अंगाच्या फकिराचा उदय झाला आणि काहीच वर्षांत महाराष्ट्रातल्याच नव्हे, तर अख्ख्या भारतातल्या श्रीमंत, गरीब, विद्वान, निरक्षर, शहरी, ग्रामीण अशा सर्वच डोक्यांना एकच एक नवे शिरोभूषण मिळाले – गांधी टोपी. ह्या शिरोभूषणाच्या जन्माची ही इवलीशी पण प्रेरणादायक कथा :

**गांधी टोपी आणि दरिद्रीनारायणाचा राजमुकुट**

गांधींना भारतातील सर्व धर्मांच्या, जातीजमातींच्या, पंथांच्या लोकांकरता एकच एक अशी टोपी डिझाईन करायची होती. त्याकरता त्यांनी वेगवेगळ्या प्रांतांतून टोप्या मागवल्या. त्यांचा अभ्यास केला. त्या स्वतः वापरून पाहिल्या.



गांधींच्या बाबतीत हे फार महत्त्वाचे आहे. ते एक प्रयोगशील कलावंत होते, केवळ तात्त्विक विचारवंत नव्हते. 'लोका सांगे ब्रह्मज्ञान' हा प्रकार ते कटाक्षाने टाळत. कारण आपण अनुभवले नाही, त्याचा उपदेश करायचा आपल्याला नैतिक हक्क नाही, ही त्यांची धारणा होती.

ह्या टोप्यांवर प्रयोग करून त्यांनी गांधी टोपी बनवली. त्यांनी स्वतः ती दोन वर्षे वापरली. ह्या टोपीला त्यांनी स्वातंत्र्यलढ्यातले एक प्रभावी शस्त्र बनवले. १९२०च्या सुमारास ह्या टोप्या जागोजागी दिसू लागल्या. 'गांधींचे अनुयायी' हा ह्या टोप्यांचा अर्थ ब्रिटिशांनी तात्काळ ओळखला. त्यांचा संपूर्ण अर्थ 'ब्रिटिश साम्राज्याला विरोध, स्वातंत्र्याला पाठिंबा' असा असल्याची त्यांना कल्पना होती. ह्या टोप्यांवरून ब्रिटिशांनी लोकांना नोकऱ्या नाकारल्या, त्या परिधान करणाऱ्यांवर लाठीमार आणि हल्ले केले. सोजिरांनी काठीने ह्या टोप्या उडवून अपमान करायला सुरुवात केली. दरिद्रीनारायणाच्या ह्या राजमुकुटाचे साधेपण, हा एका मिनिमलिस्ट कलाकाराच्या सर्जनशीलतेचा विजय होता.

कवींना सर्वमान्य प्रतीके निर्माण करणे अनेकदा फार जड जाते. ती रसिकांपर्यंत पोचतीलच अशी त्यांना खात्री वाटत नाही. ज्यांना ती वाटते आणि जे ती प्रत्यक्षात आणतात ते खरे कवी. ज्ञानेश्वर, तुकाराम इ॰ संतांनी अशी समर्थ प्रतीके महाराष्ट्राच्या जिभेवर खेळवली, वारकऱ्यांनी दिंड्या-पताकांतून अंगाखांद्यावर नाचवली. गांधी टोपीबरोबरच भारतीय जनतेने गांधींना डोक्यावर घेतले. त्यांच्या सशक्त कविशक्तीचा योग्य मानसन्मान केला.

**- अरुण खोपकर**

**क. डाव्या रकान्यातील प्रश्नांची उत्तरे उजव्या रकान्यात लिहून वरील उतारा नीट समजावून घ्या.**

| | | |
|---|---|---|
| अ. | मिश्या आणि 'पुरुषपणाची' भावना ह्यांच्याशी निगडित म्हणी / वाक्प्रचार | |
| आ. | मिश्यांचे वेगवेगळे प्रकार – | |
| इ. | शिरोभूषण वापरण्याचा मूळ हेतू - | |
| ई. | पागोटे किंवा पगडी कशी बनत असे? थोडक्यात वर्णन - | |
| उ. | गांधी टोपीचा जन्म होण्याआधी शिरोभूषणांचे प्रचलित असलेले प्रकार – | |
| ऊ. | सर्वांकरता एकाच प्रकारची टोपी बनवण्यामागचा महात्मा गांधींचा हेतू – | |
| ए. | गांधी टोपी कशाचे प्रतीक बनली? - | |
| ॲ. | गांधी टोपी वापरणाऱ्यांना सुरुवातीस कोणत्या प्रतिक्रियांना सामोरे जावे लागले? - | |

**ख. अधोरेखित अधिविशेषणांचा उदाहरणाप्रमाणे विधिविशेषण म्हणून प्रयोग करा. त्यासाठी वाक्यरचनेत बदल, अथवा एका वाक्याची दोन वाक्ये करावी लागू शकतात.**

उदा॰ मिशीच्या आकारांना आकडेबाज, छपरी, लिंबू-पिळी, तलवार कट, हिटलर कट अशी अनेक मनोरंजक नावे दिलेली आहेत.

मिशीच्या आकारांना दिलेली आकडेबाज, छपरी, लिंबू-पिळी, तलवार कट, हिटलर कट अशी अनेक नावे मनोरंजक आहेत.

मिशीच्या आकारांना आकडेबाज, छपरी, लिंबू-पिळी, तलवार कट, हिटलर कट अशी अनेक नावे दिलेली आहेत. ती नावे मनोरंजक आहेत.

अ. पगडी बनवण्यासाठी सुती किंवा रेशमी आणि रंगीत कापड वापरले जाई.

-----------------------------------------------------------

-----------------------------------------------------------

आ. महाविद्यालयांमध्ये इंग्रजी शिक्षण घेणाऱ्या शहरी सुशिक्षितांनी आपली मस्तके नाना प्रकारच्या सुटसुटीत टोप्यांखाली झाकली.

-----------------------------------------------------------

-----------------------------------------------------------

इ. गांधी टोपीला त्यांनी स्वातंत्र्यलढ्यातले एक प्रभावी शस्त्र बनवले.

-----------------------------------------------------------

-----------------------------------------------------------

ई. ज्ञानेश्वर, तुकाराम इ. संतांनी अशी अनेक समर्थ प्रतीके महाराष्ट्राच्या जिभेवर खेळवली

-----------------------------------------------------------

-----------------------------------------------------------

उ. जनतेने गांधींच्या कविशक्तीचा योग्य मानसन्मान केला.

-----------------------------------------------------------

-----------------------------------------------------------

**ग. खालील उताऱ्यातील अधोरेखित अधिविशेषणांची विधिविशेषणे बनवून उतारा पुन्हा लिहा. त्यासाठी वाक्यरचनेत काही बदल करावे लागतील, ते करा.**

विसाव्या शतकाच्या सुरुवातीस जे चित्रपट आले त्यांत एका बाजूस लोभी आणि दुष्ट व्यापारी दाखवत असत. श्रीमंत जमीनदार, धनिक कारखानदार असे त्यांचे मित्र असत. चित्रपटाचा नायक बिचारा गरीब, कष्टाळू, इमानदार मजूर असे आणि त्याच्यासारख्याच इतर मजुरांच्या भल्यासाठी आणि न्यायासाठी तो लढत असे. चित्रपटाच्या नायिकेला जास्त करून केवळ सुंदर दिसणे आणि भारी कपडे घालून नाच करणे, गाणी गाणे आणि नायकाच्या प्रेमात पडणे ह्या प्रकारच्या भूमिका वाट्याला येत.

-----------------------------------------------------------

-----------------------------------------------------------

-----------------------------------------------------------

-----------------------------------------------------------

-----------------------------------------------------------

-----------------------------------------------------------

-----------------------------------------------------------

-----------------------------------------------------------

**घ. वाक्प्रचार आणि त्याचा अर्थ ह्यांच्या जोड्या लावा आणि नंतर त्यांचा योग्य त्या वाक्यात प्रयोग करून अर्थपूर्ण वाक्ये बनवा.**

**मिशी**

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | मिशी उतरणे / उतरवणे | १. | सूड घेण्याची तयारी दाखवणे |
| आ. | मिशीवर ताव देणे | २. | श्रीमंतीची ऐट मिरवणे, पोकळ डामडौल करणे |
| इ. | मिशीला तूप लावणे | ३. | फजिती होणे, नक्षा उतरणे, मानहानी होणे |

१. सगळ्यांसमोर सारखं आपल्या नव्या बंगल्याचं, बायकोला घेतलेल्या महाग दागिन्यांचं वर्णन करून तो ------------------------------------------------.

२. महेश उगाच ------------------------------------------------. बजरंग फार प्रसिद्ध पहिलवान आहे. त्याच्यासमोर महेशची डाळ शिजणार नाही.

३. मी निवडणूक बिनविरोध जिंकेन, मग मी यंव करेन, त्यंव करेन अशा खूप बढाया रणजीतनं मारल्या; पण निवडणुकीचा निकाल कळला आणि ------------------------------------------------.

**टोपी**

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | टोपी घालणे | १. | टिंगल करणे, चेष्टा करणे |
| आ. | टोपी उडवणे | २. | मत बदलणे |
| इ. | टोपी फिरवणे | ३. | फसवणे, पैसे बुडवणे, लुबाडणे |

१. अमेय जे बोलतो तेच करतो आणि तसेच वागतो ह्यावर कोणी विश्वास ठेवू नये. तो कधी ------------------------------------------------

२. कॉलेजच्या पहिल्या दिवशी जुने विद्यार्थी नवीन विद्यार्थ्यांची ------------------------------------------------ ही गोष्ट सर्वमान्य नसली तरी सर्वत्र प्रचलित नक्कीच आहे.

३. श्रीराज खूपच गोडबोल्या आहे. पण असंच गोड बोलून त्यानं बऱ्याच जणांना ------------------------------------------------

## २ विशेषणांचा वापर

**क. पुढे दिलेल्या वाक्यांत आवश्यक ते बदल करून त्यांचे एक वाक्य तयार करा. हा बदल करताना विशेषणात काय बदल होतो तिकडे नीट लक्ष द्या.**

उदा. काळी साडी. त्यात मंजूषा छान दिसते. मंजूषा काळ्या साडीत छान दिसते.



अ. चालती गाडी. प्रवाशांनी चढू नये.

------------------------------------------------

आ. चावरं मांजर. तुषार त्याच्याजवळ जात नाही.

---------------------------------------------

इ. मोकळा माळ. फिरायला मजा येते.

---------------------------------------------

ई. बारीक भुरभुरणारा पाऊस. तरुणपणी आम्ही फिरायला जात असू.

---------------------------------------------

उ. चिंचोळा, वेडावाकडा रस्ता. म्हातारी माणसे इथून कशी जातील?

---------------------------------------------



**ख. कंसातील विशेषणाचे योग्य रूप वापरून वाक्ये पूर्ण करा.**

अ. तू त्या (वेडा) ------------ मुलाच्या नादी लागू नकोस, पस्तावशील.

आ. असा (उघडा) ------------ अंगानं घरभर फिरतोयस, थंडी नाही का वाजत तुला?

इ. त्या (भाबडी) ------------, (हळवी) ------------ मुलीला संपतनं असं कसं फसवलं?

ई. त्या (सावळा)------------, (उंच) ------------ आणि (हुशार)------------ मुलाच्या ती प्रथमदर्शनीच प्रेमात पडली.

उ. ह्या (फुटका) ------------ कपातून पाहुण्यांना चहा देणे योग्य नाही.

ऊ. (बडबडी) ------------ अन्वया त्या (माणूसघाणा) ------------ माणसाबरोबर कसा संसार करते, देव जाणे.

## ३ माझी आवड, माझी निवड.

**क. महाराष्ट्रातील एका वर्षाच्या वास्तव्यानंतर आपल्या गावी परत जाताना तुम्हाला तुमच्या येथील वास्तव्याची आठवण म्हणून एक शिरोभूषण बरोबर न्यायचे आहे. तुम्हाला पुढील तीन शिरोभूषणांमधून एक निवडायचे आहे. तुमची निवड काय असेल? कारणे देऊन पाच ते सहा ओळीत सांगा. तुम्हाला पुढील मुद्द्यांची मदत घेता येईल.**

१. ऐतिहासिक / सामाजिक / सांस्कृतिक महत्त्व.
२. आत्ताच्या काळात वापरता येण्याची शक्यता.
३. किंमत
४. वैयक्तिक आवड
५. उपयुक्तता


१


२


३

---------------------------------------------

---------------------------------------------

---------------------------------------------

---------------------------------------------

---

---

**ख. तुम्हाला तुमच्या मैत्रिणीसाठी खास महाराष्ट्रात तयार झालेले पादत्राण घ्यायचे आहे. पुढील चार पादत्राणांपैकी कोणते घ्याल? कारणे देऊन पाच ते सहा ओळींत सांगा. तुम्हाला पुढील मुद्द्यांची मदत घेता येईल.**

१. ऐतिहासिक / सामाजिक / सांस्कृतिक महत्त्व.
२. आत्ताच्या काळात वापरता येण्याची शक्यता.
३. किंमत
४. वैयक्तिक आवड
५. उपयुक्तता




---

---

---

---

---

---

---

**ग. तुम्हाला तुमच्या मैत्रिणीसाठी खास मराठी पेहराव विकत घ्यायचा आहे. पुढील चार पेहरावांपैकी कोणता घ्याल? कारणे देऊन पाच ते सहा ओळीत सांगा. तुम्हाला पुढील मुद्द्यांची मदत घेता येईल.**

१. ऐतिहासिक / सामाजिक / सांस्कृतिक महत्त्व.
२. आत्ताच्या काळात वापरता येण्याची शक्यता.
३. किंमत
४. वैयक्तिक आवड
५. उपयुक्तता



-----------------------------------------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------------------------

## ४ पत्रव्यवहार

तुम्ही कोल्हापुरातील एका सराफाकडून एक अस्सल कोल्हापुरी साज तुमच्या आईसाठी विकत घेतलात. मुंबईला परत आल्यावर तुमच्या लक्षात आलं, की त्याचा फासा बरोबर नाही. तुम्ही पुढच्या महिन्यात अमेरिकेला, तुमच्या मायदेशी परत जात आहात. तुम्ही त्या सराफाला एक औपचारिक पत्र लिहून तक्रार करता, आणि हा साज लवकरात लवकर दुरुस्त होऊन तुम्हाला कसा परत मिळेल त्याची विचारणा करता.

**खाली दिलेल्या काही वाक्यांची मदत घेऊन हे पत्र लिहा.**

प्रेषक –
प्रति –
स्थळ –
तारीख-

**विषय- सदोष दागिन्याबद्दल तक्रार**

**विक्री विभाग प्रमुख, ------------------------------ सराफ**

श्री. ------------------------------

दागिना कधी विकत घेतला? ------------------------------

दागिन्यातील दोष काय आहे? ------------------------------

दागिन्यातील दोष कधी लक्षात आला? ------------------------------

दुकानदाराकडून तुमच्या काय अपेक्षा आहेत? ------------------------------

दागिना तुम्हाला कधी परत हवा आहे? ------------------------------

दुकानदाराला तुमच्या सूचना : ------------------------------

दागिना वेळेवर परत न आल्यास तुम्ही काय कराल? (पोलिसात तक्रार, ग्राहकमंचाकडे तक्रार)

आपला,

## ५ शब्दकोडे

**पुढे दिलेल्या कळीच्या शब्दांवरून दागिने ओळखा. अधिक मदतीसाठी काही अक्षरे दिली आहेत.**

आडवे शब्द – १. गळ्यातलं – चार अक्षरी, २. गळ्यातलं - दोन अक्षरी, ३. नाकातलं- दोन अक्षरी ४. कानातलं – दोन अक्षरी, ५. गळ्यातलं – तीन अक्षरी, ६. कानातलं (अ.व.) दोन अक्षरी, ७. कमरेतलं- पाच अक्षरी, ८. बोटातलं- तीन अक्षरी

उभे शब्द – १. नाकातलं – तीन अक्षरी, २. पायातलं- तीन अक्षरी, ३. केसातलं – चार अक्षरी ४. गळ्यातलं - पाच अक्षरी, ५. पायातलं (अ॰व॰) – तीन अक्षरी, ६. हातातलं (अ॰व॰) – तीन अक्षरी

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १. | १. | पे | | | २.,२. | | | |
| | | | | | | ख | | | ३. |
| ४. मो | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| ३. | | | | | | ५. | | ४. | ल |
| | | ५. | | णी | | | | | |
| | | | | | ६. | ड्या | | | |
| | | | | | | | | ६. | |
| | ७. | म | | | | | ८. | ग | |
| | | | | | | | | | |

## ६ शब्दसंपदा


**क. पहिल्या स्तंभात जी विशेषणे आहेत, त्याच अर्थाची विशेषणे दुसऱ्या स्तंभात आहेत. जोड्या लावा.**

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | बुटका | १. | विनामूल्य |
| आ. | ढगाळ | २. | किमती |
| इ. | धनिक | ३. | धडधाकट |
| ई. | धट्टाकट्टा | ४. | अवाढव्य |
| उ. | फुकट | ५. | बदनाम |
| ऊ. | भ्याड | ६. | अभ्राच्छादित |
| ए. | कानफाट्या | ७. | श्रीमंत |
| ॲ. | निर्बुद्ध | ८. | मद्दड |
| ऐ. | भारी | ९. | भेकड |
| ओ. | अजस्त्र | १०. | गिड्डा |



**ख. वेषभूषा - जोड्या लावा**

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | झिप | १. | शर्ट |
| आ. | बटण | २. | धोतर |
| इ. | मोजे | ३. | दाढी-मिश्या |
| ई. | निऱ्या | ४. | शर्ट |
| उ. | ओचा | ५. | बूट |
| ऊ. | कात्री | ६. | नऊवारी साडी |
| ए. | सोगा | ७. | पाचवारी साडी |
| ॲ. | कॉलर | ८. | पँट |



ग. दागिने – जोड्या लावा

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | बिंदी | १. | पाय |
| आ. | अग्रफूल | २. | नाक |
| इ. | पाटली | ३. | केस |
| ई. | वाकी | ४. | गळा |
| उ. | अंगठी | ५. | कंबर |
| ऊ. | चिंचपेटी | ६. | बोटं |
| ए. | कुड्या | ७. | दंड |
| ॲ. | चमकी | ८. | कान |
| ऐ. | कमरपट्टा | ९. | डोकं |
| ओ. | तोरड्या | १०. | मनगट |



घ. विशेषण + नाम, जोड्या लावा.
डाव्या रकान्यातील विशेषणासाठी उजवीकडील वर्तुळातील योग्य नाम शोधून त्यांच्या जोड्या लावा. एका विशेषणाबरोबर एकाहून अधिक नामे वापरता येतील.

| | विशेषण | नाम |
|---|---|---|
| अ. | लांब | |
| आ. | पायघोळ | |
| इ. | घट्ट | |
| ई. | आखूड | |
| उ. | सैल | |
| ऊ. | कापलेले | |
| ए. | खोटे | |
| ॲ. | विटके | |
| ऐ. | जुनाट | |
| ओ. | आधुनिक | |

शर्ट
वेणी
केस
दाढी
कुडता
धोतर
साडी
सलवार
पँट
मिशी
दागिने
कपडे

**च. योग्य त्या पर्यायावर ✓ खूण करा.**



अ. **माधवीने नवीन साडीची घडी ------------------.**
१. मोडली २. ठेवली ३. रचली

आ. **मी बाहेर जाताना साडी ------------------.**
१. घालेन २. नेसेन ३. चढवेन

इ. **मी बाहेर जाताना टोपी / पगडी ------------------.**
१. चढवतो २. नेसतो ३. घालतो

ई. **नवरदेवाने लग्नासाठी फेटा ------------------.**
१. बांधला २. केला ३. नेसला

उ. **मी ऑफिसला जाताना नवीन शर्ट / पँट ------------------.**
१. बांधेन २. घालेन ३. नेसेन

**छ. वाक्प्रचार आणि अर्थ ह्यांच्या जोड्या लावा.**

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | पदरमोड करणे | १. | क्षमायाचना करणे |
| आ. | पदर पसरणे | २. | देणे, जबाबदारी एखाद्यावर टाकणे |
| इ. | पदराला खार लागणे | ३. | मिळणे |
| ई. | पदरात बांधणे | ४. | स्वत:चा पैसा खर्च करणे |
| उ. | पदरी पडणे | ५. | आर्थिक नुकसान, झीज सोसणे |
| ऊ. | पदराखाली घेणे | ६. | आठवण ठेवणे, लक्षात ठेवणे |
| ए. | पदराला गाठ मारणे | ७. | आश्रय देणे, जबाबदारी घेणे |

**ज. योग्य तो वाक्प्रचार वापरून वाक्ये पूर्ण करा.**

अ. झालेली अक्षम्य चूक लक्षात आल्यावर धनश्रीने ती कबूल केली आणि मालकासमोर चक्क ------------------.

आ. त्या अनाथ मुलाची दीपंकरला दया आली आणि त्याने त्याला ------------------.

इ. ह्या प्रकल्पाची जबाबदारी माझी नाही. उगाच तो माझ्या ------------------ प्रयत्न करू नका. मदतीला मी तयार आहे. जबाबदारी घ्यायला नाही.

ई. आजी सारखी विसरते. काय विसरू नये म्हणून आपण ------------------ हेही ती विसरते.

उ. तू उगाचच इतकी ------------------. तुझ्या ह्या उदारपणाचा काहीच फायदा झालेला मला तरी दिसत नाहीये.

ऊ. आजोबांनी त्यांच्या मृत्युपत्रात प्रत्येकाला काही ना काही ठेवलं होतं. माझ्या ------------------ नेमकं ते गावचं उजाड घर ------------------.

ए. मोहिनीवर छाप पडावी म्हणून मी सगळ्यांना हॉटेलात जेवायला नेलं. नंतर कळलं, की तिचा साखरपुडा झालेला आहे. उगीचच माझ्या ------------------.

## ७ जगातील सर्वात चांगला वेष

**जगातील सर्वांत चांगला वेष**



मला कोणी विचारलं, तर मी परत परत हेच सांगेन, सर्व जगात सर्वात चांगला वेष कुठला असेल, तर तो साडी हाच.

बघा ना, साडीत बायका किती सुंदर दिसतात! डौलदार, कमनीय, ऐटबाज. साडी त्यांच्या शरीराच्या ठेवणीतील सर्व दोष लपवते आणि चांगल्या गोष्टी उठावदार करते. साडी नेसण्याचे प्रत्येक स्त्रीचे कसब वेगळेच, त्यामुळे प्रत्येक स्त्री त्याच साडीत वेगळी दिसते. शिवाय, साडी किती बहुगुणी असते! पाऊस पडत असेल, तर जरा उंच खोचून पाण्यातून वाट काढावी. थंडी वाजत असेल तर दोन्ही खांद्यांवरून पदर लपेटून घ्यावा. कुठल्या समारंभाला जात असू, तर पायघोळ साडी नेसून, लांब पदर काढून तो फलकारत ऐटीत हिंडावे.

साडीचा पदर हा एक वेगळाच विषय आहे. कामाची गर्दी असेल तेव्हा पदर खोचून कामाला लागावे. रस्त्यातून जाताना ऊन असेल तर तो डोक्यावर घ्यावा, कोणापासून लपायचे असेल तर जरा आणखी पुढे ओढावा. बाई घरात असताना तर हा पदर एकटाच अनेक कामांसाठी उपयोगी पडतो. आपले ओले हात पदराला पुसत नवऱ्याला दार उघडायला धावणारी स्त्री, लहान मुलाचं खरकटं तोंड पदराच्या शेवानं पुसणारी स्त्री, कोणती गोष्ट विसरायची नसेल तर त्यासाठी पदराला गाठ मारून ठेवणारी स्त्री, कुशीत झोपलेल्या बाळाला आपल्या पदराचं पांघरूण घालणारी स्त्री, त्याच मुलाचे अपराध ह्याच पदरामागे लपवणारी स्त्री, वेळप्रसंगी हाच पदर खोचून आपल्या माणसांसाठी खंबीरपणे उभे राहणारी स्त्री. बघा, हा वेष जर स्त्रीला मिळाला नाही, तर स्त्रीची ही इतकी वेगवेगळी रूपे आपल्याला कशी दिसतील?

काय, मग आहे ना कबूल? जगातला सर्वांत चांगला वेष म्हणजे साडी.

**क. तुम्हाला (स्त्रियांचा किंवा पुरुषांचा) कोणता वेष जगातील सर्वांत चांगला वेष वाटतो? का? तुमचे मत दहा पंधरा ओळीत पटवून द्यायचा प्रयत्न करा. त्यासाठी वरील उताऱ्याची मदत घ्या. तुमच्या मदतीसाठी खाली काही चित्रे दिली आहेत. त्यांपैकी एकाची मदत घेता येईल, किंवा तुम्ही तुमच्या कल्पनेतील एखाद्या वेषभूषेबद्दलही सांगू शकता.**



---------------------------------------------

---------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

## ८ संधी

**क. पुढील संधी सोडवा.**

अ. रमेश = ---------------- + ----------------

आ. अत्यल्प = ---------------- + ----------------

इ. भाग्योदय = ---------------- + ----------------

**ख. पुढील शब्दांचे संधी करा.**

अ. जन + ऐक्य = ----------------

आ. अति + आवश्यक = ----------------

इ. निसर्ग + उपचार = ----------------



# तोंडी परीक्षा

## एकूण गुण २०

**१. पुढीलपैकी कोणताही एक विषय आपल्या सहाध्यायाशी बोलून निवडा आणि त्याच्या / तिच्या बरोबर वादविवाद करा. (१०)**

**क. विद्यालयात आणि महाविद्यालयात प्रत्येक विद्यार्थ्याला किमान एका मैदानी खेळात भाग घेणे सक्तीचे असावे / नसावे.**

**ख. आंतरविद्यालयीन आणि आंतरमहाविद्यालयीन पातळीवर अनेक स्पर्धा घेतल्या जातात. त्यात 'फॅशन-शो'चाही समावेश असावा / नसावा.**

**ग. शाळा-कॉलेजात गणवेश सक्तीचा असावा / नसावा.**

**२. खालीलपैकी कोणताही एक विषय निवडा आणि हा उपक्रम कसा पार पाडायचा ह्याबद्दल सहाध्यायाबरोबर चर्चा करून संपूर्ण बेत ठरवा. (१०)**

**क. सहल न्यायची आहे.**
कोठे, कधी, कोण-कोण, बरोबर काय घ्यायचे, प्रवास कसा करायचा, कोणाला काय जबाबदारी द्यावी वगैरे वगैरे

**ख. क्रिकेटचा सामना आयोजित करायचा आहे.**
कोणाबरोबर, कधी, कुठे (शाळेचे मैदान, इतरत्र), खेळाडूंची निवड, पंचांची निवड, खर्चाची तरतूद, चहापान, जेवण ह्यांची व्यवस्था इत्यादी.

**ग. संस्थेच्या वर्धापनदिनानिमित्त फॅशन-शो करायचा आहे.**
फॅशन-शोचा विषय, सहभाग, लागणारी सामग्री, निवेदकाची निवड, प्रशिक्षकाची निवड, परीक्षकाची निवड इत्यादी.

# लेखी परीक्षा

## एकूण गुण ३०

### १. पुढील उतारा वाचून खाली दिलेले प्रश्न सोडवा. (६)

आदिवासी वस्त्यांमध्ये जाऊन आरोग्यसेवेचे काम करणारी एक डॉक्टर मैत्रीण सांगत होती : कामाला मी नुकतीच सुरुवात केली होती. तिथलं सगळंच मला अनोळखी आणि नवं होतं. इतकं, की मी एखाद्या परग्रहावरून अचानक त्या प्रदेशात उतरले आहे, असं मला वाटायचं. तिथल्या जगण्याची लय मला पकडता येत नव्हती. निसर्ग आणि तिथला माणूस ह्यांच्यात असणारं नातं आणि निसर्गाशी असणारं माझं नातं, ह्यांचं गणितच जुळत नव्हतं. मी तिथं असण्यामागचं उद्दिष्ट नक्की काय होतं ते माझं मलाच कळेनासं झालं होतं. एका लहानशा प्रसंगानं हा प्रश्न जास्तच तीव्रतेनं मला जाणवला.

थंडीचे दिवस होते. सकाळी मी आमच्या आरोग्यकेंद्राकडे चालत निघाले होते. रस्त्यापासून थोड्याशा अंतरावर एका झोपडीसमोरच्या मोकळ्या जागेत एक जख्ख म्हातारी आजी आणि रांगणारं एक उघडबंब मूल उन्हं खात बसले होते. ते मूल दोन्ही हातांनी काही तरी पकडण्याची धडपड करत असल्याचं आणि ते काही तरी त्याच्या हातून निसटून दूर जात असल्याचं मला पुसटसं दिसलं. गुडघे पोटाशी घेऊन स्वस्थ बसलेल्या आजीनं अखेर हात लांब करून ते उचललं आणि मुलापुढं टाकलं. मुलाच्या चेहऱ्यावर किंचितसं हसू उमटलं आणि ते पुन्हा खेळू लागलं.

नकळत रस्ता सोडून मी झोपडीच्या दिशेनं गेले. त्या दोघांच्या जवळून जाता जाता पाहिलं आणि थक्क झाले. ते मूल एका खेकड्याशी खेळत होतं. जिवंत खेकड्याशी. माझ्या भाचरांच्या, मित्रांच्या मुलांच्या तऱ्हेतऱ्हेच्या खेळण्यांनी ओसंडणाऱ्या स्वतंत्र चकचकीत खोल्या माझ्या नजरेसमोरून सरकल्या आणि पुढचे काही दिवस माझी झोप उडाली.

**क. खाली दिलेल्या अर्थांचे समानार्थी वाक्प्रचार वरील उताऱ्यात आले आहेत ते लिहून तक्ता पूर्ण करा.**

| | | |
|---|---|---|
| अ. | पकडीतून सुटणे | |
| आ. | जास्त भरल्यामुळे बाहेर पडणे | |
| इ. | अस्वस्थ वाटणे, मनःशांती हरपणे | |
| ई. | ताळमेळ न बसणे | |
| उ. | खूप आश्चर्य वाटणे | |
| ऊ. | प्रकर्षाने वाटणे | |

**२. कोणत्याही एका विषयावर पंधरा ते सोळा ओळींचा परिच्छेद लिहा. (१०)**

क. खेळांचे मानवी जीवनातील स्थान

ख. जर फॅशन करण्याचे स्वातंत्र्य नसते तर!

**३. अधोरेखित वाक्यांश उदाहरणाप्रमाणे धातुसाधित बनवा आणि ते वापरून वाक्य परत लिहा. (३)**

उदा. वीज आली की लगेच पाण्याचा पंप चालू कर. पाणी संपलंय टाकीतलं.
वीज आल्या आल्या पाण्याचा पंप चालू कर. पाणी संपलंय टाकीतलं.

क. श्रीरंगने ती बातमी वाचली आणि लगेच पोलीस स्टेशन गाठलं.

ख. जेवण झाल्याक्षणी राधिका घराबाहेर पडली.

ग. जयश्री नेहमीच पत्र लिहिल्यावर लगेच ते पोस्टात टाकते.

घ. पहिला पाऊस पडताना पाहिला, आणि नताशा लगेच अंगणात धावली.

च. परीक्षा संपताक्षणी अंजली मैदानात धाव घेते.

छ. झाड लावलं आणि लगेच त्याला फुलं लागली, असं कधी होतं का?

**४. कंसात दिलेल्या क्रियापदांपासून उदाहरणाप्रमाणे धातुसाधित बनवून वाक्य पूर्ण करा. (२)**

उदा. सरकारी कार्यालयात काही (देणे-घेणे) दिल्याघेतल्याखेरीज कामं होत नाहीत असा बऱ्याच जणांचा समज असतो.

क. (रडणे-भेकणे) ----------------------खेरीज आपला हट्ट पुरवला जाणार नाही हे श्रेयाला पुरतं माहीत होतं.

ख. आमच्याकडच्या जेवणात मिरची, कोथिंबीर आणि खोबऱ्याचं वाटण लागतंच. चांगलं तासभर (वाटणे-घाटणे) ----------------------खेरीज बायकांचा दिवसच सुरू होत नाही.

ग. लग्नाच्या मेंदीचा कार्यक्रम, विद्या चांगली गाते आणि नाचते हे सर्वांनाच माहीत. त्यामुळे (नाचणे-गाणे) ----------------------शिवाय तिची सुटका होणार नाही ह्याची खात्रीच होती घरच्यांना.

घ. कोणी (करणे-करवणे) ----------------------शिवाय हे झाले नाही. (अडणे-नडणे) ---------------------- ला मदत करणे हे आपलं कर्तव्यच नाही का?

**४. पुढील शब्द वापरून प्रथम वर्तमानकाळात आणि नंतर भूतकाळात वाक्ये बनवा. दोन्ही वाक्यांतील क्रियापद कशाप्रमाणे चालले ते सांगा. (कर्त्याप्रमाणे, कर्माप्रमाणे की दोन्हीप्रमाणे नाही?) (३)**

क. राजेश, मंदार, ढकलणे.

ख. सुनिधी, केळं, खाणे.

ग. सुनिधी, केळी, खाणे.

घ. रमेश, कॉफी, पिणे.

च. झिनिया, नाटक, पाहणे.

छ. झिनिया, तमाशा, पाहणे.

**५. उदाहरणाप्रमाणे शब्दांच्या जागा बदलून वाक्ये परत लिहा. (२)**

उदा. माझी एका अत्यंत हुशार आणि चतुर माणसाशी गाठ पडली आहे, हे माझ्या लवकरच लक्षात आले.
माझी ज्याच्याशी गाठ पडली आहे, तो माणूस अत्यंत हुशार आणि चतुर आहे, हे माझ्या लवकरच लक्षात आले.

क. त्या प्राचीन आणि भव्य वाड्यात मी हरवले. माझ्याबरोबरची माणसे मला सापडेनात.

ख. जेवण फारच चविष्ट आणि रुचकर होतं. अशा जेवणानंतर झोप येणारच.

## ६. संधी

**क. पुढील संधी सोडवा** **(२)**

अ. केलेसे = ---------- + ----------

आ. कार्यारंभ = ---------- + ----------

इ. महोत्सव = ---------- + ----------

ई. परोपकार = ---------- + ----------

**ख. संधी करा.** **(२)**

अ. उमा + ईश = ----------

आ. चंद्र + उदय = ----------

इ. विद्या + अर्थी = ----------

ई. महिला + आश्रम = ----------



# हास्यतरंग ३










## चला, शिकू या ...

- व्यंगचित्रे समजणे
- विनोद, त्याची आवश्यकता व त्याचे महत्त्व ह्यांबद्दल बोलणे
- महाराष्ट्राला लाभलेल्या विनोदी लेखकांचे उतारे वाचणे व समजणे
- व्याकरण : विशेषणसाधित क्रियाविशेषणे ओळखणे व वापरणे
- संधी ओळखणे आणि करणे

## १ व्यंगचित्रे

क. शिवराम दत्तात्रेय फडणीस यांच्या खालीलपैकी एका व्यंगचित्रावरून एक विनोदी गोष्ट लिहा.



**अ. ह्यांना ही व्यंगचित्रे कशी सुचली असतील? एखादे व्यंगचित्र निवडा आणि त्याविषयीचा तुमचा अंदाज लिहा.**

**आ. रिकाम्या जागी योग्य शब्द वापरून खालील उतारा पूर्ण करा.**

(तंबोरा, गैरसोय, अडगळ, मोठमोठे, दृष्टिकोन, चंद्रप्रकाश, पुतळा, पाठलाग, विनोदी, निर्मिती, विनोदबुद्धी, परिधान, व्यंगचित्रे, उणीव, मजला, ~~विनोद~~, मुखपृष्ठ, प्रसिद्ध, निरागस, कल्पनाशक्ती)

"तुम्ही स्त्रियांवरच विनोद का करता असे कोणीतरी एकदा शि. द. फडणीस ह्यांना विचारले होते. त्यावर ते म्हणाले, "स्त्रियांच्या (१) ---------- वर माझा विश्वास आहे. त्या माझे अपराध पदरात घेतात, म्हणून स्त्रियांना पहिलं स्थान दिलं आहे."

शि. द. फडणीस ह्यांनी नेहमीच स्त्रीला, तिच्या अनेकांगी स्वभावाला आपल्या (२) ---------- तून निखळ (३) ---------- पद्धतीने मांडले आहे. त्यांची अनेक व्यंगचित्रे त्यांना कशी सुचली ह्या प्रश्नावर ते अनेक किस्से सांगत :

"मासिकाच्या (४) ---------- वर व्यंगचित्र वापरण्याची कल्पना प्रत्यक्षात आणायची होती. १९५२चा तो काळ होता. आम्ही कुटुंबीय खरेदी करायला गेलो होतो. दुकानदारानं अनेक कापडं समोर टाकली. सगळ्या कपड्यांवर (५) ---------- प्रिंटस् होत्या. त्या पाहताना सहज माझ्या मनात आलं, उद्या उंदीर, मांजरं असलेली कापडंदेखील येतील. त्यातून विचार सुरू झाला. जर कापडांवर मांजरं आली तर तीही उंदरांच्या मागे लागतील. त्यातूनच मग पुढे बसस्टॉपवर मांजराची प्रिंट असलेली साडी (६) ---------- केलेली स्त्री आणि उंदराची प्रिंट असलेला शर्ट अंगात असलेला तरुण यांचा (७) ---------- हा विषय मी चित्रातून मांडला. 'मोहिनी'चं ते मुखपृष्ठ होतं.

स्त्री हा विषय घेऊन वा ठरवून मी कधी व्यंगचित्रांची (८) ---------- केली नाही. चित्राचा विषय म्हणूनच त्यामध्ये स्त्री आली आहे हे निश्चितपणे सांगता येईल. माझं पहिलं व्यंगचित्र 'मनोहर'मध्ये (९) ---------- झालं होतं. 'मुंबईतील हल्लीचं बिऱ्हाड' हा चित्राचा विषय होता. एकाच खोलीतील (१०) ---------- चा संसार आणि या अडचणीत पाहुणा आल्यामुळे (११) ---------- होईल म्हणून नाराज झालेली गृहिणी असा आशय मी त्या चित्रातून मांडला होता. अशा रीतीने माझ्या पहिल्याच चित्रात स्त्री आली.

एका चित्राची नायिका (१२) ---------- घेऊन गाणं गात आहे. डोळे मिटलेले आणि हावभाव पाहून जवळ असलेल्या बालकाला ती का रडतेय हेच कळत नाही. त्यामुळे ते बालक हातातील चॉकलेट आणि खुळखुळा तिला देत आहे. हे चित्र अनेकांना आवडलं. हा (१३) ---------- विनोद म्हणजे बालकाचा तिच्या गाण्यावरचा अभिप्राय आहे अशी अनेकांची भावना झाली.

एका चित्रात (१४) ---------- त तो आणि ती नौकेतून विहार करताना तिच्या साडीचं रूपांतर शिडामध्ये झालं आहे, असं दाखवलं आहे. या चित्रामध्ये रोमँटिक मूड असलेली स्त्री आली आहे. प्रत्येक व्यंगचित्राची एक गोष्ट असते. ती त्यातून व्यक्त होत असते.

स्त्रियांकडे खूप चांगली (१५) ---------- असते असं मला वाटतं. त्याचाही मी छान उपयोग करून घेतलाय. एक चाळ दाखवली आहे. वरच्या (१६) ---------- वरून वाळत

घातलेल्या साड्या खालच्या मजल्यापर्यंत आल्या आहेत. तेव्हा तळमजल्यावरची स्त्री त्यांचा चक्क पडद्यासारखा उपयोग करते. त्यामुळे दोघींचे उद्देश सफल होताना दिसतात आणि तिच्या कल्पकतेचं हसू येतं.

☐ प्रत्येक वेळी व्यंगचित्रातून विनोद घडलाच पाहिजे असं नाही. आपल्या संस्कृतीचं आणि स्त्रीच्या कनवाळू स्वभावाचं दर्शन घडवणारं एक चित्र मी काढलं होतं. या चित्रात व्हीनसचा तो हात नसलेल्या स्त्रीचा (१७) ------------------------ आहे. एक भारतीय स्त्रीचा पुतळा आपले दोन हात तिला देऊ करतो, असं ते चित्र होतं. आपल्याकडचं गरजवंताला काही देण्याच्या आपल्या स्वभावातून हे चित्र घडलंय.

मी ठरावीक उद्देश ठेवून व्यंगचित्रकार झालो नाही. कल्पनेत जे आलं ते मांडत गेलो; अर्थात वास्तवात जे दिसलं ते समोर ठेवूनच. निखळ विनोद हीच त्यामागची भावना होती. त्यामध्ये एखाद्या घटनेकडे पाहण्याचा (१८) ------------------------ सामावलेला असतो. चित्रकार म्हणून व्यक्त होण्याला मर्यादा पडतात. ती (१९) ------------------------ व्यंगचित्र भरून काढतं असंच मला वाटतं.”

**इ. वरील लेखात सांगितलेले किस्से आणि सुरुवातीला दिलेली व्यंगचित्रे ह्यांच्या जोड्या लावा. किश्श्यांच्या डावीकडे दिलेल्या छोट्या चौकटीत व्यंगचित्रांचे क्रमांक लिहा.**

## २ पुढे काही वाक्ये दिली आहेत. त्यांचा अर्थ न बदलता ती वेगळ्या शब्दांत लिहा.

उदा. पूर्वी साहित्याची निर्मिती सामान्यतः समाजाला वळण लावण्यासाठी आणि जीवनावर प्रेम करायला शिकवण्यापेक्षा त्याला विरक्तीकडे नेण्यासाठी होत असल्याचे दिसते.
समाजाला वळण लागावे, त्याने जीवनावर प्रेम करण्याऐवजी विरक्तीकडे जावे हेच बहुतेक त्यापूर्वीच्या साहित्याच्या निर्मितीचे उद्दिष्ट होते.

क. भरीला पद्यरचनेचे काटेकोर नियम पाळण्याचे दडपणही असे.
शिवाय साहित्यकारांना ------------------------------------------------
------------------------------------------------------------------------

ख. मानवी जीवनातल्या आणि स्वभावातल्या विसंगतींमधून विनोद जन्म घेत असतो हे तेव्हा कुणाच्या गावीही नसावे.
मानवी जीवनातल्या आणि स्वभावातल्या विसंगतींमधून विनोद जन्म घेत असतो ------------
------------------------------------------------------------------------

ग. पण विनोद फुलण्यासाठी, तो सशक्त आणि परिणामकारक होण्यासाठी मोकळे वातावरण, मोकळी अभिव्यक्ती आणि प्रयोगशीलता यांना समाजमानसात स्थान असावे लागते.
पण मोकळे वातावरण, मोकळी अभिव्यक्ती आणि प्रयोगशीलता यांना समाजमानसात स्थान असले ------------------------------------------------

घ. मग ब्रिटिश आले. बरोबर आपली भाषा आणि समृद्ध वाङ्मय घेऊन आले. त्या वाङ्मयाशी

परिचय झालेल्या देशी सुशिक्षितांनी पुराणकथांमध्ये अडकलेली आपली नजर सोडवून घेत विसंगतींनी भरलेल्या सभोवतालाकडे पाहायला सुरुवात केली.
मग ब्रिटिशांनी बरोबर ------------------------------------------------------------------------------------- परिचय झालेल्या देशी सुशिक्षितांनी ------------------------------ ऐवजी सभोवतालच्या ------------------------------ पाहायला सुरुवात केली.

च. त्यातून निरुपयोगी आणि अन्याय्य रूढी जपणाऱ्या वर्गाचा रागही ओढवून घेतला.
त्यातून निरुपयोगी आणि अन्याय्य रूढी जपणाऱ्या सनातनी ------------------------ त्यांच्यावर ------------------------ .

छ. राम गणेश गडकरींनीही नाटके, कविता, व्यक्तिचित्रे, टीकालेख, प्रहसने इत्यादी प्रकार हाताळले. त्यांच्याकडे दिपवून टाकणारे भाषावैभव, कल्पकता, तीक्ष्ण आणि भेदक विनोदबुद्धी होती.
दिपवून टाकणारे भाषावैभव, -------------------------------------------------------------------------------------
---------------- राम गणेश गडकरींनीही नाटके, कविता, व्यक्तिचित्रे, टीकालेख, प्रहसने इत्यादी प्रकार हाताळले.

ज. ज्या लेखकांची अशी ओळख नाही आणि तरीही ज्यांच्या साहित्यात जागोजागी दर्जेदार विनोद आढळतो, असे तर अनेक लेखक महाराष्ट्राला लाभले आहेत.
अशी ओळख ------------------------------ आणि तरीही त्यांच्या साहित्यात जागोजागी दर्जेदार विनोद ------------------------------ अनेक लेखक महाराष्ट्राला लाभले आहेत.

## ३ कथाकार जी. ए. कुलकर्णी

**जी. ए. कुलकर्णी हे एक गंभीर लेखक म्हणून ओळखले जातात. तरीही त्यांच्या लेखनात अधूनमधून खुदकन हसवणारा तिरकस विनोद आढळतो. हा एक नमुना पाहा :**

### तातू



दातार मास्तरांच्या तासाला तातू सामंताला जर काही प्रश्न विचारायचे असले, तर फारच रंगत येत असे. हा तातू सामंत म्हणजे एक पिशानवल्ली पोरगा होता. त्याच्या डोक्याला बरोबर बसणारी टोपी जगात अद्याप निर्माण न झाल्याप्रमाणे एक टीचभर टोपी तुळतुळीत डोक्यावर कुठेतरी ठेवून बेडूकडोळ्यांनी समोर पाहत तो वर्गात स्वस्थ बसलेला असे. त्या वेळी वर्गाला खेळ सक्तीचे असत. केवळ त्यामुळे आठवड्यातून दोनदा तो ग्राऊंडवर दिसे. फुटबॉलच्या वेळी तर तो इतरांच्यापेक्षा जास्त वेगाने धावे. पण ते फुटबॉलला पाऊल मारण्यासाठी नव्हे, तर तो धावणारा फुटबॉल आपल्याला खाऊन टाकण्यासाठी आपल्या मागे लागला आहे, असे वाटून त्याच्यापासून सुटण्यासाठी. तेथून सुटून तो एकदा वर्गात परत आला व धापा टाकत पेन्सिल तोंडाशी धरून बसला की घंटा होईपर्यंत जगाला हरवलाच.

कातडी फुग्याला लाथा मारणे किंवा फळकुटाने चेंडू बडवत राहणे हे अगदी खुळचटपणाचे काम आहे, असे तो स्पष्ट सांगत असे. त्यामुळे तो वर्गात फारसा लोकप्रिय नव्हता. (...)

तातू तिसरीत आमच्या वर्गात आला. पाच वर्षे आम्ही शेजारी शेजारी बसलो. त्याच्या शेजारी बसण्याचे मला आणखी एक कारण होते. माझ्या खालोखाल त्याची सर्वात जास्त वेळा वर्गातून हकालपट्टी झाली होती. (...)

एकदा आपटे मास्तरांनी कोणताही एक प्राणी अगर पक्षी याविषयी त्याचे खाणे, त्याची राहण्याची पद्धत ही माहिती गोळा करून एक निबंध तयार करण्यास सांगितले होते. त्यात तातूचा निबंध सर्वात प्रसिद्ध ठरला. त्याला त्याबद्दल वर्गाबाहेर जावे लागले आणि प्रिन्सिपॉलकडून आठ आणे दंड झाला. तो कधी प्रत्यक्ष द्यावा लागला नाही ही गोष्ट निराळी. त्याने एका चतकोर कागदावर लिहिले होते, "पेंग्विन पक्षी आमच्या गल्लीत कुणाकडेच नाही. त्यामुळे त्याच्या खाण्यापिण्याची माहिती मिळत नाही. पण तो दिसायला असा असा असतो," असे लिहून त्याखाली त्याने कुठून तरी मिळवलेले पेंग्विनचे एक लहान चित्र चिकटवले होते. (...)

पण एका प्रसंगानंतर मात्र आम्ही सगळ्यांनी त्याची पाठ थोपटली. केवळ शाकाहाराचा आग्रह धरणारे एक गृहस्थ शाळेत आले. त्यांनी त्या विषयावर आवेशपूर्ण भाषण केले व शेवटी सांगितले, "गव्हाचा दाणा चैतन्यपूर्ण आहे. तो जमिनीत टाका, त्यातून हिरवेगार रोप वर येते. मटण-मांस जमिनीत टाका, तर काय येईल? माती?"

व्याख्यानानंतर त्यांनी प्रश्न विचारायला सांगितले. त्या विषयात तसे कुणालाच आतडे नव्हते. तातूने तर कधी कोंबडीचे अंडेदेखील हातात धरले नसेल. पण प्रश्न विचारायला उभा राहिला तो तातू! त्याने विचारले, "तुम्ही गहू कच्चे खाता की चपाती-ब्रेडच्या रूपात?"

"मी चपाती-पोळ्या खातो. कच्चा गहू खायला मी घोडा नाही," व्याख्याते म्हणाले व काही पोरे भस्सदिशी हसली.

"मग त्या चपात्या जमिनीत टाकल्या तर काय येईल? माती?" तातूने तसे विचारताच पाहुण्यांचा चेहरा लालसर झाला, व प्रिन्सिपॉलनी घाईघाईने सभा संपवली. पण आम्ही पाठीवर मारलेल्या थापांमुळे तातू अगदी जेरीला आला.

- **जी. ए. कुलकर्णी**

**क. पूर्ण उतारा वाचल्यावर तातू सामंत ह्या मुलाचे व्यक्तिमत्व तुम्हाला कसे जाणवले? त्याचे रूप, स्वभाव, सवयी, वैशिष्ट्ये दाखवणारे व्यक्तिचित्र लिहा.**

--------------------------------

--------------------------------

--------------------------------

--------------------------------

**ख. आता त्याचे वर्णन करणाऱ्या 'पिशानवल्ली' ह्या शब्दाचा कोणता अर्थ तुम्हाला कळतो? लिहा.**

--------------------------------

--------------------------------

--------------------------------

**ग. खालील वाक्यांशांचा अर्थ काय?**

अ. ...पेन्सिल तोंडाशी धरून बसला, की घंटा होईपर्यंत जगाला हरवलाच.

आ. बेडूकडोळ्यांनी पाहत तो वर्गात स्वस्थ बसलेला असे.

इ. त्या विषयात तसे कुणालाच आतडे नव्हते.

घ. विद्यार्थी असताना अशा एखाद्या 'पिशानवल्ली'शी तुमची गाठ पडली होती का? सविस्तर लिहा.

## ४ जनसामान्यांचा विनोद

निरक्षर कष्टकरी समाजाच्या मनोरंजनामध्ये खळखळून हसवणारा विनोद हा फारच महत्त्वाचा घटक नेहमीच होता आणि आजही आहे. जसे श्रमिकाचे जगणे खडतर तसा त्यांचा विनोदही ओबडधोबड, रासवट पण रसरशीत, सडेतोड आणि रोखठोक, ओल्या मातीचा खमंग गंध असणारा असतो. लोककथा, लोकगीते, स्त्रीगीते, खेळ अशा वेगवेगळ्या वाटांनी तो त्यांच्यापर्यंत पोहचत असतो. पण त्यात निखळ, विनोदासाठी विनोद तसा कमीच असतो. भारूड, ललित, तमाशा, गोंधळ, दशावतार यांसारखे नाट्यप्रकार विनोदाच्या आडून सामान्यजनांना शहाणपणाचे बोल ऐकवत असतात. त्यात दडलेले अध्यात्म असते तसे विचारप्रबोधनही असते. संत एकनाथांनी रचलेले आणि



आजही लोकप्रिय असणारे हे भारूड पाहा –

सत्वर पाव ग मला । भवानीआई, रोडगा वाहीन तुला ॥
सासरा माझा गावी गेला । तिकडंच खपवी त्याला ॥
सासू माझी फार गांजिते । मरिआई येऊ दे तिला ॥
जाऊ माझी फडफड बोलती । बोडकी कर ग तिला ॥
नणदेचं पोर किरकिर करतं । खरूज येऊ दे त्याला ॥
दादला मारूनि आहुती देईन । मोकळी कर ग मला ॥
एका जनार्दनी सगळेचि जाऊ दे । एकटीच राहू दे मला ॥

सासरच्या त्रासाला कंटाळलेली सून त्या त्रासातून मला सोडव अशी देवीकडे विनवणी करते आहे हा भारूडाचा सरळ अर्थ आहे. खरोखरच त्रासलेल्या सुनांचे त्यामुळे मनोरंजन होते; आपली बाजू घेऊन कोणी तरी बोलते आहे हे ऐकून त्यांच्या जीवाला बरे वाटते हे खरेच; पण त्यात दडलेले अध्यात्मही आहे : सासरा म्हणजे अहंकार, सासू म्हणजे इच्छा किंवा वासना ... वगैरे.

सामाजिक-राजकीय विषयांवर टिप्पणी करण्यासाठी आणि लोकांचे प्रबोधन करण्यासाठीही विनोदासारखे दुसरे प्रभावी साधन नाही, हे लक्षात घेऊन आपापले विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी आणि विरोधी विचार खोडून काढण्यासाठी लोकरंजनाच्या ह्या माध्यमांचा वापर होत आलेला आहे. विनोदाचा आधार घेऊन धार्मिक किंवा राजकीय सत्ताधाऱ्यांना चिमटे काढता येतात आणि त्यांच्याबद्दलची नाराजी व्यक्त करण्याची संधी मिळते. ह्याही दृष्टीने जनतेसाठी विनोद महत्त्वाचा असतो.

**शब्दार्थ :** १. रोडगा = गव्हाचे आणि हरभऱ्याचे पीठ मळून केलेली आणि निखाऱ्यावर भाजलेली जाड पोळी. २. खपवी त्याला = तो मरेल असे कर. ३. मरिआई येणे = एखादा जीवघेणा आजार होणे. ४. बोडकी कर = तिला विधवा कर. ५. खरूज = एक त्वचारोग. ६. दादला = नवरा. ७. आहुती देईन = तुला वाहीन. ८. एका जनार्दनी = ईश्वराच्या कृपेने

**क. खालील वाक्ये अर्थ न बदलता, त्यांतील अधोरेखित शब्दसमूहांमध्ये बदल करून पुन्हा लिहा.**

अ. निरक्षर कष्टकरी समाजाच्या मनोरंजनामध्ये खळखळून हसवणारा विनोद हा फारच महत्त्वाचा घटक होता.

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

आ. जसे श्रमिकाचे जगणे खडतर तसा त्यांचा विनोदही ओबडधोबड, रासवट पण रसरशीत, सडेतोड आणि रोखठोक.

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

इ. त्यात <u>दडलेले अध्यात्म असते तसे</u> विचारप्रबोधनही असते.

ई. संत एकनाथांनी रचलेले <u>आणि आजही लोकप्रिय असणारे</u> हे भारूड.

उ. खरोखरच <u>त्रासलेल्या सुनांचे</u> त्यामुळे मनोरंजन होते.

ऊ. विनोदाचा आधार घेऊन धार्मिक किंवा राजकीय सत्ताधाऱ्यांबद्दलची नाराजी व्यक्त <u>करण्याची संधी मिळते</u>.

**ख. 'संत एकनाथांच्या वर दिलेल्या भारुडामध्ये अध्यात्म आणि विचारप्रबोधन – दोन्ही सापडते' स्पष्टीकरण द्या.**

**ग. तुमच्या मातृभाषेतील लोकसाहित्यातील विनोदाबद्दल लिहा.**

### विनोद

बऱ्याच वर्षांनंतर जुन्या मित्रांबरोबर ट्रेकला गेलो होतो. वाटेत एका गावात चहासाठी थांबलो. एका घराच्या ओसरीवर एक तरुण पाय पसरून खांबाला टेकून बसला होता. बाजूलाच असलेल्या शेतात त्याची तरुण बायको काम करत होती.



"तुमच्या पत्नींना दिवसभर हे काम करणं जड जात असेल, नाही?" मी विचारलं.

"हां, लय जड जातं. पन तिच्या कामाच्या पाळ्या ठरल्याल्या असत्यात," तरुण म्हणाला.

"अच्छा! म्हणजे त्या थकल्या की तुम्ही काम करता..."

"अं हं! शेतातल्या कामानं ती थकली की घरकाम करते..."

**घ. खालील उतारा वाचा.**

'हास्य ही मानवाला निसर्गाकडून मिळालेली एक श्रेष्ठ देणगी आहे', 'हास्य हे जगातील सर्वात सुसंस्कृत संगीत आहे', अशासारखी सुभाषिते आपल्या कानावर पडत असतात, आणि ती जे म्हणतात ते खरेही आहे. पण नेहमीच आणि सर्वांसाठीच ते खरे असते का? ज्यांना चांगला विनोद करता येतो आणि ज्यांना तो चांगल्या प्रकारे समजून घेता येतो अशा व्यक्तींसाठी ते तसे असते ह्यात शंका नाही. मात्र, चांगला, दर्जेदार आणि बुद्धिमान विनोद करणे सर्वांनाच जमते असे नाही. ज्यांना जमते त्यांना कुठे थांबावे हेही कळते. अडचण होते ती हे न कळणाऱ्यांची.

होते असे, की विनोद करणाऱ्यांभोवती माणसे पटकन गोळा होतात. त्यांच्या प्रतिसादामुळे विनोद करणारे सुखावतात. त्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि बऱ्याचदा मर्यादा ओलांडून ओसंडायला लागतो. आपल्या ताकदीची त्यांना जाणीव होते. हळूहळू तिची नशा चढत जाते आणि विनोद टिंगलटवाळीच्या पातळीवर घसरू लागतो. दर्जाला सोडचिट्ठी दिलेला असा विनोद



नेहमी कमकुवत, दुर्बळ, 'अरे'ला 'का रे' करू न शकणाऱ्या व्यक्तींच्या किंवा समाजगटाच्या मागे हात धुऊन लागतो. मित्रांच्या गटामध्ये हे घडताना आपण बऱ्याचदा पाहतो. हेच मोठ्या प्रमाणात समाजामध्येही घडत असते. कुणाचे तरी निरीक्षण वाचनात आले : जेव्हा एखादा पुरुष एखादी मूर्ख चूक करतो, तेव्हा इतर पुरुष म्हणतात – 'काय मूर्ख आहे हा इसम!' जेव्हा एखादी बाई मूर्ख चूक करते, तेव्हा पुरुष म्हणतात – 'काय मूर्ख असतात ह्या बायका!' इथे 'बाई'च्या जागी 'ड तुकडीतली मुलं' इथपासून 'अमुक जातिधर्माची, अमुक वर्णाची किंवा तमुक प्रांतातली, देशातली, शहरातली, शारीरिक व्यंग असलेली, फार लठ्ठ किंवा फार बारीक असलेली माणसे' असे काहीही घालता येईल.

मग विनोदाचे करायचे काय? सारखे जंतुनाशक फवारून तो निर्जंतुक करायचा की विनोद करायचाच नाही? प्रश्न अवघड आहे. मला वाटते की तारतम्य बाळगणे, जीभ किंवा लेखणी घसरू न देणे आणि विनोद करण्याचे स्वातंत्र्य हवे असेल तर दुसऱ्याने केलेला विनोद ऐकून घेण्याचीही तयारी असणे एवढे तरी जमायला हवे. 'मी कुणालाही टपल्या मारणार, पण माझ्याकडे कुणी मान वर करून पाहायचेही नाही', ही फॅसिस्ट वृत्ती कोणीही झाले तरी किती काळ खपवून घेणार?

**अ. उताऱ्यातील पुढील विधानांवरची तुमची मते लिहा.**

१. दर्जाला सोडचिट्ठी दिलेला असा विनोद नेहमी कमकुवत, दुर्बळ, 'अरे'ला 'का रे' करू न शकणाऱ्या व्यक्तींच्या किंवा समाजगटाच्या मागे हात धुऊन लागतो.

---

---

---

२. चांगला, दर्जेदार आणि बुद्धिमान विनोद करणे सर्वांनाच जमते असे नाही.

३. विनोद करण्याचे स्वातंत्र्य हवे असेल तर दुसऱ्याने केलेला विनोद ऐकून घेण्याचीही तयारी असणे एवढे तरी जमायला हवे.

**आ. पुढील वाक्यांमधील काही भागाऐवजी वरील उताऱ्यामध्ये असलेले वाक्प्रचार वापरून वाक्ये पुन्हा लिहा.**

१. लग्नानंतर दोनच महिन्यांनी वामनने बायकोला घटस्फोट दिला.

२. एकनाथचे कुणाशीच पटत नाही. चुकीबद्दल कुणी समजुतीने जरी काही म्हटले तरी तो लगेच भांडायला लागतो.


३. पार्वतीला सुखाचे दिवस कधी दिसले नाहीत. जन्माला आल्यापासून दुर्दैवाने तिची साथ सोडलेलीच नाही.

४. "ताई, अशी कामं तू एकट्या भैरवीवर सोपवू नकोस. बोलताना कुठे, कधी, किती आणि काय बोलावं, काय बोलू नये हे तिला समजत नाही."

५. जाहीर सभेत श्रोत्यांवर छाप पाडण्याच्या नादात अनेकदा वक्ते सभ्यतेची पातळी सोडतात.

**च. 'हसणे' आणि 'विनोद' ह्या विषयांशी आणि शब्दांशी संबंधित सर्व प्रकारचे शब्द लिहा.**






## ५ दत्ताराम मारुती मिरासदार



विनोद ही एक जीवनदृष्टी आहे. आयुष्याकडे पाहण्यासाठी विशिष्ट कोन करून धरलेली ती एक मजेदार दुर्बीण आहे. ती मला मिळाली असेल. या दुर्बिणीतून पाहिले म्हणजे जग कसे गमतीदार आणि हलकेफुलके दिसते! संगतीपेक्षा विसंगतीकडे अधिक लक्ष जाते. रस्ता डांबरी असला तरी त्यातील खड्डे आधी दिसतात. स्वच्छ सूर्यप्रकाशात चाललेल्या माणसाचे टक्कल उन्हात चकाकत असल्याची जाणीव होते. पाय घसरून भर रस्त्यात रस्त्याशी समांतर रेषेत पडलेल्या एखाद्या ढेरपोट्यापाशी थांबून कुतूहलाने त्याचे तोंड न्याहाळावे असे वाटू लागते. स्वतःशीच पुटपुटत, बडबडत चाललेली भ्रांतिष्ट माणसे दिसतात. शहाणपणाचा आव आणून स्वतःचा मूर्खपणा मात्र प्रकट करणारी रत्ने जागोजाग आढळतात. वाटेल तशा थापा मारून इतरांची करमणूक करणाऱ्या आणि स्वतःची फसवणूक करणाऱ्या अलौकिक चिजा डोळ्यात भरतात. जीवनातली सगळी विसंगती आणि विरूपता स्पष्टपणे समोर उभी राहते. इतकेच नव्हे, तर या विसंगतीआड आणि या विरूपतेच्या पाठीमागे दडलेले माणसाच्या आयुष्यातील दुःख जेव्हा सहजपणे या विनोदातून व्यक्त होते, त्या दुःखाविषयी सहानुभूती निर्माण होते, तेव्हा त्या विनोदाला वेगळीच पातळीही प्राप्त होते. त्याला चिरतारुण्याचा वर प्राप्त होतो. सकाळी अर्धवट उमललेल्या फुलासारखा तो विनोद ताजा आणि टवटवीत करतो. त्याचा सुगंध कधी नष्ट होत नाही.



**क. विशेषणे**

**अ. विशेषणाशी जुळणाऱ्या योग्य नामांपुढे (✓) अशी खूण करू या. (अनेक उत्तरे शक्य आहेत.)**

१. मजेदार : कथा – त्वचा – शक्ती – स्वभाव
२. गमतीदार : प्रसंग – गंमत – मजा – पोषाख
३. हलकेफुलके : नाटक – जेवण – वातावरण – घर
४. भ्रांतिष्ट : काम – मन – परिस्थिती – पुस्तक
५. अलौकिक : संवाद – व्यक्तिमत्व – विनोद – कुटुंब
६. टवटवीत : पदार्थ – उदाहरण – चेहरा – दिवस



**आ. वरीलपैकी प्रत्येक जोडी वापरून एक वाक्य लिहू या.**

१. ------------------------------------------------
२. ------------------------------------------------
३. ------------------------------------------------
४. ------------------------------------------------
५. ------------------------------------------------
६. ------------------------------------------------

**इ. "विसंगतीआड आणि या विरूपतेच्या पाठीमागे दडलेले माणसाच्या आयुष्यातील दुःख जेव्हा सहजपणे या विनोदातून व्यक्त होते, त्या दुःखाविषयी सहानुभूती निर्माण होते, तेव्हा त्या विनोदाला वेगळीच पातळीही प्राप्त होते." मिरासदार सांगतात असा अनुभव तुम्ही कधी घेतला आहे का? त्या अनुभवाविषयी लिहा.**

------------------------------------------------
------------------------------------------------
------------------------------------------------
------------------------------------------------
------------------------------------------------
------------------------------------------------

**ख. खालील अर्थांचे शब्द ओळखा. त्या शब्दाचा वाक्यात उपयोग करून लिहा.**

अ. एखाद्याचे भले व्हावे अशी इच्छा बाळगणारी व्यक्ती : (हितचिंतक, इच्छुक, चांगुलपणा)
------------------------------------------------

आ. एखाद्याचे दुःख बघून दुःखाची होणारी जाणीव : (अनुभूती, समज, सहानुभूती)
------------------------------------------------

इ. उपकार करणारी व्यक्ती : (धनी, सुखकर्ता, उपकारकर्ता)
------------------------------------------------

ई. दूर अंतरावरील गोष्ट पाहण्याचे यंत्र : (दुर्बीण, चष्मा, भिंग)

---

उ. संबंध नसण्याचा भाव : (भिडस्त, असंबद्ध, तटस्थपणा)

---

ऊ. शब्दांत, वाक्यांत काही फरक करून किंवा एकाच उच्चाराचे पण भिन्न अर्थाचे शब्द घेऊन आणलेली गम्मत : (अलंकार, कसोटी, कोटी)

---

ए. श्रेष्ठत्व, महानता, मोठेपणा : (उंची, उदात्तता, ज्ञान)

---

ॲ. आधी न कळलेला, अचानक झालेला, समजावून न सांगता येणारा अनुभव : (साक्षात्कार, चमत्कार, अपघात)

---

ऐ. खोटे (बोलणे) : (छाप, धाप, थाप)

---

ओ. निवड करण्याची क्षमता, सारासार विचार, व्यवहार कौशल्य : (निवडणूक, तारतम्य, सरासरी)

---

### विनोद



एका तरुण पत्रकाराला योगायोगाने एक वृद्ध चिनी प्रवासी भेटला. पत्रकाराने लगेच कागद-पेन घेतले, त्या वृद्धाशी बऱ्याच विषयांवर गप्पा मारल्या. शेवटी त्याने विचारले, "तुमच्या मते जगातला कोणता समाज सर्वात बुद्धिमान आहे?"

चिनी आजोबांनी काही क्षण विचार केला आणि शांतपणे उत्तर दिले : "चिनी समाज. त्याची तीन कारणं आहेत. एक : त्यानं छपाईची कला शोधली, पण वृत्तपत्रं छापली नाहीत. दोन : त्यानं स्फोटक दारूचा शोध लावला, पण तोफा तयार केल्या नाहीत. आणि तीन : होकायंत्राचा शोध लावला, पण अमेरिकेचा शोध लावला नाही."

## ६ एकदा आणि अनेकदा

**क. विशेषणाला पुढे दिलेल्यांपैकी योग्य प्रत्यय लावून क्रियाविशेषण तयार करा आणि रिकाम्या जागा भरा.**

**विशेषण :** कित्येक, नवे, तेवढे, एक, इतके, हजार, एवढे, ~~अनेक~~, एक)
**प्रत्यय :** ने / त्र / दा / त

उदा॰ अनेकदा आपण शरीराने जरी एखाद्या ठिकाणी असलो तरी मनाने मात्र आपण भलतीकडेच असतो.

अ. कंपनी बंद पडली तरी मी हार मानली नव्हती, मी पुन्हा .................... व्यवसाय सुरू करण्याचे ठरवले.

आ. आयुष्यात .................... तरी प्रेम करून पाहावे असे म्हणणाऱ्यांना एकटे राहण्यातली मजा माहीतच नसते.

इ. .................... प्रशासनाला निवेदन देऊनही त्यांनी शाळेकडे दुर्लक्षच केले.

ई. राजकारणातली समीकरणं समजणं अवघड आहे. आज एकमेकांच्या विरोधात उभे असलेले पक्ष कधी .................... होतील हे सांगता येत नाही!

उ. शेजाऱ्यांना .................... सांगून झालं की रात्री टीव्हीचा आवाज कमी ठेवत जा म्हणून, पण त्याचा काही उपयोग झाला नाही.

ऊ. दिवसभर राबून फक्त वीस रुपये? .................... पोटाची खळगी कशी भरणार?

ए. आम्ही स्वयंसेवक रस्ता साफ करत होतो .................... एका गृहिणीने दुसऱ्या मजल्यावरून रस्त्यावर पुन्हा कचरा टाकला.

ॲ. ते दोघे अभिनेते कित्येक दिवस एकत्र राहत आहेत, परंतु आम्हाला .................... लग्न करायचं नाही म्हणतात! काय तर म्हणे लिव्ह-इन-रिलेशनशिप!

**ख. खाली काही नामे दिली आहेत. त्यांपासून विशेषणे तयार करा.**

| नाम | विशेषण | नाम | विशेषण |
|---|---|---|---|
| उदा॰ उदात्तता | उदात्त | अ. मजा | |
| आ. हुशारी | | इ. विसंगती | |
| ई. फसवणूक | | उ. आनंद | |
| ऊ. विरूपता | | ए. धर्म | |
| ॲ. चिरतारुण्य | | ऐ. गंमत | |
| ओ. विभक्तपणा | | औ. ज्ञान | |

## ७ संधी

**क. पुढील संधी सोडवा.**

अ. चांगलेसे = ------------ + ------------

आ. नयन = ------------ + ------------

इ. घामोळे = ------------ + ------------



**ख. पुढील शब्दांचे संधी करा.**

अ. काही + असे = ------------

आ. किती + एक = ------------

इ. प्रीती + अर्थ = ------------

## ८ खालील चौकोनात 'विनोद' ह्या शब्दाला लागतील अशी विशेषणे शोधा आणि ती वलयांकित करा. एकूण २१ विशेषणे तुम्हाला सापडू शकतात.

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| द्व्य | र्थी | सू | भ | प्र | ल | भो | त | र | ल |
| ल | ळ | क्षम | सा | सं | क | कु | ज | क | ट |
| नि | र्वि | ष | म | ग | खो | च | क | टा | ती |
| बो | च | रा | भे | नि | ड | झों | ब | णा | रा |
| ज | गा | र | द | ष्ठ | क | शी | झो | खे | न |
| ठ | ग | टो | क | दा | र | द | भ | ळ | ब |
| अ | स | भ्य | ता | र | जो | मा | र्मि | क | ट |
| ना | ती | र | क | स | चा | र | ना | र | ब |
| प्र | स | न्न | ता | म | व | मी | ठा | क | टी |
| र | ले | शा | ब्दि | क | ट | वा | ळ | क | त |

# हे विश्वचि माझे घर!

## ४









**चला, शिकू या ...**

- सर्वसमावेशक भारतीय संस्कृती समजून घेणे
- संवेदनशीलता, मानवतावाद, आंतरराष्ट्रीय सहकार्य यांबद्दल समजून घेणे व चर्चा करणे
- व्याकरण : धातुसाधित विशेषणे (गाणारा गळा - गायलेले गाणे - गाता गळा) समजणे व वापरणे
- संधी ओळखणे आणि करणे

## १ हे विश्वचि माझे घर!

क. खालील चित्र पाहा. वारकरी संप्रदायाबद्दल आंतरजालावरून माहिती मिळवा आणि त्याबद्दल लिहा.



**ख. खालील उतारा वाचा.**

महाराष्ट्राची भूमी ही संतांची, विचारवंतांची, शूरांची आणि समाजसुधारकांची भूमी आहे. महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये संतांचे अनमोल योगदान आहे. पंढरपूरच्या श्री विठ्ठलाला दैवत मानणाऱ्या या वारकरी संप्रदायास संत ज्ञानेश्वर व संत नामदेवांनी लोकप्रियता मिळवून दिली आहे. संत ज्ञानेश्वरांच्या जन्मापूर्वीच वारकरी संप्रदाय अस्तित्वात आला असला, तरी त्यांनी आपल्या ग्रंथांमधून आणि कार्यातून संप्रदायास मूर्त रूप दिले आहे. समाजाने वाळीत टाकले असतानाही संत ज्ञानेश्वरांनी 'हे विश्वचि माझे घर' अशी विश्वात्मक विशाल शिकवण साऱ्या समाजास दिलेली आहे. आपल्या कार्यातून व चिरंतन साहित्यातून त्यांनी तळागाळातील समाजास भागवत धर्माच्या मंदिरात एकत्र आणले. सामाजिक समतेचा व वारकरी संप्रदायाच्या भक्तिमंदिराचा पाया त्यांनी घातला असून अभंग, ओवी, गवळण, विरहिणी, भारूड, प्रवचने यांमधून त्यांचे समृद्ध साहित्य व विशाल अंतःकरण आपणास जाणवते.

**ग. खालील उतारा वाचा.**

**हे विश्वचि माझे घर...?!**

थोर लोकांच्या तोंडून बाहेर पडलेल्या अशा वचनांवर आम्ही लहान वयात मनापासून विश्वास ठेवला. अगदी भारावून जाऊन. आमच्या वयाला आणि तेव्हाच्या काळाला शोभण्यासारखेच होते ते.

वय वाढले. ओठावर मिसरूड अन् अकलेला शिंगे फुटली तसा भारावलेपणाचा डोक्यापर्यंत चढलेला ज्वर उतरत गेला. तसे होणे स्वाभाविक होते आणि आवश्यकही होते.

पण त्यानंतर जगण्याच्या धडपडीत आम्ही कधी आणि कसे गुरफटत गेलो, कळलेच नाही. थोर लोक भिंतींवर टांगलेल्या तसबिरीत आणि त्यांची वचने बंद कपाटांमधल्या पुस्तकांमध्ये राहिली. आम्ही आमच्या जगात रमलो. काळ पुढे सरकत गेला, बदलत गेला. रीती बदलल्या, सवयी बदलल्या, जगण्याचे नवे मंत्र मिळाले : 'आजचा, आत्ताचा विचार करा! उद्याचं कुणी पाहिलंय? हवं ते सगळं मिळवा. सहज मिळत नसेल तर ओरबाडून, हिसकावून घ्या!'

आम्ही अगदी तस्सेच केले. सजीवांना ओरबाडले, निर्जीवांना लुबाडले; माती म्हणू नका, पाणी म्हणू नका, टेकड्या म्हणू नका, पर्वत म्हणू नका, वातावरण, अंतराळ, काही काही सोडले नाही. उद्याचा जरासुद्धा विचार केला नाही. जग आमच्या मुठीत आल्याचे भास आम्हाला होऊ लागले.

काळ पुढे सरकतच राहिला. घरात नातवंडे आली.

"तुम्ही आजी-आजोबा त्यांचे; त्यांच्यावर 'आपले' संस्कार करा जरासे!" मुलगा आणि सून म्हणाले.

त्यामुळे आजकाल आम्ही नातवंडांवर संस्कार करत असतो. तसे थोडे थोडे अजूनही आठवते आहे आम्हाला :




'खोटे कधी बोलू नये, चोरी कधी करू नये' इथपासून 'हे विश्व माझेचि घर...' माझेचि घर!?...माझेचि?...काही तरी चुकते आहे का?... माझेचि...'चि'च्या जागेची गफलत होतेय का?... असू दे! काय फरक पडतो? नाही तरी मुलांना काही कळणार नाहीच आहे. आम्हाला तरी कुठे कळले सगळे? संस्कारांचे असेच तर असते.

**अ. पुढे दिलेले संवाद वाचा. 'हे विश्वचि माझे घर' ह्या ओळीत 'चि' हा प्रत्यय कोणत्या शब्दाला जोडावा ह्याचे भान कोणाला आहे, ते मोकळ्या जागेत लिहा.**

---

१

"तुषार, कासचं पठार फुलल्याची बातमी वाचलीस ना? रविवारी आम्ही बाईकवरून पाहायला जाणार आहोत. येताना मी दोन-चार प्रकारची रोपं आणणार आहे, कुंडीत लावायला."



"रोपं? कशी आणणार?"

"कशी म्हणजे? मुळापासून उपटणार आणि आणणार! येतोस?"

"नाही."

"का रे? तू एवढा निसर्गप्रेमी..."

"मी निसर्गावर प्रेम करतो. त्याच्यावर मालकीहक्क सांगत नाही. ती रानफुलं आहेत, उत्पल. ती त्याच मातीत, त्याच वातावरणात आणि त्याच मोसमात फुलतात. कुंडीत ती कशी जगतील?"

"तू ना, प्रत्येक गोष्टीत नाटच लावणार."

"आणि तुझ्यासारखे लोक ते पठार उजाड केल्याशिवाय शहाणे नाही होणार. जा तुम्ही!"

---

२

"आत्या, आम्ही यंदा अल्जीरिया, मोरोक्को आणि स्पेनला जायचा बेत करतोय," वैदेही उत्साहाने म्हणाली.



"दोघंच? आणि मग जेवण्याखाण्याचं कसं?"

"कसं म्हणजे? जसं तिथं असेल तसं!"

"बाई गंऽ! काय खातात ते लोक कोण जाणे!" आत्या अंगावर शहारे आल्यासारखे करत म्हणाली.

"आत्या, माणसंच राहतात तिथं. आम्ही तो देश पाहायला जातोय, पण नुसत्या इमारती पाहून देश कळत नाहीत. ज्यांना माणसं आणि त्यांचं जगणं समजून घ्यायचं नसतं ना, त्यांनी घरी बसून पिठलं-भात खात टीव्हीवर नॅशनल जिओग्राफिक पाहावं. स्वस्त पडतं ते."

## २ स्थलांतर

**क. खालील देशांतील लोकांबद्दल तुम्हाला काय वाटते? उदाहरणाप्रमाणे लिहा.**

उदा॰ अमेरिकेतील लोक फार हुशार असतील / असणार / असले पाहिजेत.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| तुर्कस्तान | रशिया | पाकिस्तान | पोलंड | नेपाळ | भूतान | श्रीलंका |
| कजाकिस्तान | फ्रान्स | पॅलेस्टाइन | स्वीडन | जपान | चीन | अफगाणिस्तान |

**ख. खालील लेख वाचा.**

अ. लेखास व त्यातील निरनिराळ्या भागांस योग्य शीर्षक सुचवा.

आ. लेखातील रिकाम्या जागी योग्य प्रत्यय / अव्यय लिहा.

**लेखाचे शीर्षक :** ..........................................................

**उपशीर्षक :** ..........................................................

स्थलांतरितांना (१) सामावू ...... घेण्याच्या मुद्द्यावरून युरोपीय देशांमध्ये बहुसांस्कृतिकतेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. चॅन्सेलर अंगेला मेरकेल यांच्या राष्ट्रवादी भूमिकेमुळे जर्मनीतही हा विषय वादग्रस्त बनला आहे. सांस्कृतिक विविधता हाडीमाशी (२) खिळले ...... भारतीय समाजात बहुसांस्कृतिकता हा वादाचा मुद्दा बनला नसला, तरी पाश्चात्त्य (३) देशां ...... त्यावरून चर्चेचे मोहोळ उठले आहे. बहुसांस्कृतिकतेच्या मुद्द्यावरून युरोपीय देश एका अवघड वळणावर येऊन पोचले आहेत. या (४) देशां ...... 'त्यां'चा, म्हणजे स्थलांतरितांचा (विशेषतः मुस्लिम) प्रश्न उभा ठाकला आहे. नेदरलँड्स, ब्रिटन या देशांप्रमाणेच (५) जर्मनीत ...... या विषयावर चर्चा घडू लागली आहे. फ्रान्समध्येही हा विषय आहे; मात्र त्यावर चर्चा होत नाही. स्थलांतरितांना त्यांच्या संस्कृतीप्रमाणे वागण्याची मुभा देऊन (६) जर्मनी ...... बहुसांस्कृतिकता मान्य करायची की स्थलांतरितांनी जर्मनीमधील समाजजीवनात एकरूप होण्यासाठी राष्ट्रवादाकडे झुकणाऱ्या जर्मन नागरिकत्वाच्या अटी मान्य करायच्या, असा हा पेच आहे. या संदर्भात जर्मनीने एकीकडे राष्ट्रवादाला महत्त्व देऊन (७) स्थलांतरितां ...... असलेल्या कायद्यात बदल केले आहेत, तर दुसरीकडे, स्थलांतरितांसाठी काही योजनाही आखल्या आहेत. मात्र या विषयाशी संबंधित कमिशनर मारिया ब्योहमर यांनी जर्मनीत (८) बहुसांस्कृतिकते ...... स्वप्न साकार होऊ शकलेले नाही, असे स्पष्ट केले आहे. या संदर्भात जर्मनीत अलीकडे 'एकात्मता परिषदे'चे आयोजन करण्यात आले होते. त्या अनुषंगाने हे मुद्दे उपस्थित झाले. मुख्य म्हणजे या (९) परिषदे ...... तुर्कस्तानातील गटांनी बहिष्कार घातला होता, तरी या शिखर परिषदेचा उल्लेख 'मैलाचा दगड' असा करण्यात आला आहे. जर्मनीतील स्थलांतरितांमध्ये तुर्कस्तानातील मुस्लिम स्थलांतरितांची संख्या सर्वाधिक (सुमारे २५ लाख) आहे; तथापि, तेथील नागरिकांचे स्थलांतर आजचे नाही. त्यामागे सुमारे ५० वर्षांचा इतिहास आहे.

**उपशीर्षक :** ..........................................................

१९६० च्या दशकात जर्मनीने 'गेस्ट वर्कर्स'ना आपल्या देशात येण्याचे निमंत्रण दिले (कारण तेव्हा जर्मनीला मनुष्यबळाची गरज होती). त्या वेळी (१०) तुर्कस्तानाती ...... अनेक नागरिकांनी उदरनिर्वाहाचा एक मार्ग म्हणून जर्मनीत स्थलांतर केले; पण जर्मनीत राहूनही ते आपली संस्कृती जपून होते. दरम्यान, पाश्चात्त्य देशांत सर्वप्रथम कॅनडाने बहुसांस्कृतिकतेची संकल्पना स्वीकारली. विविध संस्कृतींच्या नागरिकांनी परस्परांचा आदर करणे हे या संकल्पनेत अपेक्षित आहे. मात्र बहुसांस्कृतिकतेद्वारे व्यक्तींच्या मनात एका विशिष्ट संस्कृतीला असलेले महत्त्व, तसेच (११) इतरां ...... आपण कोणी वेगळे आहोत ही भावना, या दोन बाबी अधोरेखित होतात. त्यामुळे इतर समाज-संस्कृतींमध्ये सामावून जाणे, त्यांच्याशी एकरूप होणे अवघड बनू शकते, असे म्हटले जाते.

जर्मनीत १९८०च्या दशकात बहुसांस्कृतिकतेची कल्पना उचलून धरण्यात आली. मात्र या संकल्पनेबाबत तेथे फारशी स्पष्टता नव्हती. बर्लिनची भिंत पडल्यानंतर तेथील स्थलांतरितांची संख्या वाढली. १९९०च्या दशकात, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत जर्मनीत वांशिक भिन्नता अधिक प्रमाणात आढळू लागली. मग अमेरिकेतील 'मेल्टिंग पॉट'प्रमाणे (सुरुवातीच्या काळात स्थलांतरितांनी आपली संस्कृती जपणे व हळूहळू अमेरिकी समाजजीवनात एकरूप होणे) जर्मनीतही घडावे, अशी अपेक्षा करण्यात आली; पण जर्मनीत तसे कधी घडले नाही. आपली अस्मिता, संस्कृती व त्यानुसार आपले जीवनव्यवहार हे मुद्दे स्थलांतरितांसाठी नेहमीच महत्त्वाचे ठरत गेले. दुसरीकडे, सरकारनेही जर्मन समाजाशी स्थलांतरितांनी एकरूप व्हावे, यासाठी पुरेसे प्रयत्न केले नाहीत.

**इ. वरील लेख नीट वाचा आणि खालील प्रश्नावली वापरून वर्गातील इतर विद्यार्थ्यांची मते गोळा करा.**

१. स्थलांतरितांना का सामावून घेतले पाहिजे?

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

२. बहुसांस्कृतिकता ही तुमच्यासाठी समस्या आहे की उपाय? स्पष्टीकरणासहित उत्तर लिहा.

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

३. तुमच्या मते 'राष्ट्रवाद' म्हणजे काय?

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

४. 'राष्ट्रवाद' आणि 'एकात्मता' ह्या परस्परविरोधी संकल्पना आहेत का? स्पष्टीकरणासहित उत्तर लिहा.

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

ई. आता ह्या मतांचा अभ्यास करून खालील मुद्द्यांवर लिहा. तुम्हाला जाणवलेल्या समस्या आणि त्यावरील उपाय ह्यावर भाष्य करा.

| | साधारण मत | गैरसमज | समस्या | उपाय |
|---|---|---|---|---|
| स्थलांतर | | | | |
| बहुसांस्कृतिकता | | | | |
| राष्ट्रवाद | | | | |
| एकात्मता | | | | |

उ. आतापर्यंत आपण कोणकोणते देश पाहिले-अनुभवले आहेत? आपल्याला कोणता देश आवडला, आणि का आवडला? खालील यादीतील वाक्यांश वापरून त्याबद्दल लिहा.

| वाक्यांश | |
|---|---|
| ... मला (खूप) आपुलकी वाटते. | ... काहीतरी करायला पाहिजे, असं वाटतं. |
| ... मला सुखावतो. | ... पाहून वाईट वाटतं. |
| ... शिकण्यासारखं आहे. | ... अभिमान वाटतो. |
| ... वाखाणण्याजोगं आहे. | ... जरा अतीच आहे, असं वाटतं. |
| ... दिशा दाखवतात. | ... कौतुक वाटतं.. |
| ... राग येतो. | ... नवल वाटतं. |
| ... कळू शकत नाही. | ... आपलं वाटतं. |
| ... चकित करतं. | ... बाबतीत मी तडजोड करू शकत नाही. |

उदा॰ मला जपानमधील शांतिप्रिय संस्कृतीबद्दल खूप आपुलकी वाटते.

ऊ. एखादी व्यक्ती, समाज किंवा संस्कृती यांच्या बाबतीत तुमचे काही पूर्वग्रह होते का? ते कशावरून तयार झाले होते (उदा॰ पोशाख, राहणीमान, सवयी, भाषा, इ॰)? ते कसे दूर झाले?

ए. ‘हे विश्वचि माझे घर’ ही संकल्पना तुमच्या मते कशी प्रत्यक्षात आणता येईल?

अ॑. खालील तक्ता भरा.

| | | | |
|---|---|---|---|
| उदा॰ खाणे | | तो खाणारा, ते खाणारे<br>ती खाणारी, त्या खाणाऱ्या<br>ते खाणारे, ती खाणारी | तो खाल्लेला, ते खाल्लेले<br>ती खाल्लेली, त्या खाल्लेल्या<br>ते खाल्लेले, ती खाल्लेली |
| १. | वाचणे | | |
| २. | झोपणे | | |
| ३. | करणे | | |
| ४. | होणे | | |
| ५. | जेवणे | | |
| ६. | येणे | | |
| ७. | जाणे | | |
| ८. | उरणे | | |
| ९. | लिहिणे | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १०. | पिणे | | |
| ११. | गाणे | | |
| १२. | जगणे | | |
| १३. | अनुभवणे | | |
| १४. | देणे | | |
| १५. | घेणे | | |
| १६. | सांगणे | | |
| १७. | वाजवणे | | |

ऐ. उदाहरणाप्रमाणे नामे तयार करा आणि त्यांचा वाक्यांत उपयोग करून संभाषणे लिहा.

उदा॰ मुलगा : आई, माझं खाऊन झालं गं! थोडं अन्न उरलं आहे.

आई : बरं. मग उरलेलं फ्रीजमध्ये ठेव.

मुलगा : आणि खाल्लेल्याचं काय करू?

आई : खाल्लेलं पचव आता, जा. शतपावली करून ये.



१. **विद्यार्थी :** सर, माझा थोडा गृहपाठ झाला आहे, थोडा अजून राहिला आहे.

२. **मित्र :** अरे, तू सुचवलेलं पुस्तक थोडंच वाचून झालंय माझं, अजून बरंच उरलंय.

३. **शिक्षक :** (मुख्याध्यापकांना) सर, तुम्ही म्हणताय सर्व मुलांना शिक्षा करा. पण काहीच मुलं दंगा करतायत. काही जण शांत बसले आहेत.



४. **नाट्यगृहाचे व्यवस्थापक :** हे बघा, सगळ्याच प्रेक्षकांना हाकलता येणार नाही. त्यातले काही जणच फोनवर बोलतायत, बाकीचे तर शांतपणे नाटक पाहतायत.

५. **मैत्रीण :** नाही रे, माझी गोष्ट लिहून नाही झाली अजून. बऱ्यापैकी सुचलं आहे, पण अजून बरंच सुचलं नाहीये.

## ३ सीमोल्लंघन

**क. खालील सुभाषिताचा अर्थ लिहा. दिलेल्या स्पष्टीकरणांची मदत घ्या.**

केल्याने देशाटन । पंडितमैत्री सभेत संचार ।
शास्त्रग्रंथविलोकन । मनुजा चातुर्य येतसे फार ॥

**शब्दार्थ :**

**देशाटन** = प्रवास; पर्यटन; देशभ्रमण **पंडितमैत्री** = पंडितांशी किंवा विद्वान आणि ज्ञानी लोकांशी मैत्री **सभेत संचार** = ज्ञानी, विचारी, कलावंत लोकांच्या मेळाव्यातील वावर; अशा ठिकाणी असणे **शास्त्रग्रंथविलोकन** = ज्यामध्ये शास्त्राची चर्चा केलेली आहे असे ग्रंथ पाहणे, समजून घेणे **मनुजा** = माणसाला, व्यक्तीला **चातुर्य** = हुशारी; बुद्धिमत्ता

**ख. वरील सुभाषिताच्या अर्थाशी जवळीक सांगेल अशी एखादी घटना, एखादा अनुभव तुम्हाला आला आहे का? वर्गात सांगा आणि त्याबद्दल सर्वांनी मिळून चर्चा करा.**

**ग. खालील प्रसंगांमध्ये कोण काय प्रतिक्रिया देईल? लिहा.**

अ. परदेशात गेल्यानंतर तुम्ही तुमच्या पद्धतीचं जेवण कुठे मिळेल याबद्दल चौकशी केलीत, तर तुमच्या परदेशी मित्राची काय प्रतिक्रिया असेल?

आ. तुमची परदेशी मैत्रीण तुमच्या देशातल्या गरिबांच्या परिस्थितीबद्दल तुमच्या सरकारवर ताशेरे ओढते. तुम्ही काय म्हणाल?

इ. तुमच्या देशातील लोक खातापिताना आरोग्याचा विचार करत नाहीत असे तुमच्या परदेशी मित्राला वाटते. तुमची प्रतिक्रिया काय होईल?

**घ. तुमच्या मते कोणत्या गोष्टी 'संस्कृती'च्या व्याख्येमध्ये बसतात? शब्द जमा करा.**

संस्कृती



**च. तुमच्या मते 'बहुसांस्कृतिकता' जपण्यासाठी काय करावे लागते?**

**छ. तुमच्या देशातील एखादे उदाहरण देऊन 'सर्वसमावेशकता' ह्या विषयावर एक छोटा निबंध लिहा.**

**ज. सर्वत्र खुणा माझ्या...**

पुढील कवितेतल्या दोन ओळी आपण पाठ्यपुस्तकात क्रमांक ४.च्या उताऱ्यात वाचल्या आहेत. इथे पूर्ण कडवे दिले आहे.

जिकडे जावे तिकडे माझी भावंडे आहेत ।
सर्वत्र खुणा माझ्या घरच्या मजला दिसताहेत ॥
कोठेही जा – पायांखाली तृणावृता भू दिसते ।
कोठेही जा – डोईवरतें दिसते नीलाम्बर ते ॥

सावलीत गोजिरी मुले
उन्हात दिसती गोड फुले.
बघता मन हर्षून डुले;



ती माझी, मी त्यांचा – एकच ओघ अम्हांतुनि वाहे ।
नव्या मनूतिल नव्या दमाचा शूर शिपाई आहे ॥
- **केशवसुत**

**शब्दार्थ :**

**मजला** = **मला** तृणावृता = गवताने झाकलेली **भू** = भूमी, जमीन **डोईवरतें** = डोक्यावरती **नीलाम्बर** = निळे आकाश **गोजिरी** = गोंडस, गोड **हर्षून** = हर्षाने, आनंदाने **अम्हांतुनि** = आमच्यातून **मनूतिल** = युगातील **नव्या दमाचा** = नवे बळ मिळालेला, नव्या ताकदीचा, तरुण **संदर्भ :** ही कविता एकोणिसाव्या शतकात (१८९८) लिहिलेली आहे. हे शतक 'नव्या मनूचे' म्हणजेच समता, बंधुता आणि शांती ही मूल्ये पुन्हा जिवंत करणारे युग असे मानले जाते. केशवसुतांनी वरील कवितेतून ह्या मूल्यांचा पुरस्कार केला आहे.

**अ. आजच्या युगात ह्या कवितेचा अर्थ तुम्हाला कसा जाणवतो ते लिहा.**

**आ. एकोणिसाव्या शतकात जगभर, विशेषतः युरोपमध्येही 'नवा मनू' अवतरला होता असे दिसते. त्या काळातील साहित्यामधली अशी नव्या मनूने भारावलेली उदाहरणे तुम्हाला माहीत आहेत का? त्याबद्दल लिहा.**

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

## ४ संधी

**क. खालील शब्दांचे संधी सोडवा.**

अ. दिग्दर्शन = ---------------------------- + ----------------------------

आ. दिग्विजय : ---------------------------- + ----------------------------

इ. आपत्काल : ---------------------------- + ----------------------------

**ख. पुढील शब्दांचे संधी करा.**

अ. जगत् + ईश्वर = ----------------------------

आ. सत् + वर्तन = ----------------------------

इ. पितृ + छाया = ----------------------------

# तोंडी परीक्षा

**एकूण गुण २०**

**१. पुढीलपैकी कोणताही एक विषय निवडा आणि दोन-दोनच्या गटांत संवाद करा. (१०)**


क. भारतभ्रमणाच्या सहली आयोजित करणारी कंपनी आणि सहलीला जाऊ इच्छिणारा प्रवासी

ख. एका विनोदी कलाकाराची मुलाखत

**२. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर बोला. (१०)**

क. तुम्ही भेट दिलेले पर्यटनस्थळ

ख. तुम्हाला आवडलेला विनोदी चित्रपट




# लेखी परीक्षा

एकूण गुण ३०

## १. पुढील उतारे वाचून खाली दिलेले प्रश्न सोडवा. (६)

**क.**



काही लोकांचे अक्षर इतके वाईट असते की त्यांनी लिहिलेले त्यांना स्वत:लाही परत वाचता येत नाही. यावरूनच 'आप लिखे और खुदा पढे' अशी म्हण हिंदीमध्ये पडली आहे. वास्तविक आपण लिहितो तेच दुसऱ्या कुणासाठी तरी. मग आपण लिहिलेले त्याला धडपणे वाचता याला नको का? पण खूपदा अनुभव असा येतो की मजकुराचे लेखन अगदीच अवाचनीय असते. नोकरीच्या जाहिरातीत उमेदवाराने स्वत:च्या हस्ताक्षरात अर्ज करावा अशी अपेक्षा व्यक्त केलेली असते, ती उमेदवाराचे अक्षर वाचनीय आहे की नाही, हे पाहण्यासाठीच. काही काही जाहिरातींत तर 'ॲप्लिकेशन शुड बी इन क्लिअर, लेजिबल हँडरायटिंग' म्हणजे 'अर्ज स्पष्ट व सुवाच्य अक्षरातच असावा' असे बजावून सांगितलेले असते.

**ख.**



निसर्गाच्या सान्निध्यात सहलीसाठी जायचं ते निसर्गाची विविध रूपं पाहण्यासाठी! कधी तो शांत असतो, तर कधी रुद्रभीषण; कधी साधा, तर कधी नखरेल; कधी निष्पर्ण उघडानागडा, तर कधी शालीन हिरवा. निसर्गाचं रूप कोणतंही असो – संवेदनशील माणूस त्यानं मोहित आणि अंतर्मुख झाल्याशिवाय राहात नाही.

**ग. पुढील अर्थांचे उताऱ्यांमधील शब्द लिहा.**

| | | |
|---|---|---|
| अ. | वाचता येण्याजोगे | |
| आ. | स्वत:शीच विचार करणारा | |
| इ. | अवाचनीय | |
| ई. | भयंकर | |
| उ. | सुसंस्कृत | |
| ऊ. | सहवास | |

## २. कोणत्याही एका विषयावर पंधरा ते सोळा ओळींचा परिच्छेद लिहा. (१०)

क. हसण्यावर बंदी आली तर...!

ख. बहुभाषिक भारत

## ३. उदाहरणाप्रमाणे अधोरेखित शब्दाचे स्पष्टीकरण देणारे वाक्य परत लिहा. (३)

उदा॰ खूप अभ्यास करणारा विद्यार्थी हुशार असतोच असे नाही.
जो खूप अभ्यास करतो तो विद्यार्थी हुशार असतोच असे नाही.

क. सरकत्या जिन्यावरून जायला आमची आजी नेहमी घाबरते.

ख. बाबांच्या निधनाचे वृत्त कळताच त्यांना ओळखणारा प्रत्येक जण हळहळला.

ग. कार्यक्रमासाठी प्रथम येणाऱ्यास प्राधान्य अशी आसनव्यवस्था आहे.

घ. गळक्या छपराखाली भांडी ठेवून पावसापासून स्वत:ला वाचवण्याचा किती प्रयत्न करणार?

च. चित्रपटात गुस्तॉवच्या मुलाला स्वयंपाकात मदत करणारा एक छोटासा उंदीर असतो!

छ. लांब राहणारेच नेहमी वेळेच्या आधी कार्यक्रमाला पोहोचतात असा आमचा अनुभव आहे.

## ४. कंसात दिलेल्या विशेषणांपासून क्रियाविशेषणे बनवून वाक्य पूर्ण करा. (२)

उदा॰ "काय रे सारंग? एकच पुरणपोळी घेतलीस? ---------------- (एवढे) झालं तुझं?"
"काय रे सारंग? एकच पुरणपोळी घेतलीस? एवढ्यात झालं तुझं?"

क. मी मेहनतीने काढून ठेवलेलं टिपण हरवलं कुठे तरी. आता पुन्हा ---------------- (नवे) लिहायला हवं सगळं.

ख. मला ---------------- (एक) तरी तोरणा ते राजमाची ट्रेक करायचाच आहे.

ग. सानिका ऑफिसला निघायची तयारी करतच होती, ---------------- (इतके) दारावरची बेल वाजली.

घ. फक्त रात्रीच सगळे घरी असतात, त्यामुळे ---------------- (एक) जेवायला बसायचं असा नियमच केला आहे आईने.

## ५. अर्थ न बदलता वाक्यरचनेत बदल करा. (३)

क. आजकालच्या मुलांना वाचनाचे वावडेच असते.

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

ख. वकीलसाहेबांनी दादासाहेबांच्या मृत्युपत्रातील महत्त्वाच्या गोष्टींवर <u>प्रकाश टाकला</u>.

---

ग. रंग, रूप अशा आनुवंशिक गुणांपेक्षा शिक्षणासारख्या अर्जित गोष्टीबद्दल <u>अभिमान बाळगला</u> पाहिजे.

---

## ६. दिलेल्या अर्थाचा शब्द ओळखा. (२)

**क. सगळ्यांना सामावून घेणारा**

१. सार्वजनिक  २. सार्वत्रिक  ३. सर्वसमावेशक

**ख. सुखरूप**

१. सहीसलामत  २. सुखवस्तू  ३. सुस्वरूप

**ग. जगाचे नियम**

१. जगजाहीर  २. जगरहाटी  ३. जगद्विख्यात

**घ. पुनःपुन्हा वाचणे**

१. पुनरुच्चार  २. पारायण  ३. पुनरुक्ती

## ७. संधी

**क. पुढील संधी सोडवा.** (२)

१. उद्वेग = ............ + ............

२. शिवालय = ............ + ............

३. प्रत्येक = ............ + ............



**ख. पुढील शब्दांचे संधी करा.** (२)

१. पितृ + छाया = ............

२. सत् + आनंद = ............

३. दिक् + अंत = ............

# ५ मराठी भाषा – विविध पैलू









चला, शिकू या ...

- मराठी भाषेची मूलभूत माहिती करून घेणे
- मराठी भाषेतील गमतीजमती समजून घेणे
- मराठी वळवावी तशी वळते हे समजून घेणे
- मराठी भाषेच्या विविध बोलींची झलक पाहणे
- एकाच शब्दाचे अनेक अर्थ समजून घेणे
- अनेक लिंगे असणारी नामे ओळखणे
- व्याकरण : ध्वन्यनुकारी शब्द / क्रियापदे वापरणे
- व्याकरण : ‘ऊक’ जोडून होणारी नामे वापरणे
- व्याकरण : संधी ओळखणे आणि करणे

## १ भाषा मराठी

कोणत्याही भाषेचा विकास ही काही अचानक घडणारी गोष्ट नव्हे. ती एक दीर्घकालीन प्रक्रिया (१) असते. ही प्रक्रिया घडताना भाषेवर त्या त्या काळातील समाज, त्यातल्या महत्त्वाच्या घडामोडी, त्या काळातल्या निरनिराळ्या राजवटी (२) ह्या सर्वांचाच परिणाम होत असतो. म्हणजेच भाषा सतत घडत, बदलत राहते. शेजारील प्रांतांच्या अथवा देशांच्या भाषांचा प्रभाव पडून भाषा बदलते. परकीय आक्रमणांमुळे नव्या भाषेच्या सान्निध्यात आणि संपर्कात आल्यामुळे त्या नवीन भाषेतील शब्द, वाक्‌प्रचार, स्वर आणि व्यंजने त्याच किंवा अपभ्रष्ट (३) स्वरूपात उचलली जातात. प्रत्येक भाषा ह्याप्रमाणेच घडते. मराठी भाषाही ह्याला अपवाद नाही.



वेदपूर्वकालीन भाषा, वैदिक भाषा, संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश अशा प्रत्येक भाषेतील काही वैशिष्ट्ये मराठी भाषेत दिसतात. त्यामुळे मराठी ही वेदपूर्वकालीन भाषेपासून, संस्कृतपासून, पालीपासून, प्राकृत भाषेपासून, महाराष्ट्री किंवा अपभ्रंश भाषेपासून तयार झाली असावी असा विचार अनेक अभ्यासक (४) मांडतात; मात्र त्यांच्यात अजूनही एकमत दिसून येत नाही. म्हणजेच मराठी भाषेबाबत असे म्हणता येईल, की मराठी भाषा ही कोणत्याही एका भाषेपासून निर्माण झालेली नाही.



मराठी भाषा साधारण सहाव्या शतकापासून बोलली जाऊ लागली असे म्हणतात. पण बाराव्या शतकापासून मराठीत ग्रंथरचना केली जाऊ लागली हे नक्की. त्यापूर्वीही शिलालेख (५) किंवा ताम्रपटांत (६) काही मराठी लेखन झाले होते. म्हैसूरजवळ श्रवणबेळगोळ येथील गोमटेश्वराच्या पुतळ्याच्या खाली एक शिलालेख आहे. त्यात दोन मराठी ओळी आहेत. श्रवणबेळगोळचा हा शिलालेख इसवीसन ९८३ मधील आहे. यावरून दहाव्या शतकात मराठीने बऱ्यापैकी आकार घेतला होता, असे दिसून येते.



बारावे शतक म्हणजे महानुभाव, ज्ञानेश्वर ह्यांचा कालखंड (७). देवगिरीच्या यादव राजांच्या काळात मराठीला राजभाषेचा मान मिळाला. ह्या काळातील मराठीला यादवकालीन मराठी म्हणतात. यापुढील दोन-अडीचशे वर्षांच्या काळात एकनाथ, दासोपंत ह्यांनी ग्रंथरचना केली. त्यानंतर सुमारे शंभर वर्षे शिवकालीन मराठी भाषा प्रचलित (८) होती. त्या काळात रामदास, तुकाराम आदींनी साहित्यनिर्मिती केली. नंतरची पेशवेकालीन मराठी सुमारे शंभर वर्षे अस्तित्वात होती. त्या काळात रामजोशी, मोरोपंत आदींच्या काव्यरचना आढळतात. संपूर्ण एकोणिसाव्या शतकामध्ये ब्रिटिशकालीन मराठी प्रचारात आली. त्यानंतर मराठीने आधुनिक रूप घेतले.



अशा रीतीने ही मराठी भाषा घडत असताना ह्यातील प्रत्येक टप्प्यावर तिला वेगवेगळे पैलू पडत गेले.

**क. वरील उताऱ्यातील अधोरेखित शब्दांचे अर्थ खाली दिले आहेत. अर्थाच्या शेजारील कंसात तो कोणत्या शब्दाचा अर्थ आहे ते उदाहरणाप्रमाणे लिहा.**

उदा॰ शासनसत्ता ( २ )

अ. दगडावर कोरलेला लेख ( )

आ. काळाचा एक ठरावीक भाग ( )

इ. अभ्यास करणारा ( )

ई. वापरात असणे ( )

उ. तांब्याच्या पत्र्यावर कोरलेला लेख ( )

ऊ. पद्धत किंवा तंत्र ( )

ए. मूळ शब्दाचे बदललेले रूप ( )




**ख. मराठी भाषेच्या प्रगतीचे टप्पे कालक्रमानुसार मांडा :**

| | मराठी भाषेच्या प्रगतीचे टप्पे | कालखंड |
|---|---|---|
| अ. | बोली मराठीचा प्रारंभ | |
| आ. | शिलालेख, ताम्रपट | |
| इ. | यादवकालीन मराठी | |
| ई. | शिवकालीन मराठी | |
| उ. | पेशवेकालीन मराठी | |
| ऊ. | ब्रिटिशकालीन मराठी | |

**ग. थोडक्यात उत्तरे द्या.**

| प्रश्न | थोडक्यात उत्तरे |
|---|---|
| अ. कोणतीही भाषा घडत असताना तिच्यावर कोणकोणत्या गोष्टींचा प्रभाव पडू शकतो? | त्या काळातील समाज, महत्त्वाच्या घडामोडी, राजवटी, शेजारील देशांच्या भाषांचा प्रभाव |
| आ. मराठी भाषा साधारण कधीपासून बोलली जाऊ लागली? | |
| इ. मराठी भाषेत लेखन कधीपासून होऊ लागले? | |

**घ. तुम्हाला तुमच्या मातृभाषेचा इतिहास माहीत आहे का? नसेल तर आंतरजालावर माहिती मिळवा आणि असाच एक छोटासा उतारा लिहून वर्गात सादर करा.**

## २ मराठी भाषेतील गमतीजमती

**पाठ्यपुस्तकातील 'जीव घाबरा करणारी भाषा' हा उतारा वाचा आणि खालील डाव्या रकान्यातील वाक्प्रचार / म्हणींच्या उजव्या रकान्यातील योग्य अर्थाबरोबर उदाहरणाप्रमाणे जोड्या लावा.**

**क. मराठीचा सामाजिक व्यवहार**

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | खापर इतरांच्या माथी फोडणे | १. | एखाद्या गोष्टीसाठी जिवापाड काम करणे |
| आ. | कोणाला तरी धारेवर धरणे | २. | खूप आरडाओरडा करणे |
| इ. | एखाद्याच्या पाठीत खंजीर खुपसणे  | ३. | काही एक गोष्ट करवून घेण्यासाठी दुसऱ्या गोष्टीत अडवणूक करणे |
| ई. | बिनपाण्याची हजामत करणे | ४. | विश्वासघात करणे |
| उ. | रक्त आटवणे | ५. | योग्य शिक्षा देऊन समजावणे |
| ऊ. | एकमेकांच्या पोटावर पाय देणे | ६. | आपण केलेल्या चुकीचा दोष दुसऱ्याला देणे |
| ए. | दुसऱ्याचे पाय ओढणे | ७. | खूप संताप होणे |
| ॲ. | कान उपटणे | ८. | वाटेल तसे बोलणे |
| ऐ. | डोक्यावर मिरी वाटणे | ९. | कामधंद्यात अडथळा आणून कमाई बंद पाडणे |
| ओ. | तोंडसुख घेणे | १०. | खूप रागावून बोलणे |
| औ. | तळपायाची आग मस्तकात जाणे | ११. | वरचढ ठरणे |
| अं. | घर डोक्यावर घेणे  | १२. | यशस्वी होत असणाऱ्याच्या कामात अडथळा आणणे |
| अः | नाक दाबलं तर तोंड उघडणे | १३. | काही विचार न करता रागावून बोलणे |

**ख. मराठी लोक खरंच हे खातात का?**

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | दात ओठ खाणे | १. | लिखाणात काही अक्षरे गाळली जाणे |
| आ. | बोलणी खाणे | २. | लाच घेणे |
| इ. | डोके खाणे | ३. | खूप रागावणे / संतापणे |
| ई. | वेळ खाणे | ४. | कोणी मारत असेल तर मारू देणे |
| उ. | मार खाणे | ५. | कोणी रागाने बोलत असेल तर ते ऐकून घेणे |
| ऊ. | अक्षरे खाणे  | ६. | वाईट कृत्य करणे |

| | | | |
|---|---|---|---|
| ए. | पैसे खाणे | ७. | एखाद्याकडे सारखी कटकट करून त्याला डोकेदुखी देणे |
| अॅ. | शेण खाणे | ८. | एखाद्याकडे कारण नसताना खूप वेळ बसणे किंवा एखाद्याशी उगीचच खूप वेळ बोलत राहणे |

**ग. शरीरशास्त्राविषयीच्या अद्भुत कल्पना**

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | डोक्यात राख घालणे | १. | विचार न करता वाटेल ते बोलणे |
| आ. | जिभेला हाड नसणे | २. | घाबरल्यामुळे तोंड कोरडे पडणे |
| इ. | हातपाय गळणे | ३. | खूप संतापाने विचार न करता वागणे |
| ई. | काळजाचे पाणी होणे | ४. | आपण मोठे झालो असे वाटणे आणि वागणे |
| उ. | तोंडचे पाणी पळणे | ५. | भीतीमुळे शरीरातील शक्ती गेल्यासारखे वाटणे |
| ऊ. | पंख फुटणे | ६. | भीतीमुळे हृदयाचा थरकाप होणे |
| ए. | शिंगे फुटणे | ७. | इतरांच्या लक्षात न येणाऱ्या गोष्टी समजणे |
| अॅ | तिसरा डोळा फुटणे | ८. | मोठे झालो असे समजून स्वैर वागणे |

**घ. मराठी माणसांना होणारे विकार**

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | तोंड येणे | १. | सुसंबध्द विचार करता न येणे |
| आ. | डोळे येणे | २. | वेड लागल्यासारखे होणे |
| इ. | डोके फिरणे | ३. | डोळे लाल होणे, डोळ्यांचा आजार होणे |
| ई. | डोके हलणे | ४. | तोंडाचा आतील भाग लाल होणे, त्यावर पुरळ येणे इ० |

**च. स्वतःवरच हिंसाचार!**

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | अंग मोडणे | १. | खूप जास्त बोलणे |
| आ. | एखाद्याच्या नावाने बोटे मोडणे | २. | संतापाने सर्व घर हादरेल इतका आरडओरडा करणे |
| इ. | घसाफोड करणे | ३. | खूप संतापाने विचार न करता वागणे |
| ई. | तोंड फाटेस्तोवर बोलणे | ४. | शरीराची हालचाल करून अंग मोकळे करणे |
| उ. | घर डोक्यावर घेणे | ५. | घसा दुखेपर्यंत तेच तेच सांगणे |
| ऊ. | डोक्यात राख घालणे | ६. | एखाद्याचे वाईट चिंतणे |

## ३ मराठी भाषा वळवावी तशी वळते

**आडवळणाची भाषा**



सर्वांच्या वापरातला सोयीचा आणि थेट रस्ता न घेता दूरचा, अडचणीचा, गैरसोयीचा रस्ता घेतला, की 'आडवळण घेतले' असे म्हणतात. भाषेतही अशी आडवळणे असतात. एखादी गोष्ट थेट, स्पष्टपणे न सांगता समोरच्या व्यक्तीला क्षणभर कोड्यात टाकणारी रचना वापरणे म्हणजे 'आडवळणाने बोलणे.'

ज्या काळात स्त्रीने आपल्या नवऱ्याबद्दल बोलताना त्याचे नाव घेणे किंवा त्याचा स्पष्ट उल्लेख करणे योग्य मानले जात नव्हते, त्या काळात घडलेला हा एक किस्सा आहे; अर्थातच, थोडे तिखटमीठ लावलेला आहे. एकदा लोकमान्य टिळक बाहेर गेले होते आणि त्यांची पत्नी ओसरीवर बसली होती. तेवढ्यात तिथे एक मराठी भाषा शिकलेला इंग्रज माणूस आला. त्याने आपल्या मिशनरी घाटाच्या व्याकरणशुद्ध मराठीत विचारले, "मिस्तर तिलक घराच्या मध्ये हाये का?" टिळकांच्या पत्नीनेही मग त्यांना कोकणस्थी मराठी शैलीत उत्तर दिले, "काठी जागेवर नाही." त्याला अर्थातच काही कळले नाही. त्याने पुन्हा तोच प्रश्न विचारला. पुन्हा टिळकांच्या पत्नी म्हणाल्या, "पगडी दिसत नाही." हेही उत्तर ऐकून मराठी व्याकरणावर प्रभुत्व असणाऱ्या त्या इंग्रजाला अर्थात काहीच बोध झाला नाही. त्याने आणखी एकदा (बहुधा आपल्या स्वरात जास्त मार्दव आणत) तोच प्रश्न विचारला. त्या वेळीही "दाराशी जोडे दिसत नाहीत" हे उत्तर मिळाले. पण अशी उत्तरे देणे व ती समजणे यासाठी जी एक भाषिक क्षमता आवश्यक असते ती नसेल, तर भाषेतील ही आडवळणाची गंमत कळणार नाही.

भाषा येणे म्हणजे भाषेतले आडवळणाचे प्रयोग चटकन समजणे आणि मुख्य म्हणजे तसे प्रयोग सहज स्वाभाविकपणे करता येणे. तात्पर्य, आडवळणाची भाषा येणे म्हणजे भाषा खऱ्या अर्थाने येणे.

**क. लोकमान्य टिळकांच्या पेहेरावात / वापरात असणाऱ्या काही गोष्टी तुम्हाला हा उतारा वाचून कळल्या का? कोणत्या?**

अ. ---------------------------------------- आ. ---------------------------------------- इ. ----------------------------------------

**ख. टिळकांच्या पत्नीने आपल्या उत्तरांमध्ये कोणते आडवळण घेतले आहे?**

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

**ग. आज जर टिळक असते आणि त्यांच्या पत्नीने आडवळणे घेण्याचे मुद्दाम ठरवले असते, तर त्यांनी कोणत्या वस्तूंचा उल्लेख केला असता? दोन किंवा तीन आडवळणे सांगा. थोडी मदत दिली आहे. तुम्ही तुमची कल्पनाशक्ती वापरून आणखीही उदाहरणे देऊ शकता!**

उदा॰ मोबाईल दिसत नाही.






## ४ मराठी भाषेच्या विविध बोली : एक झलक

**मायबोलीमधले धक्के आणि हिसके**

नवीन गावात आल्यावर थोड्याच दिवसांतली गोष्ट! एका विद्यार्थिनीच्या घरी अत्यंत प्रेमाने आणि आदराने जेवणाचं निमंत्रण आलं. जावंच लागलं. नाही म्हटलं तरी 'मास्तरचं' मन थोडं सुखावलं होतं.

जेवायला बसलो सगळे. पहिला घास तोंडात घालणार तोच मुलीचे वडील म्हणाले, 'शिस्तीत बसा, बाई."

मी सटपटलेच! अपमानही वाटला भयंकर. 'शिस्तीत बसा' म्हणजे मी काय गैर शिस्तीत बसले? माझ्या चेहऱ्यावरही नाराजी दिसली असावी. मुलीचा भाऊ सुज्ञ, पुण्या-मुंबईकडे वावरलेला. हसून म्हणाला,



"आरामशीर बसा. काही अडचण होत नाही ना?"

– अच्छा – म्हणजे 'शिस्तीत बसा' – एक निःश्वास!

मग जेवणात आग्रह आईचा – "शिस्तीत होऊ द्या – काही गडबड नाही आज."

पुन्हा शिस्तीत. हां! म्हणजे सावकाश! आता हे 'शिस्तीत' प्रकरण जरा 'कानवळणी' पडायला लागलं!

तोच दुसऱ्या दिवशी 'शिस्तीनं' एक हिसका आणखी दिलाच. वर्गात मागच्या बाकावरून एक आवाज :

"मॅडम, जरा शिस्तीत बोला."

अरेच्चा! काय हा उद्दामपणा! मी काय शिस्तीला सोडून बोलले? पुन्हा स्पष्टीकरण :

"म्हणजे काय आहे, लिहून घ्यायला घाई होते, म्हणून म्हटलं."

हां, म्हणजे 'सावकाश बोला!' ठीक आहे.

नवीन घरात सामान लावायचं होतं. खिळे हवे होते. बाजारात दोन-चार ठिकाणी विचारलं, "खिळे आहेत का?"

"नाय बा!"

ठराविक उत्तर. म्हटलं, काय गाव आहे का काय आहे? साधे खिळे मिळू नयेत? एका दुकानदाराने तर कहरच केला. समोर खिळे दिसताहेत आणि हा म्हणतो,



"खिळे? नाय बा!" असा संताप आला.

"अहो ते काय, आहेत तर काय झालं!"

"हां, ते होय! मग मोळे म्हणाय येत नाही का शिस्तीत!"

आता शिस्तीत म्हणजे नीट, आणि 'मोळे' म्हणजे खिळे. बरं बाबा, 'मोळे'.

शिपायाला म्हटलं, "अरे, ते अमुक सर कुठेत?"

"ते ना! ते काय ग्राउंडात उभारलेत!"

''उभारलेत? अरे, तो काय झेंडा आहे का उभारायला?''

तो गोंधळून पाहायला लागला. काय चुकलं बा आपलं? असा एकूण आविर्भाव! आणि माझी गफलत माझ्याच लक्षात आली. 'उभे राहिले आहेत – उभारलेत!' काय सुंदर संक्षिप्त रूप! मग लवकरच 'यायलेत' 'करायलेत' (यायला लागलेत, करायला लागलेत) ह्या रूपांचं कोडंही उलगडायला लागलं.

**- तारा भवाळकर**

क. ‘शिस्तीत’ हा शब्द वरील उताऱ्यात कोणकोणत्या अर्थाने वापरला आहे?

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

ख. इतर कोणते शब्द तुम्ही शिकत असलेल्या प्रमाण भाषेपेक्षा वेगळ्या पद्धतीने वापरले गेले आहेत? त्यांचे अर्थ काय?

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

ग. मराठीत आणि तुमच्या मातृभाषेत उच्चारात साधर्म्य असलेले शब्द आहेत का? त्यांचा अर्थही तोच आहे की वेगळा आहे? तो शब्द तुम्ही मराठीत चुकीच्या अर्थाने वापरल्यामुळे काही विनोद किंवा गैरसमज निर्माण झाले का? शब्दांच्या अशा गडबडीमुळे झालेल्या आणि होऊ शकणाऱ्या काही गमती आणि विनोद वर्गात सांगा.

ही काही उदाहरणे पाहा.



मराठी
वांगं



जर्मन
वांगं



मराठी
फूल



इंग्लिश
फूल



मराठी
कुंडी



तमिळ
कुंडी



मराठी
कीस



इंग्रजी
किस

"भरीत करण्यासाठी आधी वांगं चांगलं भाजून घ्या!" असं मी म्हटल्यावर माझी मराठी शिकणारी जर्मन मैत्रीण काही वेळ माझ्याकडे अचंब्याने पाहतच राहिली. नंतर अर्थ लक्षात आल्यावर तिला खूप हसू आलं.

माझी मैत्रीण उषा एका लग्नसमारंभासाठी नागपूरला गेली होती. जेवणाची वेळ झाली तेव्हा



तिच्या नागपुरातील इतर मैत्रिणी म्हणाल्या, "चला, आपण गुपचूप खाऊन घेऊ या." आपल्याला लग्नाचं आमंत्रण आहे, मग आपण गुपचूप का खायचं, असा प्रश्न उषाला पडला. पण जेव्हा तिला कळलं की नागपुरात पाणीपुरीला गुपचूप म्हणतात, तेव्हा तिला अनावर हसू फुटलं. आजही हा प्रसंग सांगताना तिला हसू आवरत नाही.

**घ. महाराष्ट्रातील वेगवेगळ्या शहरांत, प्रांतांत आणि प्रदेशांत मराठी भाषेच्या वेगवेगळ्या छटा ऐकायला मिळतात. हा अनुभव एव्हाना तुम्हालाही आला असेल. तुमच्याबरोबर अथवा तुमच्या परिचिताच्या बाबतीत भाषेतील फरकामुळे काही गमतीचा प्रसंग घडला असेल, किंवा तुमच्या ऐकिवात असा काही प्रसंग नक्कीच आला असेल. असा प्रसंग थोडक्यात लिहा आणि वर्गात सादर करा.**




## ५ भाषेची गंमत

**क. एकाच शब्दाचे अनेक अर्थ**

**खाली दिलेल्या शब्दांपैकी योग्य शब्द निवडून त्याचे योग्य रूप रिकाम्या जागेत भरा.**

(हार, जर, माळ, दर, गळ, मुका, शिरा, जागा)

अ. दाराला तोरण लावायचंय. ............वरची फुलं घेऊन ये आणि छान ............ बनव बरं चटकन. आणि ............ लहान झाली, तर ती केसात ............ .

आ. चांगले ............ मिळत नाहीत म्हणजे काय? मी शोधत राहीन. सहजासहजी ............ मानणाऱ्यातला नाही मी.

इ. वसंतनं त्या अधिकाऱ्याच्या परोपरीनं विनवण्या केल्या, ............ घातली, पैशाचं आमिषही दाखवलं, पण तो काही ............ लागला नाही.

ई. त्या लहान बाळाचा ............ घेतोय ना, तो माणूस ............ आहे.

उ. ............वर इतकं कसलं ओझं घेताय? घरात ............ आणि आईनं गोडाचा ............ केलाय तो खा.

ऊ. ............ असलेल्या माणसाला जागं करता येत नाही. मला माहिताय, तू ............ आहेस. किती ऐसपैस पसरून झोपलायस! जरा सरक आणि मला ............ दे.

ए. मला तू ............ साडी आणणार असशील, तर त्यात ............ नाही ना हे बघ. मला ............आवडत नाही.

ॲ. ............ वर्षी सगळ्या वस्तूंचे ............ वाढतातच.

**ख. शब्दांचा योग्य तो गट योग्य रूपात वापरून वाक्ये पूर्ण करा.**

(खण – खण, वार – वार, गाठ – गाठ, नाद – नाद – नाद, भरती - भरती)

अ. कपाटाच्या वरच्या ---------- बघ. चोळी शिवायला आणलेला ---------- तिथेच सापडेल तुला.

आ. छोट्या मेघनाला एक वेगळाच ---------- लागला होता. चमचा जेवायच्या ताटावर मारायचा, आणि होणारा ---------- ऐकत राहायचं. त्या ---------- सगळं जेवण व्हायचं तिचं.



इ. माझा वाढदिवस म्हणजे आजोबांच्या लेखी सगळ्यात महत्त्वाचा दिवस. तो विसरू नये म्हणून आजीनं पदराला ---------- मारून ठेवली होती. जर विसरली तर आजोबांशी ---------- होती तिची.

ई. १. मंत्रालयातील लिपिकांच्या जागेच्या ----------साठी हजारो अर्ज आले आहेत.

२. ---------- वेळी समुद्रकिनाऱ्यावर बसण्याचा आनंद काही वेगळाच असतो.

उ. १. त्या योद्ध्याने तलवारीचे अगणित ---------- अंगावर झेलले, पण तो लढतच राहिला.

२. सुट्टीचा ---------- सोडून इतर कोणत्याही दिवशी मला फोन कर.

**ग. फरक काना-मात्रा-वेलांटीचा**

(घर – घार, चाळ – चाळा – चाळ, तार – तारा, कडा - कडी, शीड - शिडी, ढग - ढीग)

अ. १. बाप रे! किती सरळ आहे हा या डोंगराचा उंच ----------. चढायला जवळ जवळ अशक्य!

२. घरात एकटी आहेस, दाराला ---------- घालायला विसरू नकोस!

आ. १. मयुरीला आवडेल असे ---------- शोधण्यात फार वेळ गेला तिच्या नवऱ्याचा.

२. ---------- आकाशात कितीही उंच उडत असली, तरी तिला तिचे भक्ष्य बरोबर दिसते.

इ. १. पायातील ---------- वाजवत वासुदेव ----------भर हिंडत फिरतो.

२. काय सांगतेस! हा अजबच ---------- लागलाय तिला.

ई. १. एकदा ---------- वारा भरू दे, मग बघ माझी नाव कशी जोरात जाते ते.

२. ---------- घट्ट धरून ठेव, हं! अगदी सोडू नकोस मी वर चढेपर्यंत.

उ. १. खूप तातडीने बातमी कळवायची असेल तर पूर्वी ---------- करत असत.

२. रात्रीच्या वेळी निरभ्र आकाशात ध्रुव---------- दिसेलच तुला.

ऊ. १. आकाशात किती ---------- दाटून आलेत, पण पाऊस काही पडण्याचं नाव घेत नाहीये.

२. फाईलींचे ---------- साठलेत टेबलावर. कधी संपणार आहे हे काम?

घ. तिन्ही लिंगांत असलेली सजीवांची नामे लिहून तक्ता पूर्ण करा.

| | पुल्लिंगी नामे | स्त्रीलिंगी नामे | नपुंसकलिंगी नामे |
|---|---|---|---|
| अ. | तो – मुलगा | ती – | ते – |
| आ. | तो – | ती – कुत्री | ते – |
| इ. | तो – | ती – | ते – शिंगरू |
| ई. | तो – | ती – गाय | ते – |
| उ. | तो – | ती – | ते – मेंढरू / कोकरू |
| ऊ. | तो – चिमणा | ती – | ते – पाखरू |

च. एका नामासाठी दोन योग्य क्रियापदे शोधा.

| | नाम | क्रियापद |
|---|---|---|
| अ. | वाट | लावणे, फुटणे |
| आ. | दम | |
| इ. | संधी | |
| ई. | मार्ग | |
| उ. | बळी | |
| ऊ. | गंडा | |
| ए. | पाय | |
| ऐ. | वेळ | |

लावणे, धरणे,
येणे, देणे, साधणे, मिळणे,
घालणे, काढणे, दाखवणे, ओढणे
देणे, पडणे, बांधणे, फुटणे,
धरणे, साधणे

छ. आता वरील नाम-क्रियापद जोड्या योग्य त्या वाक्यात योग्य प्रकारे वापरून वाक्य पूर्ण करा.

अ. १. मी इतक्या परिश्रमांनी हा पत्त्यांचा बंगला बांधला. जयूनं एकच फुंकर मारली आणि माझ्या सगळ्या मेहनतीची वाट लावली.

२. पुराच्या लोंढ्यापासून वाचण्यासाठी लोक वाट फुटेल तिकडे सैरावैरा धावू लागले.

आ. १. नव्या शाळेतली मुलं मला सारखी छळत होती. शेवटी माझ्या बाबांनी त्यांना असा ------------ ------------ की त्यांनी परत मला छळण्याचा विचारही केला नाही.

२. रडणाऱ्या बाळाला आई म्हणाली, “जरा ------------ ------------ सोन्या, भात शिजत आलाय.”

इ. १. घरात कोणी नसल्याची ------------ ------------ चोर घरात शिरला.

२. घरात कोणीच नव्हते. चोराला चांगलीच ------------ ------------.

| | | |
|---|---|---|
| ई. | १. ह्या कठीण परिस्थितीतून ------------------ ------------------साठी मला तुमची मदत लागेल. | |
| | २. तुम्ही ------------------ ------------------वर मी नक्कीच चालेन. | |
| उ. | १. ------------------ ------------------ प्रथा बंद करण्यासाठी त्या समाजसेवकाने खूप प्रयत्न केले. | |
| | २. मी माझ्याकडून खूप प्रयत्न केले, पण माझ्यावर विश्वास न ठेवता गावकरी अंधश्रद्धेला ------------------ ------------------. | |
| ऊ. | १. त्या वित्तसंस्थेला खूप मोठा ------------------ ------------------ त्यानं परदेशी पलायन केलं. | |
| | २. महेशनं आता गानमहर्षी बाळमहाराजांचा ------------------ ------------------ आहे. | |
| ए. | १. परिस्थितीला शरण जाऊन शेवटी मला माझ्या वैऱ्याचेच ------------------ ------------------ लागले. | |
| | २. मला मदत करणार नसशील तर निदान माझे ------------------ ------------------ तरी नकोस. | |
| ॲ. | १. ------------------ ------------------ की मी तुला सगळे सांगणारच आहे. तोवर जरा कळ सोस. | |
| | २. आई-बाबा घरात नव्हते. तीच ------------------ ------------------ मी हळूच फ्रीजमधलं आइस्क्रीम खाल्लं. | |

**ज. मराठीत अ, बे, ना, अप, बिन, गैर असे उपसर्ग लावून नामाचे / विशेषणाचे नकारार्थी रूप करता येते. तुम्ही कोणत्या नामाचे / विशेषणाचे नकारार्थी रूप कसे कराल? उदाहरणाप्रमाणे लिहा.**

उदा॰ शक्य – अशक्य

| | |
|---|---|
| अ. समान – | आ. पराजित – |
| इ. पूर्ण – | ई. रोजगारी – |
| उ. योग्य – | ऊ. खूश – |
| ए. इमानी – | ॲ. शांत – |
| ऐ. पर्वा – | ओ. वाजवी – |
| ऑ. विरोध – | औ. मंजूर – |
| अं. व्यवहार – | अः. इज्जत – |

**झ. कंसात दिलेले शब्द योग्य जागी लिहून वाक्य पूर्ण करा.**

(अभाव, प्रभाव, स्वभाव, निभाव)

अ. मुळातच सौम्य स्वभावाच्या जयेशवर मित्रांचा खूप ------------------ होता. त्यांनी केलेल्या त्या प्रदेशातील अन्न-पाण्याच्या ------------------च्या अतिरंजित वर्णनावर त्याचा लगेच विश्वास बसला आणि आपला तिथे कसा ------------------ लागेल ह्याची काळजी त्याला वाटू लागली.

आ. (मस्त, भिस्त, रास्त, स्वस्त)

रास्त भावात ---------------- आणि ---------------- माल मिळण्याचे एकमेव ठिकाण. आमच्यावर ---------------- ठेवा, याच एकदा!

इ. (विचलित, प्रचलित, स्वयंचलित)

---------------------- वाहनांपेक्षा वेगळ्या अशा ---------------------- गाड्या रस्त्यांवरून धावताना पाहून भूषण क्षणभर ---------------------- झाला.

ई. (अक्कल, नक्कल, टक्कल, शक्कल)

परीक्षेत माझी ---------------- काही काम करेना. मग मी एक ---------------- लढवली आणि माझ्या पुढे बसलेल्या, ---------------- असलेल्या त्या मुलाच्या उत्तरपत्रिकेची ---------------- केली.



## ६ अशी ही मराठी, अशीही मराठी

ज्यांना तोंडावर 'बोलून टाकणं' जमत नाही ते पाठीमागे 'टाकून बोलत' राहतात

काम सोपं असेल तर आपण ते 'करून पाहतो' आणि अवघड असेल तर 'पाहून करतो'

शहाणा माणूस 'पाहून हसतो', निर्मळ माणूस 'हसून पाहतो'

**क. खाली एक कथा दिली आहे, पण त्या कथेतील मधले दोन भाग वगळले गेले आहेत. आपापली कल्पनाशक्ती चालवून ही कथा पूर्ण करा आणि नंतर वर्गात वाचून दाखवा.**

**मातृभाषा**



सुमारे पावणेतीनशे वर्षांपूर्वी एक मोठा मुत्सद्दी महाराष्ट्रात होऊन गेला. नाना फडणीस त्याचं नाव. त्याच्या हुशारीबद्दल बऱ्याच गोष्टी प्रसिद्ध आहेत. त्यातलीच ही गोष्ट.



एकदा पुण्याच्या दरबारात एक बाहेरगावचा ब्राह्मण आला. त्याला पुष्कळ भाषा बोलता येत होत्या आणि प्रत्येक भाषेवर त्याचं एवढं प्रभुत्व होतं, की त्याची मातृभाषा कुठली हे सांगता येणं अवघड होतं. त्यानं दरबारातील लोकांना आव्हानच दिलं, 'माझी मातृभाषा ओळखा!' अनेकांनी प्रयत्न केला, पण त्यांना जमलं नाही. अखेर नाना फडणिसानं ते आव्हान स्वीकारलं, की 'चोवीस तासांत तुमची मातृभाषा कुठली ते सांगतो'.

----------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------

ख. दुसऱ्या दिवशी दरबारात नानानं पाहुण्याला सांगितलं, 'तुमची मातृभाषा कानडी आहे.' नानांचा अंदाज बरोबर असल्याचं त्या ब्राह्मणानं कबूल केलं. नानानं त्याची भाषा कशी ओळखली?

अ. ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

माणूस मनातल्या मनात विचार करायला जी भाषा वापरतो ती त्याची सर्वात जवळची भाषा – बहुतकरून जिला आपण मातृभाषा म्हणतो ती – असते.

उत्तरसंचात मूळ कथा वाचा. तुम्ही पूर्ण केलेली कथा आणि मूळ कथा ह्यात फार फरक आहे का? वर्गातील इतर विद्यार्थ्यांच्या कथा ऐका आणि चर्चा करा.

## ७ ध्वन्यनुकारी शब्द / क्रियापदे

**खाली दिलेल्या क्रियापदांपैकी योग्य ते क्रियापद निवडून त्याचे ध्वन्यनुकारी नाम करा आणि वाक्ये पूर्ण करा.**

(कलकलणे, बडबडणे, गडगडणे, चुरचुरणे, लखलखणे, फडफडणे, गडबडणे, खरखरणे)

क. आयुषीने त्या पोपटाला पिंजऱ्यात कोंडून ठेवलं खरं, पण मग तिला रात्रभर त्याच्या पंखांची ---------------------- ऐकून झोप लागली नाही. सकाळी उठली तर अपुऱ्या झोपेमुळे डोळ्यांची ---------------------- होत होती.

ख. आमचा रेडिओ बिघडलाय. नीट ऐकू येत नाही, नुसती ---------------------- ऐकू येतेय. आजी मोठ्याने ओरडून सांगत होती. पण अंगणात खेळणाऱ्या मुलांच्या ----------------------मुळे त्या मेकॅनिकला काही तिचे बोलणे समजत नव्हते.

ग. केव्हापासून ढगांचा ---------------------- आणि विजेचा ---------------------- चालू आहे. पण पाऊस काही पडत नाहीये अजून.

घ. अचानक इतके पाहुणे दारात उभे पाहून रेवतीची अगदी ---------------------- उडाली.

च. दामलेआजी एकदा का बोलायला लागल्या की थांबायचं नाव घेत नसत. त्यांची सततची ---------------------- ऐकून त्यांचे शेजारी वैतागून जात.






## ८ अधोरेखित क्रियापदाला 'ऊक' प्रत्यय लावून नाम तयार करा व रिकाम्या जागी लिहा.

| | | |
|---|---|---|
| क. आमच्या गावात क्लब, डिस्को, सिनेमागृह, नाट्यगृह, वाचनालय इत्यादी नाहीतच. त्यामुळे आम्हाला तिथं करमत नाही. काहीच ---------- नाही हो तिथं! | ख. ही मुलं रोज शाळेत मारामाऱ्या करतात. हे काय वागणं झालं? त्यांची ---------- सुधारावी म्हणून त्यांच्या शिक्षकांचे प्रयत्न चालू आहेत. | ग. आपल्या चालीरीती, रूढी, परंपरा आपल्यालाच जपल्या पाहिजेत ना? आपल्या गोष्टींची ---------- आपणच करायला हवी असं आजी नेहमीच सांगते. |
| घ. आमचं चांगलं वर्तन पाहून पाहुणे अगदी खूश झाले. "नेहमी अशीच चांगली ---------- ठेवा!" पाहुणे गेल्या गेल्या आईनं लगेच सुनावलं. | च. भरमसाट व्याजदर लावून तो सावकार अशिक्षित गोरगरिबांना इतक्या सफाईने पिळून काढत असे, की आपली ---------- झालीये हे पुढे बराच काळ त्यांच्या लक्षातही येत नसे. | छ. आमच्या आजीला थोडेथोडे पैसे साठवून बाजूला ठेवण्याची सवय होती. तिची हीच ---------- आम्हाला अडचणीच्या वेळी उपयोगी पडली. |

## ९ उच्चारात होते गडबड?

**कंसात दिलेले शब्द योग्य जागी योग्य रूपात वापरा. नंतर वाक्ये मोठ्याने वाचा आणि आपले उच्चार बरोबर होत आहेत ना, ते पाहा. 'न' चा 'ण' झाला की अर्थ किती बदलतो ते लक्षात घ्या.**

(मन – मण, घन – घण, तन – तण, जन – जण, काना – काणा)

क. डोक्यावर ---------- ओझं दिल्यासारखी का चालतेयस तू?

ख. तुझ्या ---------- काय आहे ते मोकळेपणानं सांगून टाक बरं!

ग. हे आकाशात दाटून आलेले काळे ---------- बरसतील लौकरच, तोवर ही तलखी सहन करायलाच हवी.

घ. कोणीतरी डोक्यात ---------- घालावा असं डोकं दुखतंय माझं!

च. रोपांची वाढ नीट व्हायला हवी असेल तर आधी जमिनीतलं ---------- काढायला हवं.

छ. मन निरोगी असेल तर ---------- पण निरोगी राहील!

ज. दोन्ही उताऱ्यांत अगदी तंतोतंत तोच मजकूर आहे. अगदी ----------मात्रेचाही फरक नाही.

झ. दिसायला बरा आहे तसा तो, डोळा थोडा ---------- आहे इतकंच.

ट. लग्न घरातल्या घरात करायचं आहे, तरी साधारण २०-२५ ---------- तरी येतीलच की!

ठ. मान ---------- सांगावा, अपमान मनात ठेवावा.

## १० 'मराठीची महती'

**मराठीला रूक्ष, कठीण भाषेची उपाधी देणाऱ्यांना अगदी चौदाव्या-पंधराव्या शतकातील कवीही मराठी भाषेची महती पुढीलप्रमाणे पटवून देतात.**

### मराठीची महती

नारळीचें फळ गोमटें । वरीं पाहतां दिसें करवंटें ।
भीतरी नेटेंपाटें । उत्तम दिसे ॥
कीं कर्दळीफळ पक्वघडी । वरीवरी पाहतां सालडी ।
भीतरी अमृतरस गोडी । तैसी वाणी मराठी ॥
जे संस्कृताचा गर्व घेती । आणि प्राकृतातें निंदिती ।
ते गर्विष्ठ अहंकृती । आपस्वार्थी बोलके ॥
जे वरिवरि पाहतां । फळाची करिती उपेक्षिता ।
ते वंचिती भीतरार्था । अल्पमतिचे जाण पां ॥
तैसी उखरवाणी मऱ्हाटी । परी भीतरार्थी घालितां दृष्टि ।
होइजे सुख संतुष्टी । स्वानुभज्ञान ॥



अज्ञानसिद्ध
अंदाजे १३५८- १४१८

काही शब्दार्थ - गोमटें = चांगले, सुंदर, नेटेंपाटें = निश्चितच, कर्दळीफळ = केळ, भीतरी = आत, उपेक्षिता = उपेक्षा, वंचिती = मुकतात, भीतरार्थी = आतल्या अर्थाला, उखरवाणी = खडबडीत, स्वानुभज्ञान = स्वतःच्या अनुभवातून कळलेले.

**क. 'मराठीची महती' ह्या कवितेचा अर्थ आत्ताच्या प्रमाणभाषेत लिहिण्याचा प्रयत्न करा.**

---

## ११ संधी

**क. पुढील शब्दांचे संधी सोडवा.**

अ. समाप्त = ---------------------------------------- + ----------------------------------------

आ. दुष्प्राप्य = ---------------------------------------- + ----------------------------------------


इ. निरंकुश = ---------------------------------------- + ----------------------------------------

**ख. पुढील शब्दांचे संधी करा.**

अ. सम् + चालन = ----------------------------------------

आ. यश: + धन = ----------------------------------------

इ. सत् + जन = ----------------------------------------



# हर्षोल्हास ६





















## चला, शिकू या ...

- वेगळ्या वाटेवरचे सण माहीत करून घेणे
- नवे उत्सव आणि समारंभ जाणून घेणे
- व्याकरण : साहचर्यवाचक शब्दयोगी अव्यये वापरणे
- व्याकरण : नामसाधित क्रियापदे / नामधातू तयार करून वापरणे
- व्याकरण : संधी ओळखणे आणि करणे

## १ आम्ही हे दिन साजरे करतो.

क. भारतात अनेक वेगवेगळे दिन साजरे केले जातात. त्यापैकी काही दिन आणि ते कधी आणि कोणाच्या आठवणीनिमित्त साजरे होतात त्याची माहिती खाली तक्त्यात दिली आहे. त्यावरून वाक्ये बनवा.



शिक्षक दिन

क्रीडा दिन

गणित दिन

बालदिन

मराठी भाषा दिन

विज्ञान दिन

युवा दिन

पर्यावरण दिन

| | |
|---|---|
| उदा. | बालदिन / १४ नोव्हेंबर / पंडित जवाहरलाल नेहरू |
| अ. | युवा दिन / १२ जानेवारी / स्वामी विवेकानंद |
| आ. | राष्ट्रीय विज्ञान दिन / २८ फेब्रुवारी / सर चंद्रशेखर वेंकट रमण |
| इ. | मराठी भाषा दिन / २७ फेब्रुवारी / कवी विष्णू वामन शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज |
| ई. | शिक्षक दिन / ५ सप्टेंबर / डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन |
| उ. | जागतिक पर्यावरण दिन / ५ जून / संयुक्त राष्ट्र |
| ऊ. | गणित दिन / २२ डिसेंबर / श्रीनिवास रामानुजन |
| ए. | क्रीडा दिन / २९ ऑगस्ट / हॉकीपटू मेजर ध्यानचंद |

उदा. पंडित जवाहरलाल नेहरू ह्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ १४ नोव्हेंबर रोजी बालदिन साजरा केला जातो.

अ. ..........

आ. ..........

इ. ..........

ई. ..........

उ. ..........

ऊ. ..........

ए. ..........

**ख. पुढे कंसात दिलेल्या नामापासून क्रियापदाचे योग्य ते रूप करून वाक्ये पूर्ण करा. ही वाक्ये कोणत्या दिनाचे वर्णन करत आहेत ते लक्षात घेऊन वरील तक्त्यातील माहिती बरोबर उदाहरणाप्रमाणे जोड्या लावा.**



उदा॰ ह्या दिवसाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या चित्रकला स्पर्धेमुळे सारी मुले (मोहर) मोहरली. – बालदिन

अ. ह्या दिवशी लावलेली रोपे आता चांगलीच (पालव) ------------------ आहेत. ------------------------------------

आ. मोबाईल गेम्समुळे (नाद) ------------------------- मुलांना ह्या दिवशी मैदानी खेळांचे महत्त्व सांगण्यात आले. ------------------------------------

इ. हा विषय शिकताना मुले नेहमीच (धास्ती)----------------------, म्हणूनच ह्या दिवशी आम्ही अंकांचे खेळ सादर करतो. ------------------------------------

ई. या निमित्ताने विद्यापीठातर्फे विविध प्रयोगांच्या स्पर्धा आणि एक प्रदर्शन (आयोजन) ------------------------- जाते. ------------------------------------

उ. या निमित्ताने आम्ही दरवर्षी वेगवेगळ्या कवींच्या कविता (अभ्यास) ------------------------- त्यांचे सादरीकरण करतो. ------------------------------------



ऊ. या दिवशी आयोजित केलेल्या चर्चासत्रात आजच्या तरुणांसमोर असलेले विविध प्रश्न (हात) ------------------------- गेले. ------------------------------------


ए. या निमित्ताने ज्या मुलींनी लहान इयत्तांचे वर्ग घेतले, त्या साड्या नेसून आल्यामुळे शिक्षिकेच्या भूमिकेत (शोभा) -------------------------- होत्या. ------------------------------------

**ग. ह्या दिनांव्यतिरिक्त इतर कोणता दिन तुम्ही साजरा करता, किंवा तुम्हाला साजरा करायला आवडेल? तो तुम्ही कोणत्या कारणासाठी आणि कसा साजरा कराल? थोडक्यात लिहा आणि वर्गात सांगा.**

## २ नवे पंचांग

"किशोरी, दिवाळीची आत्तापासूनच सुरुवात केलीयेस की काय?" घरात शिरता शिरता रोहिणीने विचारले, "तळल्याचा खमंग वास सुटलाय म्हणून म्हटलं."

"नाही गं बाई! बाल्कनीतल्या कुंडीत कोथिंबीर फोफावलीये, गावभर वाटूनही उरली म्हणून वड्या करतेय. तुलाही आवडतात. बस, मी आलेच," म्हणत किशोरी स्वयंपाकघराकडे वळली.



"कधीही आलं तरी तुझं घर दिवाळीसाठी आवरल्यासारखंच दिसतं. आमच्यासारखा भोंगळ आणि बेशिस्त कारभार नसतो. आम्ही उद्यावर दिवाळी आली की आज जागे होणार," रोहिणी काहीशा असूयेनं म्हणाली.

"पसारा करायला इथं आहे कोण?" ट्रे घेऊन बाहेर येत किशोरी म्हणाली, "आपणच इथली वस्तू तिथं न्

तिथली इथं ठेवायची, की झालं आवरणं. घे गं, गरम आहे तोवर."

वडी आपल्या बशीत घेत रोहिणी म्हणाली, "पण बोल बोल म्हणता दिवाळी तीन आठवड्यांवर आलीच की! यंदा तुमच्याकडे काय विशेष?"

"आमच्याकडे विशेष म्हणजे यंदा दिवाळीच नाही."

"अंऽ?!" गरम वडीचा जिभेला चटका बसल्याने ती तोंडात घोळवत रोहिणीने डोळे मोठे केले.

"कारण आम्ही पंचांगच बदललंय," किशोरी खट्याळ हसत म्हणाली, "आमच्या नव्या पंचांगात चार-पाच दिवाळ्या आहेत अन् दीड महिन्यानंतर त्या सुरू होणार आहेत."

"किशोरी, तुम्ही दिवाळी कशी साजरी करणार आहात असा माझा साधासरळ प्रश्न आहे. त्याचं तितकंच साधंसरळ उत्तर मला हवंय. देणारेयस का?"

"उत्तरच देतेय नं! हे बघ, रोहिणी, आयुष्यभर सगळे सणवार साग्रसंगीत साजरे करून झालेत. घरात मुलं होती तोवर त्यात मजा होती. आता ती नाहीत. घरटी किमान एक अपत्य परदेशात पाठवण्याची पुण्याची प्रथा आहे की नाही? आम्ही तर आमची दोन्ही पाठवलीत. उरलोत दोघंच म्हातारा-म्हातारी. पहाटेच्या अभ्यंगस्नानाचं कौतुक नवऱ्याला नाही, मला त्याहून नाही. मी चकल्या नि करंज्या करायच्या, तो कंटाळलेल्या चेहेऱ्यानं एखाद-दुसरी तोंडाला लावणार. नातेवाइकांची आणि मित्रांची घरं वस्तूंनी नि बँक खाती पैशांनी ओसंडून वाहताहेत. भेटवस्तूंचं अपरूप ना त्यांना आहे ना आम्हाला. तरीही हे सगळं करायला मग कुणी सांगितलंय! शेवटी सण करायचा कशासाठी? आनंदासाठीच ना? त्यामुळे आता जे करण्यात आपल्याला आनंद वाटतो ते करायचं आम्ही ठरवलंय. तीच आमची दिवाळी."

रोहिणी तोंड उघडं टाकून ऐकत होती. एक आवंढा गिळून ती म्हणाली, "तू मघाशी चार-पाच दिवाळ्या म्हणालीस-...."

"हां, तर पहिली म्हणजे गोव्याचा चित्रपट महोत्सव," किशोरी उत्साहानं म्हणाली.

"गोव्याला जाणार? सिनेमे बघायला?"



"बुकिंग झालंसुद्धा. मग सवाई गंधर्व महोत्सव. जानेवारी-फेब्रुवारीत साहित्य संमेलन असतंच. शिवाय एक दोन नाट्यमहोत्सव, मुंबईचा काळा घोडा महोत्सव, नवऱ्याला जयपूरच्या लिटफेस्टलाही जाण्याची इच्छा आहे... काय बघू आणि किती बघू असं होईल. इतक्या वर्षांत हे का सुचलं नाही असं वाटतंय."

"आणि त्याचाही कंटाळा आला तर?" रोहिणी बिचकत म्हणाली.

किशोरीने उसासा टाकला. "बोललीस? वाटच बघत होते मी. आला कंटाळा तर दुसरं काही तरी शोधायचं! एखाद्या वर्षी वाटलं तर रीतसर पणत्या लावून दिवाळीसुद्धा करायची, पण आनंद करायचा. उरलेलं आयुष्य साजरं करायचं. रोहिणी, डोक्यावर ओझं दिलंय म्हणून नव्हे, तर मनापासून वाटतं म्हणून साजरं करायचं. अगं, मी बडबडतच सुटले ... कशी झालीय वडी? ... थांब, चहा तयार आहे, आणतेच."

**क. घुसखोर शब्द खोडा.**

अ. सूड – असूया – मत्सर – हेवा – द्वेष

आ. खट्याळ – खोडकर – टवाळखोर – थट्टेखोर

इ. मूल – आपत्ती – संतती – अपत्य

ई. सहाध्यायी – सहकारी – सहप्रवासी – सहनशील – सहस्पर्धक

उ. नातवंड – स्नेही – नातेवाईक – सगेसोयरे – कुटुंबीय – आप्त

**ख. पुढे दिलेल्या यादीपैकी तुम्ही कोणकोणत्या कारणांसाठी समारंभ साजरे करता त्या कारणांवर खूण करा.**

अ. धार्मिक कारणांसाठी. ☐

आ. नातेवाईक, मित्रमैत्रिणी आणि सगेसोयरे ह्यांच्या भेटीगाठी व्हाव्यात म्हणून. ☐

इ. उत्सवातील आनंदी वातावरणामुळं मनही आनंदी होतं म्हणून. ☐

ई. पक्वान्नं आणि चमचमीत खाद्यपदार्थ खायला मिळावेत म्हणून. ☐

उ. नवीन कपडेलत्ते, दागदागिने विकत घ्यायला मिळावेत म्हणून. ☐

ऊ. भेटवस्तूंची देवाणघेवाण व्हावी म्हणून. ☐

ए. नटायथटायला मिळावं म्हणून. ☐

ॲ. घराची साफसफाई व्हावी म्हणून. ☐

ऐ. घराला रोषणाई करता यावी म्हणून. ☐

ओ. फटाके फोडता यावेत आणि आतषबाजी करता यावी म्हणून. ☐

ऑ. नवीन काही तरी शिकायला आणि अनुभवायला मिळावं म्हणून. ☐

औ. नवीन लोकांच्या ओळखी व्हाव्यात म्हणून. ☐

अं. रोजच्या दिनक्रमातून बाहेर पडून काही तरी नवं करावं म्हणून. ☐

अः. रोजच्या कामातून सुट्टी मिळावी म्हणून. ☐

**ग. आपल्या सहाध्यायाने कोणती कारणे निवडली आहेत ती बघा आणि त्यावर एकमेकांशी चर्चा करा. ह्याव्यतिरिक्त इतर काही कारणांसाठी तुम्ही समारंभ साजरे करत असाल, तर ती कारणे वर्गात सांगा.**

**घ. प्रस्थापित आणि रूढ सण-समारंभ साजरे करण्याऐवजी काही नव्या, वेगळ्या समारंभात भाग घेऊन आनंद लुटावा असं किशोरीला वाटतं. किशोरीने उल्लेख केलेल्या उत्सवांची चित्रे खाली दिली आहेत. तो कोणता समारंभ आहे असं तुम्हाला वाटतं? ओळखा आणि त्या समारंभाचं नाव त्या चित्राखाली लिहा.**



अ ------------------------



आ ------------------------



इ ------------------------



ई ------------------------



उ ------------------------



ऊ ------------------------

च. ह्या सर्व समारंभांची माहिती आंतरजालावर मिळेल. चार-चार जणांच्या गटाने ह्यापैकी कोणताही एक समारंभ वर्गात एकत्र चर्चा करून निवडा, त्याची सविस्तर माहिती आंतरजालावरून मिळवून ती वर्गात सादर करा.

छ. हे समारंभ रूढ सण-समारंभांपेक्षा कसे वेगळे आहेत? ते साजरे करण्याच्या पद्धतीत कोणता समान धागा आहे आणि तो रूढ सण-समारंभांपेक्षा कसा वेगळा आहे? थोडक्यात सांगा.

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

ज. किशोरी म्हणते : आनंद करायचा. उरलेलं आयुष्य साजरं करायचं. डोक्यावर ओझं दिलंय म्हणून नव्हे, तर मनापासून वाटतं म्हणून साजरं करायचं. सण साजरे करणं आणि आयुष्य साजरं करणं ह्यात काय फरक आहे असं तुम्हाला वाटतं? जे साजरे करण्याचा किशोरीचा मानस आहे, ते वेगळ्या वाटेने जाणारे सण आणि उत्सव आहेत. ते साजरे करण्याची कोणती वेगळी कारणं असतील असं तुम्हाला वाटतं? थोडक्यात लिहा.

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

## ३ नामसाधित क्रियापदे / नामधातू

क. कंसातील नामांपासून नामसाधित क्रियापदे बनवा.

(चक्र, हात, गोंधळ, कंटाळा, मोहर, डाग)

| | | |
|---|---|---|
| अ. ---------------- | आ. ---------------- | इ. ---------------- |
| ई. ---------------- | उ. ---------------- | ऊ. ---------------- |

**ख. आता क्रियापदाचे योग्य रूप करून योग्य त्या जागी वापरा आणि वाक्ये पूर्ण करा.**

अ. हा खोटा आळ आला आणि त्या सुप्रसिद्ध माणसाची प्रतिमा नाहक ............................ .

आ. आपल्याला ही वाट सरळ आपण शोधत असलेल्या पत्त्यावर नेईल ही खात्री असलेले प्रवासी त्या वाटेला अचानक समोरासमोर दोन फाटे फुटलेले पाहून ............................ .

इ. ह्या लेखकानं हा क्लिष्ट विषय चांगला ............................ .

ई. स्वयंपाकाचा विषय निघाला की अनिता नेहमीच ............................ .

उ. चित्रपटात संधी मिळणार हे कळल्यामुळे सुगंधा ............................ .

ऊ. इतके पाहुणे अचानक दारात उभे राहिलेले पाहून नयना ............................ .

इवले बीज <u>अंकुरले</u>, छोटे रोप उगवले,  
पावसाची सर येता, हळुवार <u>पालवले</u>  
इवली कळी <u>डोकावली</u>, पानामागून हसली  
वारा करता छेडछाड, अलगद ती <u>फुलारली</u>  
फूल असे <u>गंधाळले</u>, त्याचा गंध <u>दरवळे</u>  
त्या दरवळामागे येती, वेड्या भ्रमरांचे थवे  
होता भ्रमराची भेट, फूल अति <u>सुखावले</u>  
<u>आनंदले</u>, <u>बहरले</u> अन् <u>फळले</u> <u>फळले</u>



**ग. वरील कवितेतील अधोरेखित क्रियापदे कोणत्या नामांपासून आली आहेत? उदाहरणाप्रमाणे लिहा.**

उदा॰ अंकुरले – तो अंकुर – अंकुरणे

अ. ............................

आ. ............................

इ. ............................

ई. ............................

उ. ............................

ऊ. ............................

ए. ............................

ॲ. ............................

ऐ. ............................

ओ. ............................

**घ. खालील अधोरेखित क्रियापद कोणत्या नामापासून आलं आहे ते नाम शोधा. आता उदाहरणाप्रमाणे ते नाम + क्रियापद जोडी वापरून वाक्ये पुन्हा लिहा. नामाबरोबर येणारी क्रियापदे कंसात दिली आहेत. त्यातून योग्य ते क्रियापद निवडा.**

(करणे, करणे, लागणे, लागणे, घडवणे, देणे)

उदा॰ बाळाचं रडणं थांबतच नव्हतं. म्हाताऱ्या आजीला बाळ दृष्टावलं आहे असं वाटत होतं, पण इतर कोणाचाच त्यावर विश्वास नव्हता.
बाळाचं रडणं थांबतच नव्हतं. म्हाताऱ्या आजीला बाळाला दृष्ट लागली आहे असं वाटत होतं, पण इतर कोणाचाच त्यावर विश्वास नव्हता.



अ. महेश झाडामागं दडून संकेतला खुणावत होता. पण संकेतचं त्याच्याकडं लक्षच नव्हतं.

---

---

आ. अंशुल फारच मोठ्या पदावर काम करत होता. लहान वयात इतक्या जबाबदारीचं पद तो स्वीकारेल असं कुणालाच वाटलं नव्हतं.

---

---

इ. भाजी चांगली दहा मिनिटं वाफवून घे. मगच पातेलं शेगडीवरून खाली उतरव.

---

---

ई. तू इतका पावलोपावली ठेचकाळतोयस, पण अजून काही धडा शिकत नाहीयेस.

---

---

उ. श्रीरंगनं मनावर घेतलं आणि त्या दोन दुरावलेल्या मित्रांना भेटवलंच.

---

---

## ४ जीवनोल्हास

कधी कधी एखाद्या अनामिक भीतीने मन अस्वस्थ होते. आपल्याच घरात, आपल्याच गावात, आपल्याच आकाशाखाली आपण परके, उपरे आहोत असे वाटू लागते. पण ही अवस्था फार काळ टिकतही नाही ...



उदास झालेले, भ्यालेले मन ठरवून सुखाच्या आठवणींची चित्रे काढते. सुंदर नाद ऐकते. त्यांची गुंगी मनावर हळूहळू चढत असतानाच मला दूरवरून ऐकू यावे,

तसे अनेक स्त्रिया एकत्र गाणे म्हणत असताना ऐकू येतात. हे तर ओळखीचे गाणे. आल्या वाटते गोंड स्त्रिया! पारव्याच्या अवतीभवतीच्या जंगलामध्येच राहतात ना या! दिवाळीला फक्त येतात. गात गात घोळक्याने गावात येतात व भद्र लोकांच्या अंगणात गात गात समूहनृत्य करतात. ताठ डौलदार चालणाऱ्या, अभिमानी, दाठर स्तनांच्या ह्या स्त्रिया हातात हात गुंफवून आमच्या अंगणात लयबद्ध मंडलाकार नाचत आहेत आणि साथीला 'रीरीरी रीरीरी रीरीरी रीरीऽऽऽ' असे समूहगानही गात आहेत. कुठले आदिम संगीत हे? हुंकारणारी गर्द अरण्ये हे संगीत आमच्या अंगणातच आणते व मन नित्याची लय सोडून आपोआप निसर्गलय पकडते. किती मनमुक्त आनंद ह्या स्त्रियांचा. नाच संपवून त्या निघाल्या की आई त्यांना बोलवून नवा कपडा, पैसे काही तरी देत आहे ते घ्यायलाही त्यांना उसंत नाही इतके त्यांचे पाय उत्साहाने थिरकत आहेत. जमिनीवर टेकायला ते तयार नाहीत. त्या काही भीक घेणाऱ्या नाहीत. आपल्या आनंदाचे व उल्हासाचे वाटपच जणू करत, त्यात आम्हाला मोठेपणाने सामील करून घेत त्या दिवसभर गावात राहतील व नंतर वर्षभर अदृश्य होतील. हा निष्पाप जीवनोल्हास आम्हा नागर लोकांजवळ कुठून?

**- महेश एलकुंचवार**

**क. घुसखोर शब्दांवर खूण करा.**

अ. विरंगुळा – सवड – उसंत – फुरसत


आ. रान – जंगल – शेत – अरण्य


इ. गच्च – घट्ट – ताठ – तंग

ई. माठ – गाठ – मठ्ठ – मंद

उ. परका – तऱ्हेवाईक – तिऱ्हाईत – उपरा

**ख. विसंगत जोडीवर खूण करा.**



**ग. डाव्या रकान्यामधील प्रश्नांची उत्तरे उजव्या रकान्यात लिहा.**


| | |
|---|---|
| अ. वरील उताऱ्यामध्ये मनाची चलबिचल,अस्वस्थता  दाखवणारे शब्द / शब्दसमूह कोणते आहेत? | |
| आ. मनाची ही उदासी घालवण्यासाठी मन काय करते? | |
| इ. गोंड स्त्रियांची वैशिष्ट्ये कोणती आणि त्या आनंद कसा पसरवतात? | |
| ई. गोंड स्त्रियांच्या नाचाचे वर्णन | |
| उ. ह्या संगीत-नृत्याचा आणि निसर्गाचा संबंध दाखवणारे वर्णन - | |

**घ. तुम्ही नुकताच ह्या गोंड स्त्रियांचा नाच पाहिला आहे अशी कल्पना करा. ह्या गोंड स्त्रियांचे आणि त्यांच्या नाचाचे वास्तविक वर्णन आपल्या मित्र / मैत्रिणीला ई-मेल द्वारे कळवा.**



## ५ आमची सहल

**'बरोबर, सह, संगे, सहित, सकट, समवेत, निशी, सवे,' ही सर्व साहचर्यवाचक अव्यये खालील वाक्यात एकेकदाच योग्य जागी भरून वाक्ये पूर्ण करा.**



गेली दोन वर्षं आमच्या शाळेची सहल या ना त्या कारणानं कुठं गेलीच नव्हती. आता शेवटी येत्या शनिवार-रविवारी आमच्या शाळेची सहल चाललीये लोणावळ्याला. खूप खूश आहोत आम्ही सगळे. सहलीला आमच्या.............. (क) आमच्या लाडक्या मोघेबाई येणार आहेत. त्या खूप प्रेमळ आहेत, म्हणून आमच्या पालकां.............. (ख) सगळेच आनंदात आहेत. आम्ही सगळे सर्व तयारी.............. (ग) सहलीला जाणार आहोत. कोणी कोणते खेळ आणायचे, कोणी गाणी ऐकायला पेन-ड्राइव्ह आणायचा, कोणी खेळात हरलेल्यांसाठी लुटुपुटुच्या शिक्षा बनवायच्या, सगळं सगळं ठरलंय आमचं. शाळेनं तीस लोक बसतील अशी बस ठरवली आहे. आम्ही पंचवीस विद्यार्थी आहोत. आमच्या बाई त्यांच्या दोन मुलां.............. (घ) येणार आहेत. शाळेचा गडी दशरथ त्याच्या.............. (च) त्याच्या बायकोला आणणार आहे, कारण तिनं म्हणे 'तुमच्या.............. (छ) मी येणारच' असा हट्ट धरलाय. म्हणजे झाले की तीस लोक! आमच्या सामाना.............. (ज) आम्ही त्या बसमध्ये मावू की नाही, हे कळत नाही, कारण प्रत्येक विद्यार्थ्या.............. (झ) त्याची एक बॅग, एक पाण्याची बाटली, खाऊचा डबा आणि एक छोटी थैली असणारच. बघू या कसं जमतंय ते!

आम्ही सर्व विद्यार्थी मोठ्या उत्साहाने ह्या सहलीला निघालोय. एव्हढ्याच किंवा ह्याहून जास्त उत्साहाने आणि आनंदाने आम्ही परत येऊ, तेव्हा आमच्या सहलीतील गमती आणि मजा ऐकायला या हं तुम्ही सगळे!

> **शब्दक्षेत्र** : शब्द सहसा एकटे नसतात. जेव्हा एखाद्या शब्दाचा आपण विचार करतो, तेव्हा समान अर्थाचे किंवा त्या शब्दापासून तयार झालेले, इतकेच नव्हे, तर त्या शब्दाच्या आजूबाजूचे, त्याच्याशी जवळचा आणि लांबचाही संबंध असणारे अनेक शब्द, अनेक कल्पना, अनेक वाक्प्रचार, दृश्ये, वस्तू वगैरे आपल्याला आठवतात. एक प्रकारे शब्दाचे सख्खे आणि दूरचे नातेवाईक, मित्र, शेजारीपाजारी यांचा तो मोठा परिवारच असतो. यालाच शब्दक्षेत्र म्हणायचे.

## ६ असाही एक अनोखा उत्सव


**क. खालील उताऱ्यात 'उत्सव' ह्या शब्दाचे शब्दक्षेत्र आपल्याला शोधायचे आहे. ह्या शब्दाशी संबंधित सर्व शब्द अधोरेखित करा.**



ह्यावेळी मी अमेरिकेत असताना एका अनोख्या आणि आनंददायी उत्सवात सहभागी होण्याचा योग आला. आम्ही तिथे पोचल्यावर दुसऱ्याच दिवशी माझ्या मुलीच्या मैत्रिणीचं डोहाळेजेवण होतं – तिथल्या भाषेत 'बेबी शॉवर' होता. बेबी शॉवरमध्ये डोहाळतुलीच्या आवडीचं जेवण, मित्रमंडळी आणि नातेवाइकांबरोबर गप्पा, थोडे मजेचे खेळ, नाच-गाणी असा आनंदसोहळा

साजरा केला जातो. त्यानंतर सर्व मंडळी आहेर करतात. ह्यात बहुधा लहान बाळाला लागणारे कपडे व अन्य वस्तू असतात. म्हणजे येणाऱ्या बाळाच्या आगमनाची आणि स्वागताची तयारी होते. ह्या वेळी समारंभाला निघण्यापूर्वी माझी मुलगी मला म्हणाली, “आई, तुला काय वाटतं, श्वेताला काय होईल, मुलगा की मुलगी? अगं, त्यांनी सांगितलंय, तुम्ही अंदाज करा, आणि जर तुम्हाला मुलगी होणार असं वाटत असेल तर गुलाबी रंगाचे कपडे, मुलगा होणार असं वाटत असेल तर निळ्या रंगाचे कपडे घालून या”.

आम्ही सर्व जण त्याप्रमाणे तयार होऊन तिथे गेलो. संपूर्ण हॉल गुलाबी आणि निळ्या रंगांच्या विविध छटांनी भरून गेला होता. हास्य-विनोदाची कारंजी उडत होती. सर्व मंडळी आपापल्या अंदाजाप्रमाणे निळ्या किंवा गुलाबी रंगाचे कपडे घालून आली होती आणि आपल्यासारखेच कपडे घातलेल्यांबरोबर फोटो काढून घेण्यात रंगली होती. सगळीकडून एकमेकांचे कपडे पाहून “अरे, तुमचा अंदाज मुलगा का? काय, तुम्ही मुलीच्या बाजूचे दिसताय!” असे उद्‌गार ऐकू येत होते. माझी मुलगी मला म्हणाली “आई, इथे गर्भलिंगनिदान आधीच होतं, माहितेय ना तुला? ह्यांना आधीच कळलंय, त्यांना काय होणार आहे ते. आज ह्या समारंभात ते हे गुपित फोडणार आहेत.” सर्वांची उत्सुकता आता ताणली गेली होती. आपला अंदाज खरा ठरतोय का, हे बघण्याची सर्वांनाच घाई झाली होती. मुलगा किंवा मुलगी, अलीकडच्या काळात दोन्हीही सारखंच असलं, तरी हे कळण्यात गंमत असतेच की! आपल्याकडे नाही का, एका वाटीत स्त्रीलिंगी खीर आणि एका वाटीत लाडू किंवा असाच एखादा गोड पुल्लिंगी पदार्थ घालून त्या वाट्या झाकून डोहाळतुलीपुढे ठेवतात. ती जी वाटी उघडेल, त्यात जो पदार्थ असेल त्यावरून मुलगा का मुलगी ह्याचा अंदाज बांधतात. मजाच की ती पण!



इतक्यात रंजन – होणाऱ्या बाळाचा बाबा – एक ट्रॉली ढकलत घेऊन आला. त्यावर एक मोठा रंगीबेरंगी पुठ्ठ्याचा डबा होता. सर्व मित्रमंडळींनी आता मोठ्यानं टाळ्या वाजवायला सुरवात केली. ‘आम्हाला मुलगी हवी’, ‘आम्हाला मुलगा हवा’ अशा घोषणाही ऐकायला आल्या. श्वेता आणि रंजननं एकत्रच डब्याची कळ दाबली. डबा एकदम उघडला आणि निळ्या रंगाचे फुगेच फुगे हवेत उडाले. टाळ्यांचा कडकडाट झाला. ‘मुलगा, मुलगा’ अशा घोषणा झाल्या. येणाऱ्या बाळाचं स्वागत करण्याची ही नवी आणि अनोखी रीत माझ्या मनाला भावली. आपल्याकडे गर्भलिंगनिदान जरूर असल्याखेरीज करत नाहीत, आणि केलं तरी निदान काय आहे, हे आधी सांगत नाहीत. त्यामुळे अशा प्रकारचा समारंभ आपल्याकडे होत नाही. पण बदललेल्या सामाजिक परिस्थितीत माणसाचा उत्सवप्रिय स्वभाव समारंभ साजरे करण्याची अशी नवनवी कारणे शोधून काढतोय हे पाहून मला खरंच कौतुक वाटलं. आपल्या आगमनाचा असा स्वागतसोहळा पोटातल्या त्या बाळालापण नक्कीच आवडला असेल!

**टीप :**

**समारंभ :** जास्त औपचारिक + अनौपचारिक

**सोहळा :** जास्त अनौपचारिक + औपचारिक

**ख. आपण अधोरेखित केलेले शब्द आणि वर्गातील आपल्या सहाध्यायांनी अधोरेखित केलेले शब्द पाहा आणि चर्चा करा.**

**ग. योग्य पर्याय वापरून रिकाम्या जागा भरा.**




(रौप्य महोत्सव, कार्याला, अमृत महोत्सव, सुवर्णमहोत्सव, षष्ट्यब्दिपूर्ती महोत्सव, लग्नकार्य)

अ. ------------------------ एखाद्या व्यक्तीची किंवा संस्थेची पंचविशी साजरी करण्यासाठी आयोजित केला जातो.

आ. आमच्या मुलीसाठी स्थळं पाहणं चालू आहे. कदाचित यंदा आमच्याकडे ---------------------- पार पडेल.

इ. ------------------------------------- एखाद्या व्यक्तीची पन्नाशी साजरी करण्यासाठी ठरवला जातो.

ई. गेल्या आठवड्यात माझे आजोबा वारले. त्यांच्या ---------------------- मी गावी गेलो होतो.

उ. ---------------------- एखाद्या व्यक्तीची किंवा संस्थेची साठ वर्षे पूर्ण झाल्यानंतर आयोजित केला जातो.

**घ. घुसखोर शब्दावर खूण करा.**

अ. वारले – गेले – मेले – आले – निवर्तले

आ. क्रियाकर्म – कर्तव्य – लग्न – कार्य

इ. जीवन – मनुष्य – आयुष्य – जगणे

ई. मृत्यू – मरण – निधन – निर्धन – स्वर्गवास

उ. सोहळा – कोहळा – उत्सव – समारंभ

ऊ. टिंगलटवाळी करणे – खूण करणे – चेष्टा करणे – खोड्या काढणे

ए. आवडणे – भावणे – गमणे – चावणे

ॲ. फसवणे – शाळा करणे – लबाडी करणे – दांडी मारणे

**च. डाव्या रकान्यात दिलेले शब्द वाचा.**

हे सण, उत्सव, समारंभ, महोत्सव, सोहळा, कार्यक्रम ह्यांपैकी काय आहेत?

तसेच हे साजरे केले जातात की आयोजित केले जातात?

त्यापुढील रकान्यात उदाहरणाप्रमाणे लिहा.

| | प्रसंग | सण / उत्सव / समारंभ / महोत्सव / सोहळा / कार्यक्रम | आयोजित करणे / साजरा करणे |
|---|---|---|---|
| उदा. | दिवाळी | सण | साजरा करणे |
| अ. | चित्रपट | | |
| आ. | होळी | | |

| | | | |
|---|---|---|---|
| इ. | परिषद | | |
| ई. | बक्षीस | | |
| उ. | ईद | | |
| ऊ. | कार्यशाळा | | |
| ए. | नाताळ | | |
| ॲ. | चर्चासत्र | | |
| ऐ. | व्याख्यान | | |
| ओ. | वाढदिवस | | |
| ऑ. | संगीत | | |
| औ. | सुवर्ण | | |

**च. वरील उताऱ्यात नसलेले, पण 'उत्सव' ह्या शब्दाच्या शब्दक्षेत्रात येणारे इतरही अनेक शब्द असतील. तुम्हाला जे शब्द आठवतील त्यांची यादी करून वर्गात सांगा.**

**छ. आता तुम्हाला जेव्हा एखाद्या सणाचे / उत्सवाचे / समारंभाचे वर्णन करायचे असेल तेव्हा तुमची शब्दसंपदा किती वाढली आहे, हे तुमच्या लक्षात येईल. एखाद्या उत्सवाचे लेखी वर्णन करून वर्गात वाचून दाखवा.**

## ७ संधी

**क. पुढील शब्दांचे संधी सोडवा.**

अ. निस्तेज = ---------- + ----------

आ. तेज:पुंज = ---------- + ----------

इ. निष्फळ = ---------- + ----------

**ख. पुढील शब्दांचे संधी करा.**

अ. नि: + काम = ----------

आ. अध: + पतन = ----------

इ. नि: + चल = ----------



## ८ नाम + क्रियापद जोड्या

**क. जोड्या लावा**

| | नाम + क्रियापद | | अर्थ |
|---|---|---|---|
| | दातखीळ बसणे | उदा० | भीतीमुळे तोंड न उघडणे |
| अ. | आव आणणे | १. | कोणत्याही गोष्टीला आवश्यकतेपेक्षा जास्त महत्त्व देणे |
| आ. | थरकाप उडणे | २. | वाघ-सिंहाचे भीतिदायक ओरडणे |
| इ. | स्तोम माजवणे | ३. | भीतीने थरथरणे |
| ई. | खुशीच्या उकळ्या फुटणे | ४. | नवीन गोष्टीचे कौतुक वाटणे |
| उ. | अप्रूप वाटणे | ५. | एखादी गोष्ट मिळवण्यासाठी गोड बोलणे |
| ऊ. | डरकाळी फोडणे | ६. | पळून जाणे |
| ए. | धूम ठोकणे | ७. | विश्वास वाटणे |
| ॲ. | लाडीगोडी लावणे | ८. | काही हवे असल्याची इच्छा व्यक्त करणे |
| ऐ. | मागणी करणे | ९. | खूप आनंद होणे |
| ओ. | खात्री पटणे | १०. | नसलेली गोष्ट असल्याचा भास उत्पन्न करणे |

**ख. वरील नाम + क्रियापद जोड्या योग्य त्या वाक्यात योग्य रूपात वापरून वाक्ये पूर्ण करा.**

अ. माझ्या निकालपत्रात मी नापास झाल्याचे पाहून बाबांनी जो रुद्रावतार धारण केला तो पाहून माझी तर ---------- ----------.

आ. आजी आजोबांच्या नसलेल्या आजाराचे उगाच नसते ---------- ----------. आजोबा आपल्याला ते आवडत नसल्याचा ---------- ----------, पण मनातून त्यांना ---------- ---------- ---------- असतात.


इ. मधुरा इतकी घाबरट आहे! सिनेमातल्या वाघाने ---------- ---------- तरी भीतीने तिचा ---------- ----------.

ई. मावशी सारखी परदेशवारी करायची. तिने येताना आणलेल्या भेटवस्तूंचे आम्हाला मोठे ---------- ----------.

उ. क्रिकेट खेळताना बॉल लागून भावेकाकूंच्या खिडकीची काच फुटली, तशी बॅट आणि स्टंप तसेच टाकून आम्ही ---------- ----------.

ऊ. चिंगी सकाळपासून आईला इतकी ---------- ---------- होती, की आता ती लवकरच कशाची तरी ---------- ---------- अशी आईची ---------- ---------- होती.

ग. वर्तुळातील क्रियापदाला उदाहरणाप्रमाणे योग्य ते नाम किंवा इतर शब्द द्या.




घ. आता वरील सर्व जोड्या वापरून वाक्ये बनवा.

## ९ संक्षिप्त रूपे

**पुढे काही शब्द त्यांच्या संक्षिप्त रूपात दिले आहेत. त्यांचे पूर्ण रूप ओळखून ते त्यापुढे लिहा.**

| | |
|---|---|
| अ. पं. ............ | ॲ. ता. क. ............ |
| आ. दै. ............ | ऐ. मा. ............ |
| इ. उ. ............ | ओ. प्र. भू. ............ |
| ई. डॉ. ............ | ऑ. चि. सौ. कां. ............ |
| उ. दि. ............ | औ. क. लो. अ. ............ |
| ऊ. आ. ............ | अं. स. न. वि. वि. ............ |
| ए. कै. ............ | अः. उदा. ............ |

## १० चला, वाचा.

**पानझड**

मातीच्या कुशींतून डोकावणारे
लुसलुशीत हिरवें
पाहून पातें
पानांना येते
कोंवळी चाहूल
चैत्राच्या येण्याची अन्...

आधार सोडून
फांद्यांचा तीं
झेपावतात
धरणीवरती
कराया साजरा
नव्याचा सोहळा...



नि
कुठेंतरी कुणी
एखादा म्हातारा
म्हणतो:

पहा हा
आला हिंवाळा
गळूं लागला
पानांचा पाचोळा...

- सदानंद रेगे

**क. कंसातील शब्द वापरून रिकाम्या जागा भरा.**

(लुसलुशीत, झेपावले, कुशीत, चाहूल, पाचोळा, कोवळ्या)

अ. वाळक्या पानांचा केवढा ------------- साचलाय बागेत ! माळ्याला उचलायला सांगितलं पाहिजे.



आ. एक वर्षाची निया भारी लाजरी आहे. कुणी नवं माणूस दिसलं, की शिरलीच आईच्या ------------------------.

इ. पावसाळ्यात गावातल्या माळावर सगळीकडे कोवळे -------------------- गवत उगवते. मग काय, सगळ्या शेळ्या-बकऱ्यांची चंगळच होते.

ई. वाळक्या गवतात सळसळणाऱ्या सापाची -------------------- लागताच जमिनीवर विसावलेले पक्षी क्षणार्धात आकाशाकडे --------------------.


उ. सकाळच्या -------------------- उन्हात बसणे प्रकृतीला चांगले असते.

## ११ वाक्प्रचार

**डाव्या रकान्यात काही वाक्ये दिली आहेत आणि उजव्या रकान्यात काही वाक्प्रचार दिले आहेत.**

**क. आधी कोणत्या वाक्यात कोणता वाक्प्रचार योग्य ठरेल ते ओळखून जोड्या लावा.**

**ख. नंतर तुम्हाला योग्य वाटलेला वाक्प्रचार योग्य प्रकारे वापरून वाक्ये पूर्ण करा.**



| | | | |
|---|---|---|---|
| अ. | दरवाजाच्या लॅचमध्ये किल्ली घातल्याचा आवाज आला आणि भीतीने माझी --------------------------------------------. | १. | जीभ लुळी पडणे |
| आ. | "नानू!" सावकार गरजले, "इतके दिवस फुटाण्यासारखं तडातडा बोलत होतास, मग आता का तुझी ---------------------------------------- ---------------------------------. | २. | जीभ सोकावणे |
| इ. | आपण बोलू नये ते बोलून गेलो, हे लक्षात येताच महेशने -------- -----------------------------------------. | ३. | जीभ विटाळणे |
| ई. | "शारंग, मला तुझा राग कळतो. पण तरीही, तू सुसंस्कृत माणूस आहेस. दुसऱ्याबद्दल वाईटसाईट बोलून कशाला आपली -------- ------------------------------------------------. | ४. | जीभ आवरणे |

| | | | |
|---|---|---|---|
| उ. | रुक्मिणीच्या हातून जरा इकडेतिकडे होण्याचा अवकाश; लगेच खाष्ट नणंदबाईंची .................................................. . | ५. | जीभ झडणे |
| ऊ. | कष्टाशिवाय चांगलेचुंगले खायला मिळत गेले, की पुढे .................................................. आणि तो आपला हक्कच आहे असे वाटू लागते. | ६. | जीभ टाळ्याला चिकटणे |
| ए. | "मनोहर, आधी ..................................................! कोणाशी बोलतो आहेस याचं काही भान आहे की नाही?" | ७. | जीभ सैल सुटणे |
| ॲ. | "महाराज, देवाशपथ मी खरं सांगतो आहे. खोटं बोलेन तर माझी ..................................................". | ८. | जीभ चावणे |

**१२. जोडशब्द**

**चित्रे, जोडशब्द आणि नामे ह्यांच्या जोड्या लावून अर्थपूर्ण वाक्ये बनवा.**

क

ख

ग

घ

च

छ

ज

झ


गोरागोमटा, वेडावाकडा, पांढराशुभ्र, हलकाफुलका, काळानिळा, पिवळाजर्द, निम्माशिम्मा, हिरवेगार

साप, बाळ, गुडघा, पिझ्झा, दात, आहार, रस्ता, झाडी

अ. ..................................................

आ. ..................................................

इ. ..................................................

ई. ..................................................

उ. ..................................................

ऊ. ..................................................

ए. ..................................................

ॲ. ..................................................

# तोंडी परीक्षा

एकूण २० गुण

## १. संभाषणकौशल्य (१०)

**क. पुढीलपैकी कोणतेही दोन म्हणी निवडा, निवडलेले वाक्प्रचार / म्हणी वापरून एक प्रसंग रंगवा व सादर करा. (तयारीसाठी ५ मि॰ कालावधी मिळेल.)**

घर डोक्यावर घेणे

बिनपाण्याची हजामत करणे

शिंग फुटणे

शेण खाणे

डोके फिरणे

कोणाला तरी धारेवर धरणे

## २. वादविवाद (१०)

**क. तुम्हाला काय वाटतं? कोणतेही एक वाक्य निवडून उदाहरणांसहित आपली बाजू पटवून द्या.**

अ. आपली संस्कृती टिकावी म्हणून सण-समारंभ पारंपरिक पद्धतीनेच साजरे झाले पाहिजेत.

आ. प्रस्थापित सण साजरे करण्यापेक्षा काही नवे सण नव्या पद्धतीने साजरे केले पाहिजेत.

इ. प्रमाण मराठी भाषा शिकताना बोलींचाही अभ्यास करायला हवा.

ई. महाराष्ट्रात राहण्यासाठी मराठी भाषा आलीच पाहिजे.



# लेखी परीक्षा

### एकूण गुण ३०

## १. वाचन व आकलन (८)

**क. खालील उतारा वाचा आणि पुढील प्रश्नांची उत्तरे द्या.**

सामान्यतः जगातील सर्वच मुले बोबडे बोलतात. म्हणजे त्यांना र, ट, ठ, ह, ळ वगैरे व्यंजने उच्चारणे कठीण वाटते. त्यामुळे 'र' चा ल, 'ट' चा त, 'ह' चा अ होतो. मराठी मुलेही बोबडे बोलताना हेच करतात. एरवी कठोर वाटणारी मराठी ह्या पिल्लांच्या तोंडून आली, की कशी मऊसूत आणि लोभस वाटते. अनेकदा पाहुण्यांसाठी घरातल्या मोठ्यांना तिचे भाषांतर करावे लागते.

'माऽ फुलपातलू पाद्यं!' ह्याचे 'मला फुलपाखरू पहायचंय' किंवा 'लंद तोनानी दीला?' ह्या प्रश्नाचे 'रंग कोणी दिला?' हे भाषांतर ऐकून पाहुण्यांचा चेहेरा नकळत बावळट दिसू लागतो. प्रश्नाचे उत्तर 'काकांनी' असे असेल, तर प्रश्नही 'तोनानी' (कोणानी) असा येणे स्वाभाविकच असते. शिवाय, मुलागणिक भाषा बदलते. बालभाषेच्या उच्चारणाचे रूढ नियम उलटे करत एखादे पोरटे ओ 'शर, पेन्सिर खारी पडरी!' किंवा 'मुरगा नागरा झारा!' अशी तक्रार करून प्रौढांची सहज फिरकी घेते.



स्त्रियांची भाषा हे आणखीच वेगळे प्रकरण आहे. जगाचे माहीत नाही, पण भारतात दोन-तीन पिढ्यांपूर्वी स्त्रियांची जाणवण्याइतकी वेगळी भाषा ऐकू येत असे. त्यामागील कारणे अर्थातच भारतीय समाजरचनेत आहेत. घरात स्त्रियांना दुय्यम स्थान असणे आणि घराबाहेर तर स्थानच नसणे; अंधाऱ्या माजघराच्या आणि स्वयंपाकघराच्या पलीकडील जगाशी त्यांचा संबंध येऊ न देणे; त्यांना शिक्षण नाकारणे इत्यादी कारणांमुळे स्त्रियांची वेगळी आणि मर्यादित भाषा तयार झाली होती. 'अय्या', 'इश्श', 'अगोबाई', 'गडे', 'कित्ती कित्ती', 'मला मेलीला ...', 'असं काय करायचं ते!' अशासारखे खास बायकी उद्गार परंपरेने चालत आलेल्या बायकी ढंगानेच उच्चारायचे असतात. ते न वापरणारी बाई पुरुषी, उद्धट, आगाऊ समजली जाई.

काळ पुढे सरकला. बाई दिवाणखान्यात, दिवाणखान्यातून दरवाजाबाहेर आली. आज ती बायकी भाषा आणि बोलण्याचा ढंग सहसा ऐकूही येत नाही.

**अ. हे खरे आहे का?** **हो – नाही** **(३)**

१. लहान मुले बोलतात ती मराठीही मोठ्यांइतकीच कठोर असते.

२. जगात फक्त मराठी मुले बोबडे बोलतात.

३. मुलांचे बोबडे उच्चार समजायला सोपे नसतात.

**आ. पुढील वाक्यांचे प्रौढांच्या मराठीत भाषांतर करून लिहा.** **(२)**

१. शर, पेन्सिर खारी पडरी.

२. मुरगा नागरा झारा.

**इ. मराठी शिकताना सुरुवातीच्या काळात तुम्हीही काही चुकीचे उच्चार केले होते का? कोणते ते आठवून सांगा.**

**किंवा**

**ई. स्त्रियांची विशिष्ट भाषा तयार होण्यामागची कोणती कारणे उताऱ्यात दिली आहेत?** **(३)**

## २. व्याकरण (एकूण १२ गुण)

**क. रिकाम्या जागी योग्य क्रियापद वापरा.** **(४)**

अ. इतर कोणी मार्ग ------------------------------ या आशेत राहण्यापेक्षा आपण आपला मार्ग ------------------------------ बरा.

आ. आपण केलेल्या पराक्रमांमुळे आता आपली घरी चांगलीच वाट ------------------------------ या भीतीने शिऱ्या वाट ------------------------------ तिकडे धावत सुटला.

इ. ॲ हॅ... तुझ्यासारखी नाहीये हां संजू वेळ ------------------------------ परिस्थितीचा फायदा घेणारी. योग्य वेळ ------------------------------ की काढेलच ती हा विषय.

ई. जरा दम ------------------------------ का तू, जया. खरी परिस्थिती जाणून घेतल्याशिवाय का उगीच दम ------------------------------ छोट्या सुहानीला?

**ख. कंसातील सूचनांप्रमाणे खालील प्रश्न सोडवा.** **(६)**

अ. अशी कठीण परिस्थितीही अभिषेकने शांत डोक्याने ------------------------------. (हात या नामापासून तयार होणारे क्रियापद योग्य रूपात वापरा.)

आ. कधी अंगणात मंद संगीत लावून पाहा. ज्याप्रमाणे आपण संगीताचा आनंद लुटतो त्याप्रमाणेच ही झाडे, झुडुपे संगीताचा आस्वाद घेतात. ('सह' हे अव्यय योग्य ठिकाणी वापरून वाक्य पुन्हा लिहा.)

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

इ. सोहळा – कोहळा – उत्सव – समारंभ (घुसखोर शब्दावर खूण करा.)

ई. खूप पिवळा म्हणजे ------------------------------ (रिकाम्या जागी योग्य ते विशेषण वापरून त्यापासून एक अर्थपूर्ण वाक्य बनवा.)

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

उ. किती हा ........................................................................! दिवाळी आहे का? ('लखलखणे' या क्रियापदापासून बनणारे नाम लिहा.)

ऊ. सारखं काय गं <u>अडवतेस</u> त्याला! एखाद्याची इतकी ................................................ करणे चांगले नाही. (अधोरेखित क्रियापदापासून बनणारे नाम रिकाम्या जागी लिहा.)

**ग. पुढील शब्दांचे संधी सोडवा.** **(१)**

अ. दुष्प्राप्य = ................................ + ................................

आ. निष्फळ = ................................ + ................................

**घ. पुढील शब्दांचे संधी करा.** **(१)**

अ. अध: + पतन = ................................................................

आ. सम् + चलन = ................................................................

## ३. लेखन (एकूण १० गुण)

**क. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर १०-१५ ओळी लिहा.**

अ. तुमचा मराठी शिकतानाचा प्रवास तुमच्या शब्दांत मांडा. (मराठी सुरुवातीस सोपी वाटली की कठीण, मराठी शिकताना आलेले मजेशीर अनुभव, लक्षात राहिलेला खेळ / चित्रफीत / गाणे / कविता इ॰)


**किंवा**

आ. तुमच्या आवडत्या सणावर १०-१५ ओळी लिहा. (कोणता सण, कुठे, कधी, कसा साजरा केला जातो इ॰)



७

# मन मनास उमगत नाही










चला, शिकू या ...

- विविध भावना - मनाच्या अवस्था व्यक्त करणे
- ‘हो’चा वापर करणे


## १ मानवी भावना

**क. पुढे काही चित्रांचे अंश दिले आहेत. चित्रांतील व्यक्तींची मनःस्थिती ओळखा.**

अ. तुमच्या मते या मनःस्थितीमागे कारण काय असावे?



आ. आता संपूर्ण चित्रे पाहा. तुम्ही ओळखलेली कारणे आणि चित्रांत दिसणारी दृश्ये परस्परांशी जुळतात का?



**इ. कंसातील योग्य शब्द वापरून खालील उताऱ्यातील रिकाम्या जागा भरा.**

(भक्तिभाव, तर्कसंगत, सूड, गूढ, प्रेम, जटिल, द्वेष, व्यक्त, भावना, अन्याय, द्वेषभावना, प्रगती, दुबळा, राग, भावना, अपमान, वेदना, आनंदीआनंद)

माणूस हा मोठा (१) ---------- प्राणी आहे. शरीराने (२) ----------, परंतु डोक्याने सर्वशक्तिमान. बुद्धी, विचार, स्मृती, कल्पना अशा आयुधांच्या जोरावर सारी पृथ्वी आपल्या मुठीत ठेवणारा. त्याला (३) ---------- विचार करता येतो; तो (४) ---------- करण्याची माध्यमेही त्याने विकसित केली आहेत. त्यांच्याच बळावर त्याने एवढी (५) ---------- साधली आहे. पण तरीही, 'भावना' ह्या मुद्द्यापाशी आल्यावर मात्र तो बऱ्याचदा लटपटतो. (६) ---------- असो, माया असो, (७) ---------- किंवा स्नेहभाव असो की (८) ----------, तिरस्कार व (९) ---------- असो; एकंदरीतच (१०) ---------- हे प्रकरण कसे हाताळावे हे समजून



घेण्याची खटपट करण्यातच बहुतेकांचे आयुष्य संपून जाते.

त्यातही राग, तिरस्कार, द्वेष ह्या जरा जास्तच (११) ---------------- भावना आहेत. एकदा का त्या माणसाच्या मानगुटीवर बसल्या, की सहजासहजी उतरत नाहीत. कधी (१२) ---------------- झाला म्हणून, कधी (१३) ---------------- झाला म्हणून माणसे दुखावतात खरी; पण त्या दु:खावर मात करण्याऐवजी वारंवार त्या जखमेवरची खपली काढून ती ओली, भळभळती ठेवण्याकडे, आठवून आठवून (१४) ---------------- पुन्हा पुन्हा अनुभवण्याकडे माणसाचा कल असतो. त्यातून जन्म घेते द्वेषभावना आणि (१५) ---------------- घेण्याची तीव्र इच्छा. विषासारखी ती मनात भिनत जाते. असे पिढ्यांमागून पिढ्यांचे शतकानुशतके चालू राहते. समजा, कुणाला सूड घेता आलाच, तर त्यामुळे प्रश्न मिटला आणि सर्वत्र (१६) ---------------- होऊन माणसे सुखाने राहू लागल्याचे दाखले इतिहासात क्वचितच सापडतील. कारण विषाच्या वेलीची मुळे दूरवर पसरलेली असतात.

प्रश्न असा पडतो, की कुणाचा तरी किंवा कशाचा तरी (१७) ---------------- करत राहणे ही मानवाची – व्यक्ती म्हणून किंवा समूह म्हणून – गरजच आहे की काय? अन्यथा, आयुष्यात आलेल्या अनेक चांगल्या अनुभवांपेक्षा मोजक्या वाईट अनुभवांच्याच आठवणी मरेपर्यंत उगाळत बसावे असे त्याला का वाटत असेल?

**राग**

- राग, संताप, क्रोध, कोप
- रागावणे, संतापणे, क्रोध येणे, चिडणे, भडकणे
- रागीट, संतापी, संतप्त, तापट, क्रोधिष्ट, भडक डोक्याचा / डोक्याची, भडक माथ्याचा / माथ्याची
- राग – संताप – क्रोध उफाळून येणे / रागाचा – संतापाचा भडका उडणे / पारा चढणे – उतरणे / एखाद्यावर राग असणे / एखाद्या गोष्टीचा राग असणे / रागाने – कपाळावरची शीर उडू लागणे / मुठी वळणे / दातओठ खाणे / डोळ्यांत रक्त उतरणे / कापणे / थरथरणे
- रागाच्या भरात... / रागाचा भर ओसरणे / रागाचे चटके बसणे / राग अनावर होणे / राग आवरणे – मनात ठेवणे – धरून ठेवणे / डोके सटकणे / राग थंड / शांत होणे
- मन थाऱ्यावर नसणे, मन सैरभैर होणे, चंचल मन

**ई. पुढे वाक्यांचा उत्तरार्ध दिलेला आहे. त्याचे कारण लिहून वाक्य पूर्ण करा.**

१. ----------------------------------------------------------------

की मला फार राग येतो.

२. ----------------------------------------------------------------

की मला फार आनंद होतो.

३. ----------------------------------------------------------------

की मला फार त्रास होतो.

४. ---------------------------------------------------------------------------
की माझी फार चिडचिड होते.

५. ---------------------------------------------------------------------------
की मला फार बरं वाटतं.

६. ---------------------------------------------------------------------------
की मला फार कंटाळा येतो.

७. ---------------------------------------------------------------------------
की मला फार वाईट वाटतं.

८. ---------------------------------------------------------------------------
की माझा उत्साह वाढतो.

९. ---------------------------------------------------------------------------
की मला फार भीती वाटते.

१०. ---------------------------------------------------------------------------
की मला फार शांत वाटतं.

११. ---------------------------------------------------------------------------
की मला फार अशांत वाटतं.

१२. ---------------------------------------------------------------------------
की मला फार अस्वस्थ वाटतं.

१३. ---------------------------------------------------------------------------
की मला फार उदास वाटतं.

**उ. खालील शब्दांचा वाक्यात उपयोग करून लिहा.**

उदा॰ **आकर्षण वाटणे – रस नसणे**
मला हिमालयाचं आकर्षण वाटतं, पण त्यासाठी प्रवास करण्यात मला रस नाही.

१. **मत्सर वाटणे – कौतुक वाटणे**
---------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------

२. **लोभ असणे – उदासीन असणे**
---------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------

३. **ईर्ष्या असणे – तटस्थ असणे**
---------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------

४. **घमेंड असणे – नम्र असणे**
---------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------

५. **कळकळ वाटणे – बेपर्वा असणे**
---------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------

६. लाज वाटणे – अभिमान असणे

---

७. कुतूहल वाटणे – मख्ख असणे

---

८. निवांत असणे – बेचैन असणे

---

९. आततायी असणे – समंजस असणे

---

१०. संतापी असणे – प्रेमळ असणे

---

ऊ. खालील शब्दांपासून आणखी शब्द (नाम, क्रियापद, विशेषण) तयार करा.

उदा॰ आकर्षण : आकर्षणे, आकर्षक, आकर्षित

१. कोप : ---

२. प्रेम : ---

३. लोभ : ---

४. उदासीनता : ---

५. आनंद : ---

६. राग : ---

७. क्रोध : ---

८. गोड : ---

९. स्थिर : ---

१०. अभिमानी : ---

११. आग्रह : ---

१२. तडफड : ---


१३. हाव : ---

१४. हट्ट : ---

१५. इच्छा : ---

१६. लाज : ---

## २ रंग भावनांचा




**क. सगळ्याच भावनांचा अनुभव आपण कधी ना कधी घेत असतो. त्यातले काहीच अनुभव लक्षात राहतात. उदाहरणार्थ आततायीपणा, वेंधळेपणा, धांदरटपणा, संकोच, अपराधीपणा / अपराधभाव इ॰. यातील कोणत्या भावनेचा अनुभव तुमच्या सगळ्यात जास्त लक्षात राहिलेला आहे? तो अनुभव लिहा.**

-----------------------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**ख. खालील यादीत दिलेल्या भावना व प्रतिक्रिया यांचे उदाहरणाप्रमाणे वर्गीकरण करू या.**



कोप – आकर्षण – मोह – प्रेम – चिडचिड – लोभ – आरडाओरडा – उदासीनता – आनंद – राग – क्रोध – मत्सर – कुत्सितपणा – गोडवा – आपुलकी – स्थैर्य – अभिमान – गर्व – तटस्थपणा – उत्साह – झिंग – रागराग – अस्वस्थता – स्वस्थता – आराम – निवांतपणा – पेच – कुतूहल – आग्रह – कौतुक – अशांतता – द्वेष – ईर्ष्या – जळफळाट – घमेंड – अहंकार – वासना – काम – लालचीपणा – आततायीपणा – हट्ट – इच्छा – आकांक्षा – महत्त्वाकांक्षा – भीती – कळकळ – ओढ – जागरूकता – लाज

| सकारात्मक | तटस्थ | नकारात्मक |
|---|---|---|
| उदा॰ आकर्षण, ... | | |

## ३ लळा-जिव्हाळा (भाग २)

मास्तर परत फिरले होते. मी टेकडी उतरून खाली आलो तेव्हा तानीमावशी येताना दिसली. "आज काय करून बसलास? डोळ्यात गंगाजमुना दिसतात."
मी तिचा हात पकडला व मोठ्याने हसलो. "हे तसलं काही नाही, निराळं आहे. ती एक माझी गंमत आहे."

येताना मी तानीमावशीवर काय काय लिहावे हे आठवत होतो : मागचा भात स्वतःच कालवून खाताना तितकासा बरा लागायचा नाही, पण तोच भात तानीमावशीने कालवून त्यात लोणच्याचा खार घातला की तो सारा संपून आणखी भूक राहत असे. मला रामरक्षा येते, पण तिच्यासारखी नाही; एरंडाची नळी घालून केलेले तिचे साबणाचे फुगे माझ्यापेक्षा मोठे होतात. श्रीपुमामाला सांगून तिच्यासाठी वहाणा आणायला हव्यात, नाहीतर वाळूचे कण तिच्या टाचांत जातात व मग ती सुई घेऊन रात्रभर टाच कोरत बसते. तिला एक खुरपेदेखील हवे. आता ती एक मोडकी पळी घेऊन सीताफळाच्या झाडाभोवती उकरते व घागरभर पाणी ओतते. तिला निळे लुगडे छान दिसते; पण ते आता फार विटले आहे. मी मोठा झाल्यावर पैसे मिळवू लागल्यावर तसले नवे झगमगीत चमकणारे लुगडे तिला घेऊन देणार आहे. तिला कधीतरी पंढरपूरला जाऊन यायचे आहे, त्यासाठीदेखील मी तिला पैसे पाठवीन. पण तिला अद्याप गलोलाने दगड मारता येत नाहीत आणि शाईने लिहिताना तिच्या बोटांना फार शाई लागते.

तानीमावशीने मला एकदम ढोसताच मी भानावर आलो.

"कुठं लक्ष आहे रे मडक्या तुझं?" तिने हसत विचारले, "बघितलास नव्हे?"

"काय बघितलास?" मी उत्सुकतेने विचारले.



"काय म्हणजे, माकडाचं लग्न!" ती म्हणाली, "आता कसा मैलभर पिसारा असलेला मोर गेला समोरच्या बांधावरून."

"मोर मलाच का दिसत नाही?" मी रागाने विचारले.

ती पुन्हा हसून म्हणाली, "अरे, मोर कुणाला केव्हा दिसावा याबद्दल काही न्याय आहे होय? दिसला तर तो दुसऱ्याला दाखवावा, नाही दिसला तर तक्रार करू नये."

परंतु मोर रतनला दिसतो, तानीमावशीला दिसतो, पण मला मात्र तो दिसत नाही याचा माझा राग कमी झाला नाही. मी मोर पाहिले आहेत असे सगळ्यांना सांगायला मला फार आवडले असते.

**- जी. ए. कुलकर्णी**

**क. 'ती माझी एक गंमत आहे,' असे कथानायक म्हणतो ते कशाबद्दल?**

----------------------------------------

----------------------------------------

**ख. तानीमावशीविषयी कथानायकाच्या मनात कोणत्या भावना आहेत?**

----------------------------------------

----------------------------------------



ग. “अरे, मोर कुणाला केव्हा दिसावा याबद्दल काही न्याय आहे होय? दिसला तर तो दुसऱ्याला दाखवावा, नाही दिसला तर तक्रार करू नये.” तानीमावशीच्या ह्या वाक्यांचा अर्थ सांगा.

घ. पु॰ शि॰ रेगे यांच्या लच्छीच्या कथेत आणि जी॰ ए॰ कुलकर्णी यांच्या वरील कथेत मोर हा पक्षी कुठल्या भावनेचे प्रतीक म्हणून येतो? उदाहरणासहित स्पष्ट करा.

## ४ भीती

**क. पुढे दिलेला परिच्छेद वाचा आणि तुमच्या कल्पनेप्रमाणे तो पूर्ण करा.**



लहानपणी शिरीन कमालीची घाबरट होती. दोन क्षणांसाठीही तिची ममा दिसेनाशी झाली, की तिचा जीव घाबरा व्हायचा. अंधाराची भीती तर तिला वाटायचीच, पण झोपण्याचीही भीती वाटायची. दुसऱ्या दिवसाची सकाळ झालीच नाही, सूर्य उगवायचे विसरलाच, तर? ह्या धास्तीने तिच्या पोटात खड्डा पडत असे. प्रेशर कुकरची शिट्टी वाजली की कानापाशी बॉम्ब फुटल्यासारखी ती दचकत असे. अनोळखी व्यक्ती समोर आली, की ममा-पपाच्या मागे लपणे, डासापासून हत्तीपर्यंत सर्व प्रकारच्या आणि आकारांच्या प्राण्यांना भिणे, वर्गासमोर उभी राहून दोन वाक्ये बोलायला सांगितले तरी थरथर कापणे, अशा तिच्या भित्रेपणाला काही काळ सगळ्यांनी गोंजारले; पण लवकरच त्यांना त्याचा वैताग येऊ लागला.

एक दिवस तिच्या काकांनी जाहीर केले : “आज मी शिरीनला पोहायला शिकवणार आहे...

**ख. लहानपणी तुम्हाला सर्वात जास्त भीती कशाची वाटायची? ती भीती घालवणे तुम्हाला जमले का? कसे?**

## ५ चिंता, काळजी, ताण

**क. एक चित्रफीत पाहू या आणि त्यावर चर्चा करू या.**

अ. तुम्ही पाहिलेल्या चित्रफितीत माणसांच्या कोणकोणत्या भावनिक समस्या दिसतात?

आ. ह्या समस्यांवर कोणकोणते उपाय सांगितले आहेत?

इ. ह्या समस्यांशी संबंधित तुमचे अनुभव काय आहेत?

ई. ह्या चित्रपटात 'कासवाचे' स्थान काय आहे असे तुम्हाला वाटते?

**ख. चिंता वाटावी अशा बऱ्याच गोष्टी जगात आहेत. काही पुढे दिलेल्या आहेत. चिंता वाटावी असे ह्या गोष्टींमध्ये काय आहे ते लिहा.**
(पर्यावरण, राजकीय घडामोडी, सतत चाललेली युद्धे, तंत्रज्ञानाचा वाढता प्रभाव...)

**ग. वाचू या.**

### लाजाळूचे रोप



लाजाळूची रोपे हल्ली कुठे दिसतच नाहीत. जेमतेम गुडघ्याएवढ्या उंचीची, वाऱ्याच्या झुळकेचादेखील स्पर्श झाला तरी आपली चिमुकली पाने मिटून घेणारी आणि आसपासची हालचाल थांबली की हळूच पुन्हा उमलणारी लाजाळूची रोपे. शहरांच्या दांडगट आणि कशालाही पायदळी तुडवायला तयार असलेल्या बेदरकार वातावरणात त्यांना

उगवायला वाव तरी कुठे आहे म्हणा! कुठेही बिनधास्तपणे वाढणाऱ्या आणि काट्यांचा धाक दाखवणाऱ्या बाभळीचाच इथे निभाव लागणार.

आज अचानकच लाजाळूच्या रोपाची तीव्रतेने आठवण झाली. लाजून मान झुकवत अंग चोरून घेताना होणारी त्याची हळुवार आणि लयदार हालचाल डोळ्यांसमोर आली. चुकूनमाकून पुन्हा कुठे ते रोप दिसलेच, तर मी काय करेन? बहुधा काहीच करणार नाही. त्याने आपला लाजरा स्वभाव अजून जपला असेलही; तरी, पूर्वीच्या मला जे जाणवत असे ते आजच्या मला जाणवेलच ह्याची काय खात्री? आपला निबरपणाच अधिक ठळक होईल. नकोच ते.

तरीही, जुन्या आठवणी चाळवल्याने वाटणारी हुरहुर आहेच. इतकेच नाही, तर ती हवीशीही वाटते आहे. लाजाळूचे रोप आजच का आठवले? तर, माधव आचवलांनी रेषांबद्दल लिहिले आहे, ते कितव्यांदा तरी वाचत असताना नजरेसमोरून हिरवी वलये उमटावीत तसे ते अंधूकसे तरळून गेले. रेषांचे भावजीवन माणसाला प्रथम कधी आणि कसे जाणवले असेल त्याची कल्पना करताना आचवल म्हणतात –

'येथे काही तरी आपणाला न समजणारे, सुखवू-दुखवू शकणारे काही आहे, असे वाटून त्याने पुन्हा सभोवतालच्या विश्वाकडे बघितले आणि त्याला जाणवले, की आपल्या सगळ्या भावनाच इथे, तिथे, सगळीकडे विखुरल्या आहेत. रेषाही नाजुक असतात, कठोर असतात; दुबळ्या असतात किंवा वळूच्या शिंगांप्रमाणे बेडर असतात. पारंब्यांच्या छायेसारख्या लाजाळू, पुसट असतात, तर कधी मोकळ्या पठारावर पडलेल्या एकाच शिलाखंडासारख्या ठाम, रोवलेल्या असतात. ओढ्यावर झुकलेल्या वेलीप्रमाणे त्या कधी झुरणाऱ्या, विषण्ण करणाऱ्या असतात, तर कधी धबधब्याखालच्या डोहांतून वर उडणाऱ्या पाण्याच्या तुषारांसारख्या नाचणाऱ्या, जुल्लूष करणाऱ्या असतात; वाळूच्या किनाऱ्यासारख्या त्या सोशिक, घेणाऱ्या असतात, तर कधी पावसाच्या सरीप्रमाणे तिरकेपणात देणाऱ्या असतात. त्या बेडकांसारख्या गिळगिळीत, कुरूप असतात आणि मोरपिसांतल्यासारख्या सुरंगी, सुखावणाऱ्याही असतात. कधी असून असतात, – कधी सप्तर्षींनी टाकलेल्या प्रश्नाप्रमाणे नसूनही असतात! हे त्याला जाणवले आणि विश्वाशी त्याची नवीन ओळख झाली. एका नवीन भाषेत ते त्याच्याशी बोलू लागले. त्याच्यातील कलावंत जागा झाला. एक कधी न संपणारा प्रवास सुरू झाला.'

मी काही भावुक, हळवा, भावनांच्या लोंढ्यात वाहवत जाणारा नाही हे खरे आहे; पण तरीही, त्या आदिमानवाच्या डोळ्यांनी जगाकडे पाहण्याची क्षमता आपण गमावून बसलो आहोत हा माझा समज दिवसेंदिवस घट्ट होत चालला आहे, आणि त्यामुळे मी घाबरा झालो आहे, हे मी मान्य करतो.

**अ. वरील उताऱ्यात काही शब्द आणि शब्दसमूह अधोरेखित केले आहेत. पुढे दिलेल्या वाक्यांमध्येही काही भाग अधोरेखित केला आहे. उताऱ्यातील योग्य अधोरेखित भाग वापरून मोकळ्या जागा भरा.**

१. श्रावणच्या कुणाचीही आणि कशाचीही परवा न करण्याच्या / ------------------------------ ------------ वृत्तीचा माईंनी धसकाच घेतला होता.

२. गाडी चालू झाली. बाबा गाडीसह दिसेनासा झाल्यामुळे शंतू धास्तावला / ................................ आणि त्याने टाहो फोडला.

३. "तातू, मी आपला गावी परत जातो. शहरातल्या स्पर्धेच्या वातावरणात मी टिकून राहू शकणार नाही. / ................................ नाही.

४. हत्तींच्या झुंडीने उभे शेत पायांखाली / ................................ तुडवून उद्ध्वस्त केले हे पाहून कमला रडायलाच लागली.

५. प्रियकराच्या विरहामुळे खिन्न झालेल्या / ................................ स्त्रीच्या अनेक प्रतिमा आपल्याला लघुचित्रांमध्ये पाहायला मिळतात.

६. समाजमाध्यमांवर माणसे ज्या क्रूरपणे व्यक्त होतात, ते पाहून पाहून आता मन संवेदना हरवून बसले आहे. / ................................ आहे.

७. बाईने सहनशील / ................................ असणे हा तिचा गुण नव्हे, तर ते तिचे कर्तव्यच मानले जाई.

८. पहाटेच्या अंधारात झाडांआड काही आकृती हलताना अस्पष्ट / ................................ दिसल्या आणि बाबूने बोंब ठोकली.

## ६ 'हो'चा वापर

**रिकाम्या जागा भरा.**

(होय हो, 'हो'ला 'हो', होच मुळी, होय (५), होय की नाही?, हो क्का, होय बाई, हो की नाही, हो की)

**क.**

"बोराटे, आज जोगबाई दिसत नाहीयेत!"

"(अ) ................................"

"म्हणजे आल्याच नाहीयेत का?"

"(आ) ................................"

"काल काही बोलल्या नाहीत!"

"(इ) ................................"

"बोराटे, अहो, कशालाही (ई) ................................ काय म्हणता!"

"मग काय म्हणू?"

"नाहीयेत का असं विचारलं की 'नाही' म्हणायचं."

"(उ) ................................"

"देवा!"

**ख.**

"जोगबाई, तुमचा मोबाईल. वॉश बेसिनवर होता."

"अगोबाई, (अ) ------------------! थँक्यू! हल्ली फार विसरते मी."

"चालायचंच. शेवटचे चार महिने राहिलेत तुमचे."

"(आ) ------------------------------! मी त्याचा विचारच टाळते. म्हातारी झाल्याची जाणीव होते, (इ) -----------------?"

**ग.**

"सासूबाई आल्यात, लेकीशी भांडून."

"तुम्हाला नाही तरी अंगावर जबाबदाऱ्या घेण्याची सवयच आहे, जोगबाई."

"काही तरीच तुमचं. मी कशाला अंगावर घेऊ?"

"(अ) ------------------------------! सरळ 'नका पाठवू' म्हणणार नाही तुम्ही. गेले सहा महिने तुमचा भाचा तळ ठोकून बसला होता, (आ) ------------------------------!"

"(इ) --------------------, होता नं! बदलीच झाली तेव्हा गेला. मग जरा निवांतपणा मिळेल म्हटलं तर ह्या अवतरल्या. अखंड बडबडत असतात, तुम्हाला सांगते, जरा म्हणून जिभेला विश्रांती नसते."

"तुम्हीदेखील गप्प राहत नसाल. शब्दानं शब्द वाढत असेल."

"नाही बाई! मी नुसतं (ई) ------------------------------ करते."

"(उ) ------------------------------! हळू बोला, कुणी ऐकेल नि विश्वास ठेवेल."

"काय करणार! जिवंत माणूस, तेही आपल्याच घरचं. समोर असल्यावर दुर्लक्ष तरी कसं करायचं, सांगा मला!"



# ८ कवितेच्या प्रांतात

भावगीत चरण कविता पंक्ती भजन पोवाडा गीतकार श्लोक
कवी कवन भक्तिगीत अभंग पद रचना ओळ






ओवी पद्य चारोळी गीत हायकू गझल लावणी
आरती काव्य गाणे कडवे कवयित्री रचनाकार

## चला, शिकू या ...

- मराठी कवितेविषयी जाणून घेणे
- मराठी कवींविषयी जाणून घेणे
- कवितेची भाषा समजून घेणे
- काव्यरचनेच्या परंपरा आणि तऱ्हा यांची ओळख करून घेणे
- व्याकरण : अनिश्चित सर्वनामे (सामान्य सर्वनामे) शिकणे

१ **पुढे गीतप्रकारांच्या व्याख्या दिल्या आहेत. त्याखाली वर्तुळात गीतप्रकारांची नावे दिली आहेत. योग्य त्या व्याख्येपुढे योग्य ते नाव लिहा.**

| | मानवी भावनांचे प्रतिबिंब ज्यात दिसते ते | भावगीत |
|---|---|---|
| क. | सहज, सोप्या भाषेत लहान मुलांच्या आवडीच्या विषयांवर लिहिलेले असते ते | |
| ख. | लहान मुलांचे मनोरंजन करण्यासाठी म्हटले जाणारे तालबध्द, शब्द आणि ध्वनीचे खेळ करत रचलेले असे अर्थनिरपेक्ष गीत म्हणजे | |
| ग. | ईश्वराविषयीच्या भक्तिभावाने जी पद्यरचना गायली जाते ती म्हणजे | |
| घ. | दोनपेक्षा जास्त व्यक्ती एकत्र गातात ते | |
| च. | ज्या कवनातून चांगले कार्य करण्यास लोकांना उद्युक्त केले जाते ते | |
| छ. | रणांगणावर लढणाऱ्या सैनिकांना स्फूर्ती देते ते | |
| ज. | दोन व्यक्तींनी गाण्यासाठी जे लिहिले जाते ते | |
| झ. | लोकांनी रचलेली आणि मौखिक परंपरेने चालत आलेली विविध विषयांवरची गीते म्हणजे | |
| ट. | मच्छीमार समाजात परंपरेने गायली जातात ती गीते म्हणजे | |
| ठ. | प्रेमी जीवांची ताटातूट झालेली असताना गातात ते | |
| ड. | प्रेमभावना व्यक्त करण्यासाठी गायले जाते ते | |

भावगीत, भक्तिगीत, बडबडगीत,
लोकगीत, कोळीगीत, बालगीत,
विरहगीत, प्रेमगीत, युगुलगीत, समूहगीत,
स्फूर्तिगीत, समरगीत

## २ योग्य शब्द वापरून वाक्यांतील रिकाम्या जागा भरा.

(वात्रटिका, भारूड, विरहिणी, भजन, धृवपद, कीर्तन, गवळण)

क. ............................ ह्या काव्यप्रकारात साध्या रूपकांमधून धार्मिक आणि नैतिक तत्त्वज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम केले जाते.

ख. मराठी लोकसाहित्यातील ............................ हा एक गीतप्रकार. कृष्णाच्या बालक्रीडांनी आणि खोड्यांनी त्रस्त झालेल्या गोपींनी त्याच्या आईकडे आणलेल्या कौतुकमिश्रित तक्रारी ह्यांत मांडलेल्या असतात.

ग. आपल्या दुरावलेल्या प्रियकराला अथवा प्रेयसीला उद्देशून गायल्या जाणाऱ्या पारंपरिक काव्यप्रकाराला ............................ असे म्हणतात.

घ. कवितेच्या प्रत्येक कडव्यानंतर परत परत येणाऱ्या ओळींना ............................ म्हणतात.

च. काव्य, संगीत, अभिनय आणि क्वचित नृत्य यांच्यासह सादर होणाऱ्या भक्तिरसपूर्ण, एकपात्री कथन प्रकाराला ............................ असे म्हणतात.

छ. देवाच्या स्तुतिपर काव्यरचनेला ............................ म्हणतात.

ज. ............................ म्हणजे हास्यकविता. ह्या काव्यप्रकारात अतिशयोक्ती, विडंबन, मिस्किलपणा, थट्टा ह्यांचा वापर करून मर्मावर बोट ठेवले जाते आणि दांभिकतेवर प्रहार केला जातो.

## ३ पुढील कवितांचे अंश वाचा आणि तो कोणता काव्यप्रकार आहे ते त्यावरील रिकाम्या जागेत लिहा.

क. ................................................ ख. ................................................

दिवसामागून दिवस
चालले ऋतूमागुनी ऋतू
जिवलगा कधी रे येशील तू
धरेस भिजवुनी गेल्या धारा
फुलून जाईचा सुके फुलोरा
नभ धरणीशी जोडून गेले सप्तरंग सेतू
जिवलगा कधी रे येशील तू

**- ग. दि. माडगूळकर**

आपडी थापडी गुळाची पापडी
धम्मक लाडू, तेल काढू
तेलंगीचे एकच पान
दोन्ही हाती धरले कान

**- कवी - अज्ञात**



ग. ----------------------------------------

घ. ----------------------------------------

उठा राष्ट्रवीर हो
सुसज्ज व्हा उठा चला, सशस्त्र व्हा उठा
चला
उठा राष्ट्रवीर हो,
युद्ध आज पेटले, जवान चालले पुढे
मिळुन सर्व शत्रुला क्षणात चारू या खडे
एकसंघ होऊनी लढू चला, लढू चला
उठा उठा, चला चला, उठा राष्ट्रवीर हो

**- रवींद्र भट**



अमृताहुनी गोड नाम तुझें देवा ।
मन माझें केशव कां बा नेघे ॥१॥
सांग पंढरीराया काय करू यासी ।
का रूप ध्यानासि न ये तुझें ॥२॥

**- संत तुकाराम**

च. ----------------------------------------

छ. ----------------------------------------



'एक आहे पाववाला
तो माझा गाववाला
एक म्हातारी विकते भाजी
ती माझ्या एका दोस्ताची आजी
आणि एक आहे समोर देखणी बाई
ती मात्र अजून माझी कोणी नाही'

**- मंगेश पाडगावकर**

जे वेड मजला लागले, तुजलाही ते लागेल
का?
माझ्या मनीची ही व्यथा, कोणी तुला
सांगेल का?
मी पाहतो स्वप्नी तुला, मी पाहतो जागेपणी
जे मी मुकेपणि बोलतो, शब्दांत ते रंगेल
का?

**- डॉ. वसंत अवसरे**

ज. ----------------------------------------

गोपी न्हाण्यात होत्या दंग
तोच आला सखा श्रीरंग
गोळा करून वस्त्रं सारी
बसला चढून कळंबावरी

नको न्याहाळू नितळ काया ओलेती उघडी
दे रे कान्हा, चोळी अन् लुगडी

**- जगदीश खेबूडकर**



## ४ टोपणनाव

टोपणनाव घेण्याची प्रथा केवळ मराठी किंवा केवळ भारतीय आहे असं अजिबात नाही. पूर्वीपासून जगभरातील अनेक लोक टोपणनावे वापरत आले आहेत. बरेच कवी आणि लेखक टोपणनावानं लिखाण करतात. त्यामागची कारणं अर्थातच प्रत्येकाची वेगवेगळी असतात. काहींना स्वतःचं नाव आवडत नसतं, म्हणून ते वेगळं नाव घेतात. काहींना स्वतःची ओळख लपवायची असते, तर काही जण प्रसिद्धीपासून दूर राहणं पसंत करतात, म्हणून वेगळ्याच नावानं समाजात वावरतात. ह्यांत फक्त प्रसिद्ध किंवा सतत लोकांच्या नजरेसमोर राहण्याची धडपड करणारे लोकच असतात असं नाही, तर अगदी सामान्यातले सामान्य लोकही टोपणनाव घेत असतात. अलीकडे समाजमाध्यमांवर टोपणनावानं नावानं लिहिणारे लोक आहेत, तसंच फेसबुकवरही आपली ओळख लपवण्यासाठी वेगळं नाव घेणारे लोक आहेत. केवळ एक फॅशन म्हणूनही काही जण टोपणनाव वापरतात.

भारताबाहेरील काही मोजक्या प्रसिद्ध लेखकांची ही टोपणनावं बघा.

अगाथा ख्रिस्ती म्हणून जगप्रसिद्ध असलेल्या ह्या लेखिकेनं सहा कादंबऱ्या मेरी वेस्टमकॉट ह्या नावाने लिहिल्या होत्या. बेन्जामिन फ्रँकलीन ह्यांनी तरुण वयात मिसेस सायलेन्स डूगुड ह्या नावानं काही  लिखाण केलं होतं, हे कुठे माहितेय बऱ्याच लोकांना? आयझॅक असीमोव ह्यांनी पॉल फ्रेंच हे नाव वापरलं, तर ‘हॅरी पॉटर’ मालिकेसाठी प्रसिद्ध असणाऱ्या जे. के. रोलिंग ह्यांनी रॉबर्ट गल्ब्रेथ हे नावही वापरलं.

आपल्या मराठी कवी आणि लेखकांनीही बरेचदा टोपणनावं वापरली आहेत. त्यांनी घेतलेलं टोपणनाव बरेचदा त्यांच्या खऱ्या नावावरून ओळखता येतं. कधी कधी मात्र हे नाव अगदीच वेगळं असतं. लेखिका पुरुषाचं नाव घेतात तर लेखक स्त्रीच्या नावानं लिखाण करतात.

**क. कोणत्या रकान्यात कवींची नावे आहेत आणि कोणत्या रकान्यात टोपणनावे आहेत?**

| | --------------- | --------------- |
|---|---|---|
| अ. | चिं. त्र्यं. खानोलकर | आरती प्रभू |
| आ. | वि. वा. शिरवाडकर | कुसुमाग्रज |
| इ. | कृष्णाजी केशव दामले | केशवसुत |
| ई. | माणिक सीताराम गोडघाटे | ग्रेस |
| उ. | त्र्यंबक बापूजी ठोंबरे | बालकवी |
| ऊ. | राम गणेश गडकरी | गोविंदाग्रज |

**ख. तुम्ही स्वत:साठी कोणते टोपणनाव घ्याल?** ---------------

## ५ खालील कवन वाचून त्यापुढील प्रश्नांची उत्तरे द्या.



कां गां रुसलासी    कृपाळू बा हरी ।
तुजविण दुसरी    भक्ती नेणे ॥ १ ॥
दीन रंक पापी    हीन माझी मती ।
सांभाळा श्रीपती    अनाथनाथा ॥ २ ॥
आशा मोह माया    लागलीसे पाठीं ।
काळ क्रोध दृष्टी    पाहतसे ॥ ३ ॥
सावता म्हणे देवा    नका ठेऊं येथें ।
उचलोनी अनंते    नेई वेगीं ॥ ४ ॥

- **संत सावतामाळी**

(**शब्दार्थ :** कां गां = का रे, नेणे = नाही, रंक = गरीब, मती = बुद्धी)

क. वरील कवनात 'देव' ह्या अर्थी आलेले शब्द सांगा.

---

ख. ह्या कवनातील यमक जुळणारे शब्द लिहा.
उदा॰ हरी – दुसरी

---

ग. वरील कवनाचा आशय गद्यात सांगा.

---

## ६ सूर्य

**क. डाव्या रकान्यात दिलेली कविता उजव्या रकान्यात गद्यात लिहा.**



बघ आई आकाशात सूर्य हा आला।
पांघरून अंगावरी भरजरी शेला॥
निळ्या याच्या महालाला खांब सोनेरी।
मोतियांच्या लावियेल्या आत झालरी॥
केशराचे घातलेले सडे भूवरी।
त्यावरून येई त्याची डौलाने स्वारी॥
डोंगराच्या आडून हा डोकावे हळू।
आणि फुले गुलाबाची लागे उधळू॥
नभातून सोनियाच्या ओती तो राशी।
गुदगुल्या करी कशा कळ्याफुलांसी॥
पाखरांच्या संगे याची सोबत छान।
गाती बघ कशी याला गोड गायन॥
मंद वारा जागवितो साऱ्या जगाला।
म्हणतसे उठा उठा मित्र हा आला॥

**- शांता ज. शेळके**

मित्र = सूर्य

आई, बघ आकाशात सूर्य आला आहे. त्याने अंगावर भरजरी शेला पांघरला आहे.

--------------------------------

**ख. दिलेले शब्द योग्य जागी लिहा आणि खालील बालगीत पूर्ण करा.**
**(चारा, भुर्रकन्, बाळ, पाणी, डोक्यावरून, इथे)**

इथे ............ बैस रे मोरा,
............ घाली चारा,
............ खा, ............ पी,
बाळाच्या ............
............ उडून जा!



**७ कवी कुसुमाग्रजांनी लिहिलेल्या ह्या सुंदर कवितेची कडवी इथे खाली-वर लागली आहेत. ती योग्य क्रमात आणा.**

**उठा उठा चिऊताई**

बाळाचे मी घेता नाव
जागी झाली चिऊताई
उठोनिया दूर जाई
भूर भूर!



लगबग पांखरे ही
गात गात गोड गाणे
टिपतात बघा दाणे
चोहीकडे!

उठा उठा चिऊताई
सारीकडे उजाडले
डोळे तरी मिटलेले
अजूनही! १

झोपलेल्या अशा तुम्ही
आणायाचे मग कोणी
बाळासाठी चारापाणी
चिमुकल्या!



सोनेरी हे दूत आले
घरट्याच्या दारापाशी
डोळ्यांवर झोप कशी
अजूनही!

\- **कुसुमाग्रज**

**८ पुढे एक मराठी बालगीत दिले आहे, पण त्यातील काही शब्द तिथून हरवले आहेत. शेजारील वर्तुळात त्यातील हरवलेले शब्द आहेत. ते योग्य जागी घालून गीत पूर्ण करा.**

लहान ------------------- -------------------

------------------- ------------------- सावली

घारे डोळे -------------------

------------------- ------------------- पाहते

मोठी तिची,
माझी बाहुली, लुकुलुकु ही,
फिरवीते

नकटे ------------------ ------------------

------------------ ------------------ फुगवीते

दात काही ------------------ ------------------

------------------ ------------------ धूत नाही

------------------ ------------------, करपून गेला!

पोळ्या केल्या, ------------------ ------------------!

वरण केले, ------------------ ------------------

------------------ ------------------सांडून गेले

असे भुकेले नक्का जाऊ

थांबा करते गोड खाऊ

केळ्याचे शिकरण ------------------ ------------------

------------------ ------------------ दात

आडाचे पाणी ------------------ ------------------

------------------ ------------------ आत!

घासत नाही,
गोबरे गाल, अंग काही,
नाक उडवीते

पातळ झाले,
भात केला, तूप सगळे,
कच्च्या झाल्या

काढायला गेली,
दोनच पडले, धपकन् पडली,
करायला गेली

**९ पुढे दिलेली वाक्ये जोडून त्यांचे एक वाक्य करा. मात्र हे करताना 'आणि', 'व' अशी उभयान्वयी अव्यये वापरण्याची परवानगी नाही.**

**अ.** अ. ह्या काव्यप्रकाराला हायकू म्हणतात.
आ. ह्या काव्यप्रकारात तीन ओळी असतात.

------------------------------------------------------------------------

**ख.** अ. माझ्यासाठी हे पेन फार मौल्यवान आहे.
आ. माझ्या लाडक्या कवीने ते मला भेट म्हणून दिले आहे.

------------------------------------------------------------------------

**ग.** अ. त्या खोक्यावर 'कविता' असं लिहिलं आहे.
आ. त्या खोक्यात तुला आवश्यक ती सर्व पुस्तकं सापडतील.

------------------------------------------------------------------------

**घ.** अ. गेल्या आठवड्यात मी तुमच्याकडून हे पुस्तक विकत घेतले.
आ. ह्या पुस्तकातील काही पाने कोरीच आहेत.

------------------------------------------------------------------------

**च.** अ. ही मुलगी फक्त कवितेतच बोलते.
आ. बऱ्याच लोकांना तिचे बोलणे कळत नाही.

------------------------------------------------------------------------

छ. अ. ह्या कवीचे बहुतेक सर्व काव्यसंग्रह माझ्याकडे आहेत.
आ. ह्या कवीला अनेक पुरस्कार मिळाले आहेत.
------------------------------------------------------------

**१० 'मन' ह्या शब्दाशी निगडित काही क्रियापदे आणि काही वाक्प्रचार दिले आहेत. पुढील वाक्यांत योग्य जागी योग्य ते क्रियापद अथवा वाक्प्रचार वापरून वाक्ये पूर्ण करा.**

(मनास येणे, मनाला मुरड घालणे, मन मारणे, मनाला लागणे, मनात काळेबेरे असणे, मनाला भिडणे, (दुखऱ्या) मनावर फुंकर घालणे, मनावर दगड ठेवणे, मनातलं मनात ठेवणे, मन खाणे)

क. रुसला ना महेश परत? असाच आहे तो. खास त्याच्यासाठी त्याला आवडेल असं काही केलं तरी त्याच्या ---------- ---------- नाही.

ख. जयश्रीच्या ---------- नक्कीच काहीतरी ---------- ----------. उगाच नाही ती आपली नजर चुकवत इथून निघून गेली.

ग. मोकळेपणानं बोलेल तर तो जयेश कसला? आपल्या ---------- ---------- ---------- तो नेहमी.

घ. सगळ्याच मित्रांनी कारण नसताना राघवशी अबोला धरला. फारच दुखावला होता तो. त्याच्या ---------- ---------- ---------- ---------- मलाही जमलं नाही.

च. घरची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्यानं त्या भावंडांना कधीच कोणत्या चैनीच्या गोष्टी मिळाल्या नाहीत. त्यांना कायम ---------- ---------- जगावे लागले.

छ. वडिलांच्या अंत्यप्रसंगी त्याने उत्स्फूर्तपणे इतकं हृद्य भाषण केलं! त्याचं प्रत्येक वाक्यच सर्वांच्या ---------- ----------.

ज. हेमांगी फारच हळवी आहे. जरा काही बोललं, की लगेच तिच्या ---------- ---------- आणि टचकन् पाणीच येतं तिच्या डोळ्यांत.

झ. मेधाला दोन महिने ऑफिसच्या कामासाठी परदेशी जावं लागत होतं. मुसमुसून रडणाऱ्या चार वर्षांच्या महिमाला आईकडे सोडून जाताना तिचं पाऊल अडखळलं; पण शेवटी ---------- ---------- ती निघाली तिथून.

ट. त्या प्रकरणात निशिगंधाची काहीच चूक नसताना केवळ गैरसमजामुळे मी तिच्याविरुद्ध तक्रार केली. त्यामुळे तिला इतका मनस्ताप सहन करावा लागतोय. माझं ---------- खूप ---------- आता. पण आता काहीच करता येत नाही.

ठ. जरा ---------- ---------- ---------- ना परेश! थोडं पथ्य पाळायलाच हवं तुला. पाच-सहा महिन्यांचाच तर प्रश्न आहे.

## ११ खाली दिलेल्या क्रियापदांतील योग्य ते क्रियापद वापरून वाक्ये पूर्ण करा. काही वाक्यांत एकाहून अधिक पर्याय असू शकतील.

(म्हणणे, बोलणे, सांगणे, विचारणे, गरजणे, किंचाळणे, पुटपुटणे, कुजबुजणे, दरडावणे, खेकसणे, तणतणणे, ओरडणे, बजावणे, खडसावणे, बोलणे, कुरकुरणे, चीत्कारणे)

क. "सगळ्यांनी दिलेला गृहपाठ केलाय ना?" बाईंनी मोठ्यानं (१) ..........................

ख. "हो, हो, केलाय ना"! काही मुले जोरात (२) .........................., तर काही हळू आवाजात (३) ..........................



ग. "ज्यांनी आज गृहपाठ करून आणला नसेल त्यांनी मधल्या सुट्टीत वर्गाबाहेर न जाता वर्गातच बसून तो पूर्ण करायचा आहे," बाईंनी (४) ..........................

घ. "झालं, बसा आता वर्गातच! मी आज कॅन्टीनमधून वडापाव घेणार होते. वैताग आहे नुसता!" भाग्यश्री (५) ..........................

च. "अय्या! वडापाव?" जयंती मोठ्यानं (६) ..........................

छ. "अगं, केवढ्यांदा (७) .........................., जरा हळू!" भाग्यश्री (८) ..........................

ज. "कोण (९) .......................... मागे? मला ऐकायला येतंय हं! शिक्षा वाढवीन मी!" बाईंनी (१०) ..........................

झ. "पण बाई, गृहपाठ फारच मोठा होता," काही मुलं (११) ..........................

ट. "हे बघा, आता कोणी काही (१२) .......................... नका आणि (१३) .......................... नका. शिक्षा म्हणजे शिक्षा. त्यात आता बदल नाही," बाई रागाने (१४) ..........................

ठ. "आणि तिकडे बाकाखाली वाकून कोण बसलंय रे? ऊठ, ऊठ आधी! हे असले चाळे मला वर्गात चालणार नाहीत," बाईंनी (१५) ..........................

ड. "बाईऽऽऽ, संपत आहे तोऽ!" गणेश (१६) ..........................

ढ. "बघतेच आता त्याच्याकडे मी!" बाई रागानं (१७) .........................., आणि पदर बांधून तरातरा मागच्या बाकाकडे निघाल्या; पण संपत कधीच खिडकीतून उडी मारून पळाला होता!



## १२ उदाहरणाप्रमाणे क्रियापदापासून जोडनामे करून वाक्ये पूर्ण करा.


उदा॰ एवढी मोठी खरेदी करायची असेल, तर मला आधी पैशांची (जुळवणे) जुळवाजुळव करावी लागेल.




मधल्या सुट्टीत शाळेच्या आवारात मुलांचा (क) (ओरडणे) .................... चालू होता. डबा खाऊन झाला होता आणि आता वेगवेगळे खेळ रंगात आले होते. एका कोपऱ्यात मुलं शिस्तीत (ख) (शिवणे) .................... खेळत होती, तर दुसऱ्या बाजूला खो-खो खेळण्याचं निमित्त करून मुलं नुसतीच (ग) (धावणे) .................... करत होती. आवारातील मोठ्या झाडाच्या मागे काही मुलांची (घ) (मारणे) .................... चालू होती, आणि व्हरांड्यात काही व्रात्य मुलांची (च) (चिडवणे) .................... सुरू होती. तेवढ्यात आवारात एक उधळलेला बैल शिरला आणि मुलांची (छ) (पळणे) .................... सुरू झाली. शाळेच्या मुख्य इमारतीच्या आत पटकन शिरता यावं म्हणून जो तो पुढे घुसायला लागला. (ज) (ढकलणे) .................... आणि (झ) (चेंगरणे) ....................ला सुरुवात झाली. ज्या लहान मुलांना पुढे घुसता येत नव्हतं त्यांनी मोठ्यांदा भोकाड पसरलं. इतका गोंगाट आणि (ट) (रडणे) .................... ऐकून गणपत शिपाई काठी घेऊनच धावत आला आणि त्यानं बैलाला आवाराबाहेर हाकललं.


## १३ वर्तुळात दिलेली नामे पुढे दिलेल्या कोणकोणत्या क्रियापदांबरोबर वापराल? लिहा.


(करणे, गाणे, म्हणणे, लिहिणे, वाचणे, ऐकणे, रचणे, बसवणे, पडणे, जुळवणे, उतरवणे, पाडणे, चालणे, स्फुरणे, पाहणे, जगणे, खरडणे)




(होणे, करणे, लावणे, ऐकणे, घालणे, पाहणे, मिटवणे, सोडवणे, बघणे, ऐकणे, निस्तरणे)



## १४ पु. ल. देशपांडे ह्यांनी सुरेश भट ह्यांच्या 'रंग माझा वेगळा' ह्या काव्यसंग्रहासाठी लिहिलेल्या प्रस्तावनेचा काही भाग वाचा आणि त्यापुढे दिलेल्या प्रश्नांची स्वतःच्या शब्दात उत्तरे द्या.

सुरेश भटांची कविता एके दिवशी मला अचानक **भेटली,** आणि नवकवितेच्या या जमान्यात नुसत्या निरनिराळया रंगांचेच नव्हे, तर निराळ्या अंतरंगाचे दर्शन घडले. मुंबईच्या जीवघेण्या उकाड्यात राहणाऱ्या माणसाच्या अंगावरून दैवयोगाने किंवा निर्सगाच्या एखाद्या चमत्कारामुळे दक्षिण वायूची शीतल झुळुक जावी, तशी ही कविता अंगावरून गेली. या कवितेतले फुललेपण मोहक होते, आणि त्या कवितेत सुगंधासारखे गाणे दडलेले होते.

एक काळ असा होता, की कविता कानावाटेच मनात शिरायची. कवी कविता गाऊन दाखवीत. मुद्रणकला आली आणि कवितेचा छापील ठसा डोळ्यापुढे येऊ लागला. ती आता मूकपणाने डोळ्यावाटे मनात शिरू लागली. मनातल्यामनात कविता वाचायची पद्धत तशी अलीकडली. ठशातून कागदावर उमटणाऱ्या अक्षरांमुळे तोडांतून उमटणा-या नादातून होणारा संस्कार नाहीसा झाला. हे उणेपण घालवण्याचा र. कृ. जोशी यांच्यासारख्या कवीने त्या अक्षरांना चित्ररूप देऊन प्रयत्न केला. गीतांनी सुरांतून उमटावे तसे त्यांच्या कवितांना त्यांनी चित्राक्षरातून उमटवण्याचा प्रयत्न केला. जोशी चित्रकार असल्यामुळे त्यांनी मोठ्या सहजतेने चित्ररूपातून कविता प्रगटवली. भटांची कविता गाता येते. फुलाला चित्रकलेचा डिप्लोमा असावा लागत नाही. ज्या मातीतून ते रुजून फुलते तिथेच ते रंग दडलेले असतात. भटांच्या मनोभूमीत निसर्गतःच सूर दडलेले आहेत. ज्यांची कविता अशीच गात गात फुटते असे माझ्या आवडीचे बा. भ. बोरकर हे कवी आहेत. **हा पिंडाचा धर्म आहे.** पु. शि. रेग्यांना **भेटणारे** शब्द जसे फुलपाखरांसारखे त्यांच्या अवतीभवती हिंडत असल्यासारखे वाटतात, तसे सुरेश भटांच्या भोवती सूर हिंडत असावेत. मनात फुलत जाणाऱ्या कवितेने या सुरांच्या गळ्यात गळा घालून केव्हा गायला सुरवात केली, हे सुरेश भटांनाही कळत नसावे. म्हणूनच त्यांच्या गीतांना चाली देणाऱ्या संगीत दिग्दर्शकांच्या गुणवत्तेविषयी मला आदर असूनही सुरेश भट त्या गीताबरोबर जन्माला आलेल्या चालीत जेव्हा आपली कविता गाऊ लागतात त्यावेळी ते गीत आणि गाणे एक होऊन जाते. कुणीही कुणावर मात करण्यासाठी येत नाही. वरपांगी अत्यंत अस्ताव्यस्त दिसणारा हा कवी, त्यातही ती कविता आणि त्याचे ते गाणे हे तिन्ही घटक त्या कवितेच्या संपूर्ण आस्वादाला आवश्यक असावेत असे वाटायला लागते. हे एक विलक्षण अद्वैत आहे.



('रंग माझा वेगळा', प्रास्ताविक, पु. ल. देशपांडे)

**क. जुनी आणि नवी कविता ह्याबद्दल पु. ल. देशपांडे काय म्हणतात?.**

**ख. पुढील कवी आणि त्यांच्या कवितांविषयी पु. ल. देशपांडे काय म्हणतात?**

अ. र. कृ. जोशी

आ. बा. भ. बोरकर

इ. पु. शि. रेगे

**ग. सुरेश भट आणि त्यांच्या कविता ह्यांविषयी पु. ल. देशपांडे काय म्हणतात?**

**घ. वरील प्रस्तावनेत पु. ल. देशपांडे 'भेटणे' हे क्रियापद दोनदा कोणत्या वेगळ्या अर्थाने वापरतात? त्यांना हे क्रियापद अशा अर्थाने वापरावेसे का वाटले असेल?**

**च. पु. ल. देशपांडे म्हणतात 'हा पिंडाचा धर्म आहे'. – हे वाक्य स्पष्ट करा.**

**छ. वरील परिच्छेदातील अधोरेखित केलेली लांबलचक वाक्ये सुटी करून छोटी वाक्ये बनवा.**

अ.

आ.

## १५ आणखी काय-काय पेलतात? रिकाम्या जागा भरा.

| | | |
|---|---|---|
| ------------------------ | ------------------------ | आव्हान |
| | **पेलणे** | |
| ------------------------ | ------------------------ | ------------------------ |

## १६ योग्य शब्द भरून वाक्ये पूर्ण करा.

(कोणीही, कोण, कशाची, कधी, कोण, कधी, कशासाठी, कोणास, कोणाची, काय)

क. --------------------- उठावं आणि स्वतःला लेखक किंवा कवी म्हणवून घ्यावं, असं चालत नाही.

ख. --------------- , --------------- आणि --------------- लिहितं आणि ते लिखाण --------------- , --------------- आणि --------------- वाचतं, हेही अलीकडं कळेनासं झालंय.

ग. हंबीररावांना सगळेच खूप घाबरतात. ------------------------ हिंमत होणार नाही त्यांना विरोध करण्याची.

घ. शेजारच्या घरात काल रात्रीपासून इतका गलका का चाललाय ------------------------ ठाऊक!

च. मनोजला एवढी मिजास -------------------- आहे काही कळत नाही. कायम तोऱ्यात वावरत असतो.

## १७ खालील शब्दांना सध्याच्या गद्य भाषेत प्रतिशब्द लिहा.

| | | | |
|---|---|---|---|
| क. | मज = ---------------------------------------- | छ. | मजसी = ---------------------------------------- |
| ख. | मम = ---------------------------------------- | ज. | यास्तव = ---------------------------------------- |
| ग. | तव = ---------------------------------------- | झ. | आपुले = ---------------------------------------- |
| घ. | तुझिया = ---------------------------------------- | ट. | माझिया = ---------------------------------------- |
| च. | तुज = ---------------------------------------- | ठ. | तुजसी = ---------------------------------------- |

## १८ 'प्रश्न'

**क. 'प्रश्न' या नामाबरोबर आणखी कोणती क्रियापदे येऊ शकतात?**

**ख. आता तुम्ही शोधलेल्या नाम-क्रियापद जोड्यांचा अर्थपूर्ण वाक्यांत उपयोग करून एक परिच्छेद किंवा स्वतंत्र वाक्ये तयार करा.**

**प्रश्न**

| मिटणे | ------------------------ | ------------------------ | ------------------------ |
|---|---|---|---|

## १९ वाचा.

**क. कृष्णाजी केशव दामले उर्फ केशवसुत**


(१८६६-१९०५)



हे एक उत्कट संवेदनशील, एकांतप्रिय, जे जे सुंदर त्याची मनस्वी ओढ असलेले निसर्गप्रेमी कवी होते. त्यांच्या जाणत्या वयात भारतीय समाजजीवनात मोठ्या उलथापालथी होत होत्या. परकीय सत्तेविरोधात जनमत तयार होऊ लागले होते, त्याच वेळी नव्या आधुनिक समाजाची निर्मिती करण्याची उर्मी जागी होत होती. साहित्यक्षेत्रातही नवतेचे वारे वाहत होते. मराठी भाषेला नवी झळाळी येऊ लागली होती. पाश्चिमात्य शिक्षणाच्या, साहित्यपरंपरांच्या प्रभावामुळे हे घडत होते. हा प्रभाव केशवसुतांच्याही कवितेवर होता. मराठी काव्यात त्यांनी जे नवे युग निर्माण केले, त्यात इंग्रजी कवितेचा मोठा वाटा होता. त्यामुळेच प्लेगने वयाच्या अवघ्या चाळीसाव्या वर्षी त्यांचा मृत्यू झाला तेव्हा रेव्हरंड टिळक ह्या कवींनी दुःखाने 'आज आपला वर्डस्वर्थ गेला' असे उद्गार काढले आणि गोविंदाग्रजांनी 'केशवसुत मेले?' असा विलाप केला.

**ख. राम गणेश गडकरी उर्फ गोविंदग्रज उर्फ बाळकराम**

(१८८५-१९१९)



गोविंदाग्रज हे रोमँटिक परंपरेमधील महत्त्वाचे कवी होते. उत्कट आणि नाट्यपूर्ण आविष्कार, श्रीमंत भाषा आणि अफाट कल्पनाविलास ही त्यांच्या लेखनाची आणि प्रवृत्तीचीही वैशिष्ट्ये आहेत. त्यांचे सारेच तीव्र आणि दाहक असे : आशाही आणि निराशाही, सुखही आणि दुखःही. ते स्वतःला केशवसुतांचा शिष्य मानत असत. आपल्या ह्या गुरूप्रमाणेच तेही अल्पायुषी ठरले. वयाच्या अवघ्या तेहतिसाव्या वर्षी त्यांना मृत्यूने गाठले.

## केशवसुत मेले?

जगतास जागवायाला केशवसुत गाउनि गेले!

(...)

एकेका शब्दें भरले काव्याचे अद्भुत पेले!
ज्यांसाठीं मानव झटले, ते सुधाकुंभ भरलेले–
वाग्देवी वरुनी टाकी केशवसुतहृदयी झेले!

अनुभवुनि निजानंदाने
मग त्यांचे केले गाणे,
श्वासाच्या कारंज्याने

चहुंकडे उधळुनी दिधले! केशवसुत गाउनि गेले!

(...)

लीलेनें त्यांनी गातां
ही सजीव केली जडता,
अणुरेणूंमधुनी आतां

निघतील तयांचे चेले! केशवसुत गाउनि गेले!

(...)

केशवसुत कसले मेले? केशवसुत गातचि बसले!


- **गोविंदाग्रज**

**ग. सदानंद रेगे**

(१९२३-१९८२)

हे मराठी कवी, भाषांतरकार होते. रेग्यांच्या कवितेने एखाद्याच विशिष्ट दृष्टिकोनात स्वतःला बंदिस्त करून घेण्याचे नेहमीच नाकारले. रेग्यांची कल्पनाशक्ती मुक्त होती. एकाच विषयावर त्यांनी वेगवेगळ्या दृष्टिकोनातून एकापेक्षा अधिक काव्यरचना केल्या. एकच मनोभूमिका स्वीकारून 'भारतीय संस्कृती', 'मराठी परंपरा', 'आपली मुळे' अशा मर्यादित वर्तुळात ते फिरत राहिले नाहीत. त्यांच्या मनाच्या खिडक्या नेहमी उघड्या होत्या. त्यामुळे मराठी किंवा भारतीय सांस्कृतिक जगापलीकडचे विषयही त्यांच्या कवितांमध्ये आले. दुसरा विशेष म्हणजे त्यांना विनोदाचे वावडे नव्हते. निर्मिती गांभीर्याने करणे आणि गंभीर निर्मिती करणे ह्यांत फरक करणारा हा कवी होता. त्यांचे कवितासंग्रह : गंधर्व, वेड्या कविता, देवापुढचा दिवा, बांक्रुशीचा पक्षी

**काफ्का**




म्हटलं
आज गादीला जरा
ऊन खाऊ दे.
गच्चीवर टाकली न टाकली तो
पसाभर ढेकूण
जीव घेऊन
सैरावैरा ढुंगणाला पाय
लावून धूम पळत सुटलेले.
तरी तीनचार पायाखाली आलेच.
त्यांच्या कुळथीच्या रंगांचे
रक्ताळ धूमकेतू
जमिनीवर गोंदणासारखे.
उतरत्या सूर्याला साक्षी
ठेवून मी स्वतःशीच पुटपुटलो,
देवा, त्यांच्या आत्म्यांना शांती दे.
त्यातला चुकून एखादा असायचा फ्रान्त्स काफ्का



**- सदानंद रेगे**

## २० चिंता

**मी हजार चिंतांनी हे डोके खाजवतो...**



मी हजार चिंतांनी हे डोके खाजवतो
तो कट्ट्यावर बसतो, घुमतो, शीळ वाजवतो!

मी जुनाट दारापरी किरकिरा, बंदी
तो सताड उघड्या खिडकीपरी स्वच्छंदी
मी बिजागरीशी जीव गंजवीत बसतो
तो लंघून चौकट पार निघाया बघतो!

डोळ्यांत माझिया सूर्याहुनी संताप
दिसतात त्वचेवर राप, उन्हाचे शाप!
तो त्याच उन्हाचे झगझगीत, लखलखते-
घडवून दागिने सूर्यफुलांवर झुलतो!!

मी पायी रुतल्या काचांवरती चिडतो
तो त्याच घेऊनी नक्षी मांडून बसतो
मी डाव रडीचा खात जिंकतो अंती
तो स्वच्छ मोकळ्या मुक्त मनाने हरतो!

मी आस्तिक! मोजत पुण्याईची खोली
नवसांची ठेवून लाच, लावतो बोली!
तो मुळात येतो इच्छा अर्पून साऱ्या
अन् 'धन्यवाद' देवाचे घेऊन जातो!!

मज अध्यात्माचा रोज नवा शृंगार
लपतो न परि चेहरा आत भेसूर!
तो फक्त ओढतो शाल नभाची तरीही
त्या शामनिळ्याच्या मोरपिसापरी दिसतो!!

**- संदीप खरे**

**क. खालील अर्थाचे शब्द कवितेत आले आहेत. ते शोधून लिहा.**

अ. शिट्टी - ..............................

आ. मोकळा, मुक्त – ..............................

इ. ओलांडणे - ..............................

ई. चकाकणारे – ..............................

उ. फसवणे - ..............................

ऊ. सोडून देणे – ..............................

ए. देवावर श्रद्धा असलेला – ..............................

**ख. योग्य चौकट निवडा.**

| | | मी | तो |
|---|---|---|---|
| अ. | सतत काळजी करणारा. | ☐ | ☐ |
| आ. | मुक्तपणे जगणारा. | ☐ | ☐ |
| इ. | कटकट्या स्वभावाचा. | ☐ | ☐ |
| ई. | नकारात्मक विचार करणारा. | ☐ | ☐ |
| उ. | बिनधास्त. | ☐ | ☐ |
| ऊ. | संकटांतही सकारात्मक दृष्टीकोन ठेवणारा. | ☐ | ☐ |
| ए. | आध्यात्मिक. पाप-पुण्याचा हिशेब ठेवणारा. | ☐ | ☐ |
| ॲ. | निरपेक्ष, निरिच्छ. | ☐ | ☐ |

**ग. वरील मुद्द्यांचा वापर करून कवितेतील 'मी' व 'तो' एकमेकांपासून कसे वेगळे आहेत ते सविस्तर लिहा.**

**घ. तुम्हाला कोणासारखे व्हायला आवडेल? का?**

**च. कवितेचे वर्गात वाचन करा.**

**छ. कविता ऐका.**

**ज. कवितेचे वर्गात नाटकरूपात सादरीकरण करा.**

# तोंडी परीक्षा

एकूण २० गुण

## १. कविता वाचन व रसग्रहण (१०)

**क. खालील कविता मोठ्याने वाचा. वाचताना विरामचिन्हांकडे लक्ष द्या.**

### आईपणाची भीती

आजच्याइतकी आईपणाची भीती कधीच वाटली नव्हती
अगतिकतेची असली खंत मनात कधीच दाटली नव्हती.
विचारलेस आज मला, "आई, कोणती वाट धरू?"
गोळा झाले कंठी प्राण आणि डोळे लागले झरू.
कोणती दिशा दाखवू मी तुला? पूर्व? पश्चिम? दक्षिण? उत्तर?
माझ्यासारख्याच भीतीने या चारी दिशा झाल्या फ़त्तर.

कोठे ज्ञान, यश, सुख? काय त्यांच्या खाणाखुणा?
या-त्या रूपात दिसतो सैतानच वावरताना.
जळी, स्थळी, आकाशीही अणुबॉम्ब झाकला आहे
प्रत्येक रस्ता माणसाच्या रक्ताने रे माखला आहे.
आज आईच्या कुशीतसुद्धा उरला नाही रे बाळ निवारा
द्रौणीच्या अस्त्रासारखा हिरोशिमाचा बाधेल वारा.

कोठेतरी गेलेच पाहिजे गतीचीही आहेच सक्ती
जायचे कसे त्याची मात्र कुणीच सांगत नाही युक्ती.
खचू नको, शोध बाळा तुझा तूच ज्ञानमार्ग
कोणतीही दिशा घे, पण माणुसकीला जाग.
धीर धर, उचल पाय, आता मात्र कर घाई
आणखी एक लक्षात ठेव, प्रत्येकालाच असते आई.

**- पद्मा गोळे**

**ख. कवितेतील आईला कसली भीती वाटते आहे?**
**ग. कवितेतील आई तिच्या लेकरास कोणता सल्ला देते?**

## २. संभाषणकौशल्य (१०)

**खालीलपैकी कोणतीही एक समस्या निवडा. एक समुपदेशक म्हणून त्या समस्येकडे तुम्ही कसे पाहता ते स्वत:च्या शब्दांत सांगा.**

अ. ३५ वर्षांचा निनाद सतत स्वत:ला कमी लेखतो, स्वत:च्या कार्यक्षमतेवर शंका घेतो. अजूनही स्वत:वर त्याचा पाहिजे तितका विश्वास नाही.

आ. कनिष्का परीक्षेच्या आधी व नंतर खूपच ताण घेते. आपण परीक्षेत चांगले गुण मिळवू का, पुढे चांगले करिअर करू शकू का, आपल्या आई-वडिलांप्रमाणे आयुष्यात यशस्वी होऊ का असे विचार सतत तिच्या मनात पिंगा घालत असतात.

# लेखी परीक्षा

एकूण ३० गुण

## १. पुढील उतारा वाचून खाली दिलेले प्रश्न सोडवा. (१०)

### आपली माणसं

आमच्या कुटुंबात मला कुणी कधी वाईट वागवलं नाही, त्यामुळे आई-वडिलांना - विशेषतः आईला नको असताना मी जन्माला आले ह्या गोष्टीचं मला कधी विशेष काही वाटलं नाही. मी नकोशी होते हे घरातल्या म्हाताऱ्या बायकांकडून मी लहान असतानाच कळलं होतं. म्हणजे नक्की काय कळलं होतं, कुणास ठाऊक; पण, कदाचित त्यामुळेच मी दुःखी नव्हे, पण वृत्तीने तटस्थ झाले असेन. मी कधी कसले हट्ट केले नाहीत, लाडात येऊन कधी आईवडिलांच्या गळ्याला मिठी मारली नाही, हातपाय आपटून रडले नाही. माझी गुपितं किंवा दुखलंखुपलं त्यांच्या कानात सांगितलं नाही. त्यांनीही कधी त्याबद्दल मला विचारलं नाही. 'हिचा काही त्रास नसतो' असं आई अधूनमधून इतरांना सांगत असे. खरं सांगू का, ती स्वतःही तशी तटस्थच होती. तोच स्वभाव माझ्यात उतरला असणार. मी तिला नको होते, तरीही तिनं माझं सगळं नीट केलं हे काय कमी होतं? तशी माझीही माणसं होती. मित्रमैत्रिणी, एक दोन शिक्षक, आणि माझं काम. हे माझं घराबाहेरचं कुटुंब. लहानपणापासूनच मी घरात वेगळी आणि बाहेर वेगळीच होते. अशी विभागणी सहज, माझ्या नकळत झाली. आणि हे ठीकच आहे ना! आपल्याला हवं तसं कुटुंब तयार करता येणं ही गोष्ट काही वाईट नाही. रडतकुढत बसून काय मिळणार आहे?

**क. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा. (४)**

अ. आपण आईवडिलांच्या इच्छेविरुद्ध जन्माला आल्याचे कळल्यावर लेखिकेची काय प्रतिक्रिया झाली?

आ. लेखिकेला घरात कशी वागणूक मिळाली?

इ. तिच्या आईचा स्वभाव कसा होता? लेखिकेचे तिच्याबद्दल काय म्हणणे आहे?

ई. शेवटी लेखिका 'ठीकच आहे ना!' असे म्हणते. काय ठीक आहे? सविस्तर उत्तर द्या.

**ख. अधोरेखित शब्दांचा अर्थ लिहा. (३)**

अ. मी वृत्तीने <u>तटस्थ</u> झाले असेन.

आ. मी <u>लाडात येऊन</u> आईवडिलांच्या गळ्याला मिठी मारली नाही.

इ. <u>रडतकुढत</u> बसून काय मिळणार आहे?

**ग. आईच्या भूमिकेतून लेखिकेबद्दल चार-पाच वाक्यात काही सांगा. (३)**

## २. व्याकरण (एकूण १० गुण)

**क. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.** **(२)**

अ. रागावणे : राग :: ------------------------------ : भीती

आ. ओरडणे : आरडाओरडा :: मारणे : ------------------------------

इ. भांडण : लावणे :: गोंधळ : ------------------------------

ई. मजसी : मला :: तुझिया : ------------------------------

**ख. खाली काही प्रसिद्ध मराठी गाण्यांतील ओळी दिल्या आहेत. रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द लिहा. (कुणाच्या, कोणत्या, केव्हा, कसा)** **(४)**

अ. का कळेना ------------------------------ क्षणी हरवते मन कसे...

आ. ------------------------------ खांद्यावर कुणाचे ओझे...

इ. कुणास ठाऊक ------------------------------ पण सिनेमात गेला ससा...

ई. ------------------------------ तरी पहाटे उलटून रात्र गेली...

**ग. खालील वाक्ये पूर्ण करा.** **(४)**

अ. रागाच्या भरात मी ------------------------------

------------------------------

------------------------------

आ. ------------------------------

------------------------------

की माझ्या पोटात गोळा येतो.

## ३. पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर १५ ओळी लिहा. (एकूण १० गुण)

**क. पुढील कविता वाचून तीवर आपल्या मित्राला / मैत्रिणीला पत्र लिहा.**

इथे-इथेने असे घेरले,
घेरी आली अंती
अंत होईना अडलो मध्ये
जीवन याला म्हणती

**- प्र. ना. परांजपे**

**ख. गेल्या तीन दिवसांची दैनंदिनी लिहा.**

# ९ जडणघडण










## चला, शिकू या ...

- संस्कारांचे महत्त्व जाणून घेणे
- निषिद्ध / वर्ज्य गोष्टी यांच्यावर चर्चा करणे
- महाराष्ट्रातील प्रमुख शहरे : कोल्हापूर, अमरावती, जळगाव यांची ओळख करून घेणे

## १ मिनू आणि आई.



क. वरील चित्रमालिका पाहिलीत? मिनू नेहमी एकटीच खेळत असते. आनंदात असते. तिला कोणी मित्र-मैत्रिणी लागत नाहीत. आई मात्र चिंतेत आहे. सर्वांच्यात मिसळायची सवय मिनूला कशी लावू, मिनूला योग्य वळण कसे लावू, तिच्यावर चांगले संस्कार कसे करू, असे विचार तिला सतावतायत. आई काय उपाय शोधते आणि त्याचा परिणाम काय होतो? मिनू बदलते का? आई आनंदी होते का? वरील चित्रमालिकेसाठी संवाद लिहा. सुरुवात दिली आहे.

**मिनू आणि आई**

चित्र १ - आई : बसली ही मिनू परत एकटीच खेळत! काय करावं हिचं!

चित्र २ -

चित्र ३ -

चित्र ४ -

चित्र ५ -

चित्र ६ -

चित्र ७ -

चित्र ८ -

चित्र ९ -



## २ मला वाटतं ...

**क. 'मुलांवर संस्कार कसे करावेत आणि त्यांना वाढवण्याच्या योग्य पद्धती कोणत्या' ह्या विषयावर तुमच्या वाचनात पुढील चार वेगवेगळी मते आली आहेत. ह्यांपैकी कोणत्या मताशी तुम्ही सहमत आहात? का? थोडक्यात लिहा.**

अ. संस्काराचा मूळ पाया म्हणजे शिस्त. प्रत्येक कृतीला जर शिस्त, नियम घालून घेतले नाहीत, तर ती कृती अपूर्ण होते. सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत शिस्तीचे काटेकोर पालन केले, तर प्रगती जलद होते. त्यासाठी लहानपणीच शिस्तीचे संस्कार बालमनावर रुजवायला हवेत.

आ. मुलांना स्वावलंबी बनवणे, प्रत्येक गोष्ट वेळेवर करण्यास शिकवणे, मुलांचे अति लाड करणे टाळणे ह्याकडे लक्ष द्या. मुलांपुढे स्वत:चा आदर्श ठेवा!

इ. मुलांचे मित्र बना. तुमच्या अपेक्षेपेक्षा मुले वेगळी वागली, तर त्याचे कारण समजून घेण्याचा प्रयत्न करा. योग्य मार्गदर्शन नसेल, कोणी त्यांना काय योग्य-अयोग्य, चूक-बरोबर हे समजावून सांगत नसेल, तर मुले संभ्रमात पडतात. प्रत्येक नवी पिढी जुन्या पिढीपेक्षा नवीन पद्धतीने जगायचा प्रयत्न करते. तुम्हीही हेच केले होते, हे लक्षात घ्या.

ई. मुलांच्या मित्रवर्तुळाकडे लक्ष ठेवा. संगतीचा चांगला आणि वाईट असे दोन्ही परिणाम होऊ शकतात. घरात सांगितलेल्या गोष्टी आणि बाहेर मिळणारी माहिती ह्यात तफावत असू शकते. शिवाय अयोग्य संगत, घरातील ताण, बिघडलेली नाती, सुसंवादाचा अभाव ह्या सर्वांचा एकत्रित परिणाम होऊन मुले खरोखरच बिघडू शकतात.

## ३ संस्कार म्हणजे...

**क. अधोरेखित शब्दांत उदाहरणाप्रमाणे बदल करा. त्यामुळे वाक्यरचनेतही बदल होईल. असे योग्य ते बदल करून उताऱ्याचा तो भाग परत लिहा.**

उदा॰ ह्या गोष्टी <u>करणाऱ्यांना</u> संस्कारी म्हटलं = जे ह्या गोष्टी करतात त्यांना संस्कारी म्हटलं -----



जुन्या रूढींचे आणि रीतिरिवाजांचे पालन करणे म्हणजेच सुसंस्कारित असणे का? संध्याकाळी परवचा म्हणणे, मोठ्यांना खाली वाकून नमस्कार करणे, बस किंवा ट्रेनमध्ये वयस्कर माणसांना, महिलांना उठून जागा देणे अशा गोष्टी मुलांना शिकवल्या म्हणजे त्यांच्यावर संस्कार झाले, असे म्हणून पालकांनी आनंद मानावा का?

हीच 'सुसंस्कारित' माणसे अनेकदा आपल्या घरातला कचरा घराबाहेर फेकून देताना, वेळी-अवेळी फटाके फोडताना दिसतात. असे <u>वागणाऱ्यांना</u> काय म्हणावे? सार्वजनिक स्वच्छतागृहात नीट पाणीही न <u>ओतणाऱ्यांना</u> काय म्हणावे? पान खाऊन जागोजागी <u>थुंकणाऱ्यांना</u> काय म्हणावे? रस्त्यात, सिनेमागृहात, नाट्यगृहात, अगदी कोठेही मोबाईल फोनवर मोठमोठ्याने बोलून आपले खाजगी आयुष्य सार्वजनिक <u>करणाऱ्यांना</u> आणि लोकांच्या कानांवर अत्याचार <u>करणाऱ्यांना</u> काय म्हणावे? रहदारीच्या नियमांचे पावलोपावली उल्लंघन <u>करणाऱ्याला</u> काय म्हणावं, आणि त्याच्या चुकीची जाणीव करून देण्याचा प्रयत्न <u>करणाऱ्याला</u> 'तुझ्या बापाचा रस्ता आहे का?' असे <u>सुनावणाऱ्याला</u> काय म्हणावे? असली वागणूक हे एक संस्कार नसल्याचे लक्षण आहे हे फारसे कुणाला पटलेले दिसत नाही.

जे संस्कार समाजात जबाबदार नागरिक म्हणून जगायची शिकवण देत नाहीत, त्यांना काहीही अर्थ नसतो. समाजात वावरताना एक जबाबदार नागरिक म्हणून जो वावरतो, आपल्याइतकाच दुसऱ्याही माणसाला निर्वेधपणाने जगायचा अधिकार आहे हे लक्षात घेतो, ज्या समाजात आपण जगतो आहोत त्या समाजाचे जीवन आपल्या वागण्याने अधिक दुःखमय होणार नाही, ह्याची काळजी घेतो, तोच देशाचे, समाजाचे आणि पर्यायाने स्वतःचेही सुसंस्कारित्व जगाला दाखवून देतो.

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

## ४ हो ला हो!

**कंसात दिलेल्या नाम + क्रियापद जोड्या योग्य जागी योग्य रूपात वापरा.**

(होयबा असणे, हो ला हो करणे, होकार देणे)



**बाबा :** हा तुझा काका म्हणजे (क) ---------------------- आहे नुसता.
**मिकी :** म्हणजे काय हो, बाबा?
**बाबा :** अरे, (ख) ---------------------------------------- म्हणजे जो नेहमी (ग) --------------------------------------------------. स्वतःचा काहीच विचार करत नाही.
**मिकी :** मग जो नेहमी सगळ्याला नाही म्हणतो त्याला 'नायबा' म्हणतात का हो, बाबा?
**बाबा :** म्हणजे काय आता?
**मिकी :** म्हणजे तुम्ही. मी काही मागितलं तर नेहमी नाहीच म्हणता ना?
**बाबा :** म्हणजे मी नायबा?
**मिकी :** हो, आणि आई तुमची (घ) --------------------, कारण ती तुमच्या (च) ------------------------------ करते.
**बाबा :** असं काही नाही. नायबा वगैरे काही नसतं. आणि आई नुसतं (छ) ----------------------------- नाही. नीट विचार करून तिचा (ज) -------------------------------------------.
**मिकी :** बाबा, तुम्ही कधी आईचे (झ) -------------------- असता का हो?
**बाबा :** असू शकतो!
**मिकी :** मग आज व्हाल?
**बाबा :** आज का?
**मिकी :** आईनं आत्ताच मला कबूल केलंय, की ती मला नवा व्हिडिओ गेम आणणारेय. मग बाबा, आज तुम्ही आईचे (ट) ---------------------- होणार ना, नक्की?

## ५ शब्दसंपदा – १

**उदाहरणात अधोरेखित केल्याप्रमाणे शेवटची दोन अक्षरे असलेली पाच विशेषणे लिहा आणि ते विशेषण ज्या नामाला चपखल बसेल, असे एक नाम त्याच्यासमोर लिहा.**

| क. | विशेषण | नाम |
|---|---|---|
| उदा॰ | दणद<u>णीत</u> | पराभव |
| १. | | |
| २. | | |
| ३. | | |
| ४. | | |
| ५. | | |

| ख. | विशेषण | नाम |
|---|---|---|
| उदा. | कुरकुरीत | पापड |
| १. | | |
| २. | | |
| ३. | | |
| ४. | | |
| ५. | | |

| ग. | विशेषण | नाम |
|---|---|---|
| उदा. | ठसठशीत | कुंकू |
| १. | | |
| २. | | |
| ३. | | |
| ४. | | |
| ५. | | |

## ६ गोष्ट पूर्ण करा.

खाली एका गोष्टीची सुरुवात दिली आहे. ती गोष्ट तुम्हाला पूर्ण करायची आहे.
गोष्टीतल्या अभिषेकला चांगलं वळण लागावं म्हणून आई एक युक्ती करते. काय असेल ही युक्ती? आई त्याला शिक्षा करेल? कसला तरी धाक घालेल? तो चांगला वागला तर त्याला कोणतं तरी बक्षीस द्यायचं कबूल करेल?

### अभिषेकची गोष्ट



अभिषेक दहा वर्षांचा आहे, चांगला पाचवीत आहे, हुशार आहे, पण त्याला वळण म्हणून नाही. अभिषेक शाळेतून आला, त्यानं दफ्तर सोफ्यावर टाकलं आणि धूम ठोकली. अभिषेक खेळून आला, त्यानं बूट दारातच फेकले आणि हात न धुता खायला सुरुवात केली. अभिषेक जेवून उठला, ताट तिथंच सोडून निघून गेला. अभिषेकनं हे केलं नाही. अभिषेकनं ते केलं नाही. एकूणच काय, तर अभिषेक घरात कुणाचंही ऐकत नाही, घरातल्या कुठल्याही कामाला हात लावत नाही...

आजही तेच झालं. ------------------------------------------------------------------------

आता मात्र आई खूपच रागावली. अभिषेकला चांगलं वळण लागावं म्हणून तिनं एक युक्ती योजली. दुसऱ्या दिवशी अभिषेक घरी आला, त्यानं नेहमीप्रमाणे पसारा केला, पण त्याला रागवायला घरात कुणीच नव्हतं. ना आई, ना बाबा, ना आजी ------------------------------------------------------------------------

## ७ शब्दसंपदा – २

**क. पुढील उतारा वाचा.**

समुपदेशक म्हणून ह्या आदिवासी भागातील शाळेत मी कामाला आरंभ केला, त्या वेळी माझ्या कामात पदोपदी अडथळे येणार आहेत ह्याची तिळमात्र कल्पना मला नव्हती. एक तर शाळेतील बहुसंख्य शिक्षक ह्या समुपदेशनाच्या कल्पनेच्या विरोधात होते, त्यामुळे शाळेतील सर्वात अंधारी आणि भकास खोली माझ्या वाट्याला आली. शाळेतील नाठाळ, व्रात्य, अभ्यास न करणाऱ्या मुलांना माझ्याकडे पाठवलं जाईल आणि त्यांच्याशी बोलून त्यांचं समुपदेशन करावं लागेल असं मला सांगण्यात आलं होतं. प्रत्यक्षात, ज्या मुलांना वर्गात सांभाळणं शिक्षकांना दुष्कर होई अशी मुलं माझ्याकडे रवाना केली जात आणि दिवसभर माझ्या खोलीत त्यांना डांबून ठेवण्यात येई. त्यांच्यावर अविरत पहारा करणं अशक्यच होतं. त्यांचा धुडगूस मला दिवसभर सहन करावा लागे. त्या मुलांपैकी ज्यांच्याशी मी संवाद साधू शकले असते, अशा मुलांची संख्या अत्यल्प होती. तशीही समाजातील वंचित वर्गातून आलेल्या मुलांची संख्याच शाळेत जास्त होती. त्यांच्याशी बोलताना त्यांच्या दैनंदिन जीवनाचं वास्तव किती दाहक आहे ह्याची कल्पना मला आली. असं वरवरचं समुपदेशन करून ह्यांच्या परिस्थितीत काही सुधारणा होणार नाही हे माझ्या लक्षात आलं, आणि म्हणूनच ही शाळेतली नोकरी सोडण्याचा आणि इथल्या वस्तीसाठी काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थेशी निगडित होण्याचा संकल्प मी सोडला.

**ख. उताऱ्यातील अधोरेखित शब्दांचे अर्थ पुढे दिले आहेत. त्यांपैकी योग्य अर्थाचे शब्द शोधून तक्त्यात लिहा.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | ------------------ = पावलोपावली | १०. | ------------------ = ठरवणे |
| २. | ------------------ = जराही | ११. | ------------------ = अत्यंत कमी |
| ३. | ------------------ = अवघड, कठीण | १२. | ------------------ = खरी परिस्थिती |
| ४. | ------------------ = रोजचे | १३. | ------------------ = बरेच / अनेक |
| ५. | ------------------ = पाठवणे | १४. | ------------------ = सुरुवात |
| ६. | ------------------ = कोंडून ठेवणे | १५. | ------------------ = जाळणारे, चटके देणारे |
| ७. | ------------------ = सतत | १६. | ------------------ = अभावग्रस्त |
| ८. | ------------------ = जोडले जाणे, संलग्न होणे | १७. | ------------------ = बोलणे |
| ९. | ------------------ = मस्ती, गोंधळ | | |

**ग. उताऱ्यातील अधोरेखित शब्दांच्या ऐवजी त्यांचे अर्थ वापरून योग्य ते बदल करून उतारा पुन्हा लिहा.**

------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------

## ८ शब्दसंपदा – ३

**क. जोड्या लावा.**

| | वाक्प्रचार | अर्थ |
|---|---|---|
| अ. | तोंड सोडणे | १. निघून जाणे |
| आ. | तोंड वासून पाहणे | २. आनंदाने तोंड गोड करणे |
| इ. | तोंडाला कुलूप लावणे | ३. वाटेल तसे बोलणे, अपशब्द बोलणे |
| ई. | तोंडचे पाणी पळणे | ४. पश्चात्ताप होणे |
| उ. | तोंडात मारून घेणे | ५. आश्चर्याने पाहणे |
| ऊ. | तोंड काळे करणे | ६. मोह निर्माण होणे |
| ए. | तोंडात शेण घालणे | ७. संकटात टाकणे |
| ॲ. | तोफेच्या तोंडी देणे | ८. गप्प बसणे |
| ऐ. | तोंडघशी पाडणे | ९. विश्वासघात करणे |
| ओ. | तोंडाला पाणी सुटणे | १०. खूप भीती वाटणे |
| ऑ. | तोंडात साखर पडणे | ११. समाजात छीः थूः होणे |



**ख. वाक्ये पूर्ण करा.**

अ. असं वागून तू आपल्या सगळ्या कुटुंबालाच लाज आणली आहेस. शहाणा असशील तर तू ह्या घरातूनच काय, पण ह्या गावातूनही ------------------- ------------------- -------------------.

आ. कुठं कसं बोलावं आणि कसं वागावं ह्याचं मालिनीला काहीच तारतम्य नाही. रागावली, की समोर कोण आहे ह्याचंही भान तिला राहत नाही. कोणावरही ------------------- -----------------.

इ. ह्या सगळ्या प्रकरणात मिथिलाची काहीच चूक नाही. रागीट बॉसकडे तिची तक्रार करून तू तिला ------------------------- -------------------------- ------------------------.

ई. कोणत्याही गोष्टीवर विचार न करता पटकन बोलण्याच्या आपल्या सवयीमुळे आपण नको ती गोष्ट नको तिथे बोलून बसलो आहोत हे लक्षात आल्यावर वैदेहीनं स्वतःच्याच ---------------------- -------------------------- -----------------------.

उ. जगदीशनं मला चांगली नोकरी लावून देण्याचं आश्वासन दिलं होतं म्हणून मी इतकं मोठं घर भाड्यानं घेतलं, पण आयत्या वेळी त्यानं मला ----------------------------- -----------------------. मोठी काय एखादी छोटी नोकरीही तो मला देऊ शकला नाही.

ऊ. लहानपणी रूपानं अतिशय सामान्य असणारी संगीता तारुण्यात इतकी सुंदर दिसतेय ह्यावर कोणाचा विश्वासच बसेना. सगळे -------------- ----------------- ----------------- -----------------.

ए. आमचा विश्वासघात झाल्याचं कळल्यावर खरं तर मी खूप संतापलो होतो, पण तोंडातून काही वावगा शब्द जाऊ नये म्हणून मी ---------- ---------- ----------.

ॲ. 'सर, तुमचा फोन नंबर एका लॉटरीसाठी निवडला गेलाय' असा निरोप मिळाला आणि आपल्याला आता खूप मोठं बक्षीस मिळणार ह्या कल्पनेनंच रोहितच्या ---------- ---------- ----------.

ऐ. काय सांगतोस! मी स्पर्धापरीक्षेत पास झाल्याचं तुला आतून कळलंय? ही बातमी जर खरी असेल, तर तुझ्या ---------- ---------- ---------- ----------!

ओ. सहलीला आलो आणि पावसामुळे ह्या छोट्याशा बेटावर अडकून पडलो. भरती सुरू झाली आणि चोहीकडून समुद्राच्या पाण्याची पातळी वाढू लागली. ते पाहिलं आणि भीतीनं आमच्या सर्वांच्याच ---------- ---------- ----------.

ऑ. मी तुला वेळोवेळी सावध करत होतो, तरी तू खातरजमा न करता मोहिनीताईंविषयी वाईटसाईट अफवा उठवत होतास. आता तू उघड उघड खोटा पडलायस. लोक आता मोहिनीताईंच्या नाही, तुझ्या ---------- ---------- ----------.

**ग. पुढे दिलेल्या क्रियापदांपैकी योग्य ती तीन क्रियापदे 'अ' ह्या वाक्यापुढे आणि तीन 'आ' ह्या वाक्यापुढे लिहा.**

(लोटणे, ढकलणे, सापडणे, टाकणे, अडकणे, पडणे)

अ. कोणी तरी आपल्याला चुकून अथवा मुद्दाम संकटात – ----------, ----------, ----------

आ. आपण स्वतःच चुकून किंवा मुद्दाम संकटात – ----------, ----------, ----------

**घ. आता हीच क्रियापदे योग्य जागी वापरून पुढील उतारा पूर्ण करा. प्रत्येक क्रियापद एकेकदा वापरण्याचा प्रयत्न करा.**



अजयनं सांगितलं म्हणून मी लवकर पोचण्यासाठी त्या आडवाटेनं निघालो खरा, पण ह्या वाटेनं जाण्यात बराच धोका आहे, हे माझ्या लवकरच लक्षात आलं. संध्याकाळ होत आली होती. लवकरच अंधार पडणार होता. ह्या रस्त्यावर दिवेही नव्हते. लवकरात लवकर ह्या वाटेवरून बाहेर पडायला हवं, नाही तर आपण कोणत्या तरी संकटात (अ.) ----------, हे माझ्या लक्षात आलं, म्हणून मी गाडीचा वेग वाढवला. मनातल्या मनात मी अजयला शिव्याही देत होतो. का (आ.) ---------- त्यानं मला ह्या संकटात? खरं तर उगाचच कोणाला संकटात (इ.) ----------चा त्याचा स्वभाव नाही. ही वाट इतकी निर्जन आणि ओसाड आहे हे त्याला नक्कीच माहीत असणार. तरीही का (ई.) ---------- असेल त्यानं मला ह्या संकटात? माझाच मूर्खपणा झाला. मीच जास्त विचार न करता त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवला. चला, आता (उ.) ---------- ह्या संकटात, तर शोधू या काही तरी उपाय. नाही तरी संकटात (ऊ.) ----------शिवाय त्यातून मार्ग कसा काढायचा, हे कसं कळणार?

## ९ ‘क्रियापद + ‘हवा’

**क. कंसात दिलेल्या क्रियापदांपैकी योग्य त्या क्रियापदाचे योग्य ते रूप + ‘हवा’ ह्या शब्दाचं रूप घालून उदाहरणाप्रमाणे वाक्ये बनवा.**

(होणे, खाणे, मिळणे, जमणे, निघणे, करणे, देणे, घेणे, होणे, लागणे)

स्वरा आणि चैतन्य, तुम्ही दोघं आता मोठे झालात. काही घरातली आणि काही बाहेरची कामं करण्याची सवय आता तुम्हाला व्हायला हवी. स्वतःची काळजी आता तुम्ही स्वतःच (अ.) ---------- ----------. प्रत्येक वेळी भूक लागली आणि (आ.) ---------- ---------- असेल, तर आईला किंवा आजीला कशाला हाक मारायची? थोडाफार स्वयंपाकही आता (इ.) ---------- ----------. स्वरा, तू बँकेची कामं (ई.) ---------- ----------, आणि चैतन्य, तू घरातील साफसफाईकडे लक्ष (उ.) ---------- ----------. मी आणि बाबा दिवसभर ऑफिसात असतो. आजी किती दिवस सगळं बघणार? तिलापण आता विश्रांती (ऊ.) ---------- ----------. आणि बरं का, ही कामं करताय म्हणून अभ्यासाकडे दुर्लक्ष नको. अभ्यासही वेळेवर (ए.) ---------- ---------- आणि परीक्षेचा निकालही चांगलाच (अॅ.) ---------- ----------. चला, आता मला (ऐ.) ---------- ----------, उशीर होईल नाही तर ऑफिसात पोचायला.

## १० वारसा

मला काहीच वाटलं नाही
पेरून ठेवताना फेंदारलेल्या मिश्यांचे नाकतोडे
तुझ्या भुरभुरणाऱ्या केसांआडून लकाकणाऱ्या डोळ्यांपुढे
उमटणाऱ्या अनेक निरागस वाटांवर;
मी करून ठेवली होती तरतूद तुझ्या सुरक्षित भविष्यकाळाची
की आपोआप उगवून येतील हवे तेवढे नाकतोडे
तुझ्या मनात उमलणाऱ्या वाटांसमोर
तुला रोखण्यासाठी.



मी बळेच खुपसत गेले माझे बोट, तुला नको असताना
रस्त्यावर दुडदुड धावताना फ्रॉकचा घेर पकडणाऱ्या तुझ्या हातात
आणि करून टाकली सवय वेळीच तुझ्या हातांना
चाचपडण्याची, दुसऱ्याचे बोट शोधीत.

मी नियमपूर्वक देत राहिले एक ठाशीव ‘नाही’
पदर ओढीत तू हळूच केलेल्या प्रत्येक मागणीस
अन् मागे रेंगाळून रस्त्यात दुकानांच्या पायऱ्यांवरून
उड्या मारत खिदळणाऱ्या तुला केवढ्यांदा ओरडत गेले
तुझ्या मनावर दृढ संस्कार करेपर्यंत

की जे आपल्याला करावंसं वाटतं
ते शक्यतो करायचं नसतंच.
उशीर करून घरी आलेल्या तुला
मी सांगत राहिले
घराबाहेरच्या अंधारातल्या अनेक बागुलबुवांच्या गोष्टी
तुला स्वतःलाच बागुलबुवा दिसू लागेपर्यंत.

अन् जेव्हा खेकसले मी तुझ्यावर, दबलेल्या आवाजात,
असं पाय फाकून न बसण्याबद्दल :
मी जवळजवळ पुरं केलं होतं माझं ऐतिहासिक कर्तव्य
तुला एक जबाबदार भेकड स्त्री बनवण्याचं,
माझा सांस्कृतिक वारसा तुझ्यापर्यंत पोचवण्याचं.

- हेमंत जोगळेकर

**क. शब्दाच्या योग्य त्या अर्थापुढे खूण करा.**

| | | |
|---|---|---|
| अ. | फेंदारलेल्या मिश्या | (१) कापलेल्या मिश्या (२) वाढलेल्या मिश्या<br>(३) अस्ताव्यस्त पसरलेल्या मिश्या |
| आ. | नाकतोडे | (१) नाकात घालण्याचा दागिना (२) एक कीटक (३) नाकाचा रोग |
| इ. | भुरभुरणारे केस | (१) भुऱ्या रंगाचे केस (२) वाऱ्यामुळे उडणारे केस (३) कुरळे केस |
| ई. | लकाकणारे डोळे | (१) चमकणारे डोळे (२) स्वच्छ डोळे (३) वटारलेले डोळे |
| उ. | तरतूद | (१) व्यवस्था (२) सोय (३) माहिती |
| ऊ. | खुपसणे | (१) चिकटवणे (२) ओढणे (३) कशाच्या तरी आत जोराने घालणे |
| ए. | दुडदुड धावणे | (१) लंगडी घालणे (२) जोरात धावणे (३) लहान बाळाचे धावणे |
| ॲ. | चाचपडणे | (१) घट्ट धरणे (२) हात लावून दिशेचा अंदाज घेणे (३) हात सोडणे |
| ऐ. | ठाशीव | (१) अंधुक (२) कळेल न कळेल असं (३) ठळक |
| ओ. | खिदळणे | (१) खूप मोठ्याने हसणे (२) गालातल्यागालात हसणे<br>(३) स्मितहास्य करणे |
| ऑ. | बागुलबुवा | (१) एक काल्पनिक भयंकर प्राणी (२) ढोंगी साधू<br>(३) बिगुल वाजवणारा माणूस |
| औ. | खेकसणे | (१) हळूच सांगणे (२) कुजबुजणे<br>(३) खूप रागाने जोर देऊन बोलणे |
| अं. | भेकड | (१) भित्रा (२) बोकड (३) बावळट |

**ख. वरील कवितेतील प्रत्येक कडव्यात आई मुलीवर करत असलेल्या संस्कारांचे वर्णन प्रतीकात्मक पद्धतीने केले आहे. डाव्या रकान्यातील वाक्यांत व्यक्त केलेला आशय कवितेत कोणत्या शब्दात मांडला आहे ते उजव्या रकान्यात लिहा.**

| | | |
|---|---|---|
| उदा॰ | मनातील इच्छा-आकांक्षांना रोखण्यासाठी आधीच वाटेत अडथळे निर्माण करून ठेवणे | पेरून ठेवले फेंदारलेल्या मिश्यांचे नाकतोडे तुझ्या भुरभुरणाऱ्या केसांआडून लकाकणाऱ्या डोळ्यांपुढे उमटणाऱ्या अनेक निरागस वाटांवर |
| अ. | सतत दुसऱ्याचा आधार घेण्याची सवय लावणे | |
| आ. | मन मारून जगण्याची शिकवण देणे | |
| इ. | मनात बाहेरील जगातील काल्पनिक संकटांची भीती निर्माण करणे | |
| ई. | सतत रागावून बोलून मुलीच्या मनातील आत्मविश्वास घालवणे आणि तिला दुबळे बनवणे. | |

**ग. वरील कविता उदाहरणाप्रमाणे गद्य रूपात लिहा.**

उदा॰ कडवे १ : तुझ्या भुरभुरणाऱ्या केसांआडून लकाकणाऱ्या डोळ्यांपुढे
उमटणाऱ्या अनेक निरागस वाटांवर
फेंदारलेल्या मिश्यांचे नाकतोडे पेरून ठेवताना
मला काहीच वाटलं नाही.
तुझ्या मनात उमलणाऱ्या वाटांसमोर आपोआप हवे तेवढे नाकतोडे
तुला रोखण्यासाठी उगवून येतील
अशा प्रकारे मी तुझ्या सुरक्षित भविष्यकाळाची तरतूद करून ठेवली होती.

कडवे २ :

कडवे ३ :

कडवे ४ :

कडवे ५ :


**घ. आता ही कविता तुम्हाला जास्त चांगली समजली का? वर्गात सहाध्यायांबरोबर कवितेचा विषय आणि आशय ह्यांविषयी चर्चा करा, त्यासाठी पुढील प्रश्नांचा विचार करा.**

मुलीला वळण लावण्याकरता आई कोणकोणते उपाय योजते? हे सर्व उपाय तुम्हाला योग्य वाटतात का? नसल्यास का नाही? हे सर्व उपाय आई मनापासून करतेय, की निरुपायाने?

## ११ नाम – क्रियापद जोड्या

**क. खाली दिलेल्या क्रियापदांपैकी योग्य ती क्रियापदे योग्य त्या नामापुढे लिहा. 'हात' ह्या नामापुढे योग्य ती पाच तर इतर नामांपुढे प्रत्येकी तीन क्रियापदे निवडून लिहा.**

(दाखवणे, असणे, विचकणे, उगारणे, दाखवणे, काढणे, लवणे, घालणे, फडफडणे, चोळणे, हलवणे, चालवणे, धरणे, मारणे, लावणे, सुटणे, लागणे)




**ख. वरील नाम-क्रियापदांच्या जोड्या खालील वाक्यात योग्य जागी वापरून वाक्ये पूर्ण करा.**

**अ. हात :**

१. आमचे वडील आम्हाला कधीच मारत नसत, पण आमचे आजोबा फार संतापी होते. आमची जराशी चूक झाली तरी ते आमच्यावर ------------ ------------ असत.

२. हे काम जर वेळेवर पूर्ण करायचे असेल, तर तुला जरा भरभर ------------ ------------ लागतील.

३. विशाल इतका आळशी आहे! वेळेवर कुठलेही निर्णय घेत नाही. मग आलेली संधी गेली म्हणून ------------ ------------ बसतो.

४. रसिका उत्कृष्ट भरतकाम करते. मला नाही वाटत, की ह्या परिसरात ह्या कलेत कोणी तिचा ------------ ------------ शकेल.

५. त्या लांबच्या प्रवासात आम्हाला त्या बडबड्या माणसाची छान सोबत मिळाली म्हणून आम्ही खूश होतो. घरी आल्यावर आबांचं पैशाचं पाकीट गायब झाल्याचं आमच्या लक्षात आलं. आबांच्या खिशावर त्यानं कधी ------------ ------------, कोणाला कळलंच नाही.

**आ. धाक :**

१. शाळेत असताना आमच्या गणिताच्या मास्तरांचा आम्हाला भारी ------------------- ------------------.




२. आमच्या घरासमोर असलेल्या पिंपळावर मुंजा राहतो आणि तो दिवेलागणीनंतर तिथून येणाऱ्या मुलांच्या मानगुटीवर बसतो असा दादानं आम्हाला ------------------- ------------------ होता.

३. "हे बघ मंजूषाताई, तू मला उगीच कोणाचा ------------------- ------------------- नकोस. मी आता चांगला पाच वर्षांचा आहे, मला नाही कुणाची भीती वाटत," छोटा अभी मोठमोठ्याने मंजूषाला सांगत होता.

**इ. दात :**

१. इतकं हसायला काय झालं? चिखलात माझा पाय जरा घसरला, तर एवढे ------------------ ------------------ नकोयत काही!

२. एवढ्यातेवढ्याला ------------------- ------------------- सवयच आहे जयश्रीला.

३. रागिणी, बाईनं मंद हसावं. उगाच ------------------- ------------------- नयेत. किती वेळा सांगू तुला?

**ई. पापणी :**

१. सकाळपासून माझी ------------------- -------------------. काही अमंगल तर नाही ना होणार?

२. इतक्या मोठ्या अफरातफरीसाठी त्यांना अटक झाली, पण त्यांचा निर्लज्जपणा बघा! पोलीस त्यांना बेड्या घालून नेत होते, इतके लोक बघत होते, पण त्यांनी ------------------- ------------------ नाही.

३. आमचे वैद्य म्हणतात "------------------ ------------------ हे वातप्रकृतीचं लक्षण आहे. शुभ किंवा अशुभाचा त्याच्याशी काही संबंध नाही."

**उ. सवय :**

१. लहानपणापासूनच मुलांना चांगल्या ------------------ ------------------.

२. आई-वडिलांचे लक्ष नसेल तर नको त्या गोष्टींची ---------------- ---------------- वेळ लागत नाही, आणि ती ------------------ मग सहजासहजी ------------------ नाही.

**ग. धाक, धास्ती, भीती, वचक, धसका, भय, दरारा**

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | धाक | वाटणे, असणे, घालणे | मला माझ्या आजोबांचा धाक आहे / वाटतो. आई मला आजोबांचा धाक घालते. |
| आ. | धास्ती | वाटणे, असणे | शाळेतील रागीट मास्तरांची आम्हाला धास्ती वाटे / होती |
| इ. | भीती | वाटणे, असणे, दाखवणे | मला अंधाराची भीती वाटते / आहे. दादा मला भुताची भीती दाखवतो. |
| ई. | भय | वाटणे, असणे | कसलं भय आहे तुला? कसलं भय वाटतंय तुला? |
| उ. | वचक | असणे | सगळ्या कार्यालयाला त्या अधिकाऱ्याचा वचक आहे. |
| ऊ. | दरारा | असणे | त्या पोलीस अधिकाऱ्याचा दरारा मोठा आहे. |
| ए. | धसका | असणे, घेणे | आजारपणाचा धसकाच घेतलाय त्यानं. अगदी जपून राहतो. |

**घ. वरील तक्त्यातील योग्य ती नाम- क्रियापद जोडी वापरून वाक्ये पूर्ण करा.**

अ. आमचे शिक्षक फार कडक होते, शाळा सोडून इतकी वर्षं झाली, तरी अजून त्यांचा ------------ मनात ताजा ------------.

आ. अंधारात तो ह्या खोलीतून त्या खोलीतही जात नाही. अंधाराची त्याला खूप ------------ ------------.

इ. रावसाहेबांना सगळेच घाबरतात. ह्या गावात त्यांचा मोठाच ------------ ------------.

ई. एवढं कसलं ------------ ------------ तुझ्या मनात? त्या सुनसान वाड्याकडे तू भरदिवसाही फिरकत नाहीस.

उ. त्या भयानक बॉम्बस्फोटाचा त्याने इतका ------------ ------------, की कोणी मोठ्यानं टाळी वाजवली तरी तो थरथरतो.

ऊ. मुलांवर ------------ ------------ तर वर्ग काबूत ठेवणे शिक्षकांना अवघड जाते असे दाते मास्तरांचे मत होते.

ए. तुला तर स्टेजवर यायचीच ------------ ------------. तू कशी चांगली अभिनेत्री होणार?

## १२ दासबोध

**क. सतराव्या शतकात श्री. समर्थ रामदासस्वामींनी दासबोधातून केलेला हा उपदेश स्वतःच्या शब्दांत थोडक्यात लिहा आणि समजावून घ्या.**



**दासबोध**

|| श्रीराम ||

श्रोतां व्हावे सावधान | आतां सांगतों उत्तम गुण | जेणें करितां बाणे खुण | सर्वज्ञपणाची ||१||
वाट पुसिल्याविण जाऊं नये | फळ वोळखिल्याविणं खाऊं नये | पडिली वस्तु घेऊं नये | येकायेकीं ||२||
अति करूं नये | पोटीं कपट धरूं नये | शोधिल्याविण करूं नये | कुळहीन कांता ||३||
विचारेंविण बोलों नये | विवंचनेविण चालों नये | मर्यादेविण हालों नये | कांहीं येक ||४||
प्रीतीविण रुसों नये | चोरास वोळखी पुसों नये | रात्रीं पंथ क्रमूं नये | येकायेकीं ||५||
जनीं आर्जव तोडूं नये | पापद्रव्य जोडूं नये | पुण्यमार्ग सोडूं नये | कदाकाळीं ||६||
निंदा द्वेष करूं नये | असत्संग धरूं नये | द्रव्यदारा हरूं नये | बळात्कारें ||७||
वक्तयास खोदूं नये | ऐक्यतेसी फोडूं नये | विद्याअभ्यास सोडूं नये | काही केल्या ||८||
तोंडाळासीं भांडों नये | वाचाळासीं तंडों नये | संतसंग खंडूं नये | अंतर्यामीं ||९||
अति क्रोध करूं नये | जिवलगांस खेदूं नये | मनीं वीट मानूं नये | सिकवणेचा ||१०||

**शब्दार्थ -**

**बाणे** = आत्मसात होते / भिनते, **सर्वज्ञपण** = सर्वज्ञानी असणे, **पुसिल्याविण** = न विचारता, **वोळखिल्याविणं** = न ओळखता, **येकायेकीं** = अचानक / एकट्याने, **कुळहीन** = असंस्कारी, **कांता** = पत्नी, **विवंचना** = काळजी, **वोळखी** = ओळख, **पुसों नये** = विचारू नये, **पंथ** = रस्ता, **आर्जव** = विनम्रता, **द्रव्य** = संपत्ती, **कदाकाळीं** = कधीही, **दारा** = पत्नी, **वक्तयास** = बोलणाऱ्यास, **खोदूं नये** = अडवू नये, **ऐक्यतेसी** = एकतेला, **तोंडाळ** = भांडकुदळ, **वाचाळ** = जास्त बोलणारा, **तंडो नये** = भांडू नये, **खंडूं नये** = सोडू नये, **अंतर्यामीं** = मनात, **जिवलगांस** = जवळच्या माणसांना, **खेदूं** = दुखवू, **वीट** = कंटाळा, **सिकवणेचा** = शिकवणीचा

**ख. हा उपदेश आज एकविसाव्या शतकातही किती यथार्थ आहे? ह्यातील कोणते सल्ले तुम्ही आजही मानाल? का? थोडक्यात लिहा.**

**समर्थ रामदास स्वामी :** जन्म-नाव नारायण सूर्याजी ठोसर, हे महाराष्ट्रातील सतराव्या शतकातील कवी आणि समर्थ संप्रदायाचे संस्थापक होत. रामदास स्वामी अविवाहित राहिले आणि त्यांनी आयुष्यभर आपल्या लेखनातून समाजाला शिकवण दिली. धर्मकारणात राजकारण अंतर्भूत करणारे रामदास हे एकमेव महाराष्ट्रीय संत होते. पर्यावरण ह्या विषयावरही त्यांनी समाजाचे प्रबोधन केले. त्यांची शिष्यपरंपरा आजही जिवंत आहे.

# १० पाणी









## चला, शिकू या ...

- ‘पाणी’ ह्या विषयावरील शब्दसंपदा अभ्यासणे
- ‘पाणी’ ह्या विषयावरील साहित्यिक उतारे वाचणे, समजणे, त्यांवर चर्चा करणे
- पाण्याची समस्या ह्या विषयाचा अभ्यास करणे, त्यावर बोलणे
- पाणी प्रश्नावर झालेल्या आणि सुरू असलेल्या चळवळींबद्दल वाचणे, त्यावर चर्चा करणे

## १ पाणी

**क. शब्दसंपदा**

**अ. शब्दकोडे सोडवा.**




**उभे शब्द :** **१.** समुद्राची जमिनीला टेकलेली बाजू, **२.** वेगाने वाहणारे पाणी, **३.** पाणी साठवण्याचे मातीचे मोठे मडके, **४.** जमिनीने वेढलेला पाण्याचा मोठा साठा, **५.** नदी, कालवा यांतून वाहणारे पाणी, **६.** पाण्याच्या तळाशी उगवणारी वनस्पती, **७.** लहान खड्ड्यात पाणी साचले की हे तयार होते, **८.** मराठी महिन्यांतला पाचवा (पावसाचा) महिना, **९.** विशिष्ट दाब देऊन उडवलेले पाणी, **१०.** गुरुत्वाकर्षणामुळे समुद्राच्या पाण्याच्या पातळीत होणारा नियमित चढ, **११.** नदीचे पाणी अडवण्यासाठी बांधलेली कमी उंचीची भिंत, **१२.** अतिवृष्टीमुळे नदीच्या पाण्याची वाढलेली पातळी

**आडवे शब्द :** **१.** डोंगरातून उगम पावणारे पाणी, **२.** पाण्याचा निसर्गनिर्मित कालवा, **३.** नदीच्या दोन्ही बाजूचा भूप्रदेश, **४.** अशुद्ध पाण्याचा कालवा, **५.** नदी, तळे यांतील खोल भाग, **६.** नैसर्गिक किंवा कृत्रिम बलाने पाणी जोरात वर उडणे, **७.** बऱ्याच उंचीवरून थेट खाली कोसळणारे पाणी, **८.** नदीचे पाणी अडवण्यासाठी बांधलेली मोठी भिंत, **९.** पाण्याचे गरम किंवा थंड वायुरूप, **१०.** पाण्याचे गळणे, **११.** अतिथंडीमुळे पावसाचे पडणारे बर्फरूप, **१२.** पाणी, वारा इ.ची लाट

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १. | | २. | | | ३. | | | | | ५. |
| | | | | | ३. | | | ४. | | | |
| १. | | | | | | | ४. | | | ५. | |
| | | ६. | | | ७. | | | | | | |
| | | | | ७. | | | | | | ८. | |
| ६. | | | | | | | | | | | |
| | | | | ९. | | | | ८. | | | |
| | | १०. | | ९. | | | ११. | | | | १२. |
| | | | | | | | | | १२. | | |
| १०. | | | | | | ११. | | | | | |

**आ. अचूक विशेषण ओळखा.**



१. ज्यात पाण्याचे प्रमाण जास्त आहे असे; ज्यात साखर, मीठ, तिखट असे काहीही घातलेले नाही किंवा कमी घातलेले आहे असे : ---------------------- पेय (पांचट / खवचट / रागीट)

२. जे तेजस्वी व चमकदार आहेत असे : ---------------------- डोळे (नक्षीदार / तडफदार / पाणीदार)

३. जिथे पाण्याचे प्रमाण अधिक असते तो ---------------------- भाग. (तळे / पाणथळ / स्थळ)

४. ज्यावर पडणारे पावसाचे सर्व पाणी एखाद्या विशिष्ट नदीस / पाणीसाठ्यास येऊन मिळते : ---------------------- क्षेत्र (पाणलोट / पावसाळी / झाडलोट)

५. मोठ्या धारेच्या स्वरूपात होणारा : ---------------------- पाऊस (मुसळधार / संततधार / धारदार)

६. उथळ / वरवरचा नाही असा : ---------------------- डोह (गोल / अनमोल / खोल)


७. खोल नसलेला असा : ---------------------- तलाव (अढळ / उथळ / सढळ)

८. स्वच्छ, गाळ नसलेले असे : ---------------------- जलाशय (निरोगी / निरामय / नितळ)

९. मातीने युक्त असे : ---------------------- डबके (चिखल / निर्मळ / गढूळ)

१०. घसरून पडण्याजोगी अशी : ---------------------- जागा (पसरडी / निसरडी / चिकट)

**इ. आता वरील विशेषणांचा योग्य वापर करून रिकाम्या जागा भरा.**



१. पावसामुळे तिथे फार ---------------------- झाले होते. चालताना काळजी घ्यावी लागत होती.

२. “आमचे गाव ---------------------- भूभागांनी वेढलेले आहे. म्हणून पाण्याची इतकी समस्या नाही आमच्याकडे.”

३. कप्तानाने ---------------------- पाण्यातून जहाज नेताना आपल्या नकाशाकडे अधिक लक्ष देण्याची गरज असते.

४. “किती ---------------------- झालंय हे टोमॅटोचं सार! टोमॅटो कमी आणि पाणीच जास्त!”

५. “पावसाळ्यात आमच्या नळातून नेहमी ---------------------- पाणी येते. अशा वेळी पाणी उकळून प्यायलेले बरे असते.”

६. कुठल्याही नदीत पोहायला उतरताना आधी पाणी किती ---------------------- आहे हे पाहायला पाहिजे.

७. शहरातले पाणी इतके दूषित असताना गावातल्या नदीतले पाणी मात्र ---------------------- आणि शुद्ध आहे, हे पाहून संशोधकांनी गावातल्या पाण्याचा अभ्यास सुरू केला.

८. मुंबई शहराला गेल्या वर्षी ---------------------- पावसाने चांगलेच झोडपले.

९. ---------------------- क्षेत्र हा पाऊस आणि भूजल यांच्यामधील महत्त्वाचा दुवा आहे. ह्या क्षेत्राचे जर वनीकरण झाले असेल, तर गवत, झाडेझुडपे यांच्यामुळे त्याच्यात पावसाचे धक्के सहन करण्याची ताकद आलेली असते.

१०. तिचे डोळे ---------------------- आणि ओठ हसरे होते.

**ई. पाणी कसे आहे ते लिहा.**

**आंबट, शेवाळलेले, गोडे, तुंबलेले, तुरट, शुद्ध, मचूळ, खारे**

१. खारट नाही आणि गोडही नाही असे : ----------------------
२. शेवाळ असलेले : ----------------------
३. दूषित नाही असे : ----------------------
४. अडलेले, वाहून न जाणारे असे : ----------------------
५. क्षार असलेले, समुद्राचे : ----------------------
६. खाऱ्या पाण्यावर प्रक्रिया झालेले : ----------------------
७. लिंबाचे पाणी : ----------------------
८. तुरटीप्रमाणे चव असलेले : ----------------------

**उ. रिकाम्या जागी योग्य शब्द वापरून वाक्य पूर्ण करा.**

**रात्र, क्षण, आयुष्य, टीच, नख, मैल, पोट, घर, तांब्या, जग, मूठ, पान, घागर, कण, दिवस, घटका, मन, देश, हात, ढीग, ओंजळ, हंडा**

१. जागतिक तापमानवाढीमुळे ----------------------भर पावसाची अनियमितता दिसते.
२. सुख ----------------------भर गोष्टींमध्ये लपलेलं असतं, फक्त ते ----------------------भर जगता आलं पाहिजे.
३. चेन्नईमध्ये 'अम्मा किचन' योजनेंतर्गत गोरगरीबांसाठी केवळ दहा रुपयात ---------------------- भर जेवणाची सोय झाली आहे.
४. "अभिनंदन, तुझ्या कार्यक्रमाचे आजच्या वृत्तपत्रांनी ----------------------भर कौतुक केले आहे."
५. नेता ओरडून ओरडून बोलत होता, "शेतकऱ्यांच्या नशिबी ----------------------भर सुख आणि ----------------------भर दुःख असेच जगणे लिहून ठेवले आहे." शेतकरीही चिडून नेत्याला म्हणाले, "----------------------भर आश्वासनांपेक्षा ----------------------भर मदत केव्हाही चांगली!"
६. 'सोशल ॲक्शनिस्ट फाउंडेशन'ने '----------------------भर धान्य, ----------------------भर पाणी' या संकल्पनेच्या माध्यमाने चौकाचौकांत पक्ष्यांसाठी पाणवठे तयार करण्याचे काम हाती घेतले आहे.
७. महात्मा गांधी ----------------------भर ग्रामस्वराज्याचे स्वप्न पाहत आले होते.
८. "आपल्याला ----------------------भर पाणी नाही मिळालं तरी चालेल, पण थोड्याच दिवसांत पुढाऱ्यांना ----------------------भर पाणी पाजायचंच!" असा निर्धार दुष्काळी भागातील बायकांनी केला.
९. तिवरे धरणफुटीत घरदार वाहून गेलेल्या लोकांच्या मदतीसाठी धावून आलेल्या कार्यकर्त्यांनी ----------------------भर विश्रांती घेतली.
१०. ----------------------भर विचार केला तर आपल्या लक्षात येईल : जगातील प्रत्येक माणूस कोणत्या ना कोणत्या दुःखाने अस्वस्थ झालेला असतो.
११. गावातील बायकांना ----------------------भर पाण्यासाठी ---------------------- भर पायपीट करावी लागत आहे.



१२. पंतप्रधानांच्या आवास योजनेचे ..................... भर स्वागत झाले आहे.

१३. "अरे, किती दंगा करताय! आणि काय हे! ..................... भर सामान सगळं अस्ताव्यस्त करून ठेवलंय. कोण आवरणार आता?"

१४. "पोटदुखीमुळे आजीला ..................... भर झोप आली नव्हती. शेवटी सकाळी तिला डॉक्टरांकडे न्यावं लागलं."

१५. शहरात आज ..................... भर पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली आहे.

**ऊ. कंसातील शब्दांचा योग्य वापर करून रिकाम्या जागा भरू या.**

(झंझावात, घटका, साक्षी, नेत्रदीपक, घोष, ढांग, उजाड, संगम, प्रतीक, तीर्थक्षेत्र, जिवाभावाचे, वजा होणे, उदय, विसावा, फारकत होणे)



१. लांबलांब ..................... टाकत पळाल्यामुळे शर्यतीत तो लवकरच दमला.

२. रस्ता रुंदीकरणासाठी हजारो वृक्ष तोडून शहराला अगदी ..................... करून टाकलंय.

३. समुद्री ..................... मध्ये नष्ट झालेल्या जहाजातील असंख्य लोक मरण पावले.

४. "हल्लीच्या चित्रपटांची वास्तवापासून एवढी का ..................... झाली आहे, कळत नाही!"

५. "गोंगाट करणाऱ्या अनेक गोष्टींमुळे आयुष्यातून शांतता ..................... आहे."

६. प्रतिभावंत नाटककार वसंत कानेटकर आणि अभिनेता डॉ॰ काशिनाथ घाणेकर अगदी ..................... चे मित्र होते.

७. खडकवासला धरणाच्या अलीकडे आंबी व मोशी ह्या मुठेच्या उपनद्यांचा ..................... होतो व तो एकत्रित प्रवाह मुठेला मिळतो.

८. एकेकाळच्या वर्गमित्रांना एकत्र आणून त्यांच्या ..................... ने वृद्धाश्रमाची पायाभरणी करण्याचा अनोखा कार्यक्रम गौरीशंकरने केला.

९. सूर्याचा ..................... झाल्यानंतर चांदण्या दिसेनाशा होतात.

१०. नाशिकमधील वेदांत मुंदडा याने दृष्टिहीन असूनही बारावीच्या परीक्षेत ९१ टक्के गुण मिळवून ..................... यश संपादित केलं आहे.

११. बनारस हे भारताच्या उत्तर प्रदेश राज्यातील एक शहर ..................... म्हणून प्रसिद्ध आहे. असंख्य भाविक तिथे देवदर्शनासाठी येतात.

१२. वडील शेवटच्या ..................... मोजत असताना ममताने आपण नक्की वकील होणार असे वचन त्यांना दिले होते; परंतु तिला काही ते पूर्ण करता आले नाही.

१३. शहरी वातावरणापासून दूर असलेल्या ह्या समुद्रकिनारी जरासा ..................... घेतला तरी मन प्रफुल्लित होते.

१४. भारतीय तिरंग्यातला केशरी रंग साहस आणि बलिदानाचे ..................... मानला जातो.

१५. लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेले तेर हे तीर्थक्षेत्र हरिनामाच्या ..................... ने दुमदुमले.

## २ पाण्याची वणवण

**क. कविता वाचा.**

पाणी पाणी पाणी आणि पाणी पाणी पाणी
पाण्याविना दाहीदिशा आम्ही अनवाणी ॥

सोडोनिया संसार गेले देशांतरा कोणी
तळे मळे ओस झाले पाण्याच्या कारणी ॥

कुठे ना ओलावा कोणा सांगावी कहाणी
कबीराचा दोहा आता जगण्याकारणी ॥

सांगावी वेदना कोणा ऐकेनाच कोणी
त्यांच्या आसनाला नाही दुःखाची लागणी ॥

लाख येवो मोर्चा ह्यांची मात्र पूजाअर्चा
राज्य बुडो आले तरी वांझोटीच चर्चा ॥

चर्चा फार झाली आता सोसेना काहिली
भित्र्या स्वातंत्र्यात आम्हा माय कशी व्याली? ॥

मरो आली तर शब्द आमुचा निष्पाप
बथ्थडल्या कातडीला लाचारीचा लेप ॥

फोडोनि पाषाण फुटे धरणीला पान्हा
असे काही शास्त्र, परी सारथी हेंगाणा ॥

तुझाच उमाळा, भरू येई रे आभाळा
सावरू दे थोडे, खुर्च्या करू चोळामोळा ॥

सोडोनिया संसार गेले देशांतरा कोणी
तळे मळे ओस झाले पाण्याच्या कारणी ॥

पाणी पाणी पाणी आणि पाणी पाणी पाणी
पाण्याविना सैरावैरा आम्ही अनवाणी ॥



**– ना. धों. महानोर**

**शब्दार्थ :**
**अनवाणी** = पायात चपला नसलेला; **देशांतर** = एका देशातून दुसऱ्या देशात होणारे स्थलांतर; **ओस** = रिकामे; **दोहा** = हिंदी कवितेचा एक प्रकार; **नाही दुःखाची लागणी** = दुःखाची झळ लागत नाही; **बुडो आले** = बुडू लागले; **वांझोटी चर्चा** = वायफळ किंवा निष्फळ चर्चा; **काहिली** = उन्हामुळे होणारा असह्य त्रास; **आम्हा माय कशी व्याली** = आम्हाला आईने कसा जन्म दिला; **मरो आली** = मरण जवळ आले; **बथ्थडल्या** = संवेदना हरवलेल्या; **फुटे धरणीला पान्हा** = जमिनीतून पाणी वाहू लागणे; **हेंगाणा** = मूर्ख, अडाणी; **उमाळा** = मन भरून येण्याची अवस्था; **करू चोळामोळा** = तुकडे तुकडे करू

**अ. वरील कवितेतील मुद्दे गद्यात लिहा.**

## ३ पाणी पाणी होणे

**क. वाक्प्रचार**

**अ. खालील वाक्प्रचारांच्या अर्थांशी जोड्या लावा.**

| | |
|---|---|
| १. अंगात पाणी असणे | क. (आवडीचा पदार्थ पाहून) खाण्याची तीव्र इच्छा होणे |
| २. पाणी ओतणे | ख. पराभव करणे |
| ३. रक्ताचे पाणी करणे | ग. धैर्य / हिंमत असणे |
| ४. पाणी कापणे / तोडणे | घ. सामर्थ्य, कुवत दाखवणे |
| ५. पाणी पाजणे | च. न टिकणारी गोष्ट |
| ६. पाणी सोडणे | छ. ठिकठिकाणचा पुष्कळ अनुभव घेऊन चतुर होणे |
| ७. पाण्यात पाहणे | ज. अतिशय काळजी / भीती वाटणे |
| ८. तोंडाला पाणी सुटणे | झ. हवे ते मिळवण्याची हिंमत असणे |
| ९. डोक्यावरून पाणी जाणे | ट. एखाद्या गोष्टीचा त्याग करणे |
| १०. बारा गावचे पाणी पिणे | ठ. अतिशय द्वेष करणे |
| ११. लाथ मारून पाणी काढणे | ड. वेगाने पोहत पुढे जाणे |
| १२. मेहनतीवर पाणी पडणे | ढ. अतिरेक होणे |
| १३. पाणी दाखवणे | त. जिवापाड मेहनत करणे |
| १४. अळवावरचे पाणी | थ. नाश करणे, निरुपयोगी करणे |
| १५. काळजाचे पाणी होणे | द. मेहनत वाया जाणे |

**आ. वरीलपैकी कोणतेही पाच वाक्प्रचार निवडून त्यांच्या आधाराने एखादा छोटा प्रसंग किंवा किस्सा रचून लिहा.**

**ख. पाण्याशी स्त्रियांचे नाते**

**अ. तुमच्या प्रदेशात / देशात स्त्रियांचे पाण्याशी विशिष्ट नाते आहे का? चर्चा करा.**



**आ. खालील उताऱ्यात स्त्रिया करत असलेली कामे अधोरेखित करा. ह्यांपैकी कोणती कामे तुमच्या प्रदेशातील / देशातील स्त्रियाही करतात किंवा करत नाहीत ते सांगा.**



स्त्रियांची ही उन्हाळी कामं म्हणजे वर्षभरासाठी कुरड्या, विविध प्रकारच्या पापड्या व पापड, शेवया, लोणची, चटण्या, मेतकूट, तसेच वर्षभरासाठी तिखट, हळद, दळलेले मीठ, शिकेकाई, रांगोळी तयार करणे या सगळ्या कामांची धांदल. यासाठी त्या पहाटेपासून गुंतलेल्या असत. वाळवणे, कांडणे, वाटणे, भिजवणे, दळणे अशा कामासाठी त्यांचे हात सारखे गुंतलेले असत. उन्हाळी कामं म्हणजे एक उत्सवच वाटू लागे.

पण ह्या काळातच महिलांच्या पोटात गोळा उठावा अशी गोष्ट घडत असे, ती म्हणजे आडा-बारवांचं पाणी खोल जाऊ लागे. नद्यांची धार रोडावू लागे. अशा वेळी, रात्री आडा-बारवांत जमा झालेले पाणी आपल्या वाट्याला जास्त मिळावे म्हणून चपळ बायका पहाटेच घागरी, हंडे व पोहरे घेऊन आडावर हजर होत. उन्हाळा पुढे सरकू लागला, की हे पाणी आडाचा तळ दाखवू लागे. मग पोहरा आत टाकताना सगळ्यांच्या तोंडात एकच मंत्र : 'आडा आडा पाणी दे!' आडावर गर्दी झाली तर कधी किरकोळ कलह होऊ लागत. घरातही सासू-सुना व शेजारणी एकमेकीला पाण्यात पाहू लागत. 'भांड्याला भांडं लागणे', 'पाण्यात पाहणे' हे वाक्प्रचार यावरूनच आले असावेत.

ह्या गडबडीत मग एखाद्या बिचारीच्या हातून पोहरा पाण्यात पडे. कधी धांदरटपणामुळे, कधी अधिक श्रमामुळे, तर कधी झिजलेल्या-कुजलेल्या दाव्या-कासऱ्यामुळे. मग ज्याच्या घरी गळ असे त्याच्याकडे हिरमुसल्या चेहऱ्यानं गळ आणायला जावं लागे. कधी आडात, विहिरीत उतरणारी अवखळ मुलं आत उतरून, डुबकी मारून पोहरा काढून देत.

नदीची रोडावलेली धार आटू लागे, तेव्हा बाजूला झरे खांदून छोट्या तांब्यांनी, बुटकुल्यांनी, परातींनी हंडे भरले जात. अशा झऱ्यात मग एखादी पाननिवळी सोडली तर पाणी एकदम स्वच्छ होई. तळाशी पैसा पडला तरी डोळ्यांना दिसावा इतके स्वच्छ.

अशा विहिरी, बारवा, आड, नद्या यांचे आणि स्त्रियांचे नाते अधिक जवळचे असे. दिवसभरातला त्यांचा किती तरी वेळ अशा पाणवठ्यावर जायचा. इथे भांडी भरता भरता त्यांची मनं मोकळी व्हायची. माहेरवाशिणी-सासुरवाशिणी, घरच्या, दारच्या, पाहुण्यांच्या सगळ्या जणींच्या भेटी सहज व्हायच्या. ही गोष्ट आता जुनी झाली.

ग्रामीण पाणीपुरवठा योजनांतर्गत गावोगावी योजना झाल्या. गावात उंच टाक्या झाल्या व नळावाटे पाणी घरोघरी पोचू लागले. विहिरी, नद्या, आडांवरचा राबता संपला. गाव घरात कोंडल्यासारखे झाले. बायामाणसांच्या भेटी सहज शक्य होत होत्या, त्या आता संपल्या. पाणवठ्यावर जायची वहिवाट संपली. बायामाणसांचे श्रम थोडे कमी झाले, पण हे सुख कायमस्वरूपी फार थोड्या लोकांच्या वाट्याला आले. जिथे पाणी नाही, तिथे टँकर सुरू झाले. काही ठिकाणी पाणी आहे म्हणून टँकर नाही व वीज नाही म्हणून आहे ते पाणीही चार-चार दिवस मिळत नाही, अशी विचित्र कोंडी झाली. ग्रामस्वच्छता अभियानामार्फत शासनाने सबसिडी देऊन किंवा मोफतही संडास बांधून दिले, पण अशी शौचालये वापरण्यासाठी पुरेसे पाणी नको का? त्यामुळे ही योजना अयशस्वी ठरली.

आणि ती महिलांची उन्हाळी कामं? त्यांची आठवण आणि गरज आता कोणाला?

**- अरुण जाखडे**

**शब्दार्थ :**

**धांदल** = तारांबळ, गोंधळ, **कांडणे** = कुटणे, **पोटात गोळा उठणे** = चिंतेने अस्वस्थ होणे, **पाणी खोल जाऊ लागे** = विहिरीतले पाणी कमी होऊ लागे, **धार रोडावू लागे** = पाण्याची धार बारीक होऊ लागे, **पोहरा** = आड / विहिरीतून दोराच्या साहाय्याने पाणी काढण्यासाठी वापरण्यात येणारी बादलीसारखी वस्तू, **पाणी आडाचा तळ दाखवू लागे** = आडातील पाणी संपत आल्यामुळे तळ दिसू लागे, **कलह** = भांडण, **भांड्याला भांडे लागणे** = वाद होणे, **दावा / कासरा** = मोठी जाड दोरी, **गळ** = विहिरीत पडलेली वस्तू वर काढण्याचा लोखंडी आकडा, **खांदणे** = खोदणे, **पाननिवळी / पाणनिवळी** = गढूळ पाणी स्वच्छ करण्यासाठी पाण्यात टाकतात ती एका झाडाची बी, **बारव** = बांधलेली पायऱ्या असलेली मोठी विहीर, **राबता** = वर्दळ, येणेजाणे

**इ. महिलांची उन्हाळी कामे कोणती? त्यामध्ये आजच्या गतिमान जगात कोणता फरक आला आहे?**

| महिलांची उन्हाळी कामे | आज झालेला बदल |
|---|---|
| | |

**ई. पाणवठ्यावर दिवसभरात काय काय घडत असे? घरोघरी नळ आल्यानंतर आता त्यामध्ये कोणते बदल झाले आहेत?**

| पाणवठ्यावरचा दिवस | आता |
|---|---|
| | |

## ४ पाणी चळवळ

**क. पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी केले गेलेले काही यशस्वी प्रकल्प**

**अ. कंसातील शब्द वापरून रिकाम्या जागा भरा.**

(बकाल, घडी, विचारी, योजना, पक्के, कारभार, हालचाल, निर्णय, सहभाग)

### विकास आणि लोकसहभाग

खेडे किंवा गाव हा भारताचा आत्मा आहे. गावाच्या जीवनव्यवहाराला 'गावगाडा' असे म्हटले जाते. तो सुरळीत चालता ठेवण्याची परंपरेने घालून दिलेली एक पद्धत होती. यंत्र-तंत्रज्ञानाच्या आधुनिक युगात त्या व्यवहाराची सूत्रे महानगरांतून देशाचा (१) ------------------------ पाहणाऱ्या सरकारच्या हातात गेली आणि गावाची (२) ------------------------च विस्कटल्यासारखे झाले. उंटावरून शेळ्या हाकण्याचा प्रकार होऊ लागला. आपल्या जगण्याविषयीचे (३) ------------------------ कोण घेते, का घेते, त्यात आपली काही भूमिका असते की नाही हे गावकऱ्यांना कळेनासे झाले. त्यामुळे अनेक चांगल्या (४) ------------------------ कागदावरच राहिल्या आणि गावे (५) ------------------------ होऊ लागली. परिणामी, लोक बारीकसारीक गोष्टींसाठीही सरकारवर अवलंबून राहू लागले. आपले प्रश्न सोडवण्यासाठी आपण (६) ------------------------ करण्याची गरज नाही अशी त्यांची पक्की समजूत झाली, आणि सरकार एवढे करते तरी 'हे लोक' काही सुधारत नाहीत, असे नागरी समाजाला आणि स्वतः सरकारलाही (७) ------------------------ पटले.

काही (८) ------------------------ कार्यकर्त्यांना मात्र अनेक वर्षांपूर्वीच लक्षात आले होते, की लोकांचा (९) ------------------------ असल्याशिवाय, त्यांना विश्वासात घेतल्याशिवाय कोणतीही योजना यशस्वी होऊ शकणार नाही. त्यांपैकी अनेकांनी आपल्या परीने काही प्रयोग करून पाहिले. त्यातील काही यशस्वीही झाले. ही काही उदाहरणे –

**<u>पाणी पंचायत</u>**

(खाजगी, भूजल, स्थापन, लोकशाही, पाझर, दुष्काळी)

नायगाव हे गाव (१०) ------------------------ प्रदेश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुरंदर तालुक्यात आहे. तेथील पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी आणि (११) ------------------------ व्यवस्थापनाचे महत्त्व शेतकऱ्यांना समजावे म्हणून १९७४ साली विलासराव साळुंके ह्यांनी एक प्रयोग करायला घेतला. त्याला त्यांनी 'पाणी पंचायत' असे नाव दिले. नावातूनच लोकसहभागाची कल्पना स्पष्ट होते. विलासरावांनी गावातील मंदिराच्या विश्वस्तांकडून ४० एकर जमीन घेतली आणि तिथे (१२) ------------तलाव, विंधन विहीर आणि लिफ्ट इरिगेशनच्या माध्यमातून पाण्याचा प्रश्न सुटू शकतो हे दाखवून दिले. ते पाहून प्रभावित झालेल्या शेतकऱ्यांनी हा प्रयोग मोठ्या प्रमाणावर करण्याची मागणी केली. त्याकरता 'ग्राम-गौरव प्रतिष्ठान' (१३) ------------------------ केले. समाजातील सर्व थरांतील लोकांना, अगदी



मालकीची जमीन नसणाऱ्यांनाही पाण्याचा हक्क मिळेल असे नियम तयार केले. उदाहरणार्थ, फक्त सार्वजनिक इरिगेशनलाच परवानगी दिली. (१४) ------------------------- विहिरींवर बंदी आणली. ऊस, केळ ह्यांसारख्या मोठ्या प्रमाणात पाणी खेचणाऱ्या पिकांवर बंदी आणली. एकूण, प्रतिष्ठानाचे कामकाज (१५) ------------------------- पद्धतीने चालेल अशी व्यवस्था केली.

**राळेगण सिद्धी**

(पवनचक्की, स्थलांतर, धूप, वाताहत, बांध, साठवण)


हे अहमदनगर जिल्ह्यातील एक खेडे आहे. हा जिल्हा तीव्र दुष्काळी म्हणून ओळखला जातो. १९७२ सालच्या मोठ्या दुष्काळात राळेगण सिद्धीचीही (१६) ------------------------- झाली. लोक (१७) ------------------------- करू लागले होते. १९७५ साली अण्णा हजारे लष्करी सेवेतून निवृत्त होऊन गावी परतले. गावाची अवस्था बघून त्यांनी परिस्थिती बदलण्याचा निश्चय केला. गावकऱ्यांना एकत्र करून पावसाचे पाणी अडवण्यासाठी टेकड्यांवर (१८) ------------------------- घातले, जमिनीची (१९) ------------------------- थांबवली, कालवे काढले. त्यामुळे भूजलाची पातळी बऱ्यापैकी उंचावली. आता येथील विहिरींना बारा महिने पाणी असते. वर्षाला एकाच्या जागी तीन पिके घेतली जातात. गावात (२०) ------------------------- आहे, घरोघर बायोगॅसची संयंत्रे आहेत. लोक शेतीच्या जोडीला पशुपालनाचा आणि दुधाचाही व्यवसाय करतात. पिकलेले सर्व धान्य आणि दूध यांची एकत्र (२१) ------------------------- केली जाते. गावाची गरज भागल्यावर उरलेल्या धान्याची आणि दुधाची शहरात विक्री केली जाते. पाण्याचा प्रश्न सुटल्याने गावाला चांगले आर्थिक स्थैर्य लाभले आहे.



**हिवरे बाजार**

(लागवड, पावले, पूरक, ध्येयवेड्या, पाणीसमस्या, वार्षिक, पालन, कायापालट, मतभेद)

अहमदनगर जिल्ह्यातच हेही गाव आहे आणि प्रगतीच्या दिशेने ते चार (२२) ------------------------- आणखी पुढे गेले आहे. लोकसहभागाने आणि सरकारवर अवलंबून न राहता आपल्या विचारांनी, प्रयोग करत प्रत्यक्ष काम करणे, हेच सूत्र घेऊन पोपटराव पवार ह्या (२३) ------------------------- तरुणाने गावाचा (२४) ------------------------- घडवून आणला आहे. गावाने पाझर तलाव, शेततळी बांधली. मोठ्या प्रमाणावर वृक्षांची (२५) ------------------------- केली आणि परिणामी गावात आज ३१८ विहिरी वर्षभर भरलेल्या दिसतात, हे ह्या प्रयोगाचे मुख्य यश आहे. (२६) ------------------------- विसरून, सर्वांनी एकत्र येऊन काम केल्याचे फायदे लक्षात आल्यावर गावकऱ्यांनी आरोग्य, स्वच्छता, शिक्षण, शेतीचे प्रश्न वगैरे गोष्टींकडे लक्ष दिले. आज ९५ टक्के गावकरी साक्षर आहेत. दरडोई (२७) ------------------------- उत्पन्न ९९ हजार रुपये इतके झाले आहे. सर्व घरांत सांडपाण्याची सोय आहे. शाळकरी मुलेही गावातील अनेक कामे जबाबदारीने करतात.



शेतीबरोबर (२८) ------------------------------ म्हणून दुधाचा व्यवसाय सुरू झाला आहे. पूर्वी १५० लिटर दूध मिळत असे, ते आता पाच हजार लिटरपर्यंत गेले आहे. गावात कोणीही बोअर विहीर घेत नाही; बाहेरच्या माणसाला जमीन विकली जात नाही; ऊस, केळ्यासारखी पिके घेतली जात नाहीत. संपूर्ण दारूबंदी आणि गुटखाबंदीचे १०० टक्के (२९) ------------------------------ केले जाते.

एक (३०) ------------------------------ सुटली की परिवर्तनाच्या अनेक वाटा खुल्या होतात हे हिवरे बाजार गावाने प्रत्यक्ष दाखवून दिले आहे.

**आ. वर सांगितलेल्या प्रत्येक प्रकल्पामधील तुम्हाला आवडलेली गोष्ट लिहा.**

| प्रकल्प | मला आवडलेल्या गोष्टी |
|---|---|
| **पाणी पंचायत** | |
| **राळेगण सिद्धी** | |
| **हिवरे बाजार** | |

**ख. खालील उतारा वाचा आणि रिकाम्या जागा भरा.**

(लोकचळवळीचं, एकट्यादुकट्याचं, बैठक, लोकसहभाग, विस्तार, पायपीट, उजाड, विचारविनिमय, मांडणी, झळा, व्यथित, व्याप्ती)

<u>पाण्यासाठी स्पर्धा</u>

एक दिवस मला फोन आला : "पाणी फाऊंडेशनच्या टीव्हीवरच्या कार्यक्रमात सहभागी होणार का?"

मला नीटसं कळलं नाही. महाराष्ट्राला सातत्यानं दुष्काळाच्या (अ) ------------------ सहन कराव्या लागतात, माणसांना घागरभर पाण्यासाठी मैल मैल (आ) ------------------ करावी लागते वगैरे गोष्टींनी (इ) ------------------ होऊन 'पाणी फाऊंडेशन'ची स्थापना झाली आहे; त्याचे संस्थापक आमिर खान, किरण राव आणि सत्यजित भटकळ आहेत असं ऐकलं होतं. पण मी का?... म्हणजे, माझा न् पाण्याचा काय संबंध? तरीही मी 'हो' म्हटलं.



आमिर खान ह्यांच्या घरी (ई) ------------------ होणार होती. ठरलेल्या दिवशी तिथे पोहोचलो. मराठी नाट्य-चित्रपटसृष्टीतले काही तारे आणि तारकाही उपस्थित होत्या. आमिर आणि सत्यजितनं एकूण विषयाची (उ) ------------------ केली : "काही सामाजिक वास्तवांबद्दल चर्चा घडवावी म्हणून आम्ही 'सत्यमेव जयते' ही टीव्ही मालिका केली. त्यात पाणी हा विषयही होता. त्याचं गांभीर्य आणि (ऊ) ------------------ जाणवल्यामुळे तो मनात राहिला. एवढंच नाही, तर त्यासाठी काही तरी केलं पाहिजे अशी तीव्र जाणीव झाली. पण हे (ए) ------------------ काम नव्हे, ते सर्वांनी मिळूनच करायला हवं हेही जाणवलं. नेमकं काय अन् कसं करावं ह्या प्रश्नांची उत्तरं शोधताना साताऱ्याच्या डॉक्टर अविनाश पोळ ह्यांच्या कामाची माहिती मिळाली. ह्या गृहस्थांनी काही मोजक्या मित्रांना बरोबर घेऊन 'अजिंक्यतारा' हा (ॲ) ------------------ झालेला किल्ला हिरवागार करून टाकला आहे. स्वतःचे श्रम एवढंच त्यांचं भांडवल आणि बळ होतं. ते पाहून (ऐ) ------------------ ही किती महत्त्वाची आणि सामर्थ्यवान गोष्ट आहे हे आमच्या लक्षात आलं आणि त्याच दिशेनं काम करायचं आम्ही ठरवलं."

बराच (ओ) ------------------ केल्यानंतर 'वॉटर कप' स्पर्धेची कल्पना आकाराला आली. स्थानिक लोकांच्या श्रमदानातून गावात पाणी आणण्याची स्पर्धा. ही केवळ स्पर्धा न उरता तिला (ऑ) ------------------ रूप यावं अशी इच्छा आणि आशा होती. ती लोकांपर्यंत पोहोचवण्याचं काम आम्हा कलाकारांना करायचं होतं. पाण्याचा प्रश्न सोडवण्याचे प्रयत्न ह्यापूर्वी झालेच नव्हते असं अजिबातच नाही. आपलं गाव आणि परिसरापर्यंत पाणी आणण्याचं, पावसाचं पाणी अडवण्याचं काम अनेक व्यक्तींनी केलं. त्यांचं कौतुक झालं, गौरव झाला, पण त्यांच्या कल्पनांचा आणि कामाचा हवा तेवढा (औ) ------------------ झाला नाही. काम करण्याआधीच हात टेकण्याची सवय झालेल्या समाजाकडे समस्यांशी लढण्याचं बळच उरलेलं नव्हतं. आपले प्रश्न सोडवायला कुणी तरी येईल म्हणून वाट पाहत राहणाऱ्या, आणि कुणी आलंच, तर त्याची दुरून गंमत पाहत राहण्याची मानसिकता झालेल्या समाजाला कंबर बांधून पुन्हा उभं राहण्याची उमेद द्यायला हवी आहे. पाणी फाऊंडेशनच्या चमूचं हे स्वप्न भाबडं नाही आहे, तर त्याला अभ्यासाची, शास्त्राची आणि पूर्वीच्या अनुभवांच्या आधाराची जोड आहे. ही गोष्ट मला फार आश्वासक वाटली. 'पाण्याचा न् माझा काय संबंध', हे मला तेव्हा नीट समजलं.

**- गिरीश कुलकर्णी**

**अ. लेखकाला पाण्याशी असलेला आपला संबंध चर्चेनंतर समजला, तो कसा ते समजावून सांगा.**

---

**आ. उताऱ्यातील हे निवडक वाक्यांश वापरून वेगळी वाक्ये लिहा.**

१. झळा सहन कराव्या लागणे...

२. पायपीट करावी लागणे...

३. चर्चा घडवणे...

४. व्याप्ती जाणवणे...

५. एकट्यादुकट्याचे काम नसणे....

६. सामर्थ्यवान गोष्ट...

७. आकाराला येणे...

८. विचारविनिमय करणे...

९. उमेद द्यायला हवी...

**ग. चित्रफीत पाहा.**

**अ. चूक की बरोबर? चूक असेल तर बरोबर उत्तरही लिहा.**

१. मुलगी गाडीतल्या माणसाला पैसे मागते. ------------------------------

२. नळाखाली एक मुलगा छान अंघोळ करतोय. ------------------------------

३. एका नळासमोर पाण्यासाठी मोठी रांग लागली आहे. ------------------------------

४. एका नळातून मोठ्या दाबाने पाणी येत आहे. ------------------------------

५. एकीकडे कुंड्यांमधील रोपटी छान हिरवीगार दिसत आहेत. ------------------------------

६. एक कावळा नळासमोर पाण्याची आस धरून बसला आहे. ------------------------------

७. सगळीकडे पाणीच पाणीच दिसत आहे. ------------------------------

**आ. ह्या लघुपटासाठी संवाद लिहा.**

**इ. लघुपटाच्या शेवटी काय घडते?**

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

**ई. लघुपटाचा शेवट समजावून सांगा.**

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

**घ. एका लघुपटाची सुरुवात पाहा.**
**त्यावरून लघुपटाची पुढची पटकथा तुमच्या कल्पनेने लिहा.**

**च. महापुराच्या बातम्या**
आपल्याला पाणी हवेसे नेहमीच वाटते, परंतु कधी तरी त्याची अतिरेकी कृपा नकोशीही वाटते. त्याबद्दल काही ...

**अ. खाली निरनिराळ्या वृत्तपत्रांतील बातम्यांची कात्रणे दिली आहेत. कंसातील पर्यायांचा योग्य वापर करून रिकाम्या जागा भरा.**

**१. (पथके, पूरस्थिती, मुसळधार, पूरग्रस्तांच्या)**

कोल्हापूरमध्ये (क) ------------------------ पावसामुळे (ख) ------------------------ निर्माण झाली आहे. (ग) ------------------------ मदतीसाठी स्थानिक प्रशासनासह सैन्यदलाची आणि नौदलाची (घ) ------------------------ दाखल झाली आहेत. जिल्ह्यांतील अनेक गावांमधून असंख्य कुटुंबांना सुरक्षित स्थळी हलविण्यात येत आहे.



**२. (अंदाज, आस्थापने, मर्यादाही, ओसरताच, फटका, पाण्याखाली, नुकसानीचा)**

२६ आणि २७ जुलै रोजी बदलापूर शहरात आलेल्या पुराचा (क) ------------------------ शहरातील जवळपास ७० हजार नागरिकांना बसल्याचा अंदाज आहे. तसेच अडीच हजार दुकाने, (ख) ------------------------ आणि नागरिकांच्या एकूण (ग) ------------------------ आकडा ७० कोटींपेक्षा अधिक असण्याचा प्राथमिक (घ) ------------------------ नगरपालिका प्रशासनाने केलेल्या पाहणीतून पुढे आला आहे. या पुरात आठ ते दहा हजार घरे (च) ------------------------ गेली होती. पुराचे पाणी (छ) ------------------------ शहरात रोगराई पसरू नये यासाठी मोठ्या प्रमाणावर मदतकार्य सुरू झाले असले, तरी साफसफाईच्या कामात जागोजागी येणाऱ्या अडचणींमुळे नगरपालिका प्रशासनाच्या (ज) ------------------------ यानिमित्ताने स्पष्ट झाल्या आहेत.

**३. (आघात, उध्वस्त, केविलवाणी, कानाडोळा, रौद्र, अतिवृष्टीचे, हतबल, मृत्युमुखी)**

निसर्गापुढे माणूस (क) ------------------------ होतो आणि पुराचे (ख) ------------------------ रूप, त्याची विध्वंसक ताकद, मानव व प्राणिजीवनावर होणारे (ग) ------------------------ आदींचा मूक साक्षीदार होण्यापलीकडे काहीही करता येत नाही. अशीच काही कारुण्यमय व (घ) ------------------------ परिस्थिती यंदाच्या कोल्हापूर व सांगली परिसरातील कृष्णा नदीच्या पुराने केलेली होती. शेकडो माणसे आणि हजारो पाळीव जनावरे पुरामध्ये वाहत जाऊन (च) ------------------------ पडली. लाखो हेक्टर शेतजमीन व उभे पीक (छ) ------------------------ झाले. जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासून वेधशाळेकडून (ज) ------------------------ इशारे दिले जात होते. मनुष्यस्वभाव नेहमीसारख्या पुराचा अंदाज बांधत असतो. नकळत केला गेलेला हा (झ) ------------------------ अनेक वेळा मानवी जीवनाला भयावह परिस्थितीपुढे आणून उभा करतो.

**४. (लचके, अनिर्बंध, थैमान, महाभयंकर)**

चौदा वर्षांपूर्वी २६ जुलै रोजी आलेल्या (क) ------------------------ पुरामुळे जवळपास सर्वच

यंत्रणांच्या मर्यादा स्पष्ट झाल्या होत्या. मागच्यास ठेच पुढचा शहाणा हे म्हणणे बहुधा प्रशासकीय यंत्रणांना मान्यच नसावे. तसे ते असते, तर चौथी मुंबई म्हणून नावारूपास येणाऱ्या अंबरनाथ, बदलापूर, वांगणी या भागांतील निसर्गाचे जे (ख) ------------------------ तोडणे सुरू आहे, ते थांबले असते. गेल्या चार दिवसांपासून बदलापूर आणि आसपासच्या भागात पुराने जे (ग) -------------------- घातले आहे, ते अशाच (घ) ---------------------- 'विकासा'चे प्रतीक म्हणावे लागेल.

५. **(विस्थापित, भीषण, मदतकार्य, आपत्ती, आकडा)**

धुवाधार बरसणारा पाऊस आणि नद्यांना आलेला पूर यामुळे केरळमध्ये (क) ------------------ परिस्थिती निर्माण झाली आहे. मागच्या शंभर वर्षातील हा केरळमधील सर्वात वाईट पूर आहे असे केरळच्या मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे. (ख) ------------------------ जसजसे वेग घेत आहे तसतसा मृतांचा (ग) ---------------------- वाढत चालला आहे. या महापुरात आतापर्यंत ३२४ लोकांचा मृत्यू झाला असून २ लाख नागरिक (घ) ---------------------- झाले आहेत. याआधी १९२४ साली केरळमध्ये पावसामुळे अशी भीषण (च) ---------------------- आली होती.

**आ. आता तुम्हीही एखाद्या महापुराची बातमी लिहा.**

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------



# तोंडी परीक्षा

## एकूण २० गुण

### १. चित्रवर्णन (१०)

**क. खालील चित्रांचे त्यांखालील मथळ्यांच्या साहाय्याने वर्णन करा. (कोणतेही एक)**



अ ▶ सांगली : पूरग्रस्त भागात ९९ बोटींसह मदतकार्य सुरू



आ ▶ मराठवाड्यावर दुष्काळाची छाया, १० जिल्ह्यांत तूट

### २. संभाषणकौशल्य (१०)

**क. पुढीलपैकी कोणताही एक मुद्दा योग्य कारणे व उदाहरणांच्या साहाय्याने पटवून द्या.**

अ. मुलांचे मित्र बनून, त्यांच्या कलाने घेऊन त्यांना त्यांच्या मनाप्रमाणे जगू, वाढू द्यावे.

आ. मुलांना आपल्या धाकात ठेवून, योग्य त्या संस्कारांत व शिस्तीत त्यांना वाढवावे.

# लेखी परीक्षा

## एकूण गुण ३०

### १. वाचन व आकलन (१२)

**क. खालील उतारा वाचा आणि पुढील प्रश्नांची उत्तरे द्या.**

पुष्कळ वेळा मनुष्याचा मोठेपणा त्याच्या आईबापांवर अवलंबून असतो. त्याचे पुढचे बरे-वाईट जीवन त्याच्या आईबापांवर अवलंबून असते. त्याच्या बऱ्यावाईटाचा पाया लहानपणीच भरला जात असतो. पाळण्यात असतानाच, आईच्या खांद्यांवर खेळत असतानाच, पुढील जीवनाच्या विकासाचे बी पेरले जात असते. मोठेपणा याचा अर्थ जगातील काही व्यक्तींच्या ओठांवर आपले नाव काही काळ नाचणे, असा मी करीत नाही. हिमालयाच्या दऱ्याखोऱ्यांत असे प्रचंड व गगनचुंबी वृक्ष असतील, की ज्यांची नावे जगाला माहीत नाहीत; रानावनांतील कानाकोपऱ्यात असे एखादे रमणीय व सुगंधी फूल फुललेले असेल, की ज्याचा पत्ता कोणाला लागलेला नाही. समुद्राच्या पोटात अशी गोलबंद व पाणीदार मोत्ये असतील, की ज्याची जगास वार्ता नाही. पृथ्वीच्या पोटात ताऱ्यांसारखे तेजस्वी हिरे असतील; परंतु मानवजातीस त्यांचे अद्यापि दर्शन नाही. वर अनंत आकाशात असे अनंत तारे असतील, की जे पल्लेदार दुर्बिणीतूनही अजून दिसले नाहीत. मोठेपणा याचा अर्थ जगाला माहीत असणे, असा मी करीत नाही. मी निर्दोष होत आहे, हळूहळू उन्नत होत आहे, ही ज्याला जाणीव आहे, तो मोठाच होत आहे. मोठा होत जाण्याची ही प्रवृत्ती व्यक्तीच्या ठिकाणी आईबापच उत्पन्न करितात. आईबापांकडून मिळालेली ही ईश्वरी देणगी होय. मायबापच कळत वा नकळत मुलाला लहान किंवा मोठा करीत असतात.

मनुष्य जन्मतो त्याच्यापूर्वीच त्याचे शिक्षण सुरू झालेले असते. आईच्या पोटात गर्भरूपाने जीव आला. त्याच्यापूर्वीच त्याच्या शिक्षणाची तयारी झालेली असते. गर्भधारणेपूर्वीच आईबापांनी आपापल्या जीवनात जे विचार केले असतील, ज्या भावना हृदयात खेळविल्या असतील, जी कर्मे केली असतील, त्या सर्वांतून नवबालकाच्या शिक्षणाचीच पुस्तके तयार केली जात असतात. जगात फक्त आईबापच शिकवितात, असे नाही; आजूबाजूचे सारे जग, सारी सजीव-निर्जीव सृष्टी शिकवीत असते; परंतु या आजूबाजूच्या सृष्टीतून काय शिकावे, हे आईबापच शिकवितात. मुलांच्या शिक्षणात जास्तीत जास्त वाटा आईबापांचा असतो व त्यातही आईचा अधिक. आईच्या पोटातच मुळी जीव राहिला; आईशी एकरूप होऊनच जीव बाहेर पडला; जणू तिचाच होऊन बाहेर आला. बाहेर आल्यावरही आईच्याच सान्निध्यात त्याचा लहानपणी तरी बहुतेक वेळ जातो. तो आईजवळ हसतो; आईजवळ रडतो; आईजवळ खातोपितो; आईजवळ खेळतो-खिदळतो, झोपतो, झोपी जातो, आईजवळ त्याची ऊठबस सुरू असते. म्हणूनच खरी शिक्षणदात्री आईच होय.



**- साने गुरुजी ('श्यामची आई')**

**अ. चूक की बरोबर ते लिहा.** **(२)**

१. एखादी व्यक्ती आयुष्यात केवढी उंची गाठेल हे बरेचदा तिच्या पालकांवर अवलंबून असते.

२. लेखकाच्या मते प्रसिद्धी म्हणजेच मोठेपणा.

३. माणसाचे शिक्षण त्याच्या जन्मापासून सुरू होते असे लेखात म्हटले आहे.

४. मुलांच्या शिक्षणातील महत्त्वाचा घटक म्हणजे आई असे लेखकाला वाटते.

**आ. पुढील अर्थाचे शब्द उताऱ्यात आले आहेत. ते शोधून लिहा.** **(२)**

१. उंचच उंच - ..........

२. माहिती - ..........

३. सुंदर - ..........

४. प्रगत - ..........

**इ. 'एखाद्या गोष्टीची सुरुवात करणे' या अर्थाचे दोन वाक्प्रचार या उताऱ्यात आले आहेत. ते शोधून लिहा व त्यातील कोणत्याही एका वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करा.** **(३)**

..........

..........

..........

..........

**ई. उताऱ्यात लेखकांनी मांडलेल्या विचारांशी तुम्ही सहमत आहात का? की तुमचे विचार त्यापेक्षा वेगळे आहेत? सविस्तर उत्तर लिहा.** **(५)**

..........

..........

..........

..........

## २. व्याकरण **(११)**

**क. अनेक शब्दांसाठी एक शब्द लिहा.** **(३)**

अ. खारट नाही आणि गोडही नाही असे पाणी : ..........

आ. खोल नसलेला असा : ..........

इ. घसरून पडण्याजोगी जागा : ..........

ई. हो ला हो करणारा : ..........

उ. सतत थापा मारणारी व्यक्ती : ..........

ऊ. अतिथंडीमुळे पावसाचे पडणारे बर्फरूप : ..........

**ख. खालील वाक्प्रचारांचा योग्य अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.** **(८)**

अ. तोंडघशी पाडणे - ---------------------------------------------

आ. तोंडात मारून घेणे - ---------------------------------------------

इ. बारा गावचे पाणी पिणे - ---------------------------------------------

ई. पाणी दाखवणे - ---------------------------------------------

## ३. लेखन (७)

**क. पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर १५-२० ओळी लिहा.**

अ. तुमच्या महाराष्ट्रातील वास्तव्यात तुमच्या पाहण्यात आलेल्या एखाद्या अंधश्रद्धेबद्दल आलेले अनुभव पत्राद्वारे तुमच्या मित्राला / मैत्रिणीला कळवा.

आ. सध्या पाण्याची समस्या ही जागतिक समस्या होऊ पाहतेय. त्या समस्येशी चार हात करण्यासाठी जगाच्या विविध भागांत अनेक चळवळी जन्म घेतायत. अशा एखाद्या तुम्हाला भावलेल्या चळवळीबद्दल माहिती देणारे पत्र लिहा.

# तोंडी परीक्षा

## (एकूण गुण २५)

## १. वक्तृत्व (१०)

या स्वाध्यायासाठी दोन दोन विद्यार्थ्यांच्या जोड्या केल्या जातील.

**क. प्रत्येकाने मिळालेल्या विषयांपैकी एका विषयावर एक छोटेसे भाषण तयार करून ते सादर करावे.** **(५)**

| विद्यार्थी १ : | विद्यार्थी २ : |
|---|---|
| प्रेम आणि आनंद | कपडे आणि सौंदर्य |
| हे विश्वचि माझे घर | पारंपरिक खेळ |
| खेळ आणि आरोग्य | सुख आणि दुःख |
| मराठी भाषा | राग आणि रागावरील नियंत्रण |
| भीती | परकीय भाषा |
| सण, समारंभ | आयुष्य एक सण |
| आठवणी | मनाचे कार्य |

कोणत्याही विषयावर तयारी करताना खालील मुद्द्यांचा विचार करावा :

**विषयाची ओळख, व्याख्या / अर्थ, विषयाशी संबंधित शब्दसंग्रह, फायदे / सकारात्मक बाजू, तोटे / समस्या, उपाय, स्वतःचे मत...**

**ख. प्रत्येकाने आपल्या जोडीदाराच्या भाषणाचा थोडक्यात गोषवारा सांगावा आणि त्याच्या मांडणीवर प्रश्न विचारावेत. प्रत्येकाने जोडीदाराच्या प्रश्नांची उत्तरे द्यावीत.** **(५)**

- ❖ जोडीदाराच्या मांडणीवर विचारलेले प्रश्न स्पष्ट, नेमके आणि चर्चा करण्याजोगे असावेत. एका शब्दात उत्तर देता येईल असे प्रश्न विचारू नयेत.
- ❖ जोडीदाराने विचारलेल्या प्रश्नांचे सविस्तर उत्तर द्यावे.

## २. वादविवाद (१०)

या स्वाध्यायासाठी दोन दोन विद्यार्थ्यांच्या जोड्या केल्या जातील.

**क. दोन्ही विद्यार्थ्यांना दोन स्वतंत्र मुद्दे दिले जातील. दोघांनी त्यावर विचार करून आपापले मत आणि विचार मांडावे व एकमेकांशी चर्चा करावी.**

**मुद्दे :**

| | | |
|---|---|---|
| अ. | मेहनत यशाची पहिली पायरी असते. | यशासाठी नशीब फार महत्त्वाचे असते. |
| आ. | प्रवास करण्याने माणूस प्रगल्भ होतो. | प्रवासामुळे माणूस नकारात्मक विचार करू लागतो. |
| इ. | आयुष्यातील सकारात्मक गोष्टी आठवाव्यात, दुःख आपोआप नष्ट होते. | नुसता सकारात्मक विचार करून दुःख नष्ट होत नाही. |
| ई. | स्वतःच्या रागावर नियंत्रण मिळवणे म्हणजे स्वतःच्या स्वभावावर आघात करण्यासारखे आहे. | स्वतःच्या रागावर नियंत्रण मिळवले पाहिजे, त्याचा आपल्यालाच फायदा होतो. |
| उ. | हसणे आरोग्यासाठी चांगले असते. | दुःख माणसाला प्रगल्भ करतो. |
| ऊ. | पारंपरिक खेळांचे संवर्धन केले पाहिजे. | काळानुरूप नवीन खेळ आत्मसात केले पाहिजेत. |
| ए. | बहुभाषिकता संस्कृती नष्ट करते. | बहुभाषिकतेमुळे संस्कृती सर्वसमावेशक होते. |

## ३. चित्रवर्णन (५)

या स्वाध्यायासाठी दोन दोन विद्यार्थ्यांच्या जोड्या केल्या जातील.

**क. दोन्ही विद्यार्थ्यांना एकाच विषयाच्या दोन बाजू दाखवणारी चित्रे दिली जातील. दोघांनी केवळ आपल्या चित्रावरून जोडीदाराबरोबर संभाषण करावे.**














# दृक्‌श्राव्य परीक्षा

(एकूण गुण २५)

## १. एक ध्वनिफीत ऐका. (१३)

**क. खाली काही मुद्दे दिले आहेत. अशा अर्थाचे मुद्दे आपण ध्वनिफितीत ऐकले का? चूक (✗) किंवा बरोबरची (✓) खूण करा. (५)**

अ. राग कसा येतो हे आपल्याला कळणे शक्य नसते. ☐

आ. रागामुळे आपले आपल्या कामाकडे दुर्लक्ष होऊ लागते. ☐

इ. भिंतीमध्ये खिळे ठोकले की राग नाहीसा होतो. ☐

ई. आपल्या रागामुळे आपली जवळची माणसे दुखावतात. ☐

उ. रागाचे मुख्य कारण प्रत्येक गोष्टीला प्रतिक्रिया देण्याची सवय आहे. ☐

**ख. ध्वनिफीत दोन-तीनदा ऐका आणि खालील वाक्यांचे उर्वरित भाग लिहा. (५)**

अ. आपल्याला राग येत नाही, ------------------------------------------------

आ. आमची या ठिकाणी दोन हॉस्पिटल्स जिथे आम्ही रुग्णांना ------------------------------
------------------------ भरती करतो आणि ------------------------------------------------

इ. ------------------------------------------------------------------------ मला कळत नाही.

ई. तू आता असं कर, जे खिळे तू ------------------------------------------------
ते ------------------------------------------------------------------------

उ. आपण जेव्हा जेव्हा लोकांना रागावतो ------------------------------------------------
------------------------------------------------------------------------

**ग. रागावर नियंत्रण मिळवण्यासाठी ध्वनिफितीमध्ये कोणती गोष्ट सांगितली आहे? (३)**

------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------

## २. एक चित्रफीत पाहा. (१२)

**क. बरोबर उत्तर ओळखा.** **(३)**

**अ. चित्रफितीत सुरुवातीला दिसणाऱ्या तीन पात्रांचे एकमेकांशी कोणते नाते आहे?**

१. आई – मुलगी आणि तिचा मित्र
२. आई – मुलगा आणि मुलगी
३. आई – मुलगा आणि त्याची मैत्रीण

**आ. आईच्या मते पाऊस आणण्यासाठी आता कोणता एकच पर्याय उरला आहे?**

१. मुलांनी 'ये रे ये रे पावसा' हे गाणे म्हणणे.
२. मुलांनी लहान मुलांसारखे वागणे.
३. मुलांनी शास्त्रीय दृष्टिकोन आत्मसात करणे.

**इ. मुलाला आईने सुचवलेला पर्याय का मान्य नाही?**

१. कारण त्याला वाटते गाण्यातला पैसा खोटा आहे.
२. कारण त्याच्या मते गाणे फार बालिश आहे.
३. त्याला वाटते पावसासाठी खोके ठेवले पाहिजेत.

**ख. पाऊस आल्यावर खालीलपैकी कोणती कामे आई मुलांना सांगते? योग्य उत्तरापुढे बरोबरची (✓) खूण करा.** **(३)**

**अ. बाल्कनीत वाळत घातलेले कपडे...**

१. आत आणणे.
२. आत आणून त्यांची घडी घालणे.
३. पाहणे.

**आ. काडेपेट्या आणि मेणबत्त्या शोधणे, कारण...**

१. पाऊस आला आहे.
२. काडेपेट्या आणि मेणबत्त्या संपल्या आहेत.
३. पावसामुळे दिवे जातील.

**इ. मुलाच्या मते तो आत्ता कांदा आण्यासाठी बाहेर जाऊ शकत नाही, कारण...**

१. पावसामुळे सोसायटीमध्ये खूप पाणी झाले आहे.
२. सोसायटीचे दिवे गेले आहेत.
३. दुकान मुंबईइतके दूर आहे.

**ग. खालील वाक्ये कोणी आणि का म्हटली आहेत?** **(६)**

**अ.** **“अगं, अटक होईल मला!”**

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

**आ.** **“तुझा हेअरड्रायर दे जरा.”**

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

**ई.** **“पावसाळ्यात पाणी उकळून आणि गाळून प्यायचं!”**

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

# लेखी परीक्षा

**(एकूण गुण १००)**

## १. वाचन आणि आकलन (३५)

**क. खालील गोष्ट वाचून त्यापुढील प्रश्नांची उत्तरे द्या.**

### शिक्षा

आज शकूने फार मोठा अपराध केला होता. फार म्हणजे फारच. ती काहीतरी खोटे बोलली किंवा तिने काहीतरी चोरून खाल्ले. काय केले कोण जाणे, पण तिचा अपराध फार मोठा होता हे खास.

तिला काय शिक्षा करावी हा प्रश्न रमाबाईंपुढे उभा राहिला. शकू रोज अपराध करणार आणि तोही नवा असायचा. रोज नव्या प्रकारची शिक्षा बिचाऱ्या रमाबाई कोठून शोधणार? त्या विचारात पडल्या. त्यांना शिक्षेचा नवा प्रकार काही केल्या सापडेना. आजचा शकूचा अपराध तर अगदीच नवा अन् फारच मोठा होता. आज शिक्षासुद्धा काहीतरी नवीन प्रकारचीच केली पाहिजे. त्यांची दृष्टी सहज समोरच्या खुंटीकडे गेली. खुंटीवर लांबलचक दोरी बांधलेली होती. काय पण छानदार दोरी! नवीन प्रकारची शिक्षा करण्यासाठी जणू काय विधात्याने तिला निर्माण केले होते. खुंटीवरून लोंबकळत लोंबकळत जणू काय ती रमाबाईंना खुणावत होती, “पाहा मी कशी छान आहे. माझा उपयोग करून पाहा तर खरा!!” रमाबाईंनी पटकन शकूला खुंटीजवळ नेऊन तिच्या कमरेभोवती दोरी घट्ट बांधली व याप्रमाणे आपले कर्तव्य योग्य प्रकारे बजावून त्या स्वयंपाकघराकडे चालत्या झाल्या!

शकूच्या चिमुकल्या जगात खेळाखेरीज दुसरे काही नव्हते. खोटे बोलणे हा तिचा – तिच्या कल्पनेचा – एक खेळ असे. जेवताना ताटातील भाताचा डोंगर, किल्ला, आणखी काय काय करून खेळत खेळत ती जेवे. जेवण म्हणजे एक खेळच. स्वयंपाकघरात आई नसताना कपाटाजवळ

स्टूल नेऊन, त्यावर चढून, कपाटावर उभे राहायचे व मग बरणी उघडून तिच्यातून खुबीने लाडू हस्तगत करायचा. काय पण मजेदार खेळ! आई येण्याच्या आत हे सर्व करायचे म्हणजे लपाछपीचाच एक प्रकार. आई त्याला चोरी म्हणायची. आईचे जगच वेगळे!

शकूने एक क्षणभरच आपल्या नव्या शिक्षेचा विचार केला. दोरीचे एक टोक खुंटीला व दुसरे तिच्या कमरेला गच्च बांधलेले होते. दोरी सोडून निसटणे शक्य नव्हते; पण निसटण्याची जरूरच नव्हती. दोरी चांगली लांबलचक होती. खुंटी हा मध्यबिंदू कल्पून बरेच मोठे अर्धवर्तुळ शकूला नाचाय-बागडायला मोकळे होते. या वर्तुळाच्या बाहेर जाण्याची सोय नव्हती – पण नसेना! या खेळाची तीच तर जम्मत होती. शकूला आपल्यासाठी आईने मुद्दाम शोधून काढलेला हा खेळ आवडला. किती तरी नवा अन् छानदार खेळ! शकूच्या आनंदाला सीमा राहिली नाही. ती त्या लहानशा अर्धवर्तुळात नाचू बागडू लागली व मधूनमधून 'मंदं मंदं' वगैरे चालीवरची गाणी गुणगुणू लागली. मधूनमधून ती मोठ्याने गाणे म्हणे. शकू त्या खोलीत बंदिवान होती, परंतु तिच्या हास्याचे फवारे खोलीबाहेर दूरवर पसरले. अवतीभोवतीची मुले टवकारून ऐकू लागली. रामा आला. गणू आला. उषा पळत पळत आली. लहानगी ललीसुद्धा दुडुदुडु धावत आली. शकूचा खेळ रंगात आला होता. मुले तोंड वासून उत्सुकतेने तो पाहत होती. त्यांना तिचा हेवा वाटला. "आम्हाला खेळू दे गं" म्हणून ती तिची विनवणी करू लागली. "अं ऽहं" म्हणून शकूने आपला क्रम चालू ठेवला. मुले रडू-ओरडू लागली!

खोलीत काय गोंधळ चालला हे पाहण्यास रमाबाई लगबग आल्या. पाहतात तो शिक्षा भोगत असलेली बंदिवान शकू आनंदाने गात खेळत होती व शिक्षा भोगत नसलेली मुले रडतओरडत होती. काय पण छान खेळ! किती नवी छानदार शिक्षा!!

रमाबाईंनी शकूला सोडून पटकन तिचा मुका घेतला!

- वि. द. घाटे

**अ. आई-वडील किंवा वडीलधारी माणसे लहान मुलांना शिक्षा का करतात? चुकीच्या पर्यायावर (✗) अशी खूण करा.** **(१)**

१. मुलांना वळण लावण्यासाठी.
२. समाजात कसे वागावे ह्याचे शिक्षण देण्यासाठी.
३. केलेली चूक समजावी, आणि त्यांनी तीच चूक परत करू नये म्हणून.
४. शिक्षेतून त्यांना आनंद मिळावा म्हणून.

**आ. उताऱ्यात आलेल्या पुढील शब्दांना प्रतिशब्द द्या.** **(५)**

| | |
|---|---|
| १. अपराध = ............ | ६. जरूर = ............ |
| २. उपयोग = ............ | ७. वर्तुळ = ............ |
| ३. चिमुकल्या = ............ | ८. बंदिवान = ............ |
| ४. खुबीने = ............ | ९. गोंधळ = ............ |
| ५. हस्तगत करणे = ............ | १०. मुका = ............ |

**इ. शकू रोज कोणते खेळ खेळते?** **(२)**

१. ------------------------------------

२. ------------------------------------

**ई. पुढील वाक्यांचा अर्थ स्पष्ट करा** **(४)**

१. शकूच्या चिमुकल्या जगात खेळाखेरीज दुसरे काही नव्हते. खोटे बोलणे हा तिचा – तिच्या कल्पनेचा – एक खेळ असे.

------------------------------------

------------------------------------

------------------------------------

२. काय पण मजेदार खेळ! (...) आई त्याला चोरी म्हणायची. आईचे जगच वेगळे!

------------------------------------

------------------------------------

------------------------------------

**उ. थोडक्यात सांगा** **(४)**

१. शकू खेळत असलेले खेळ आईच्या दृष्टीने काय होते?

------------------------------------

२. आई करत असलेल्या शिक्षा शकूच्या दृष्टीने काय होत्या?

------------------------------------

**ऊ. तुम्हाला काय वाटते?** **(४)**

**आईने वेळोवेळी केलेल्या शिक्षांमुळे केलेली चूक शकूच्या लक्षात येते, असे तुम्हाला वाटते का? तुमच्या होकारार्थी किंवा नकारार्थी उत्तराचे स्पष्टीकरण द्या.**

हो, कारण / नाही, कारण ------------------------------------

------------------------------------

------------------------------------

------------------------------------

------------------------------------

**ख. खालील उतारा वाचा आणि पुढील प्रश्नांची उत्तरे द्या.**

**खेळ**

खेळ हा वास्तविक आपल्या जीवनातील किती स्वाभाविक घटक आहे! लहान मूल तर उत्स्फूर्तपणे खेळते. त्याला ते कुणी शिकवावेही लागत नाही. आपल्या शरीराच्या आणि मनाच्याही आरोग्यासाठी ते आवश्यक असते. खेळामुळे केवळ शरीराच्या स्नायूंना व्यायाम होतो असे नव्हे, तर त्यातून

मिळणाऱ्या आनंदामुळे आपले मनही सुदृढ आणि निरोगी राहण्यास मदत होते. म्हणून प्रत्येकाने बैठे आणि मैदानी असे दोन्ही प्रकारचे खेळ नियमित खेळायला हवेत आणि ते पाहायलाही हवेत.

ह्याच दृष्टिकोनातून जगातील सर्व देश आपापल्या कुवतीनुसार खेळांना प्रोत्साहन देत असतात. खेळांचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्था निर्माण होतात. क्रीडास्पर्धा, क्रीडामहोत्सव आयोजित केले जातात. खेळाडूंना पुरस्कार दिले जातात. माध्यमे त्यांना खूप प्रसिद्धी देतात. हे सगळे पाहून काही प्रश्नही पडतात. प्रत्येक गोष्टीचा बाजार करण्याची वृत्ती, प्रचंड प्रमाणात होणारी पैशाची गुंतवणूक, अफाट प्रसिद्धी, त्यामुळे खेळात शिरलेली टोकाची स्पर्धा, सतत सर्वोत्तम ठरण्यासाठी खेळाडूंवर येणारे दडपण, ह्या सगळ्या गोष्टींमुळे खेळातील निखळ आनंद हरवला आहे का? खेळाला जीवनमरणाच्या लढाईचे किंवा जनावरांच्या साठमारीचे स्वरूप आले आहे का? अशा परिस्थितीत मनाच्या आणि शरीराच्या आरोग्याचे काय होते?

ह्या प्रश्नांची उत्तरे शोधताना आठवतात ते पूर्वीचे सहज आणि आनंदाने खेळले जाणारे पारंपरिक खेळ. पैसे खर्च न करता, जिंकण्याचे ओझे शिरावर न घेता, निसर्गाशी मैत्री जपत ते खेळता येत होते. ते नाहीसे होत चालले आहेत. आधुनिक खेळांसारखा झगमगाट भोवती नसल्यामुळे ते जुनाट वाटत आहेत आणि नवे खेळ खिशाला परवडत नाहीत. मुलांनी काय करायचे?

**अ. पुढे दिलेल्या वाक्याचा अर्थ दिलेल्या तीन पर्यायांपैकी कोणता पर्याय सर्वात बरोबर दाखवतो? योग्य पर्यायावर खूण करा.** **(२)**

**१. खेळ हा वास्तविक आपल्या जीवनातील किती स्वाभाविक घटक आहे!**

क. खेळ हेच जीवनाचे वास्तव आहे.

ख. आपले वास्तविक जीवन खेळामुळे घडते.

ग. खेळ हा आपल्या आयुष्याचा एक नैसर्गिक आणि अविभाज्य घटक आहे.

**२. लहान मूल तर उत्स्फूर्तपणे खेळते.**

क. खेळण्याची प्रेरणा मुलांना स्वाभाविकपणे होते.

ख. खेळामुळे लहान मुलांना स्फूर्ती मिळते.

ग. लहान मुले उत्साहाने खेळतात.

**आ. पुढील सर्व प्रश्नांची <u>स्वतःच्या शब्दात</u> आणि <u>पूर्ण वाक्यात</u> उत्तरे द्या.**

**१. खेळण्यामुळे कोणते फायदे होतात?** **(२)**

क. ------------------------------------------------------------

ख. ------------------------------------------------------------

२. खेळांना प्रोत्साहन मिळावे म्हणून जगातील सर्वच देश कोणत्या योजना राबवतात? (४)

क. ----------

ख. ----------

ग. ----------

घ. ----------

३. सरकारच्या ह्या योजनांमुळे फायदे होत असले, तरी त्यांपासून समाजापुढे काही प्रश्नही उभे राहतात. ते कोणते? (५)

क. ----------

ख. ----------

ग. ----------

घ. ----------

च. ----------

४. पूर्वीच्या पारंपरिक खेळांचे कोणते फायदे इथे सांगितले आहेत? (२)

क. ----------

ख. ----------

## २. व्याकरण (३०)

क. योग्य त्या पर्यायावर (✓) अशी खूण करा. (५)

अ. स्वयंपाकघरात गॅसची गळती होतेय हे लक्षात ---------- मोहनने आधी गॅस सिलिंडर बंद केला आणि सगळ्या खिडक्या उघडल्या.

१. घेतल्या घेतल्या

२. कळल्या कळल्या

३. आल्या आल्या

आ. ----------वरून झालेली सगळी भांडणे विसरून आम्ही आमच्या शेजाऱ्यांशी परत मैत्री करण्याचा निर्णय घेतला.

१. दिल्याघेतल्या

२. दिलेघेतल्या

३. दिलेघेतले

इ. **मालतीला कोणतेही काम सांगा, थोडंफार तरी ---------- खेरीज ती ते पूर्ण करणारच नाही.**

१. सांडूनलवंडल्या

२. सांडल्यालवंडल्या

३. सांडूनलवंडून

ई. **जयेशवर इतके मोठे संकट कोसळलेले असताना आपण हातावर हात ठेवून बसणे योग्य नाही. आपण त्याच्या मदतीला ----------.**

१. गेलेच हवे

२. जायलाच हवे

३. गेलेलेच हवे

उ. **तू जे विधान करतो आहेस ते मला तरी पटलेलं नाही. ---------- तू म्हणतोस ते खरं आहे?**

१. कोणावरून

२. कशावरून

३. कायवरून

ऊ. **ह्या झाडाला <u>फळे लागली</u>, की सगळ्यांनाच <u>आनंद होईल</u>.**
**अर्थात हे झाड ---------- की सगळेच ----------.**

१. फळले – आनंदतील

२. फळकले – आनंदतील

३. फळफळले – आनंदतील

ए. **"काय हो, ---------- प्रतीचे कपडे ---------- भावात विकण्याचा वसाच तुम्ही घेतला आहे का?" रजनीने रागारागाने दुकानदाराला विचारले.**

१. हलका – चढा

२. हलक्या – चढा

३. हलक्या – चढ्या

ऐ. **घरातून निघताना माझ्या दोन्ही पायांत पैंजण होते. माझ्या एका ---------- हरवलंय हे मला घरी आल्यावरच कळलं.**

१. पायचं

२. पायातलं

३. पायाकडचं

**ओ. आपल्या गावात इतके ---------------- लोक आहेत ह्यावर माझा विश्वासच बसत नाही.**

१. निराक्षर

२. निरेक्षर

३. निरक्षर

**औ. तुझा असेल, पण माझा ---------------- अगदी विश्वास नाही.**

१. पुनःजन्मावर

२. पुनर्जन्मावर

३. पुनरजन्मावर

**ख. अधोरेखित शब्दातील क्रियापदापासून धातुसाधित बनवा आणि अर्थ न बदलता वाक्य परत लिहा. (४)**

**अ. सकाळी जाग <u>आल्याक्षणी</u> अभय मोबाईल हातात घेतो.**

----------------------------------------------------------------

**आ. संध्याकाळी घरात <u>शिरल्याबरोबर</u> अदिती दूरदर्शन पाहायला लागते.**

----------------------------------------------------------------

**इ. जेवणाचे ताट <u>धुऊन-पुसून</u> मगच वापरावे.**
जेवणाचे ताट ---------------खेरीज वापरू नये.

**ई. आधी पोटभर <u>खाऊन-पिऊन</u> घ्या. मग कामाला लागा.**
पोटभर ----------------वर मग कामाला लागा.

**ग. कंसातील अनिश्चित सर्वनामे योग्य जागी वापरून वाक्ये पूर्ण करा. (२)**

(कोण-काय, काय-काय, कोणास)

**अ.** ह्या घरातील माणसे एकत्र राहतात खरी, पण --------------- करतंय हे विचारलंत तर एकाचा दुसऱ्याला पत्ता नसतो.

**आ.** हा मुलगा परीक्षा पास व्हावा म्हणून एक शिक्षक ह्या नात्याने मला अजून ----------- करायला लागतंय, ---------- ठाऊक!

**घ. उदाहरणाप्रमाणे अधोरेखित शब्दाचे स्पष्टीकरण देणारे वाक्य लिहा. (२)**

उदा॰ **शर्यतीत भाग <u>घेणारा</u> स्पर्धक विजेता ठरेलच असे नाही.**
जो शर्यतीत भाग घेतो तो प्रत्येक स्पर्धक विजेता ठरेलच असे नाही.

**अ. दुसऱ्याची उत्तरपत्रिका पाहून तिची नक्कल <u>करणारा</u> स्वतःची उत्तरपत्रिका दुसऱ्याला पाहू देईल असे नाही.**

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

**आ. दुसऱ्याच्या झाडावरचे आंबे <u>चोरणारे</u> आणि ते आनंदाने <u>खाणारे</u>, हे सर्वच सारख्या प्रमाणात दोषी आहेत.**

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

**च. पुढील संधी करा.** **(२)**

अ. पुन: + वसन = ------------------------

आ. गण + ईश = ------------------------

**छ. पुढील संधी सोडवा.** **(२)**

अ. संताप = ---------------- + ----------------

आ. निष्कपट = ---------------- + ----------------

**ज. कंसातील योग्य त्या नामापासून नामसाधित क्रियापद बनवून वाक्य पूर्ण करा.** **(५)**

(पाणी, उजेड, धास्ती, ठेच, उत्तर)

अ. "सहलीला सर्व जण येणार ना?" माझा प्रश्न संपायच्या आतच "हो, नक्की येणार" सर्व मुलं एका सुरात ------------.

आ. पुरात ज्यांनी सर्वस्व गमावलं होतं त्यांच्या कहाण्या ऐकून मंत्र्यांचे डोळे ------------.

इ. मी मित्रांबरोबर गिर्यारोहणाला निघालो होतो खरा, पण त्या सर्वांचे आधीचे रोमांचक अनुभव ऐकून खरं तर मनातून ------------ होतो.

ई. "ही अवघड वाट मी अनेकदा तुडवली आहे. पावलोपावली ------------ मी काही नवशिका नाहीये", अनंत परत परत त्यांच्या वाटाड्याला सांगत होता.

उ. आई, इतक्या लवकर उठू नकोस आणि मलाही उठवू नकोस! पहाटेचे पाच वाजलेयत फक्त. ह्या प्रदेशात लवकर ------------.

**झ. योग्य त्या पर्यायावर ✓ खूण करा.** **(४)**

**अ. तू मला ------------ सांगशील आणि मी त्यावर विश्वास ठेवेन असं तुला वाटतंय का?**

१. कोण म्हणेल ते

२. काय वाटेल ते

३. काय दिसेल ते

**आ. मी कधी संकटात सापडलो, तर तू ------------ करशील ना?**

१. माझ्याशी मदत

२. माझी मदत

३. मला मदत

इ. **भाव्यांचे कुटुंब ---------------- सुखी आहे असा आमचा समज होता.**

१. खाऊन-खाऊन

२. खाऊन-पिऊन

३. जेऊन-पिऊन

ई. **मी गंभीरपणे बोलतोय. माझं बोलणं तू ----------------.**

१. हसण्यावारी नेऊ नकोस

२. हसत हसत नेऊ नकोस

३. हसून नेऊ नको

**ट. योग्य त्या म्हणीचा / वाक्प्रचाराचा क्रमांक योग्य त्या वाक्यासमोर लिहा** **(४)**

| |
|---|
| १. ढवळ्यासंगे बांधला पवळा, वाण नाही पण गुण लागला |
| २. गाड्याबरोबर नळ्याची यात्रा |
| ३. मोडेन पण वाकणार नाही |
| ४. पाण्यात पाहणे |

अ. **इतके दिवस एकमेकांबरोबर राहातायत. आता तर त्यांचे स्वभावही सारखेच झाले आहेत. ( )**

आ. **त्यानं तुझं काय वाकडं केलंय? का त्याचा इतका राग राग करतोस तू? ( )**

इ. **हे बघा मुलांनो, तुम्ही सगळे सहलीला जाऊन या. मला काही तो चढ चढणं जमणार नाही. मी थांबेन एकटी घरात. उगाच मला तुमच्याबरोबर यायला लावू नका. ( )**

ई. **आबा कधीच कोणाचं ऐकत नाहीत. 'मी म्हणतो तेच खरं' असा हटवादीपणा करतात. मग त्यापायी कितीही नुकसान झालं तरी चालतं. ( )**

## ३. वाक्यरचना आणि शब्दसंग्रह (२५)

**क. खालील वाक्यांच्या पुढचे वाक्य ओळखा.** **(५)**

अ. **महाराष्ट्रातून कांदा घेऊन गेलेल्या मालमोटारी साठामर्यादेचा भंग केल्याचे कारण देत उत्तर प्रदेशात जप्त करण्यात आल्या.**

१. कांदा व्यापाऱ्यांवर त्यामुळे परिणाम झाला असून कांद्याचा भाव दर क्विंटलमागे हजार रुपयांनी कोसळला.

२. कांद्याचा भाव प्रति क्विंटल सहा हजार रुपयांवर पोहोचल्यानंतर केंद्र सरकारने कांदा निर्यातबंदीचा निर्णय घेतला.

३. त्याचा आधार घेत राज्यातून कांदा घेऊन जाणाऱ्या मालमोटारी उत्तर प्रदेशात जप्त करण्यात आल्या.

**आ. शरीरातील हालचाली टिपून हृदयाचे ठोके मोजणारा पायजमा अमेरिकेतील संशोधकांनी विकसित केला आहे.**

१. छातीचा बिछान्यावर जो दाब पडतो तो महत्त्वाचा आहे.

२. स्मार्ट कपडे म्हणजे घट्ट बांधणीचे कपडे.

३. झोपेत काळजी घेणारे कपडे ही नवी संकल्पना आहे.

**इ. शहरामध्ये पुढील पाच दिवस ढगांच्या गडगडाटासह हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता वेधशाळेकडून व्यक्त करण्यात आली आहे.**

१. दरम्यान, सध्या पावसाची विश्रांती असल्यामुळे शहरातील कमाल तापमान पुन्हा ३० अंश सेल्सिअसच्या पुढे गेले आहे.

२. अतिवृष्टीमुळे शहरात पूरस्थिती निर्माण झाली होती.

३. सप्टेंबरच्या तिसऱ्या आठवड्यामध्ये शहर आणि जिल्ह्यामध्ये जोरदार पाऊस झाला.

**ई. माणसांनी शहरं गजबजून गेली आहेत. लहान मोठ्या इमारतींमध्ये ही माणसं राहतात.**

१. पण त्या दारं आणि खिडक्यांच्या पलीकडे काय घडत असेल या कुतूहलातून नाटकाची कल्पना सुचली.

२. या माणसांच्या जगण्यावर क्ष-किरण टाकून त्यांचं जगणं, त्यांच्या आचार-विचारांचे पदर उलगडण्याचा प्रयत्न 'डावीकडून चौथी बिल्डिंग' या नाटकात करण्यात आला आहे.

३. या नाटकाची एकूण हाताळणी प्रयोगशील पद्धतीची आहे.

**उ. पिंपळवाडी येथे आडात पडलेल्या गायीला एक तासाच्या अथक परिश्रमानंतर सहीसलामत बाहेर काढण्यात तरुणांना यश आले.**

१. मात्र, ती दिसून आली नाही.

२. आडामधून गायीचा आवाज येत असल्याचे लक्षात आले.

३. दिनकर माळी यांची गाय मंगळवारपासून बेपत्ता झाली होती.

**ख. खालील वाक्यांच्या आधीचे वाक्य ओळखा.** **(५)**

**अ. या निमित्त शाळा, महाविद्यालयांमध्ये विविध उपक्रम राबवण्यात आले.**

१. तसेच प्लास्टिकचा वापर टाळण्यासाठीही जनजागृती करण्यात आली.

२. महात्मा गांधी यांची १५०वी जयंती शहरात सर्वत्र उत्साहात साजरी करण्यात आली.

३. विद्यार्थ्यांनी गांधींचा वेष परिधान करून स्वच्छतेसाठी जनजागृती केली.

**आ. सहा वेळा जागतिक सुवर्णपदक मिळवल्यानंतर आता रशियाच्या भूमीतही नव्या विक्रमाला गवसणी घालण्यासाठी ती सज्ज झाली आहे.**

१. मणिपूरची ३६ वर्षीय मेरी कोम ही फक्त देशासाठीच नव्हे तर जागतिक बॉक्सिंगचे प्रेरणास्थान बनली आहे.

२. सहा वेळा जगज्ञेती ठरलेल्या मेरी कोम हिच्या अनुभवाचा पुन्हा एकदा कस लागणार आहे.

३. जागतिक स्पर्धेत यंदा भारताच्या पाच बॉक्सर पदार्पण करण्यासाठी सज्ज आहेत.

**इ. सुरेश कुमार असे या वैज्ञानिकाचे नाव असून ते एनआरसीसीच्या छायाचित्र विभागात काम करत होते.**

१. त्यांचे मित्र त्यांच्या घरी गेले असता घराला बाहेरून कुलूप दिसले.

२. त्यांच्या अंगावर तीन जखमा दिसून आल्या.

३. भारतीय अवकाश संशोधन संस्थेच्या राष्ट्रीय दूरसंवेदन केंद्रात काम करणाऱ्या वैज्ञानिकाचा संशयास्पद मृत्यू झाला आहे.

**ई. या कुत्र्यांनी अनेकांना जखमी केले आहे.**

१. या कुत्र्यांनीच जवळपास सात जणांना चावा घेऊन जखमी केले.

२. यात दोन लहान मुलांचाही समावेश आहे.

३. बारामती शहरात गेल्या काही दिवसांपासून मोकाट कुत्र्यांचा उच्छाद सुरू आहे.

**उ. तिने यामध्ये स्मिता पाटील यांची व्यक्तिरेखाही साकारली आहे.**

१. स्मिता पाटील यांच्या व्यक्तिमत्त्वाने झपाटलेली, क्लिनिकल सायकोलॉजीस्ट मृणाल घोळे-मापुस्कर ही स्मिता पाटीलच्या आयुष्यावर बेतलेल्या एका लघुचित्रपटाची निर्मिती करणार आहे.

२. पुण्यात होणाऱ्या स्मिता पाटील फिल्म महोत्सवात हा चित्रपट दाखवला जाणार आहे.

३. या लघुपटाचे दिग्दर्शन श्रीनिवास वारुंजीकर यांचे आहे.

**ग. खालील वाक्यांमध्ये प्रत्येकी एक प्रकारच्या चुका आहेत. चुकीचे शब्द अधोरेखित करा आणि त्यांच्याऐवजी बरोबर शब्द लिहा.** **(५)**

अ. मी एक समाज कायकता आहे. शहराच्या पयावरणाचे रक्षण करण्यासाठी काहीतरी करण्याची माझी इच्छा आहे.

आ. आपण मघाशी पाहिली ती शभर टक्के मेढी होती, याबद्दल तात्याला खात्री होती.

इ. नवा वर्ष सुरू झाला की आमचे गुरुजी विद्यार्थ्यांना नेहमी एक किस्सा सांगायचे.

ई. महाराष्ट्राची भूमी ही संताची आणि समाजसुधारकाची भूमी आहे.

उ. मित्रहो, मी कामानिमित्त काही काळासाठी भारत देशात चाललोय आहे.

**घ. खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांच्या जागी कंसातील पर्यायी शब्द वापरून वाक्य पुन्हा लिहा. (पर्यायी शब्दामुळे मूळ वाक्यात बदल करावा लागू शकतो.)** **(५)**

(समजूत, कुवत, टिपूस, झंझावात, अनभिज्ञ)

अ. स्वतः काही करायची क्षमता नसताना लोक उगीच दुसऱ्यांना सल्ले देतात.

---

आ. सतत विनोद करणारे लोक कोणतेही काम गांभीर्याने करत नाहीत असेच पुष्कळांना वाटते.

---

इ. शिळे खाल्ल्याने आपल्या शरीराचे किती नुकसान होते याबद्दल अनेकांना माहीतच नसते.

---

ई. पावसाचा थेंब नव्हता म्हणून शेतजमीन उजाड झाली होती.

---

उ. जागतिकीकरणाच्या चक्रीवादळात आपण अनेक झाडे तोडली.

---

**च. खालील उताऱ्यातील रिकाम्या जागेसाठी योग्य पर्याय निवडा.** **(५)**

हसण्यामुळे आपल्या चेहऱ्याचे स्नायू **(अ)** ---------- होतात. हसणे हाच सगळ्यावर **(आ)** ---------- उपाय आहे, त्यामुळेच हास्योपचार वगैरे बाबीही **(इ)** ---------- आल्या आहेत, पण प्रत्येक वेळी **(ई)** ---------- हसणे हे फायद्याचे नसते. सगळ्या गोष्टींवर ते औषध नाही, उलट त्यामुळे काही रुग्णांना काही वेळा हानी पोहोचू शकते असा धोक्याचा **(उ)** ---------- वैज्ञानिकांनी दिला आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| **अ.** | १. जटील | २. शिथिल | ३. शीतल |
| **आ.** | १. रामबाण | २. कृष्णबाण | ३. नेमका |
| **इ.** | १. उदयास | २. विपर्यास | ३. निवळल्या |
| **ई.** | १. वाजवी | २. निरर्थक | ३. अवाजवी |
| **उ.** | १. दरारा | २. इशारा | ३. चेतावणी |

## ४. निबंध लेखन (१०)

**क. खालीलपैकी एका विषयावर १० ते १५ ओळी लिहा.**

अ. वाचन आणि आनंद

आ. मनाचा ब्रेक उत्तम ब्रेक!

इ. पेहराव आणि सौंदर्य

ई. हे विश्वचि माझे घर.

# मागील भागात

१.

| | | |
|---|---|---|
| १. जानेवारी<br>काल मंगळवार होता. | २. जानेवारी<br>आज बुधवार आहे. | ३. जानेवारी<br>उद्या गुरुवार आहे. |
| ३१. डिसेंबर<br>परवा सोमवार होता. | १. जानेवारी<br>काल मंगळवार होता. | ४. जानेवारी<br>परवा शुक्रवार आहे. |
| ३०. डिसेंबर<br>तेरवा रविवार होता. | ३१. डिसेंबर<br>परवा सोमवार होता. | ५. जानेवारी<br>तेरवा शनिवार आहे. |

**क.** अ. मंगळवारी आ. बुधवारी इ. गुरुवारी ई. शुक्रवारी उ. शनिवारी ऊ. रविवारी

**ख.** अ. मंगळवार आ. बुधवार इ. मंगळवारचा ई. बुधवारी

**ग.** अ. सोमवार / सोमवारी आ. मंगळवार / मंगळवारी इ. बुधवार / बुधवारी ई. मंगळवारी / मंगळवारची उ. बुधवारी / बुधवारची

**घ.** अ. रविवारचा आ. रविवारचा इ. रविवार / रविवारी

**च.** अ. रविवारची आ. रविवारची इ. रविवार / रविवारी

**छ.** अ. पहाटेचे / पहाटेच्या / पहाटेची आ. दिवसा इ. दिवसाचा / दिवसाची / दिवसाचे ई. दिवसाचे / दिवसाच्या / दिवसाची उ. रात्री ऊ. रात्रीचा / रात्रीची / रात्रीचे ए. रात्रीचे / रात्रीच्या / रात्रीची

**ज.** अ. रात्री आ. रात्र इ. दुपारी इ. रात्रीचा उ. दुपारी

२. अ. सॉरी सर, मला उशीर झाला, सबब आज बस पंक्चर झाली होती.
**दुरुस्ती :** सॉरी सर, आज बस पंक्चर झाली होती, सबब मला उशीर झाला.

आ. आमची आजी कायम फेसबुकवर पडीक असते, याकरिता तिचा वेळ चांगला जावा.
**दुरुस्ती :** आमची आजी तिचा वेळ चांगला जावा याकरिता कायम फेसबुकवर पडीक असते.

इ. हे वाक्य बरोबर आहे.

ई. तुमची सर्व खाजगी माहिती हॅक होते, तेव्हा फसव्या ईमेलला तुम्ही उत्तर देता.
**दुरुस्ती :** तुम्ही फसव्या ईमेलला उत्तर देता, तेव्हा तुमची सर्व खाजगी माहिती हॅक होते.

उ. राजीवने घरच्या सगळ्यांवर आपल्याला उठवण्याचं काम सोपवलं आहे, त्यामुळे गजर वाजतो तरी त्याला सकाळी जाग येत नाही.

**दुरुस्ती :** गजर वाजतो तरी राजीवला सकाळी जाग येत नाही, त्यामुळे त्याने घरच्या सगळ्यांवर आपल्याला उठवण्याचं काम सोपवलं आहे.

ऊ. यास्तव कोणास संशय येऊ नये, राजाने फकिराचा वेष करून स्वतः राज्यात जाऊन प्रजेची विचारपूस केली.
**दुरुस्ती :** कोणास संशय येऊ नये, यास्तव राजाने फकिराचा वेष करून स्वतः राज्यात जाऊन प्रजेची विचारपूस केली.

ए. मी संवादांना चाल लावतो म्हणून मला संवाद पाठ होत नाहीत.
**दुरुस्ती :** मला संवाद पाठ होत नाहीत म्हणून मी संवादांना चाल लावतो.

ऐ. शेतकरी हवालदिल झाले आहेत, त्यामुळे सरकारने कर्जमाफीची अंमलबजावणी केली नाही.
**दुरुस्ती :** सरकारने कर्जमाफीची अंमलबजावणी केली नाही, त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत.

३. **क.**

अ. थांब जरा, ही माझी पर्स होती!
आ. मला आज बरं वाटत नव्हतं.
इ. चहा मस्त झाला होता.
ई. आलोकने बाटलीत पाणी भरले.
उ. बाबांचे गुडघे खूप दुखले.
ऊ. चंदा अगदी तिच्या बहिणीसारखी दिसायची.
ए. कलाबाईने रांगोळीत रंग भरला.
ऐ. हा ड्रेस तुला चांगला दिसत नव्हता.
ओ. सूर्य पहाटे साडेपाच वाजताच उगवला.
औ. हे लोणचे उन्हात ठेवल्यामुळे चांगले मुरले.
अं. सिगरेट का ओढलीस रे?

| | कर्त्याप्रमाणे | कर्माप्रमाणे |
|---|---|---|
| अ. | ✓ | |
| आ. | ✓ | |
| इ. | ✓ | |
| ई. | | ✓ |
| उ. | ✓ | |
| ऊ. | ✓ | |
| ए. | | ✓ |
| ऐ. | ✓ | |
| ओ. | ✓ | |
| औ. | ✓ | |
| अं. | | ✓ |

**ख.** अ. सगळ्यांना लवकर उठवते / चहा करते आ. बायकोला बोलावले / तिला म्हणाला इ. तोंड धुतले / केस पुसले / कपडे बदलले ई. ईमेल्सची उत्तरं पाठवते / अभ्यासाला बसते उ. फोन करतात / शुभेच्छा देतात ऊ. मांजर शिडी चढते / पाने खाते / तिला रागावले ए. रस्ते झाडले / रांगोळ्या काढल्या / निदर्शने केली

४. **क.** (अ.) जितक्या (आ.) तितक्याच (इ.) इतका (ई.) इतक्या (उ.) जशा (ऊ.) तशाच (ए.) तिच्याइतकीच (ऐ.) त्याहून जरा जास्तच (ओ.) ज्याप्रमाणे (औ.) त्याप्रमाणे (अं.) असा (अः) जास्त (अ.) इतकं (आ.) इतकी

**ख.** अ. त्या प्रकारे... आ. तसेच... इ. तशीच... ई. त्याप्रमाणे... उ. जणू... ऊ. तेवढीच... ए. तितक्या... ऐ. तसा...

६. **क. अ.** १. करताना २. करायला ३. करण्यापूर्वी ४. करावा ५. केल्याने
**आ.** १. देत २. दिल्यानंतर ३. देणारा ४. देते ५. द्यायचा
**इ.** १. सांगण्यासाठी २. सांगायला ३. सांगितलेल्या ४. सांगताना ५. सांगत ६. सांगणे

७. क. अ. राज्याचे मुख्यमंत्री आज येथील आश्रमातल्या अनाथ मुलांना भेट देणार आहेत.
आ. न्यायाधीशांनी विचारलेल्या प्रश्नांवर त्याने काहीच उत्तर दिले नाही.
इ. पुढच्या मीटिंगसाठी मी काही सूचना करू इच्छिते.
ई. तुम्हाला नोकरी द्यायची की नाही, याचा निर्णय घेण्यामध्ये तुमची अर्हता महत्त्वाची ठरेल.
उ. या बाबतीत आपल्याला लवकर काहीतरी निर्णय घ्यावा लागेल.
ऊ. मंत्रिमहोदय आज वाढत्या महागाईवर भाषण करणार आहेत.

८. क. अ. कोणीतरी ढकलून मला खड्ड्यात पाडले.
आ. पण शेवटी माझे ओरडणे ऐकून तू लगेच येऊन मला वाचवलेस.
ई. तुला वाढदिवसाला बोलवायला विसरलो म्हणून मला आईनं किती ऐकवलं.
उ. भांडी घासताना आमच्या कामवाल्या बाई सारखी काचेची भांडी फोडतात.
ऊ. भूसंपादनाचे कित्येक प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांनी अजूनही महापालिकेत लटकवले आहेत.
ए. सध्याच्या व्यावसायिक युगातील स्पर्धा माणसाचा मेंदू बिघडवतात, असे संशोधन सांगते.

ख.

| | | | |
|---|---|---|---|
| पडणे | उदा॰ पाडणे | रंगणे | रंगवणे |
| वाचणे | वाचवणे | फुटणे | फोडणे |
| संपणे | संपवणे | बसणे | बसवणे |
| ऐकणे | ऐकवणे | लागणे | लावणे |
| लटकणे | लटकवणे | घडणे | घडवणे |
| बिघडणे | बिघडवणे | उडणे | उडवणे |
| उडणे | उडवणे | रडणे | रडवणे |
| हसणे | हसवणे | पसरणे | पसरवणे |
| झोपणे | झोपवणे | तुटणे | तोडणे |
| पिणे | पाजणे | फिटणे | फेडणे |
| तरणे | तारणे | निघणे | घालवणे |

९. क. अ. काय / का / ना आ. कधी / काय / ना / कधी इ. काय / किती / केवढी
ई. कोणी / कोण / कशी उ. कितव्यांदा ऊ. ना / काय / की / की
ए. का / कोणत्या ऐ. कोणी / कशाला / काय / का ओ. काय / कोणापाशी / का
औ. कितवं

१०. क. अ. (१) आणि (२) तर (३) तेव्हा (४) अन् (५) की (६) किंवा (७) म्हणून (८) पण (९) तरी आ. (१) पण (२) तेव्हा (३) तर (४) पण (५) आणि (६) पण (७) कारण (८) परंतु (९) जरी (१०) तरी (११) आणि (१२) का (१३) वा (१४) तरी

११.

| | |
|---|---|
| उकळणे | पाणी, चहा, काढा, दूध, आमटी, वरण |
| चाळणे | गहू, तांदूळ, कडधान्य, मैदा, रवा |
| फेटणे | अंडी, दही |
| कापणे | फळे, लिंबू |
| वाफवणे | कणीस, मोदक, इडली, ढोकळा |
| मळणे | कणीक |
| परतणे | कांदा, भाजी, भात |
| किसणे | कैरी, सुके खोबरे, काकडी, बीट, लाल भोपळा, दुधी भोपळा, गाजर |
| आटवणे | दूध, उसाचा रस, मावा, काढा |
| कालवणे | मसाला, वरण-भात, आमटी-भात, कढी-भात, दूध-भात |
| मिसळणे | साखर, मीठ, केशर, हळद, गूळ, गरम मसाला पावडर |
| सोलणे | बटाटे, कांदे, वाटाणे, लसूण, केळे, पावट्याच्या शेंगा |
| मुरवणे | मुरांबा, लोणचे |
| खवणे | नारळ |
| कुटणे | शेंगदाणे, कडधान्य, वेलची |
| भिजवणे | कडधान्य, पोहे, साबूदाणा, तांदूळ |
| शिजवणे | भाज्या, तांदूळ |
| चिरणे | भाज्या (कांदे, बटाटे, टोमेटो, कोथिंबीर, भेंडी इ०) |
| तळणे | पापड, पुऱ्या, कुरडया, वडे, भजी |
| पाखडणे | धान्य (गहू, तांदूळ, भाजलेले शेंगदाणे) |
| लाटणे | चपात्या, पोळ्या, पुऱ्या |
| उकडणे | मूग, मोदक, अळू वडी, कोथिंबीर वडी, शेंगा, कंदमुळे (बटाटे, रताळे, अरबी) |
| ढवळणे | वरण, आमटी |
| कुसकरणे | चपाती, पोळी, भाकरी |
| घोटणे | वरण, श्रीखंड |
| वाटणे | मसाले, मिरच्या, आलं-लसूण |

| | |
|---|---|
| उलथणे | पोळी, भाकरी, डोसा, घावण |
| धुणे | भाज्या, फळे, डाळ, तांदूळ |
| घुसळणे | ताक |
| तापवणे | पाणी, दूध |
| दळणे | गहू, तांदूळ, ज्वारी, बाजरी |
| कढवणे | तूप, आमटी, कढण |
| आंबवणे | इडलीचे पीठ, ढोकळ्याचे पीठ, जिलबीचे पीठ |
| भुरभुरणे | कोथिंबीर, मीठ, मिरपूड, साखर, किसलेले खोबरे |
| उपसणे | पाणी, कडधान्य |
| गाळणे | चहा, तूप, सूप |
| निथळणे | धुतलेले पोहे, धुतलेली कोथिंबीर, धुतलेले तांदूळ |
| थापणे | थालीपीठ, भाकरी, वड्या, वडे |
| ठेचणे | मिरची, आलं-लसूण, खडा मसाला, सुंठ |

१२. **क.** निळसर लालबुंद लालसर काळाभोर काळामिट्ट काळसर पिवळसर पांढरास्वच्छ हिरवाकंच

**ख.** अ. हलकंफुलकं आ. कोऱ्याकरकरीत इ. उरलंसुरलं ई. भोळ्याभाबड्या उ. ह्या निळ्याशार ऊ. पिवळीधमक

## पाठ १

१. **क.** (इ. उभे) खेळ म्हटले की लहान-थोर सर्वांनाच आनंद होतो. लहान मुलांच्या हाती (ऊ. उभे) खेळणे देताच तीही आनंदतात. खेळात प्रत्येक जण आळीपाळीने आपली (अ. उभे) खेळी करतो. खेळ करणारा प्रत्येक जण असतो एक (१ आडवे) खेळकरी आणि एकमेकांबरोबर खेळणारे सगळे असतात (२ आडवे) खेळगडी. स्वतः (४ आडवे) खेळणे आणि जगाला (ई. उभे) खेळवणे देवालाही आवडते. खेळांची रचना करून खेळायला लावणारा आणि स्वतःही खेळणारा तो (आ. उभे) खेळिया आहे. 'जीवन' नावाच्या खेळात भाग घेणारा प्रत्येकजण एक (३ आडवे) खेळाडू आहे. हे जग म्हणजे खेळण्यासाठी तयार केलेली एक (ए. उभे) खेळपट्टी आहे. हा आयुष्याचा खेळ आनंदाने खेळायला हवा, पण सर्वच माणसे (५ आडवे) खेळकर नसतात आणि (ई. उभे) खेळकरपणा नसेल तर आयुष्यच दुःखी होते.

**ख.**

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १/अ. खे | ळ | क | री | | | | | | |
| ळी | | | | इ. खे | | | | | |
| | | | २/आ. खे | ळ | ग | डी | | | |
| | | | ळि | | | | | | |
| | | | या | | | ३/ ई. खे | ळा | डू | |
| ४/उ खे | ळ | णे | | | | ळ | | | ऊ. खे |
| ळ | | | | ५/ए खे | ळ | क | र | | ळ |
| व | | | | ळ | | र | | | णे |
| णे | | | | प | | प | | | |
| | | | | ट्टी | | णा | | | |

२. **क.** हे तिला अर्थातच तिच्या नातवांकडून कळलं होतं. तिला खेळातलं काही कळत नाही; त्यात ती रमत नाही. पण उत्साहानं आणि जल्लोशानं भारलेल्या वातावरणाचा संसर्ग तिलाही टाळता येत नाही. त्यामुळे अधूनमधून तिच्या बाल्कनीत चकरा चालू होत्या. खेळापेक्षा तो पाहणाऱ्यांचे फुललेले चेहरे पाहण्यातच तिला गंमत वाटत होती. नुकतंच चौथं संपून पाचवं वर्ष लागलेल्या धाकट्या नातवाला त्या गर्दीत शोधण्याचा तिने थोडा प्रयत्न केला, पण मग नाद सोडून दिला.

**ख.** जरी मला खेळातलं काही कळत नसलं आणि मी त्यात रमत नसले, तरी उत्साहानं आणि जल्लोषानं भारलेल्या त्या वातावरणाचा संसर्ग मलाही टाळता येत नाही.

**ग.** अ. धाकट्या नातवाला नुकतंच चौथं संपून पाचवं वर्ष लागलं होतं. त्याला त्या गर्दीत शोधण्याचा मी थोडा प्रयत्न केला. नंतर मी तो नाद सोडून दिला.

आ. त्यानं भाजलेल्या दाण्यांचा तोबरा भरला. त्या तोबरा भरलेल्या तोंडानं त्यानं 'हुंऽऽ!' म्हटलं, अंगठा उंचावून दाखवला. मग तो लगेच भुर्रकन पळून गेला.

**घ.** अ. नाद सोडून दिला आ. तोंडात टाकायची इ. लोटून घेतलेला ई. उमगत जातील. उ. ओठ काढणं, गळा काढणं, हमसून हमसून रडणं ऊ. गलबलून आलं, आवंढा गिळला ए. तोबरा भरू ॲ. फोडणीला टाकले ऐ. चाहूल लागली, अंगठा उंचावून दाखवून ओ. टिपेला पोचला

३. क. म्हटल्या म्हटल्या ख. शिजल्या शिजल्या ग. पडल्या पडल्या घ. घेतल्या घेतल्या च. मिळाल्या मिळाल्या छ. मागितल्या मागितल्या ज. पडल्या पडल्या झ. बसल्या बसल्या

४. क. अडल्यापडल्याला ख. दिल्याघेतल्याचा ग. घडल्याबिघडल्याशिवाय
घ. पडल्याझडल्या च. थकल्याभागलेल्या

५. **क.**

| |
|---|
| बॅडमिंटन खेळताना मनवाचं मनगट दुखावतं. (२) आई तिला आठ दिवस भरवते. (१) |
| बॅडमिंटन खेळताना मनवाचं मनगट दुखावलं. (२) आईनं तिला आठ दिवस भरवलं. (३) |

**ख.**

| |
|---|
| छोटा जयेश अंधाराला घाबरतो (१) आणि रडतो. (१) मग आई त्याला जवळ घेते. (१) |
| छोटा जयेश अंधाराला घाबरला. (१) रडायला लागला. (१) मग आईने त्याला जवळ घेतलं. (३) |

**ग.**

| |
|---|
| विशालला क्रिकेटचा बॉल लागतो (२) आणि चक्कर येते. (२) मुलं त्याला धरतात (१) आणि घरात आणतात. (१) |
| विशालला क्रिकेटचा बॉल लागला (२) आणि चक्कर आली. (२) मुलांनी त्याला धरलं (३) आणि घरात आणलं. (३) |

**घ.**

| |
|---|
| विजय सामना जिंकतो. (१) पदक घेण्यासाठी मित्र त्याला व्यासपीठावर चढवतात. (१) |
| विजय सामना जिंकला. (१) पदक घेण्यासाठी मित्रांनी त्याला व्यासपीठावर चढवलं. (३) |

६. **क.** अ. हुरूप आ. स्नायू इ. बळकट ई. आपसूक उ. चयापचय ऊ. ठिसूळ ए. पीळदार ॲ. घाटदार ऐ. सांधे ओ. लयबद्ध ऑ. पदन्यास
**ख.** अ. नकारात्मक आ. नाजूक, ठिसूळ इ. अखंडित ई. अनियमित उ. बेढब ऊ. रोगी ए. अयशस्वी
**ग.** अ. हृदय – हृदयाचे आरोग्य सुधारते आ. पचन – चयापचय क्रिया सुधारते, चांगली भूक लागते इ. सांधे – संधिवात होणे आणि हाडे ठिसूळ होणे हे टाळता येते ई. शरीर – घाटदार होते, शारीरिक क्षमता वाढते उ. रक्त – रक्तदाब कमी होतो, रक्तातील कोलेस्टेरॉल आणि ट्रायग्लिसराईडस् कमी होतात. ऊ. मानसिक आरोग्य – मनात सकारात्मक बदल होतो, सुरक्षिततेची भावना येते, उत्साह वाटू लागतो.

११. **क.** लंगडी – पाठलाग करणे, हुलकावणी देणे, लंगडी घालणे, दुसरा पाय न टेकवणे
**ख.** हॉकी – गोल करणे, चेंडू फटकारणे, गोल वाचवणे, चेंडू पास करणे
**ग.** टेनिस – सर्विस (आरंभखेळी) करणे, टोला लगावणे, चेंडू परतवणे, फटका मारणे
**घ.** विटी-दांडू – गल खणणे, टोला लगावणे, विटी उडवणे, विटी झेलणे, ओलीसुकी करणे

१२.

| | | | |
|---|---|---|---|
| क. टेनिस | बॅडमिंटन | खोखो ✗ | खोखोसाठी बॅट लागत नाही. |
| ख. पत्ते | बुद्धिबळ | हॉकी ✗ | हॉकी मैदानी खेळ आहे. इतर दोन्ही बैठे खेळ आहेत. |

| | | | |
|---|---|---|---|
| ग. लंगडी | मुष्टियुद्ध ✘ | कबड्डी | कबड्डी आणि लंगडी सांघिक भारतीय खेळ आहेत. |
| घ. झिम्मा | लपंडाव ✘ | फुगडी | झिम्मा आणि फुगडी जास्त करून मंगळागौरीचे स्त्रियांचे खेळ आहेत. लपंडाव लहान मुले खेळतात. |
| च. पोहणे ✘ | क्रिकेट | फुटबॉल | पोहणे- पाण्यातील खेळ. इतर दोन्ही मैदानी खेळ. |

१३.

| खेळ १ | खेळ २ | खेळ ३ |
|---|---|---|
| क्रिकेट | खो खो | कबड्डी |
| षटकार<br>शतक<br>संघ<br>मैदान<br>बॅट<br>बॉल<br>बाद<br>सामना<br>शतक<br>झेल | पळती<br>खो<br>स्पर्श<br>मैदान<br>लोण<br>सामना<br>संघ<br>खुंट<br>पाठलाग<br>बाद | मैदान<br>श्वास<br>चढाई<br>स्पर्श<br>सामना<br>संघ<br>बाद |

१४. क. फायदा X गैरफायदा ख. वापर X गैरवापर ग. समज X गैरसमज घ. सोय X गैरसोय

१५. ख. ह्या क्रीडाप्रशिक्षकाचं खेळाशी अतूट / उत्कट नातं आहे. घरात इतर कोणाचीच साथसंगत नसल्याने, असलेल्या मोजक्याच खेळण्यांशी खेळायचं, किंवा स्वतःच वेगवेगळे खेळ शोधायचे आणि एकटंच खेळायचं, असं त्यांचं बालपण गेलं. 'खेळ फक्त शरीरानंच खेळायचे नसतात, तर त्यात बुद्धी, कल्पकता, समज असं सर्वच असावं लागतं', असं त्यांचं म्हणणं आहे. काही खेळ तर ते मनानंही खेळत असत. त्यात त्यांचे काल्पनिक मित्र आणि कल्पनेतलेच भाऊ आणि बहिणीही सामील असत. ह्या खेळांनीच त्यांचं रम्य नसलेलं, हरवत चाललेलं बालपण वाचवलं आणि खेळातून जगण्यातला आनंद शोधण्याची वाट दाखवली असं त्यांना वाटतं.

१६. **क.** अ. समांतर = सम + अंतर आ. सारासार = सार + असार इ. शुभाशीर्वाद = शुभ + आशीर्वाद

**ख.** अ. विद्या + आलय = विद्यालय आ. कार्य + आरंभ = कार्यारंभ इ. महत्त्व + आकांक्षा = महत्त्वाकांक्षा

१७. **क.** अ. नाद आ. विविधरंगी इ. मोकाट ई. पसरलेल्या उ. बारीक ऊ. मैत्रिणीबरोबर ए. हळुवार ॲ. साठतील ऐ. उचलणारी ओ. न समजणाऱ्या

# पाठ २

१. क.

| | | |
|---|---|---|
| अ | मिश्या आणि 'पुरुषपणाची' भावना ह्यांच्याशी निगडित म्हणी / वाक्प्रचार | मिशीला पीळ देणे, मिशी उतरवून ठेवणे, मिशी भादरली जाणे |
| आ | मिश्यांचे वेगवेगळे प्रकार | आकडेबाज, छपरी, लिंबू-पिळी, तलवार कट, हिटलर कट |
| इ | शिरोभूषण वापरण्याचा मूळ हेतू | उन्हापासून मस्तकाचे रक्षण करणे |
| ई | पागोटे किंवा पगडी कशी बनत असे? थोडक्यात वर्णन | हातभर रुंद आणि पन्नास ते सव्वाशे हात लांब असे वस्त्र / कापडी पट्टी वापरून पागोटे किंवा पगडी शिवली जाई. श्रीमंतांच्या पगड्या / पागोट्यांना जरीचा काठ आणि सोनेरी झिरमिळ्या असत. सत्तेत सर्वोच्च पदावर असणाऱ्यांच्या शिरोभूषणांना झोकदार पिसांची आणि हिऱ्यामोत्यांची सजावट केलेली असे. |
| उ | गांधी टोपीचा जन्म होण्याआधी शिरोभूषणांचे प्रचलित असलेले प्रकार | गंधर्व टोपी, सावरकरी टोपी, गडकरी टोपी इत्यादी |
| ऊ | सर्वांकरता एकाच प्रकारची टोपी बनवण्यामागचा महात्मा गांधींचा हेतू | सर्व धर्म, जाती-जमाती, पंथ एकाच समानतेच्या सूत्रात बांधावेत हा गांधींचा हेतू होता. गांधी टोपी हे त्या हेतूचे प्रतीक होते. |
| ए | गांधी टोपी कशाचे प्रतीक बनली? | ब्रिटिश साम्राज्याला विरोध आणि स्वातंत्र्य चळवळ ह्यांचे प्रतीक बनली. |
| ॲ | गांधी टोपी वापरणाऱ्यांना सुरुवातीस कोणत्या प्रतिक्रियांना सामोरे जावे लागले? | ब्रिटिशांनी त्यांना नोकऱ्या नाकारल्या, त्यांच्यावर लाठीमार आणि हल्ले केले, काठीने टोप्या उडवून त्यांचा अपमान केला |

**ख.** अ. पगडी बनवण्यासाठी वापरण्यात येणारे कापड सुती किंवा रेशमी आणि रंगीत असे.
आ. महाविद्यालयांमध्ये इंग्रजी शिक्षण घेणारे सुशिक्षित शहरी होते. त्यांनी आपली मस्तके ज्या नाना प्रकारच्या टोप्यांखाली झाकली त्या टोप्या सुटसुटीत होत्या.
इ. गांधी टोपीला त्यांनी स्वातंत्र्यलढ्यातले एक शस्त्र बनवले. हे शस्त्र प्रभावी होते.
ई. ज्ञानेश्वर, तुकाराम इ॰ संतांनी महाराष्ट्राच्या जिभेवर अशी अनेक प्रतीके खेळवली. ती प्रतीके समर्थ होती.
उ. जनतेने गांधींच्या कविशक्तीचा मानसन्मान केला. तो मानसन्मान योग्य होता.

**ग.** विसाव्या शतकाच्या सुरुवातीस जे चित्रपट आले त्यांत एका बाजूस व्यापारी दाखवत असत. हे व्यापारी लोभी आणि दुष्ट असत. त्यांचे मित्र असणारे जमीनदार श्रीमंत आणि कारखानदार धनिक असत. चित्रपटाचा मजूर असणारा नायक गरीब, कष्टाळू, इमानदार असे आणि त्याच्यासारख्याच इतर मजुरांच्या भल्यासाठी आणि न्यायासाठी तो लढत असे. चित्रपटाच्या नायिकेचे कपडे सुंदर आणि भारी असत. ते कपडे घालून नाच करणे, गाणी गाणे आणि नायकाच्या प्रेमात पडणे ह्या प्रकारच्या भूमिका तिच्या वाट्याला येत.

**घ. मिशी** – अ. – ३ आ. – १ इ. – २

१. आपल्या मिशीला तूप लावत असे. २. मिशीवर ताव देतोय. ३. त्याची मिशी उतरली

**टोपी** – अ. – ३ आ. – १ इ. – ३

१. टोपी फिरवेल ते सांगता येत नाही. २. टोपी उडवतात ३. टोपी घातलीय.

२. **क.** अ. प्रवाशांनी चालत्या गाडीत चढू नये. आ. तुषार चावऱ्या मांजराजवळ जात नाही. इ. मोकळ्या माळावर फिरायला मजा येते. ई. तरुणपणी आम्ही बारीक भुरभुरणाऱ्या पावसात फिरायला जात असू. उ. ह्या चिंचोळ्या, वेड्यावाकड्या रस्त्यावरून म्हातारी माणसे कशी जातील?

**ख.** अ. वेड्या आ. उघड्या इ. भाबड्या, हळव्या ई. सावळ्या, उंच, हुशार उ. फुटक्या ऊ. बडबडी, माणूसघाण्या

५. उभे – १. चमकी २. साखळ्या (अ.व.) ३. अग्रफूल ४. मोहनमाळ ५. तोरड्या (अ.व.) ६. बांगड्या (अ.व.)

आडवे – १. चिंचपेटी २. साज ३. नथ ४. डूल ५. तन्मणी ६. कुड्या (अ.व.) ७. कंबरपट्टा ८. अंगठी

६. **क.** अ-१० आ-६ इ-७ ई-३ उ-१ ऊ-९ ए-५ ॲ-८ ऐ-२ ओ-४

**ख.** अ-८ आ-१ / ४ इ- ५ ई-७ उ-६ ए-२ ॲ-१ / ४

**ग.** अ-९ आ- ३ इ-१० ई-७ उ-६ ऊ-४ ए-८ ॲ-२ ओ-१

**घ.**

| | विशेषण | नाम | | विशेषण | नाम |
|---|---|---|---|---|---|
| अ | लांब | वेणी, केस, दाढी | ऊ | कापलेले | केस, दाढी, मिशी |
| आ | पायघोळ | धोतर, साडी | ए | खोटे | दागिने |
| इ | घट्ट | शर्ट, कुडता, पँट | ॲ | विटके | कपडे |
| ई | आखूड | सलवार, पँट, साडी | ऐ | जुनाट | कपडे, दागिने |
| उ | सैल | शर्ट, कुडता, पँट | ओ | आधुनिक | कपडे, दागिने |

**च.** अ. मोडली आ. नेसेन इ. घालतो ई. बांधला उ. घालेन

**छ.** अ-४ आ-१ इ-५ ई-२ उ-३ ऊ-७ ए-६

**ज.**

| | | |
|---|---|---|
| अ | १ | पदर पसरला |
| आ | २ | पदराखाली घेतले |

| | | |
|---|---|---|
| इ | ३ | पदरात बांधण्याचा |
| ई | ४ | पदराला गाठ मारली |
| उ | ५ | पदरमोड केलीस |
| ऊ | ६ | पदरी ----- -- ---- ---- पडलं |
| ए | ७ | पदराला खार लागला |

८. **क.** अ. रमा + ईश आ. अति + अल्प इ. भाग्य + उदय
**ख.** अ. जनैक्य आ. अत्यावश्यक इ. निसर्गोपचार

## पाठ ३

१. **क. आ.** १. विनोदबुद्धी २. व्यंगचित्रां ३. विनोदी ४. मुखपृष्ठा ५. मोठमोठ्या ६. परिधान ७. पाठलाग ८. निर्मिती ९. प्रसिद्ध १०. अडगळी ११. गैरसोय १२. तंबोरा १३. निरागस १४. चंद्रप्रकाशा १५. कल्पनाशक्ती १६. मजल्या १७. पुतळा १८. दृष्टिकोन १९. उणीव
**इ.** ऐ. उ. आ. ए. ई.

२. **क.** शिवाय साहित्यकारांना कविता रचण्याचे जे नियम होते ते काळजीपूर्वक पाळण्याचे ओझेही असे. / वर साहित्यकारांना पद्यरचनेचे काटेकोर नियमही पाळणे भाग होते. **ख.** मानवी जीवनातल्या आणि स्वभावातल्या विसंगतींमधून विनोद जन्म घेत असतो ह्याची कोणाला कल्पनाही नसावी. / मानवी जीवनातल्या आणि स्वभावातल्या विसंगतींमधून विनोद जन्म घेत असतो ह्याची तेव्हा कोणालाही जाणीव नव्हती. **ग.** पण मोकळे वातावरण, मोकळी अभिव्यक्ती आणि प्रयोगशीलता यांना समाजमानसात स्थान असले तर विनोद फुलतो; सशक्त आणि परिणामकारक होतो. **घ.** मग ब्रिटिशांनी बरोबर आणलेली आपली भाषा आणि श्रीमंत साहित्य ह्यांच्याशी ओळख झालेल्या देशी सुशिक्षितांनी पुराणकथांऐवजी सभोवतालच्या समाजातील विसंगती पाहायला सुरुवात केली. **च.** त्यातून निरुपयोगी आणि अन्याय्य रूढी जपणारा सनातनी वर्ग त्यांच्यावर रागावला. **छ.** दिपवून टाकणारे भाषावैभव, कल्पकता, तीक्ष्ण आणि भेदक विनोदबुद्धी असणाऱ्या राम गणेश गडकरींनीही नाटके, कविता, व्यक्तिचित्रे, टीकालेख, प्रहसने इत्यादी प्रकार हाताळले. **ज.** अशी ओळख नसलेले पण तरीही ज्यांच्या साहित्यात ठिकठिकाणी दर्जेदार विनोद वापरलेला असतो, असे अनेक लेखक महाराष्ट्राला लाभले आहेत.

४. **क.** अ. **...** मनमोकळं हसवेल असा विनोद. आ. ... शारीरिक श्रम करणाऱ्यांच्या कष्टप्रद आयुष्यासारखाच... इ. ... त्यामागे अध्यात्म लपलेले असते, तसेच ...
ई. ... संत एकनाथांनी रचलेले आणि आजही लोकांना आवडणारे ...
उ. **...** खरोखरच त्रस्त झालेल्या सुनांचे ... ऊ .... व्यक्त करण्याची सोय होते ...
**घ. आ.** १. बायकोला सोडचिठ्ठी दिली २. तो लगेच अरे ला कारे करू लागतो
३. दुर्दैव तिच्यामागे हात धुवून लागले आहे. ४. ती बोलताना तारतम्य बाळगत नाही.
५. वक्त्यांची जीभ घसरते.

५. **क.** अ. १. कथा, स्वभाव २. प्रसंग, पोषाख ३. नाटक, वातावरण ४. मन
५. व्यक्तिमत्व, कुटुंब ६. चेहरा

**ख.** अ. हितचिंतक आ. सहानुभूती इ. उपकारकर्ता ई. दुर्बीण उ. तटस्थपणा
ऊ. कोटी ए. उदात्तता ॲ. साक्षात्कार ऐ. थाप ओ. तारतम्य

६. **क.** अ. नव्याने आ. एकदा इ. कित्येकदा ई. एकत्र उ. हजारदा
ऊ. एवढ्यात ए. तेवढ्यात ॲ. इतक्यात
**ख.** अ. मजेदार, मजेशीर आ. हुशार इ. विसंगत ई. फसवा उ. आनंदी
ऊ. विरूप ए. धार्मिक ॲ. चिरतरुण ऐ. गमतीदार ओ. विभक्त ऑ. ज्ञानी

७. **क.** अ. चांगले + असे आ. ने + अन इ. घाम + उळे
**ख.** अ. काहीसे आ. कित्येक इ. प्रीत्यर्थ

८.

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| द्व्य | र्थी | सू | | प्र | | | त | र | ल |
| | | क्ष्म | भे | सं | | कु | ज | क | ट |
| नि | र्वि | ष | द | ग | खो | च | क | | |
| बो | च | रा | क | नि | ड | झों | ब | णा | रा |
| | | | | ष्ठ | क | | | खे | |
| | | टो | क | दा | र | | | ळ | ब |
| अ | स | भ्य | | | | मा | र्मि | क | ट |
| | ति | र | क | स | चा | | | र | ब |
| प्र | स | न्न | | | व | | | | टी |
| | | शा | ब्दि | क | ट | ट | वा | ळ | त |

**बोचरा, टोकदार, खोचक, मार्मिक, खेळकर, खोडकर, चावट, झोंबणारा, द्व्यर्थी, निर्विष, शाब्दिक, प्रसंगनिष्ठ, कुजकट, सूक्ष्म, तरल, प्रसन्न, टवाळ, तिरकस, बटबटीत, असभ्य, भेदक**

# पाठ ४

१. **ग. अ.** १. तुषारला २. वैदेहीला
२. **ख. आ.** १. न २. ल्या ३. त / मध्ये ४. त / मध्ये ५. ही / सुद्धा / देखील
६. समोर ७. साठी ८. चे ९. वर १०. ल ११. पेक्षा

**ॲ.**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | वाचणे | तो वाचणारा, ते वाचणारे<br>ती वाचणारी, त्या वाचणाऱ्या<br>ते वाचणारे, ती वाचणारी | तो वाचलेला, ते वाचलेले<br>ती वाचलेली, त्या वाचलेल्या<br>ते वाचलेले, ती वाचलेली |
| २ | झोपणे | तो झोपणारा, ते झोपणारे<br>ती झोपणारी, त्या झोपणाऱ्या<br>ते झोपणारे, ती झोपणारी | तो झोपलेला, ते झोपलेले<br>ती झोपलेली, त्या झोपलेल्या<br>ते झोपलेले, ती झोपलेली |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | करणे | तो करणारा, ते करणारे<br>ती करणारी, त्या करणाऱ्या<br>ते करणारे, ती करणारी | तो केलेला, ते केलेले<br>ती केलेली, त्या केलेल्या<br>ते केलेले, ती केलेली |
| ४ | होणे | तो होणारा, ते होणारे<br>ती होणारी, त्या होणाऱ्या<br>ते होणारे, ती होणारी | तो झालेला, ते झालेले<br>ती झालेली, त्या झालेल्या<br>ते झालेले, ती झालेली |
| ५ | जेवणे | तो जेवणारा, ते जेवणारे<br>ती जेवणारी, त्या जेवणाऱ्या<br>ते जेवणारे, ती जेवणारी | तो जेवलेला, ते जेवलेले<br>ती जेवलेली, त्या जेवलेल्या<br>ते जेवलेले, ती जेवलेली |
| ६ | येणे | तो येणारा, ते येणारे<br>ती येणारी, त्या येणाऱ्या<br>ते येणारे, ती येणारी | तो आलेला, ते आलेले<br>ती आलेली, त्या आलेल्या<br>ते आलेले, ती आलेली |
| ७ | जाणे | तो जाणारा, ते जाणारे<br>ती जाणारी, त्या जाणाऱ्या<br>ते जाणारे, ती जाणारी | तो गेलेला, ते गेलेले<br>ती गेलेली, त्या गेलेल्या<br>ते गेलेले, ती गेलेली |
| ८ | उरणे | तो उरणारा, ते उरणारे<br>ती उरणारी, त्या उरणाऱ्या<br>ते उरणारे, ती उरणारी | तो उरलेला, ते उरलेले<br>ती उरलेली, त्या उरलेल्या<br>ते उरलेले, ती उरलेली |
| ९ | लिहिणे | तो लिहिणारा, ते लिहिणारे<br>ती लिहिणारी, त्या लिहिणाऱ्या<br>ते लिहिणारे, ती लिहिणारी | तो लिहिलेला, ते लिहिलेले<br>ती लिहिलेली, त्या लिहिलेल्या<br>ते लिहिलेले, ती लिहिलेली |
| १० | पिणे | तो पिणारा, ते पिणारे<br>ती पिणारी, त्या पिणाऱ्या<br>ते पिणारे, ती पिणारी | तो प्यायलेला, ते प्यायलेले<br>ती प्यायलेली , त्या प्यायलेल्या<br>ते प्यायलेले, ती प्यायलेली |
| ११ | गाणे | तो गाणारा, ते गाणारे<br>ती गाणारी, त्या गाणाऱ्या<br>ते गाणारे, ती गाणारी | तो गायलेला, ते गायलेले<br>ती गायलेली, त्या गायलेल्या<br>ते गायलेले, ती गायलेली |
| १२ | जगणे | तो जगणारा, ते जगणारे<br>ती जगणारी, त्या जगणाऱ्या<br>ते जगणारे, ती जगणारी | तो जगलेला, ते जगलेले<br>ती जगलेली, त्या जगलेल्या<br>ते जगलेले, ती जगलेली |
| १३ | अनुभवणे | तो अनुभवणारा, ते अनुभवणारे<br>ती अनुभवणारी, त्या अनुभवणाऱ्या<br>ते अनुभवणारे, ती अनुभवणारी | तो अनुभवलेला, ते अनुभवलेले<br>ती अनुभवलेली, त्या अनुभवलेल्या<br>ते अनुभवलेले, ती अनुभवलेली |

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | देणे | तो देणारा, ते देणारे<br>ती देणारी, त्या देणाऱ्या<br>ते देणारे, ती देणारी | तो दिलेला, ते दिलेले<br>ती दिलेली, त्या दिलेल्या<br>ते दिलेले, ती दिलेली |
| १५ | घेणे | तो घेणारा, ते घेणारे<br>ती घेणारी, त्या घेणाऱ्या<br>ते घेणारे, ती घेणारी | तो घेतलेला, ते घेतलेले<br>ती घेतलेली, त्या घेतलेल्या<br>ते घेतलेले, ती घेतलेली |
| १६ | सांगणे | तो सांगणारा, ते सांगणारे<br>ती सांगणारी, त्या सांगणाऱ्या<br>ते सांगणारे, ती सांगणारी | तो सांगितलेला, ते सांगितलेले<br>ती सांगितलेली, त्या सांगितलेल्या<br>ते सांगितलेले, ती सांगितलेली |
| १७ | वाजवणे | तो वाजवणारा, ते वाजवणारे<br>ती वाजवणारी, त्या वाजवणाऱ्या<br>ते वाजवणारे, ती वाजवणारी | तो वाजवलेला, ते वाजवलेले<br>ती वाजवलेली, त्या वाजवलेल्या<br>ते वाजवलेले, ती वाजवलेली |

**ऐ.** १. विद्यार्थी : सर, माझा थोडा गृहपाठ झाला आहे, थोडा अजून राहिला आहे.
शिक्षक : बरं. मग झालेला मला दाखव.
विद्यार्थी : आणि राहिलेल्याचं काय करू?
शिक्षक : राहिलेला तुझ्या आई-बाबांना दाखव.

२. मित्र : अरे, तू सुचवलेलं पुस्तक थोडंच वाचून झालंय माझं, अजून बरंच उरलंय.
मी : बरं. मग वाचून झालेल्यावर चर्चा करू.
विद्यार्थी : आणि उरलेल्याचं काय करू?
शिक्षक : उरलेलं विसर आता.

३. शिक्षक : (मुख्याध्यापकांना) सर, तुम्ही म्हणताय सर्व मुलांना शिक्षा करा. पण काहीच मुलं दंगा करतायत. काही जण शांत बसले आहेत.
मुख्याध्यापक : बरं. मग फक्त दंगा करणाऱ्यांना शिक्षा करा.
शिक्षक : आणि शांत बसलेल्यांचं काय करू?
मुख्याध्यापक : शांत बसलेल्यांचं कौतुक करा.

४. नाट्यगृहाचे व्यवस्थापक : हे बघा, सगळ्याच प्रेक्षकांना हाकलता येणार नाही. त्यातले काही जणच फोनवर बोलतायत, बाकीचे तर शांतपणे नाटक पाहतायत.
नट : बरं. मग फक्त फोनवर बोलणाऱ्यांना हाकला.
नाट्यगृहाचे व्यवस्थापक : आणि शांतपणे नाटक पाहणाऱ्यांचं काय करू?
नट : शांतपणे नाटक पाहणारे राहू द्या.

५. मैत्रीण : नाही रे, माझी गोष्ट लिहून नाही झाली अजून. बऱ्यापैकी सुचलं आहे, पण अजून बरंच सुचलं नाहीय.
मी : बरं. मग सुचलेलं लिहून काढ ना आधी.
मैत्रीण : आणि न सुचलेल्याचं काय करू?
मी : न सुचलेलं सुचेल मग.

**४.** **क.** अ. दिक् + दर्शन = दिग् + दर्शन आ. दिक् + विजय = दिग् + विजय
इ. आपद् + काल = आपत् + काल
**ख.** अ. जगदीश्वर आ. सद्वर्तन इ. पितृच्छाया

# पाठ ५

१. **क.** अ-५ आ-७ इ-४ ई-८ उ-६ ऊ-१ ए-३
**ख.** अ - सहावे शतक आ - दहावे शतक इ - बारावे शतक ई - सोळाशेवीस ते सतराशेवीस ऊ - सतराशेवीस ते अठराशेवीस ऊ - एकोणिसावे शतक
**ग.** आ - साधारण सहाव्या शतकापासून इ - साधारण दहाव्या शतकापासून

२. **क.** अ-६ आ-१० इ-४ ई-१३ उ-१ ऊ-९ ए-१२ ॲ-५ ऐ-११ ओ-८ औ-७ अं-२ अः-३
**ख.** अ-३ आ-५ इ-७ ई-८ उ-४ ऊ-१ ए-२ ॲ-६
**ग.** अ-३ आ-१ इ-५ ई-६ उ-२ ऊ-८ ए-४ ॲ. ७
**घ.** अ-४ आ-३ इ-२ ई-१
**च.** अ-४ आ-६ इ-५ ई-१ उ-२ ऊ-३

४. **क.** अ. 'शिस्तीत बसा' – आरामात बसा आ. 'शिस्तीत होऊ द्या' – घाई करू नका. सावकाश जेवा. इ. 'शिस्तीत बोला' – सावकाश बोला. ई. शिस्तीत सांगा – नीट सांगा
**ख.** अ. मोळे = खिळे आ. उभारलेत = उभे राहिले आहेत. इ. यायलेत = यायला लागलेत ई. करायलेत = करायला लागलेत

५. **क.** अ. माळा-, माळ, माळ, माळ आ. हार, हार इ. गळ, गळाला ई. मुका, मुका उ. शिरा-, शिरा, शिरा ऊ. जागा, जागा, जागा ए. जर, जर, जर ॲ. दर, दर
**ख.** अ. खणात, खण आ. नाद, नाद, नादात इ. गाठ, गाठ ई. १. भरती २. भरतीच्या उ. वार, वार
**ग.** अ. १. कडा २. कडी आ. १. घर २. घार इ. १. चाळ, चाळभर २. चाळा ई. १. शिडात २. शिडी उ. १. तार २. तारा ऊ. १. ढग २. ढीग
**घ.** तिन्ही लिंगांत असलेली सजीवांची काही नामे

| | **पुल्लिंगी नामे** | **स्त्रीलिंगी नामे** | **नपुंसकलिंगी नामे** |
|---|---|---|---|
| अ. | तो – मुलगा | ती – मुलगी | ते – मूल |
| आ. | तो – कुत्रा | ती – कुत्री | ते – पिल्लू |
| इ. | तो – घोडा | ती – घोडी | ते – शिंगरू |
| ई. | तो – बैल | ती – गाय | ते – वासरू |
| उ. | तो – मेंढा | ती – मेंढी | ते – मेंढरू / कोकरू |
| ऊ. | तो – चिमणा | ती – चिमणी | ते – पाखरू |

**च.**

| | **नाम** | **क्रियापद** |
|---|---|---|
| अ. | वाट | लावणे, फुटणे |
| आ. | दम | देणे, धरणे |

| | | |
|---|---|---|
| इ. | संधी | साधणे, मिळणे |
| ई. | मार्ग | काढणे, दाखवणे |
| उ. | बळी | देणे, पडणे |
| ऊ. | गंडा | घालणे, बांधणे |
| ए. | पाय | धरणे, ओढणे |
| ॲ. | वेळ | येणे, साधणे |

**छ.**

| | | |
|---|---|---|
| अ. | १. | मी इतक्या परिश्रमांनी हा पत्त्यांचा बंगला बांधला. जयूनं एकच फुंकर मारली आणि माझ्या सगळ्या मेहनतीची वाट लावली. |
| | २. | पुराच्या लोंढ्यापासून वाचण्यासाठी लोक वाट फुटेल तिकडे सैरावैरा धावू लागले. |
| आ. | १. | नव्या शाळेतली मुलं मला सारखी छळत होती. शेवटी माझ्या बाबांनी त्यांना असा दम दिला की त्यांनी परत मला छळण्याचा विचारही केला नाही. |
| | २. | रडणाऱ्या बाळाला आई म्हणाली, "जरा दम धर सोन्या, भात शिजत आलाय." |
| इ. | १. | कोणी नसल्याची संधी साधून चोर घरात शिरला. |
| | २. | घरात कोणीच नव्हते. चोराला चांगलीच संधी मिळाली. |
| ई. | १. | ह्या कठीण परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी मला तुमची मदत लागेल. |
| | २. | तुम्ही दाखवलेल्या मार्गावर मी नक्कीच चालेन. |
| उ. | १. | बळी देण्याची प्रथा बंद करण्यासाठी त्या समाजसेवकाने खूप प्रयत्न केले. |
| | २. | मी माझ्याकडून खूप प्रयत्न केले, पण माझ्यावर विश्वास न ठेवता गावकरी अंधश्रद्धेला बळी पडले. |
| ऊ. | १. | त्या वित्तसंस्थेला खूप मोठा गंडा घालून त्याने परदेशी पलायन केले. |
| | २. | महेशनं आता गानमहर्षी बाळमहाराजांचा गंडा बांधला आहे. |
| ए. | १. | परिस्थितीला शरण जाऊन शेवटी मला माझ्या वैऱ्याचेच पाय धरावे लागले. |
| | २. | मला मदत करणार नसशील तर निदान माझे पाय ओढू तरी नकोस. |
| ॲ. | १. | वेळ आली की मी तुला सगळे सांगणारच आहे. तोवर जरा कळ सोस. |
| | २. | आई-बाबा घरात नव्हते. तीच वेळ साधून मी हळूच फ्रीजमधलं आईसक्रीम खाल्लं. |

**ज.**

| | |
|---|---|
| अ. समान X असमान | आ. पराजित X अपराजित |
| इ. पूर्ण X अपूर्ण | ई. रोजगारी X बेरोजगारी |

| | |
|---|---|
| उ. योग्य X अयोग्य | ऊ. खूश X नाखूश |
| ए. इमानी X बेइमानी | ॲ. शांत X अशांत |
| ऐ. पर्वा X बेपर्वा | ओ. वाजवी X गैरवाजवी |
| ऑ. विरोध X बिनविरोध | औ. मंजूर X नामंजूर |
| अं. व्यवहार X गैरव्यवहार | अः. इज्जत X बेइज्जत |

**झ.** अ. प्रभाव, अभावाच्या, निभाव आ. स्वस्त, मस्त, भिस्त
इ. प्रचलित, स्वयंचलित, विचलित ई. अक्कल, शक्कल, टक्कल, नक्कल

६. सुमारे पावणेतीनशे वर्षांपूर्वी एक मोठा मुत्सद्दी महाराष्ट्रात होऊन गेला. नाना फडणीस त्याचं नाव. त्याच्या हुशारीबद्दल बऱ्याच गोष्टी प्रसिद्ध आहेत. त्यातलीच ही गोष्ट.

एकदा पुण्याच्या दरबारात एक बाहेरगावचा ब्राह्मण आला. त्याला पुष्कळ भाषा बोलता येत होत्या आणि प्रत्येक भाषेवर त्याचं एवढं प्रभुत्व होतं, की त्याची मातृभाषा कुठली हे सांगता येणं अवघड होतं. त्यानं दरबारातील लोकांना आव्हानच दिलं, 'माझी मातृभाषा ओळखा!' अनेकांनी प्रयत्न केला, पण त्यांना जमलं नाही. अखेर नाना फडणिसानं ते आव्हान स्वीकारलं, की 'चोवीस तासांत तुमची मातृभाषा कुठली ते सांगतो'.

क. नानानं त्या ब्राह्मणाला आपल्या घरी राहायला बोलावलं. त्याच्याशी आडव्यातिडव्या खूप गप्पा मारल्या. तो ब्राह्मण अर्थातच खूप सावधपणं उत्तरं देत होता. अखेर रात्री झोपायची वेळ झाली. ब्राह्मणाचा बिछाना आपल्या शेजारीच घालायची नानानं सोय केली होती. मध्यरात्री नाना उठला. शेजारचा पाहुणा गाढ झोपलाय अशी त्यानं खात्री करून घेतली आणि थंड पाण्याचा एक लोटा त्याच्या अंगावर रिता केला!

पाहुणा कोकलत उठला. नानानं त्याची क्षमा मागितली आणि घरातल्या मांजरानं चुकून पाणी सांडलं असं सांगितलं. त्याला नवी वस्त्रं व बिछाना देऊन परत झोपवलं.

दुसऱ्या दिवशी दरबारात नानानं पाहुण्याला सांगितलं, 'तुमची मातृभाषा कानडी आहे.' नानाचा अंदाज बरोबर असल्याचं त्या ब्राह्मणानं कबूल केलं. नानानं त्याची भाषा कशी ओळखली?

ख. रात्री अचानक झोपेतून उठल्यावर त्या ब्राह्मणानं जे शब्द उच्चारले ते कानडी भाषेत होते. माणूस मनातल्या मनात विचार करायला जी भाषा वापरतो ती त्याची सर्वांत जवळची भाषा – बहुतकरून जिला आपण मातृभाषा म्हणतो ती – असते.

७. क. फडफड, चुरचुर ख. खरखर, कलकलाटामुळे - ग. गडगडाट, लखलखाट
घ. गडबड च. बडबड

८. क. करमणूक ख. वागणूक ग. जपणूक घ. वर्तणूक च. पिळवणूक छ. साठवणूक

९. क. मणाचं ख. मनात ग. घन घ. घण च. तण छ. तन ज. काना झ. काणा
ट. जण ठ. जनात

११. **क.** अ. सम् + आप्त आ. दुष् + प्राप्य इ. निर् + अंकुश
**ख.** अ. संचालन आ. यशोधन इ. सज्जन

# पाठ ६

१. क.

| | |
|---|---|
| अ. | स्वामी विवेकानंद ह्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ १२ जानेवारी रोजी युवादिन साजरा केला जातो. |
| आ. | राष्ट्रीय विज्ञानदिन २८ फेब्रुवारी रोजी सर चंद्रशेखर वेंकट रमण ह्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ साजरा करतात. |
| इ. | २७ फेब्रुवारी ह्या दिवशी मराठी भाषादिन कवी विष्णू वामन शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज ह्यांच्या स्मरणार्थ साजरा करतात. |
| ई. | डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन ह्यांची आठवण म्हणून ५ सप्टेंबरला शिक्षकदिन साजरा होतो. |
| उ. | जागतिक पर्यावरणदिन ५ जून रोजी साजरा करण्याचे संयुक्त राष्ट्रांनी ठरवले आहे. |
| ऊ. | श्रीनिवास रामानुजन ह्यांची आठवण २२ डिसेंबरला गणितदिन साजरा करून करतात. |
| ए. | २९ ऑगस्ट हा दिवस हॉकीपटू मेजर ध्यानचंद ह्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ क्रीडादिन म्हणून साजरा करतात. |

**ख.** अ. पालवली आ. नादावलेल्या इ. धास्तावतात ई. आयोजिले उ. अभ्यासून ऊ. हाताळले ए. शोभत

२. **क.** अ. सूड आ. टवाळखोर इ. आपत्ती ई. सहनशील उ. स्नेही
**घ.** अ. गोव्याचा चित्रपटमहोत्सव आ. सवाई गंधर्व महोत्सव इ. साहित्यसंमेलन ई. मुंबईचा काळा घोडा महोत्सव उ. जयपूर लिटफेस्ट ऊ. नाट्यमहोत्सव

३. **क.** अ. चक्रावणे, आ. हाताळणे, इ. गोंधळणे, ई. कंटाळणे, उ. मोहरणे, ऊ. डागाळणे
**ख.** अ. डागाळली, आ. चक्रावले, इ. हाताळलाय, ई. कंटाळते, उ. मोहरली, ऊ. गोंधळली
**ग.** अ. अंकुरले – तो अंकुर – अंकुरणे आ. पालवले – ती पालवी – पालवणे इ. डोकावली – ते डोके – डोकावणे ई. फुलारली – तो फुलोरा – फुलारणे उ. गंधाळले – तो गंध – गंधाळणे ऊ. दरवळे – तो दरवळ – दरवळणे ए. सुखावले – सुख – सुखावणे अॅ. आनंदले – तो आनंद – आनंदणे ऐ. बहरले – तो बहर – बहरणे ओ. फळले – ते फळ – फळणे
**घ.** अ. खूण करत होता आ. इतक्या लहान वयात इतक्या जबाबदारीच्या पदाचा तो स्वीकार करेल असं --- इ. भाजीला चांगली दहा मिनिटं वाफ दे. ई. तुला इतकी पावलोपावली ठेच लागतेय ---- उ. त्या दोन दुरावलेल्या मित्रांची भेट घडवली.

४. **क.** अ. विरंगुळा आ. शेत इ. ताठ ई. गाठ उ. तऱ्हेवाईक
**ख.** अ. घर, दही आ. पाणी, वैर
**ग.** अ. भीती, अस्वस्थ, परकं, उपरं, उदास, भ्यालेलं मन आ. सुखाच्या आठवणींची चित्रे काढते, सुंदर नाद ऐकते इ. गोंड स्त्रियांचे वास्तव्य पारव्याच्या अवतीभवतीच्या जंगलात

असते. ह्या स्त्रिया दिवाळीत गात गात घोळक्याने गावात येतात. भद्र लोकांच्या अंगणात गात गात समूहनृत्य करतात. ह्या ताठ, डौलदार चालणाऱ्या, अभिमानी असतात. ह्या स्त्रिया मनमुक्त, आनंदी असतात. ह्या भीक घेत नाहीत. आपल्या गाण्यातून आणि नृत्यातून त्या आनंदाचे व उल्हासाचे वाटप करतात.   ई. गोंड स्त्रिया लयबद्ध मंडलाकार नाचतात आणि साथीला 'रीरीरी रीरीरी रीरीरी रीरीऽऽऽ' असे समूहगानही गातात. त्यांचे पाय उत्साहाने थिरकतात.   उ. हे आदिम संगीत. हुंकारणारी गर्द अरण्ये हे संगीत आमच्या अंगणातच आणतात व मन नित्याची लय सोडून आपोआप निसर्गलय पकडते.

५. क. बरोबर/समवेत/सह   ख. सहित/सकट   ग. निशी   घ. सह/समवेत/बरोबर
च. सवे/ बरोबर   छ. संगे/बरोबर   ज. सकट/सहित   झ. बरोबर/समवेत

६. **ग.** अ.रौप्य महोत्सव   आ. (लग्न) कार्य   इ. सुवर्णमहोत्सव   ई. कार्याला   उ. षष्ठ्यब्दीपूर्ती
**घ.** अ. आले   आ. क्रियाकर्म   इ. मनुष्य   ई. निर्धन   उ. कोहळा   ऊ. खूण करणे
ए. चावणे   ॲ. दांडी मारणे
**च.**

| | **प्रसंग** | **सण / उत्सव / समारंभ / महोत्सव / सोहळा / कार्यक्रम** | **आयोजित करणे / साजरा करणे** |
|---|---|---|---|
| अ | चित्रपट | महोत्सव | आयोजित करणे / साजरा करणे |
| आ | होळी | सण | साजरा करणे |
| इ | परिषद | कार्यक्रम | आयोजित करणे |
| ई | बक्षीस | समारंभ | आयोजित करणे |
| उ | ईद | सण | साजरा करणे |
| ऊ | कार्यशाळा | कार्यक्रम | आयोजित करणे |
| ए | नाताळ | सण | साजरा करणे |
| ॲ | चर्चासत्र | कार्यक्रम | आयोजित करणे |
| ऐ | व्याख्यान | कार्यक्रम | आयोजित करणे |
| ओ | वाढदिवस | समारंभ / सोहळा | साजरा करणे |
| ऑ | संगीत | महोत्सव / कार्यक्रम | साजरा करणे / आयोजित करणे |
| औ | सुवर्ण | महोत्सव | साजरा करणे / आयोजित करणे |

७. **क.** अ. नि: + तेज   आ. तेज: + पुंज   इ. नि: + फळ
**ख.** १. निष्काम   २. अधःपतन   ३. निश्चल

८. **क.** अ. – १०   आ. – ३   इ. – १   ई. – ९   उ. – ४   ऊ. – २   ए. – ६   ॲ. – ५
ऐ. – ८   ओ. – ७
**ख.** अ. दातखीळ बसली   आ. स्तोम माजवते, आव आणतात, खुशीच्या उकळ्या फुटत

इ. डरकाळी फोडली, थरकाप उडतो ई. अपरूप वाटायचे उ. धूम ठोकली ऊ. लाडीगोडी लावत होती, मागणी करणार, खात्री पटली

९. अ. पंडित आ. दैनिक इ. उस्ताद ई. डॉक्टर उ. दिनांक ऊ. आपला / आपली ए. कैलासवासी ॲ. ताजा कलम ऐ. माननीय ओ. प्रमुख भूमिका ऑ. चिरंजीव सौभाग्यकांक्षिणी औ. कळावे लोभ असावा अं. सप्रेम नमस्कार विनंती विशेष अः. उदाहरणार्थ

१०. **क.** अ. पाचोळा आ. कुशीत इ. लुसलुशीत ई. चाहूल, झेपावले उ. कोवळ्या

११. अ. – १ आ. – ६ इ. – ८ ई. – ३ उ. – ७ ऊ. – २ ए. – ४ ॲ. – ५

१२. अ. हिरवीगार झाडी आ. वेडावाकडा रस्ता इ. पांढरेशुभ्र दात ई. हलकाफुलका आहार उ. काळानिळा गुडघा ऊ. पिवळाजर्द साप ए. निम्माशिम्मा पिझ्झा ॲ. गोरंगोमटं बाळ

# पाठ ७

१. **इ.** १. गूढ, २. दुबळा, ३. तर्कसंगत, ४. व्यक्त, ५. प्रगती, ६. प्रेम, ७. भक्तिभाव, ८. राग, ९. द्वेषभावना, १०. भावना, ११. जटिल, १२. अपमान, १३. अन्याय. १४. वेदना, १५. सूड, १६. आनंदीआनंद, १७. द्वेष

**ऊ. १. कोप :** कोपणे / कोप होणे, कोप करणे / कोपिष्ट / कोपाने इ॰ **२. प्रेम :** प्रेमी, प्रेमभंग / प्रेम करणे, प्रेम असणे, प्रेम वाटणे, प्रेमात पडणे, प्रेम उतू जाणे, प्रेम आटणे / प्रेमळ / प्रेमाने, प्रेमपूर्वक इ॰, **३. लोभ :** लोभी / लोभ सोडणे, लोभ असणे / लोभस / लोभाने इ॰, **४. उदासीनता :** उदासी, औदासीन्य / उदास वाटणे, उदासीनता घालवणे / उदास, उदासीन, उदासवाणा / उदासीनतेने इ॰, **५. आनंद :** आनंदणे / आनंद वाटणे, आनंद देणे, आनंद मिळवणे, आनंद विरणे, आनंद उतू जाणे / आनंदी, आनंदमय / आनंदाने, आनंदपूर्वक, आनंदून इ॰ **६. राग :** रागराग / रागावणे / राग करणे, राग आवरणे, राग घालवणे, राग गिळणे, रागावून राग ओसंडणे, राग उफाळून येणे, राग ओसरणे, राग थंड होणे, रागाने / रागीट / रागाने, रागावून, रागारागाने इ॰ **७. क्रोध :** क्रोधी / क्रोध करणे, क्रोध येणे / क्रोधाने इ॰ **८. गोड :** गोडी, गोडवा / गोडवा असणे, गोडी लावणे, गोडी लागणे / गोडीने इ॰ **९. स्थिर :** स्थैर्य, स्थिरता / स्थैर्य राखणे, स्थैर्य मिळवणे, स्थिर होणे / स्थिरतेने इ॰ **१०. अभिमानी :** अभिमान / अभिमान वाटणे / अभिमानाने, अभिमानपूर्वक इ॰ **११. आग्रह :** आग्रह करणे, आग्रह धरणे, आग्रह टाळणे / आग्रही / आग्रहपूर्वक, आग्रहाने इ॰ **१२. तडफड :** तडफडाट / तडफडणे / तडफड होणे / तडफडून इ॰ **१३. हाव :** हाव असणे, हाव सुटणे / हावरा, हावरट / हावेने इ॰ **१४. हट्ट :** हट्ट करणे, हट्ट सोडणे, हट्ट धरणे, हट्ट असणे, हट्ट पुरवणे / हट्टी / हट्टाने इ॰, **१५. इच्छा :** इच्छुक / इच्छिणे / इच्छा वाटणे, इच्छा बाळगणे, इच्छा सोडणे, इच्छा करणे / ऐच्छिक / इच्छेने इ॰ **१६. लाज :** लाजणे / लाज बाळगणे, लाज वाटणे, लाज काढणे, लाज असणे, लाज सोडणे / लाजिरवाणे, लाजाळू, लाजरा, लाजरी / लाजून, लाजेने इ॰

५. **ग.** अ. १. बेदरकार २. घाबरा झाला ३. माझा निभाव लागणार ४. पायदळी ५. झुरणाऱ्या ६. निबर झाले ७. सोशिक ८. अंधुकशा

६. **क.** अ. होय आ. होय इ. होय ई. होय उ. होय

**ख.** अ. हो की! आ. होय हो इ. हो की नाही?

**ग.** अ. होच मुळी! आ. होय की नाही? इ. होय बाई ई. 'हो'ला 'हो' उ. हो क्का!

# पाठ ८

१. क. बालगीत ख. बडबडगीत ग. भक्तिगीत घ. समूहगीत च. स्फूर्तिगीत छ. समरगीत ज. युगुलगीत झ. लोकगीत ट. कोळीगीत ठ. विरहगीत ड. प्रेमगीत

२. क. भारूड, ख. गवळण, ग. विरहिणी, घ. धृवपद, च. कीर्तन, छ. भजन, ज. वात्रटिका

३. क. विरहगीत ख. बालगीत / बडबडगीत ग. समरगीत घ. भजन च. वात्रटिका छ. भावगीत ज. गवळण

४.

| | कवीचे नाव | टोपणनाव |
|---|---|---|

५. क. हरी, श्रीपती, अनाथनाथा, देवा ख. पापी-मती-श्रीपती, पाठी-दृष्टी, येथे-अनंते

६. ख. इथे, बाळ, चारा, पाणी, डोक्यावरून, भुर्रकन्

७. ५ – ३ – १ – ४ – २

८.

| | |
|---|---|
| लहान माझी बाहुली<br>मोठी तिची सावली<br>घारे डोळे फिरवीते<br>लुकुलुकु ही पाहते<br>नकटे नाक उडवीते<br>गोबरे गाल फुगवीते<br>दांत कांही घासत नाहीं<br>अंग कांही धूत नाहीं | भात केला, करपुन गेला!<br>पोळ्या केल्या, कच्च्या झाल्या!<br>वरण केले, पातळ झालें<br>तूप सगळे सांडून गेले<br>असे भुकेले नक्का जाऊ<br>थांबा करतें गोड खाऊ<br>केळ्याचे शिकरण करायला गेली<br>दोनच पडले दात<br>आडाचे पाणी काढायला गेली<br>धपकन् पडली आत! |

९. क. ह्या तीन ओळी असणाऱ्या काव्यप्रकाराला हायकू म्हणतात
ख. माझ्या लाडक्या कवीने मला भेट म्हणून दिलेले हे पेन माझ्यासाठी फार मौल्यवान आहे.
ग. 'कविता' असं लिहिलेल्या त्या खोक्यात तुला आवश्यक ती सर्व पुस्तकं सापडतील.
घ. गेल्या आठवड्यात मी तुमच्याकडून विकत घेतलेल्या ह्या पुस्तकातील काही पाने कोरीच आहेत.
च. फक्त कवितेच्या भाषेतच बोलणाऱ्या ह्या मुलीचे बोलणे बऱ्याच लोकांना कळत नाही.
छ. अनेक पुरस्कार मिळवलेल्या ह्या कवीचे बहुतेक सर्व काव्यसंग्रह माझ्याकडे आहेत.

१०. क. मनास येत ख. मनात नक्कीच काहीतरी काळंबेरं आहे. ग. मनातलं मनातच ठेवतो घ. दुखऱ्या मनावर फुंकर घालणं च. मन मारत छ. मनाला भिडलं ज. मनाला लागतं झ. मनावर दगड ठेवून ट. मन ... खातंय ठ. मनाला मुरड घाल

११. १. विचारलं २. ओरडली ३. पुटपुटली ४. बजावलं ५. तणतणली ६. किंचाळली ७. बोलतेस ८. खेकसली ९. कुजबुजतंय १०. दरडावलं ११. कुरकुरली १२. बोलू १३. सांगू १४. गरजल्या १५. खडसावलं १६. चीत्कारला १७. म्हणाल्या

१२. क. आरडाओरडा ख. शिवाशिवी ग. धावाधाव घ. मारामारी च. चिडवाचिडवी छ. पळापळ ज. ढकलाढकली झ. चेंगराचेंगरी ट. रडारड

१३. क. कविता : करणे, गाणे, म्हणणे, लिहिणे, वाचणे, ऐकणे, रचणे, स्फुरणे, जगणे, जुळवणे, उतरवणे, खरडणे
ख. नाटक : करणे, लिहिणे, वाचणे, ऐकणे, रचणे, पाहणे, खरडणे, उतरवणे, बसवणे, पडणे, पाडणे, चालणे
ग. भांडण : होणे, करणे, लावणे, ऐकणे, रचणे, पाहणे, मिटवणे, सोडवणे, बघणे
घ. गोंधळ : होणे, करणे, ऐकणे, घालणे, पाहणे, मिटवणे, बघणे, निस्तरणे
१५. जबाबदारी, ओझं, धनुष्य, काम, शिवधनुष्य (अनेक उत्तरे शक्य)
१६. क. कोणीही ख. कोण – कधी – काय, कोण – कधी – कशासाठी ग. कोणाची घ. कोणाला च. कशाची
१७. क. मला ख. माझा/माझी/माझे ग. तुझा/तुझी/तुझे घ. तुझ्या च. तुला छ. मला ज. यासाठी झ. आपले ट. माझ्या ठ. तुला
१८. क. पडणे, निर्माण होणे, सुटणे, सोडवणे (अनेक उत्तरे शक्य)
२०. क. अ. शीळ आ. स्वच्छंदी इ. लंघणे ई. लखलखते उ. रडीचा डाव खाणे ऊ. अर्पणे ए. आस्तिक
ख. अ – मी आ. – तो इ. – मी ई. – मी उ. – तो ऊ. – तो ए. – मी ॲ. – तो

## पाठ ९

३. जे ह्या गोष्टी करतात त्यांना संस्कारी म्हटले, तर मग हीच माणसे अनेकदा स्वतःच्या घरातील कचरा काढून तो घराबाहेर फेकताना, वेळीअवेळी फटाके फोडताना दिसतात. जे असे वागतात त्यांना काय म्हणावे? जे सार्वजनिक स्वच्छतागृहात नीट पाणीही ओतत नाहीत, त्यांना काय म्हणावे? जे पान खाऊन जागोजागी थुंकतात, त्यांना काय म्हणावे? जे रस्त्यात, सिनेमागृहात, नाट्यगृहात, अगदी कोठेही मोबाईल फोनवर मोठमोठ्याने बोलून आपले खाजगी आयुष्य सार्वजनिक करतात, आणि लोकांच्या कानांवर अत्याचार करतात, त्यांना काय म्हणावे? जो रहदारीच्या नियमांचे पावलोपावली उल्लंघन करतो, त्याला काय म्हणावे आणि त्याच्या चुकीची जाणीव करून देण्याचा जो प्रयत्न करतो त्याला 'तुझ्या बापाचा रस्ता आहे का?' असे जो सुनावतो, त्याला काय म्हणावे?
४. क. होयबा ख. होयबा ग. हो ला हो करतो घ. होयबा च. हो ला हो छ. हो ला हो करत ज. होकार देते झ. होयबा ट. होयबा
७. **ख.** १. पदोपदी २. तिळमात्र ३. दुष्कर ४. दैनंदिन ५. रवाना करणे ६. डांबून ठेवणे ७. अविरत ८. निगडीत होणे ९. धुडगूस १०. संकल्प सोडणे ११. अत्यल्प १२. वास्तव १३. बहुसंख्य १४. आरंभ १५. दाहक १६. वंचित १७. संवाद साधणे
**ग.** समुपदेशक म्हणून ह्या आदिवासी भागातील शाळेत मी कामाला सुरुवात केली त्यावेळी माझ्या कामात पावलोपावली अडथळे येणार आहेत ह्याची जराही कल्पना मला नव्हती. एक तर शाळेतील बरेच शिक्षक ह्या समुपदेशनाच्या कल्पनेच्या विरोधात होते, त्यामुळे शाळेतील सर्वात अंधारी आणि भकास खोली माझ्या वाट्याला आली. शाळेतील नाठाळ, व्रात्य, अभ्यास न करणाऱ्या मुलांना माझ्याकडे पाठवलं जाईल आणि मी त्यांच्याशी बोलून त्यांचं समुपदेशन करावं असं मला सांगण्यात आलं होतं. प्रत्यक्षात ज्या मुलांना वर्गात सांभाळणं शिक्षकांना अवघड / कठीण होई अशी मुलं माझ्याकडे पाठवली जात आणि पुढील तासभर माझ्या खोलीत त्यांना कोंडून ठेवण्यात येई. त्यांच्यावर सतत पहारा करणं अशक्यच

होतं. त्यांचा गोंधळ / त्यांची मस्ती मला दिवसभर सहन करावा / करावी लागे. त्या मुलांपैकी ज्यांच्याशी मी बोलू शकले असते, अशा मुलांची संख्या अत्यंत कमी होती. शाळेत तशीही समाजातील अभावग्रस्त वर्गातून आलेल्या मुलांची संख्याच जास्त होती. त्यांच्याशी बोलताना त्यांच्या रोजच्या जीवनातील खरी परिस्थिती किती चटके देणारी / जाळणारी आहे ह्याची कल्पना मला आली. असं वरवरचं समुपदेशन करून ह्यांच्या परिस्थितीत काही सुधारणा होणार नाही हे माझ्या लक्षात आलं, आणि म्हणूनच ही शाळेतली नोकरी सोडण्याचं आणि इथल्या वस्तीसाठी काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थेशी संलग्न होण्याचं / जोडलं जाण्याचं मी ठरवलं.

८. **क.** अ. – ३ आ. – ५ इ. – ८ ई. – १० उ. – ४ ऊ. – १ ए. – ११ ॲ. – ७ ऐ. – ९ ओ. – ६ ऑ. – २

**ख.** अ. तोंड काळं करशील आ. तोंड सोडते इ. तोफेच्या तोंडी दिलेयस ई. तोंडात मारून घेतलं उ. तोंडघशी पाडलं ऊ. तोंड वासून पाहत राहिले ए. तोंडाला कुलूप लावलं ॲ. तोंडाला पाणी सुटलं ऐ. तुझ्या तोंडात साखर पडो! ओ. तोंडचं पाणी पळालं ऑ. तोंडात शेण घालतील

**ग.** अ. लोटणे, ढकलणे, टाकणे आ. सापडणे, अडकणे, पडणे

**घ.** अ. सापडू / अडकू / पडू आ. लोटलं / ढकललं / टाकलं इ. लोटण्या- / ढकलण्या- / टाकण्या- ई. लोटलं / ढकललं / टाकलं उ. सापडलोय / अडकलोय / पडलोय ऊ. सापडल्या- / अडकल्या- / पडल्या-

९. **क.** अ. घ्यायला हवी आ. खायला हवं इ. जमायला हवा ई. करायला हवीस उ. द्यायला हवंस ऊ. मिळायला हवी ए. व्हायला हवा ॲ. लागायला हवा ऐ. निघायला हवं

१०. **क.** अ. – ३ आ. – २ इ. – २ ई. – १ उ. – १ ऊ. – ३ ए. – ३ ॲ. – २ ऐ. – ३ ओ. – १ ऑ. – १ औ. – ३ अं. – १

**ख.** अ. बळेच बोट हातात खुपसत गेले आणि करून टाकली सवय वेळीच तुझ्या हातांना चाचपडण्याची, दुसऱ्याचे बोट शोधीत आ. नियमपूर्वक एक ठाशीव 'नाही' देत राहिले, आपल्याला जे करावसं वाटतं ते शक्यतो करायचं नसतं असा दृढ संस्कार करेपर्यंत इ. घराबाहेरच्या अंधारातल्या बागुलबुवांच्या गोष्टी सांगत राहिले, तुला स्वतःलाच बागुलबुवा दिसू लागेपर्यंत ई. खेकसले मी तुझ्यावर – तुला एक जबाबदार भेकड स्त्री बनवण्याचं आणि माझा सांस्कृतिक वारसा तुझ्यापर्यंत पोचवण्याचं माझं ऐतिहासिक कर्तव्य मी पूर्ण केलं होतं.

**ग.** कडवे २ : रस्त्यावर दुडदुड धावताना फ्रॉकचा घेर पकडणाऱ्या तुझ्या हातात तुला नको असताना मी बळेच माझे बोट खुपसत गेले, आणि तुझ्या हातांना दुसऱ्याचे बोट शोधीत चाचपडण्याची सवय वेळीच करून टाकली.

कडवे ३ : पदर ओढीत तू हळूच केलेल्या प्रत्येक मागणीस मी नियमपूर्वक एक ठाशीव 'नाही' देत राहिले, अन् मागे रेंगाळून रस्त्यात दुकानांच्या पायऱ्यांवरून उड्या मारत खिदळणाऱ्या तुला, तुझ्या मनावर दृढ संस्कार करेपर्यंत केवढ्यांदा ओरडत गेले, की जे आपल्याला करावंसं वाटतं, ते शक्यतो करायचं नसतंच.

कडवे ४ : उशीर करून घरी आलेल्या तुला, मी तुला स्वतःलाच बागुलबुवा दिसू लागेपर्यंत घराबाहेरच्या अंधारातल्या अनेक बागुलबुवांच्या गोष्टी सांगत राहिले.

कडवे ५ : अन् जेव्हा मी तुझ्यावर दबलेल्या आवाजात, असं पाय फाकून न बसण्याबद्दल

खेकसले, तेव्हा मी तुला एक जबाबदार भेकड स्त्री बनवण्याचं आणि माझा सांस्कृतिक वारसा तुझ्यापर्यंत पोचवण्याचं माझं ऐतिहासिक कर्तव्य जवळजवळ पुरं केलं होतं.

**११. क.** १. हात – उगारणे, चालवणे, धरणे, मारणे, चोळणे २. धाक – घालणे, दाखवणे, असणे ३. दात – विचकणे, दाखवणे, काढणे ४. पापणी – लवणे, फडफडणे, हलवणे ५. सवय – लावणे, सुटणे, लागणे

**ख.** अ. १. हात उगारत २. हात चालवावे ३. हात चोळत ४. हात धरू ५. हात मारला
आ. १. धाक होता २. धाक घातला होता ३. धाक दाखवू
इ. १. दात विचकायला २. दात काढायची ३. दात दाखवू
ई. १. पापणी फडफडतेय २. पापणी हलवली ३. पापणी लवणे
उ. १. सवयी लावाव्यात २. सवय लागायला, सवय ... सुटत

**घ.** अ. धाक ... आहे आ. भीती वाटते इ. दरारा आहे. ई. भय आहे उ. घसका घेतलाय ऊ. वचक नसेल ए. धास्ती वाटते

# पाठ १०

**१. क. अ.**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १. कि | | २. ओ | ढा | | ३. मा | | | | | ५. प्र |
| | ना | | घ | | ३. का | ठ | | ४. त | | | वा |
| १. झ | रा | | | | | | ४. ना | ला | | ५. डो | ह |
| | | ६. शो | | | ७. ड | | | व | | | |
| | | वा | | ७. ध | ब | ध | बा | | | ८. श्रा | |
| ६. उ | स | ळ | णे | | के | | | | | व | |
| | | | | ९. फ | | | | ८. ध | र | ण | |
| | | १०. भ | | ९. वा | फ | | ११. बं | | | | १२. पू |
| | | र | | रा | | | धा | | १२. ल | ह | र |
| १०. ग | ळ | ती | | | | ११. गा | रा | | | | |

**आ.** १. पांचट २. पाणीदार ३. पाणथळ ४. पाणलोट ५. मुसळधार ६. खोल ७. उथळ ८. नितळ ९. गढूळ १०. निसरडी

**इ.** १. निसरडे २. पाणथळ ३. उथळ ४. पांचट ५. गढूळ ६. खोल ७. नितळ ८. मुसळधार ९. पाणलोट १०. पाणीदार

**ई.** १. मचूळ २. शेवाळलेले ३. शुद्ध ४. तुंबलेले ५. खारे ६. गोडे ७. आंबट ८. तुरट

**उ.** १. जगभर  २. कणभर, मनभर  ३. पोटभर  ४. पानभर  ५. टीचभर, हातभर ढीगभर, नखभर  ६. मूठभर, ओंजळभर  ७. आयुष्यभर  ८. तांब्याभर, हंडाभर ९. घटकाभर  १०. क्षणभर  ११. घागरभर, मैलभर  १२. देशभर  १३. घरभर १४. रात्रभर  १५. दिवसभर

**ऊ.** १. ढांगा  २. उजाड  ३. झंझावातात  ४. फारकत  ५. वजा झाली ६. जिवाभावाचे  ७. संगम  ८. साक्षीने  ९. उदय  १०. नेत्रदीपक  ११. तीर्थक्षेत्र १२. घटका  १३. विसावा  १४. प्रतीक  १५. घोषाने

**३. क. अ.** १. – ग.  २. – थ.  ३. – त.  ४. – ड.  ५. – ख.  ६. – ट.  ७. – ठ. ८. – क.  ९. – ढ.  १०. – छ.  ११. – झ.  १२. – द.  १३. – घ.  १४. – च. १५. – ज.

**४. क. अ.** १. कारभार  २. घडी  ३. निर्णय  ४. योजना  ५. बकाल  ६. हालचाल ७. पक्के  ८. विचारी  ९. सहभाग  १०. दुष्काळी  ११. भूजल  १२. पाझर १३. स्थापन  १४. खाजगी  १५. लोकशाही  १६. वाताहत  १७. स्थलांतर १८. बांध  १९. धूप  २०. पवनचक्की  २१. साठवण  २२. पावले  २३. ध्येयवेड्या २४. कायापालट  २५. लागवड  २६. मतभेद  २७. वार्षिक  २८. पूरक  २९. पालन ३०. पाणीसमस्या

**ख.** अ. झळा  आ. पायपीट  इ. व्यथित  ई. बैठक  उ. मांडणी  ऊ. व्याप्ती ए. एकट्यादुकट्याचं  ॲ. उजाड  ऐ. लोकसहभाग  ओ. विचारविनिमय ऑ. लोकचळवळीचं  औ. विस्तार

**ग. अ.** १. चूक. (पाणी)  २. चूक (नळाला पाणी येत नाहीये.)  ३. बरोबर  ४. चूक (कुंड्यांमधील रोपटी वाळून गेली आहेत.)  ५. बरोबर  ६. चूक (सगळीकडे पाण्याची समस्या दिसत आहे.)

**च. अ.**

**१.** क. मुसळधार  ख. पूरस्थिती  ग. पूरग्रस्तांच्या  घ. पथके

**२.** क. फटका  ख. आस्थापने  ग. नुकसानीचा  घ. अंदाज  च. पाण्याखाली छ. ओसरताच  ज. मर्यादाही

**३.** क. हतबल  ख. रौद्र  ग. आघात  घ. केविलवाणी  च. मृत्युमुखी  छ. उद्ध्वस्त ज. अतिवृष्टीचे  झ. कानाडोळा

**४.** क. महाभयंकर  ख. लचके  ग. थैमान  घ. अनिर्बंध

**५.** क. भीषण  ख. मदतकार्य  ग. आकडा  घ. विस्थापित  च. आपत्ती

१. शास्त्रीय मराठी व्याकरण - मोरो केशव दामले

२. सुगम मराठी व्याकरण - मो. रा. वाळंबे

३. तुमचे आमचे मराठी व्याकरण - श्रीपाद भागवत

४. मराठी शब्दलेखनकोश - यास्मिन शेख

५. शासकीय मराठी शब्दकोश

६. अभिनव मराठी मराठी-इंग्रजी पर्यायशब्दकोश – वि. शं. ठकार

७. महाराष्ट्र शब्दकोश – दाते - कर्वे

८. विस्तारित शब्दरत्नाकर – वा. गो. आपटे

९. शालेय मराठी शब्दकोश

१०. नवनीत इंग्रजी-मराठी शब्दकोश

११. नवनीत मराठी-इंग्रजी शब्दकोश

१२. बृहद् हिंदी कोश

१३. TELC

## Marathi Textbook for Level 5

- Creative exercises, tests, glossary and answer key
- An integrated communicative approach
- Systematic and effective learning of the language
- For young and adult learners
- For classroom study as well as for self learners
- Language skills: Understanding, speaking, reading, writing Marathi

## The set contains:

1. A Textbook
2. A Workbook
3. Entire content with audios and audio-visuals available online
   https://mu.ac.in/mymarathi5

**Visit us:** www.rmvs.marathi.gov.in


मुंबई विद्यापीठ
UNIVERSITY OF MUMBAI

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था, मुंबई
RAJYA MARATHI VIKAS SANSTHA, MUMBAI

000000 000000

**Price:** Rs. 1250 | 25 USD | 20 EUR